# अन्वय / नरहर कुरुंदकर



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. 3233
REFBK-0025463

# अन्वय

## नरहर कुरुंदकर

REFBK-0025463

संपादक :

**प्रा. भु. द. वाडीकर**
उपप्राचार्य, यशवंत महाविद्यालय, नांदेड

**दत्ता भगत**
अधिव्याख्याता, मराठी विभाग पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रकाशक :

नरहर कुरुंदकर साहित्य प्रकाशन संस्था,
१७, शास्त्रीनगर, नांदेड-२

सर्वाधिकार :

श्रीमती प्रभावती कुरुंदकर
५६, भाग्यनगर, नांदेड-२

मुद्रक :

रविंद्र सहानी
प्रगति मुद्रणालय, नांदेड-१

मुखपृष्ठ :

दासू भगत

मुखपृष्ठ छपाई :

ॲक्टिव्ह डिझायनर, नांदेड-२

प्रकाशन दिनांक :

१९ फेब्रुवारी १९८६

मूल्य : रुपये तीस

## दोन शब्द

गुरूवर्य कुरुंदकरांचे असंकलित लेखन प्रकाशित करण्याच्या योजनेतील पहिले पुस्तक 'अभयारण्य'. या उपक्रमातला 'अन्वय' हा दुसरा लेखसंग्रह वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

पहिल्या लेख संग्रहाचा मध्यवर्ती विषय 'स्वातंत्र्य' होता. भारतासारख्या गुलामगिरीचा दीर्घ इतिहास असलेल्या देशात 'स्वातंत्र्य' ह्या आधुनिक मूल्यावर आधारलेले राष्ट्र निर्माण करताना प्रामुख्याने तीन गोष्टींचा अडथळा होतो. राजकारणाच्या सत्तास्पर्धेत आधुनिक मूल्यांची भाषा वापरीत 'एकाधिकारशाही' प्रबल होण्याची भीती असते. सामाजिक अभिसरणात 'जातीयवाद' अडसर होतो आणि राष्ट्राच्या एकात्मतेविरुद्ध 'धर्म' हिंदु-मुसलमानातील तेढ वाढवित नेतो. गेल्या शे-दीडशे वर्षात ह्या तीन अडसरांना दूर करण्यासाठी वेगवेळ्या स्तरांवर ज्या भारतीय व्यक्तींनी प्रयत्न केले, त्यांपैकी आठ व्यक्तींवरील लेख ह्या संग्रहासाठी निवडले आहेत. तेव्हा हे लेख म्हणजे त्या त्या व्यक्तींचे मूल्यमापन नव्हे तर गुरूवर्य कुरुंदकराच्या चिंतनाच्या मध्यवर्ती सूत्राशी अनुबंध सुचवणारे हे लेखन आहे. म्हणूनच श्री माधवकृष्ण ह्यांनी ह्या संग्रहासाठी 'अन्वय' असे सार्थ नाव सुचविले आणि तेंच आम्हाला अत्यंत समर्पक वाटले.

'पंचधारा' नियतकालिकाने गुरुवर्य कुरुंदकरांच्या लेखांची सूची प्रसिद्ध केली आहे. ती पूर्ण नाही. गुरुवर्य कुरुंदकरांच्या घरी उपलब्ध असणाऱ्या कात्रणांच्या आधारे तयार केलेली ती सूची आहे. प्रत्येक लेखाचे कात्रण जपणे, फाईल करणे हे त्यांच्या शिस्तीत बसत नव्हते. त्यामुळे पुस्तक रूपाने प्रसिद्ध होऊ शकेल असे पुष्कळसे लेखन मिळवून ती सूची पूर्ण केली जाणे अत्यंत आवश्यक आहे. ह्या बाबतीत वाचकांनी आम्हास सहकार्य करावे अशी विनंती आम्ही त्यांना करीत आहोत. सूचीत नसलेल्या लेखांची माहिती त्यांनी आमच्याकडे पाठवावी,

प्रस्तुत संग्रहातील काही लेख श्रीमती कुरुंदकर ह्यांनी उपलब्ध करून दिले. पण ह्यातील काही लेख मात्र प्रयत्नपूर्वक मिळवावे लागले. श्री ग. ना अंबेकर ह्यानी 'प्रतोद' च्या गेल्या पंचवीस वर्षाच्या फाईल्स दिल्या. त्यातून काही लेख उतरून घेतले. प्रा. प्रकाश कामतीकर ( सेलू ). प्रा. श्रीनिवास पांडे, प्रा. सोमनाथ रोडे आणि यदुनाथजी थत्ते ह्यांनी स्वतःच्या संग्रहातील लेखांची कात्रणे आमच्याकडे पाठविली. हे सर्व लेख मिळविण्यासाठी सर्वश्री दीपनाथ पत्की, सुरेश जोंधळे आणि किशोर रानडे ह्यांनी विशेष प्रयत्न केले. ह्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

निवडलेल्या लेखांची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामी दिगंबर ढवळे, बाबाराव नरवाडे, कु. सरोज जोशी. कु. दुर्गा देशमुख आणि अनिल येरेकार ह्या आमच्या विद्यार्थी मित्रांनी मदत केली. पुस्तकातील आशयाला साजेसे मुखपृष्ठ श्री दासू भगत हयांनी दिले. त्याची छपाई ॲक्टिव्ह डिझायनरचे मालक श्री दिलीप अष्टपुत्रे हयांनी करून दिली आणि पुस्तक छपाईचे काम प्रगति मुद्रणालयाचे मालक श्री रविंद्र सहानी आणि त्यांचा कुशल कर्मचारी वर्ग हयांनी अल्पावधीत करून दिले. मुद्रिते तपासण्याची जबाबदारी सर्वश्री मधुकर राहेगावकर. जीवन पिंपळवाडकर, शरद देशपांडे, माधव कृष्ण व श्रीनिवास पांडे हयांनी उचलली म्हणूनच हे पुस्तक एवढ्या वेगाने पूर्ण होऊ शकले. ह्या सर्वांचे आभार मानणे औपचारिक ठरेल. कारण ह्यापैकी प्रत्येकाने हे काम कुरुंदकर गुरूजींच्या आदरापोटी केलेले आहे, ह्याची आम्हाला जाणीव आहे.

प्रस्तुत पुस्तकाला अर्थसहाय्य द्यावे अशी विनंती अंबेजोगाई येथील 'कै. नरहर कुरुंदकर स्मृती विश्वस्त मंडळास' आम्ही केली होती. त्यांनी आमच्या विनंतीला प्रतिसाद देऊन दोन हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याचे मान्य केले आहे. त्याबद्दल आम्ही संस्थेच्या वतीने त्यांचे आभार मानन हे दोन शद्ब संपवीत आहोत.

प्रा. भु. द. वाडीकर/दत्ता भगत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 3233
24863 निबंध
शाखा (स्थळ प्रत)

अनुक्रम :

लोकहितवादी/१

राजर्षी शाहू/११

स्वातंत्र्यवीर सावरकर/२५

कर्मवीर भाऊराव पाटील/३३

कर्मयोगी अण्णासाहेब सहस्रबुद्धे/४५

मार्क्स आणि गांधी/५९

लॉर्ड माऊंटबॅटन/६८

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन/८३

एकाधिकारशाही/९१

जातीयवाद/९९

धर्म आणि मन/१०७

A good book is the precious
life–blood of a master spirit.

–John Milton

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........

# १/ लोकहितवादी

महाराष्ट्रातील सुधारणावादाचा आपण विचार करु लागलो म्हणजे समोर येणारे पहिले नाव लोकहितवादींचे आहे. या सर्व सुधारकांच्या कार्याचे दरवेळी नव्याने मूल्यमापन करायचे असेल तर त्याचा आरंभ लोकहितवादींच्यापासून करायला पाहिजे. लोकहितवादींच्याकडे कसे पाहावे, त्यांच्या सामर्थ्य व मर्यादांचा शोध कसा घ्यावा हा एक नेहमीच विवादग्र राहत आलेला प्रश्न आहे.

आपण मंडळी खरे म्हणजे पूजा संप्रदायाची आहोत. कुणाची तरी पूजा करण्यात आपल्या मनाला आनंद वाटतो. त्यासाठी साधू संतच लागतात असे नाही. पूजा करण्यासाठी कोणताही समाजाचा नेता चालतो. ह्या पूजा पद्धतीची सगळ्यात महत्वाची अडचण अशी आहे की आपण समाजनेत्यांचे नेमके सामर्थ्य व त्यांची मर्यादा विसरून जातो. लोकहितवादी यांचे स्मरण करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग हा की आपले मन पूजा सांप्रदायापासून मुक्त करण्याचा कसोशीने प्रयत्न करावा. कारण आधुनिक महाराष्ट्रात लोकहितवादी हा परंपरेने पूज्य मानलेल्या समाजरचनेविरूद्ध असणारा, परंपरागत समजूतींच्याविरुद्ध आपल्या बुद्धीस पटणारी भूमिका घेणारा विद्रोहाचा पहिला हुंकार आहे. मार्क्स असे म्हणतो की, सर्व चिकित्सेचा आरंभ व गाभा धर्माची चिकित्सा आहे. आधुनिक महाराष्ट्राचा विचार करायचा तर आमच्या चिकित्सक वृत्तीचा पहिला उग्र अविष्कार म्हणजे लोकहितवादी आहे.

लोकहितवादींचे मोठेपण सांगताना माझ्यासमोर त्यांच्या चिंतनाच्या मर्यादा आहेत. त्याप्रमाणे त्यांचा विचार व आचारात जे अंतर आहे त्यामुळे पडणाऱ्या मर्यादांचेही मला भान आहे. लोकहितवादी आणि जोतिबा फुले हे जवळ जवळ समकालीन. लोकहितवादींच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई फुले यांनी त्यांचा गौरव करताना ब्रह्मर्षी असा शब्दप्रयोग केलेला आहे. लोकहितवादींच्या विषयी बोलताना माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात म. फुले उभे आहेतच. म्हणूनच मी लोकहितवादींचे मोठेपण सांगताना त्यांचे द्रष्टेपण समोर ठेवून बोलत आहे. त्यांच्या कर्तेपणातील उणीव मला मान्यच आहे.

लोकहितवादींच्या विरुद्ध मुख्य आक्षेप इंग्रजधार्जिणेपणाचा आणि स्वकीयांचा तेजोभंग केल्याचा आहे. हे दोन्ही आक्षेप घेणारे विष्णूशास्त्री चिपळूणकर हे पहिले गृहस्थ नव्हेत. मागासलेल्या रुढीप्रधान देशात जो कोणी इंग्रजी राज्याचा विरोधक असेल त्याच्या मनात हा आक्षेप उत्पन्न होणारा आहे. शतपत्रांचे लिखाण चालू असतानाच हा आक्षेप चर्चिला गेला असावा असे वाटते. कारण समारोप करताना त्याला थोडक्यात उत्तरही दिलेले आहे. चिपळूणकरांनी तपशिलाने ह्या आक्षेपांची मांडणी आपल्या धारदार भाषेत केली इतकेच काय ते. धाकट्या शास्त्रीबोवांच्या मतांचे प्रतिध्वनी त्यानंतर अनेक ठिकाणी उमटले आहेत. त्यांच्या विरुद्धचे इतर सर्व आक्षेप ह्या प्रमुख आक्षेपांचे उपसिद्धांत म्हटले पाहिजेत. ह्या आक्षेपांना ह्यापूर्वीच तपशीलवार उत्तरेही दिली गेली आहेत अलिकडच्या काळात गोवर्धन पारीखांनी त्यांच्या छोटेखानी पुस्तकात ह्या सर्व आक्षेपांचा थोडक्यात परामर्ष घेतला आहे.

लोकहितवादींनी हिंदूधर्मावर पहिली कठोर टीका केली. हिंदूधर्मावरील या कठोर टीकेमुळे समकालीन ब्राह्मण वर्गाचा जर त्यांच्यावर रोष झाला असेल तर तो आपण समजून घेऊ शकतो. आज तो राग शिल्लक ठेवण्याचे कांही कारण उरलेले नाही. कारण हिंदूधर्मातील दोष व हिंदूंच्या समाजरचनेत मूलभूत परिवर्तन करण्याची गरज या बाबी आता सर्व मान्य झालेल्या आहेत. लोकहितवादी ब्राह्मणांचे आणि हिंदूधर्माचे कठोर टीकाकार असल्यामुळे परंपरेच्या अभिमानी मंडळींनी त्यांच्याकडे नेहमीच अवसानघातकी, स्वकीयांचा तेजोभंग करणारे, इंग्रजांचे स्तुतीपाठक आणि पारतंत्र्याचे उद्‌गाते म्हणून पाहिले. आज लोकहितवादींच्याकडे पाहण्याची ही सगळी दिशाच चुकलेली आहे याची तीव्र जाणीव सर्वांना झालेली आहे

याची प्रतिक्रिया म्हणून दुसऱ्या एका दिशेने लोकहितवादींच्याकडे

पाहण्यास आरंभ झाला. ज्यांना समाजसुधारणेची भूमिका मान्य होती किंबहुना ज्यांच्या समाजसुधारणेविषयी आग्रह होता, त्यांना लोकहितवादींच्यामध्ये महत्त्वाचे असे दोन मुद्दे दिसले. एक तर स्वातंत्र्यपूर्व काळात लो. टिळकांच्या नंतर जेव्हा गांधीयुगात नव्याने विचार सुरु झाला, त्यावेळी सर्वांना स्वदेशीचा पुरस्कार आणि परदेशी मालावरील बहिष्कार या बाबी अतिशय महत्त्वाच्या वाटल्या. कारण गांधीजींच्या राजकीय कार्यक्रमाचा तो भाग होता आणि लोकहितवादींनी स्वदेशीचा पुरस्कार केलेला होता. दुसरी गोष्ट म्हणजे लोकहितवादींनी आपल्या जुन्या काळात स्वतंत्र भारताच्या पार्लमेंटचे स्वप्न पाहिलेले होते. एक दिवस सर्व भारतीय हळुहळू शहाणे होऊ लागतील, स्वतःची कामे स्वत करू लागतील, मोठी अधिकारपदे त्यांच्या ताब्यात येतील आणि नंतर मग ते इंग्रजांना येथून निघून जा असे हळूच सांगतील. इंग्रज निघून गेले तर ठीक नाहीतर अमेरिकेप्रमाणे येथे सिव्हील वॉर होईल आणि भारत स्वतंत्र होऊन येथे पार्लमेंट येईल. हे घडण्यास दोनशे वर्षे लागतील असा लोकहितवादींचा अंदाज होता. या नव्या दृष्टीने पाहताना लोकहितवादी हिंदूधर्मातील दोष दूर करू इच्छिणारे समाज सुधारक, स्वदेशीचा पुरस्कार करणारे आणि स्वातंत्र्याचे स्वप्न पाहणारे विचारवंत ठरतात. १९२० च्या नंतर प्रा. न. र. फाटक आणि आचार्य जावडेकर यांच्या लिखाणामुळे लोकहितवादींच्याकडे पाहण्याची ही नवी दृष्टी निर्माण झाली.

अगदी अलीकडे गोवर्धन पारीख यांनी लोकहितवादींचे पुन्हा मूल्यमापन करुन असे प्रतिपादन केले आहे की, त्यांनी विधायक आणि ऐतिहासिक चिकित्सेचा आरंभ केला आणि बुद्धिप्रामाण्यवादाच्या जवळ जाणारी नीतीप्रधान, न्यायप्रधान समाजरचना निर्माण करण्याची जिद्द त्यांनी बोलून दाखविली. लोकहितवादींचा मोठेपणा आणि छोटेपणा नेहमीच या दोन पद्धतीने सांगितला जातो. लोकहितवादींच्या मोठेपणाचे तपशीलवार वर्णन सर्वांनी केलेले आहे. तसे ते सर्वांनी करणे रास्त आणि उचितही आहे. पण या मोठेपणाच्याबरोबर लोकहितवादींच्या प्रमुख मर्यादांचाही शोध घेणे आवश्यक आहे. तो घेतल्याशिवाय समतोलपणे आपण त्यांच्याकडे पाहू शकणार नाही.

लोकहितवादींचे घराणे पेशवाईतील थोर प्रतिष्ठीत सरदारांचे घराणे होते. पेशवाई बुडाल्यानंतर त्यांच्या वडिलांना वार्षिक १० हजाराचा सरंजाम मिळालेला होता. हा सरंजाम वडिलांच्या मृत्यूनंतर म्हणजे इ. स. १८३६ ला जप्त झाला. त्यावेळी लोकहितवादींचे वय १३ वर्षाचे होते. हा वेळपर्यंत त्यांचे बालपण समृद्धीत व लाडात गेले होते. १८२३ साली जन्म, १८२९ साली मौंज, १८३० साली लग्न, इतक्या घटना यापूर्वी घडून गेलेल्या होत्या. वडिलांचा

मृत्यू आणि सरंजाम जप्त होण्याची घटना जर घडली नसती तर लोकहितवादी कदाचित इंग्रजी शाळेत गेलेही नसते. इ. स. १८४१ ला ते इंग्रजी शाळेत गेले. १८४४ ला त्यांचा अभ्यास समाप्त झाला आणि दरमहा ७७ रु. वर वयाच्या २१ व्या वर्षी त्यांची नेमणूक झाली. त्या काळच्या मानाने दरमहा ७७ रु. ही फार मोठी प्राप्ती होती. ती लक्षात घेतली. तर लोकहितवादींचे पुढचे सगळे आयुष्य हे वरीष्ठ मध्यम वर्गीय जीवनातले आणि खानदानी जहागीरदारांशी मिळते जुळते आयुष्य होते असे मानले पाहिजे.

१८५२ साली वयाच्या २९ व्या वर्षी त्यांना दरमहा २०० रु. मिळत. तेथून त्यांचे उत्पन्न वाढतच गेले. १८७९ साली ते पेन्शनीत गेले, तेव्हा त्यांची सालीना पेन्शन ५ हजार रु. ची होती. मुन्सफ. इनामकमिशनर, असिस्टंट जज्ज. असे अनेक हुद्दे भूषवित शेवटी ते रावबहादुर झाले. मुंबई विद्यापीठाचे 'फेलो' आणि कौन्सिलचे सभासद म्हणूनही त्यांनी काम पाहिले. कांही दिवस ते रतलाम संस्थानचे दिवाण होते. ९ ऑक्टोबर १८९२ ला प्रदीर्घ आयुष्य भोगून कृतार्थतेने ते मरण पावले.

लोकहितवादींच्या जीवनाचा हा आराखडा मुद्दाम दिलेला आहे. ते एका सधन घराण्यात जन्माला आले. हा त्यांचा दोष होता असे कुणीच म्हणणार नाही. पण त्यांचे पुढचे सर्व जीवनही वरीष्ठ मध्यम वर्गीयच राहिले. खाजगी जीवनात ते संपूर्णपणे सनातनी होते. देवपूजा, देवदर्शन, ब्राम्हणांचा सत्कार, आदरातिथ्य असे सारे परंपरा मान्य जीवन तर लोकहितवादींनी व्यतीत केलेच पण ते स्वतःहा कर्मठ धार्मिक होते. निदान १ तास रोज रात्री जप करीत. सकाळी नाम-स्मरण असे. घरी रौद्रपौमाण, पूजा, नित्य असे. श्राद्धपक्षापासून सर्व बाबतीत ते धर्मश्रद्ध होते.

पुनर्विवाहाचा हक्क स्त्रियांना असावा असे जरी तरुणपणी त्यांनी लिहिले, तरी १८६९ साली प्रत्यक्ष, पुनर्विवाह झाला त्याला ते हजर राहिले नाहीत. आणि जेव्हा त्यांच्यावर ब्राह्मणांनी बहिष्कार टाकला. तेव्हां आपण पुनर्विवाहाला हजर नव्हतो हे भरपूर पुराव्यानी सिद्ध करून त्यांनी शुद्धीपत्र मिळविले. शिवाय द्वारका पीठाच्या शंकराचार्याकडून वेगळे शुद्धीपत्र मिळविले. या सगळ्या विवेचनाचा थोडक्यात अर्थ असा आहे की, लोकहितवादी समाज सुधारणेच्या कार्याला स्वतः वाहून घेणारे गृहस्थ नव्हते. आपल्या जीवनातील सनातनीपणा कमी होऊ देण्याची त्यांची तयारी नव्हती. जे समाज सुधारणेत अग्रभागी राहून काम करीत होते त्यांना दृढ पाठींबा देणे इतकेही लोकहितवादींना जमले नाही. त्यांचा सगळा

सुधारणावाद चार लेख लिहून गप्प बसण्याच्या मर्यादेतला होता. या सुधारणावादाची अंमलबजावणी ते करणार नव्हते. दुसऱ्या कुणी करणे त्यांना मानवणार नव्हते.

ज्यांना समाज सुधारणेसाठी समाजात उतरायचे नसते, त्यासाठी झीज सोसायची नसते, कर्त्या सुधारकाच्या पाठीशी उभे राहून आपल्यावर अपवाद येऊ द्यावयाचा नसतो त्यांना फक्त सुरक्षित ठिकाणी बसून शद्बविवेचना करणे शक्य असते. समाज जीवनाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने त्याची किंमत शून्य असते. महाराष्ट्रातील कोणत्याही समाज सुधारकाला लोकहितवादींच्या पासून प्रेरणा मिळण्याचा संभव नाही. लोकहितवादींनी एखादी समाजसुधारणा सुरू करण्याचा संभव नाही. ते फार तर वाचनालयांना पाठींबा देऊ शकतात. अनाथालये उघडायला मदत करू करतात. पण त्या बरोबरच मंदिरांनाही मदत करून जातात. इंग्रज शासनाचा कोणताही रोष होणार नाही या बेताने राजकीय चिंतन आणि स्वकीय समाजाकडून कोणतीही झळ पोहचणार नाही या बेताने सामाजिक चिंतन व आचार हीच कोणत्याही रावबहादूरांची मर्यादा असू शकते. ती लोकहितवादींची होती. लोकहितवादी या मर्यादेत होते याबद्दल त्यांना दोष देण्याचे कारण नाही. या मर्यादा न ओळखता त्यांचा गुणगौरव करणारे अतिरेक करीत आहेत इतकेच मला म्हणायचे आहे.

लोकहितवादींच्या जन्मापूर्वीच काही वर्षे महाराष्ट्रावर इंग्रजी राजवट आलेली होती. पेशवाई संपलेली होती. पेशवे बुडाले आणि कंपनीचे राज्य आले. ही घटना आनंदाची समजायची की दुःखाची? कोणत्याही देशभक्ताला पारतंत्र्य आणि गुलामगिरी ही मोठ्या धन्यतेची गोष्ट वाटणार नाही. लोकहितवादी कोणत्या भाषेत बोलत आहेत हे समजून घेण्याची गरज आहे. रेल्वे सुरू होण्यापूर्वी, मुंबईची पहिली गिरणी सुरू होण्यापूर्वी, मुंबई विद्यापीठ अस्तित्वात येण्यापूर्वी लोकहितवादींच्या शतपत्रांचा काळ आहे. शतपत्रे इ. स. १८४८ ते १८५० या काळात प्रकाशीत झाली. त्या काळात लोकहितवादी भारत पुन्हा स्वतंत्र होईल याची स्वप्ने पाहत आहेत. समकालीन अंधश्रद्धा आणि रूढी यावर कडाडून हल्ला करणारे कठोर टीकाकार नव्याने आलेल्या गुलामगिरीचे पूजक नव्हते. ते शतकानंतर येणाऱ्या स्वातंत्र्याच्या प्रभातीकडे डोळे लावून बसलेले द्रष्टे होते. लोकहितवादींची सर्व कठोर टीका पुन्हा एकदा स्वातंत्र्याकडे जाण्याच्या वाटचालीतील एक टप्पा म्हणून पाहिली पाहिजे.

लोकहितवादींनी १८४८ साली शतपत्रांना आरंभ केला त्या वेळी ते

अगदीच तरुण होते. पण तेव्हापासून पुढे आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी अनेकविध पद्धतीचे लिखाण केले. या लिखाणमधील किरकोळ तपशिलाच्या बाबी काढल्या तर लोकहितवादींचे मुख्य सूत्र जवळ जवळ सारखे आहे. या मुख्य सूत्रापुरता आपण विचार करू लागलो म्हणजे कांही चमत्कारिक बाबी आपल्याला दिसू लागतात. लोकहितवादींनी ब्राह्मणांच्यावर कठोर टीका केली. हे ब्राह्मण आळशी, मूर्ख लबाड आणि अप्रामाणिक आहेत असे लोकहितवादींना वाटते. या ब्राह्मणांचे काम ज्ञान जतन करण्याचे होते, हेही काम त्यांनी केले नाही आणि देशाच्या रक्षणाचे काम होते तेही त्यांनी केले नाही. असलेले सर्वस्व गमावून हे ब्राह्मण परतंत्र झालेले आहेत आणि तरीही अजून त्यांचे डोळे उघडत नाहीत याचा लोकहितवादींना राग आहे. पण म्हणून लोकहितवादी इतर जमातींना जागे करीत बसण्याचा मात्र उद्योग करीत नाहीत.

या मागची भूमिका अशी आहे की, लोकहितवादींना स्वातंत्र्य गेल्याचे दुःख आहे, ते घालविल्याबद्दल ब्राह्मणांच्या विषयी राग आहे, पुन्हा एकदा स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर इंग्रजांची विद्या व ज्ञान आत्मसात करायला पाहिजे. इंग्रजांची व्यापार वृत्ती आणि त्यांचे उद्योग कौशल्य शिकून घ्यायला पाहिजे, समाजातील आंधळ्या रूढी टाकून द्यायला पाहिजेत, असे लोकहितवादींना वाटते. लोकहितवादी सर्व समाजसुधारणांना स्वातंत्र्याकडे जाण्यासाठी आवश्यक असणारा कार्यक्रम म्हणून पाहतात. म्हणून ते पार्लमेंटचे स्वप्न पाहतात. मूळातच हिंदू समाजात असणारी विषमता आणि अन्याय्य समाज व्यवस्था यांची लोकहितवादींना फारशी जाणीव झालेली नाही. स्वतःला शहाणे समजणाऱ्या मुर्खांनी सर्वस्व गमावले आणि तरीही त्यांना अजून डोळे उघडावेसे वाटत नाहीत ही गोष्ट लोकहितवादींना झोंबली, म्हणून त्यांनी ब्राह्मणांच्यावर, रूढींच्यावर टीका केली. एकीकडे सर्व रूढींचा त्याग आणि सर्व सुधारणांचा स्विकार तर दुसरीकडे प्राचीन परंपरेचा आदर व गौरव असा सांधा आर्य समाजाच्या रुपाने जुळल्याबरोबर लोकहितवादी आर्य समाजाकडे खेचले गेले. ते आर्य समाजाचे ट्रस्टी झाले.

लोकहितवादींच्या लिखाणापासून विधायक ऐतिहासिक चिकित्सेचा आरंभ होतो ही बाब पारीखाना अत्यंत महत्त्वाची वाटते. विधायक दृष्टिकोणाची ऐतिहासिक चिकित्सा अजूनही आमच्या पचनी पडली आहे असे नाही. लोकहितवादींच्या सर्व समकालीनात ह्या दृष्टीचा अभाव आढळतो. हे सगळे समकालीन एक तर भूतकाळांविषयी असणाऱ्या खोटया गौरव बुद्धीने भारलेले आहेत किंवा भूतकाळाविषयीच्या तितक्याच मिथ्या तिरस्काराने भारलेले आहेत. त्या दोन्ही टोकांच्याकडे जाण्याची लोकहितवादींना गरज भासत नाही, लोकहितवादी सुवर्णमध्य सांभाळणारे

समतोल भाषाशैलीचे विचारवंत म्हणून कधीच प्रसिद्ध नव्हते. त्यांच्या विचारांचा रोख जितका निर्दोष असे तितकी क्वचित अधिक त्यांची भाषाशैली आक्रमक व विकारी असे. लोकहितवादींच्या भाषा शैलीत ओतप्रोत जिव्हाळा व कळकळ असल्याची वर्णने जेव्हा त्यांचे समर्थक करीत असतात तेव्हा ह्या विकारी भाषाशैली बद्दलची ती त्यांची लपवाछपवी असते.

ऐतिहासिक चिकित्सा म्हणजे सुवर्णमध्य नव्हे तर वातावरणाच्या संदर्भात प्राचीन संस्कृतीचा गौरव आणि यथार्थ मूल्यमापन करण्यात आपले काही चुकते आहे असे वाटण्याचे लोकहितवादींना कारण नव्हते. हिंदूचे धर्मग्रंथ जगातले सर्वात जुने ग्रंथ आहेत. संस्कृत विद्येने मोठ्या परिश्रमाने महान ज्ञानभांडार जतन केले आहे. हिंदूचाही वैभवाचा फार मोठा इतिहास आहे, हे तर लोकहितवादींना मान्यच होते पण ज्या वेळी ज्ञानाचा संग्रह करावा असे ज्ञानच इतर कुणाजवळ नव्हते त्यावेळी हे ग्रंथ निर्माण झाले हेही त्यांना मान्य होते. संस्कृत विद्येच्या, धर्माच्या अभ्यासाला त्यांचा विरोध नाही. विरोध अर्थहीन पठणास व त्यातच मोठेपणा मानण्याला आहे. पण हा भूतकाळाचा गौरव व ते सारे ज्ञान आजच्या संदर्भात प्रत्यक्ष उपयोगी नाही ही वस्तुस्थिती कशी झाकणार? उलट एकेकाळचे जगाचे नेते पराभूत होऊन मागासलेले ठरले हो अधिक लज्जेची गोष्ट आहे असे त्यांना वाटते.

भूतकाळाचे ज्ञान अपूर्ण होते ह्याविषयी लोकहितवादींना फारशी खंत नाही. दर शतकात ज्ञानाचा विकास चालू असल्यामुळे आज जे आपणाला माहीत आहे ते प्राचीनांना ज्ञात नाही ह्या बद्दल त्यांना हिणविण्याची गरज नाही. लोकहितवादींचा विरोध प्राचीनांच्या सदोषत्वाला आहे, अपूर्णत्वाला नाही. ते सगळे ज्ञान पूर्णच होते, पूज्यच आहे असे समजून आंधळे होण्याला आणि ह्या आंधळेपणापायी गुलामगिरीला दैवयोग समजून स्वातंत्र्याच्या दैवयोगाची वाट पाहणाऱ्या कर्तृत्वशून्य आत्मघातकी वृत्तीला त्यांचा विरोध होता. ह्या ऐतिहासिक चिकित्सापद्धतीमुळेच त्यांच्या सुधारणावादाला एक वेगळी मर्यादाही पडली आहे.

हिंदूच्या समाज रचनेत मुळातच असणारी विषमता आणि गुलामगिरी यांच्या विरुद्ध समतेच्या प्रस्थापनेसाठी जिद्दीने उभे राहणे व समतेची पूर्णता म्हणून स्वातंत्र्याकडे पाहणे ही निराळी बाब आहे. स्वातंत्र्याकडे जाण्याचा कार्यक्रम म्हणून समाजसुधारणेकडे पाहणे, तिला शाब्दिक मान्यता देणे आणि धर्मात मूलभूत बदल न करता आवश्यक तेवढ्या सुधारणांची भूमिका घेणे, रुढीवर विरोध करणे यात फरक आहे. लोकहितवादी परंपरागत समाजरचनेच्या विरुद्ध बोलत

आहेत कारण त्यांना या परंपरागत जीवनावरील श्रद्धेमुळे आपण स्वातंत्र्य गमावले याची खंत आहे. लोकहितवादींची ही एक महत्त्वाची मर्यादा आहे. वरील वर्गीय वातावरणात जन्मणे गुन्हा नसतो. त्या वातावरणात तयार झालेले मन जतन करून सुधारणावादाचे प्रतिपादन करणे यात नव्या मर्यादाची निर्मिती असते.

लोकहितवादींच्या वेळी नवजागरण चालू होते. मुंबईत मामा परमानंद, भाऊ दाजी, जगन्नाथ नाना आणि पुण्यात जोतिबा फुले. भाऊ महाजन, दादोबा कुंटे असा एक फडच उदयाला आला होता. सारेजण आधुनिक शिक्षणाचे व काही कमी अधिक प्रमाणात सुधारणावादाचे प्रवर्तक होते. ह्या भोवतालचा मंडळीतून लोकहितवादींचे वेगळेपण जर समजावून सांगायचे असेल तर ते स्वदेशीचे पुरस्कर्ते होते, स्वातंत्र्याचे द्रष्टे होते अशी मते त्यांच्या लिखाणातील त्यांच्या सुट्या उताऱ्यांच्या आधारे देण्यापेक्षा व्यापक पायावर त्यांच्या वैचारिक भूमिकेचा विचार करणे केंव्हाही इष्ट आहे. आणि असा विचार पारीखांनी केला आहे. ह्या विधायक चिकित्सेच्या आधारे आपण लोकहितवादींकडे पाहू लागलो म्हणजे राष्ट्रवादाला आधार असणारी भूतकाळची गौरवबुद्धी आणि राष्ट्रीय पुनरुत्थानाला आधार ठरणारी नवसमाजरचनेची जाणीव ह्यांचा समन्वय त्यांच्या भूमिकेत दिसू लागतो. इंग्रजी राजवटीचे स्वागत आणि स्वातंत्र्याचे स्वप्न ह्या दोन्ही बाबी आता सुसंगत वाटू लागतात. किंबहुना इंग्रजी राजवटीचे स्वागत करण्याचा लोकहितवादींना हक्कच आहे व तो त्यांच्या स्वातंत्र्यकांक्षेचा एक भाग आहे असे वाटू लागते. पण ह्याचा परिणाम असा झाला की लोकहितवादींना इंग्रजी राजवटीचे क्रमाने बळकट होत जाणे नीटपणे उलगडलेच नाही.

लोकहितवादींना इंग्रजी राज्य म्हणजे काय यातील गुंतागुंत शेवटपर्यंत कळलेली दिसत नाही. मधून मधून इंग्रज राजवटीत देश दरिद्री होत चालला आहे असे ते बोलतात. पण त्यांना कांही गाभ्याच्या गोष्टी जाणवतच नाहीत. लोकांनी वेगाने नवे शिक्षण स्विकारावे असा ते आग्रह धरतात. नवे उद्योगधंदे आत्मसात करावे असेही ते सांगतात. पण पारतंत्र्यात कुणी शिकावे, काय शिकावे किती टक्के समाज साक्षर असावा, कोणते उद्योग इथे काढावेत या साऱ्याचे नियंत्रणच परकीय सरकारकडे असते हे त्यांना जाणवत नाही. लोक शहाणे झाले की त्यांना मोठमोठ्या हुद्द्याची कामे मिळतील ज्या प्रमाणात हे शहाणे होतील त्या प्रमाणात राज्यकारभार हाती येईल असे त्यांना वाटते, ही त्यांची श्रद्धाच खुळेपणाची आहे. शिकू इच्छिणाऱ्यांना इंग्रज शिकू देतील, प्रत्येकाला लायकीप्रमाणे कर्तबगारीला इंग्रज वाव देतील असे समजणे म्हणजेच पारतंत्र्य ही कल्पना नीट समजून न घेणे आहे. पारतंत्र्याविषयीचे लोकहितवादींचे आकलन नुसतेच वरवरचे होते.

या देशात इंग्रज व्यापाराच्या निमित्ताने प्रचंड लूट करीत आहेत, या कल्पनेतली गुंतागुंत लोकहितवादींना कळणे शक्य नव्हते. इंग्रजांना या देशात स्वस्तात मिळणारा कच्चा माल हवा होता. आणि आपल्या पक्क्या मालाचीही त्यांनी व्यापारपेठ ठरविलेली होती. कच्च्या मालाच्या खरेदीला आणि विक्रीला अडथळा आणणारे सारे उद्योग जर शासन सत्तेच्या बळावर नष्ट करीत असेल तर मग गुलाम राष्ट्राच्या हाती स्वदेशी उद्योग वाढविणे राहत नाही. परदेशी मालावर बहिष्कार टाकणेही राहत नाही. राजकीय चळवळ म्हणून परदेशी मालावर बहिष्कार व परदेशीचा पुरस्कार याला अर्थ असतो. कारण राजकीय चळवळीत या घोषणा करून इंग्रजांच्या विरुद्ध चळवळ संघटित करता येत असते. चळवळीचे हत्यार म्हणून एक कल्पना सोयीस्कर असते. ती अर्थशास्त्राचा विचार म्हणून खरी नसते. अर्थशास्त्राचा विचार वेगळ्या पद्धतीने करावा लागतो. प्रचंड उद्योग-धंदे उभारूनच कोणत्याही देशाला आपले अधिक स्वातंत्र्य व स्वावलंबन निर्माण करावे लागत असते. लोकहितवादींच्या समोर कोणतीही चळवळ नव्हती, झुंज नव्हती, फक्त सोपा विचार होता आणि तो विचार म्हणजे महाग पडले तरी हरकत नाही पण देशातील वस्तू विकत घ्यायच्या; जाडे, भरडे असले तरी आपल्या देशातले वापरावे, इतकाच मर्यादित होता.

प्रचंड प्रमाणात दारिद्र्य असलेल्या देशाला स्वस्त असले तरी परकीय घेऊ नये, महाग असले तरी स्वदेशी घ्यावे हा सल्ला परवडणारा नसतो. भारतातील समाजसुधारणेचा प्रश्न हा एकीकडे शेतीच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न होता. दुसरीकडे अस्पृश्य आणि आदिवासींना सभ्य जीवन उपलब्ध करून देण्याचा प्रश्न होता. आधुनिक शिक्षण घ्यावे, परंपरागत शिक्षणाचा आग्रह धरू नये, प्रौढ वयात लग्ने करावीत, स्त्रियांना शिकू द्यावे, त्यांना पुनर्विवाहाची परवानगी असावी हे प्रश्न प्रामुख्याने वरिष्ठ वर्गाचे प्रश्न होते. समाजाच्या मूलभूत उभारणीला हे प्रश्न मध्यवर्ती नव्हते. लोकहितवादींचे चिंतन वरील वर्गातील आंधळ्या रूढी विरोधी चालू आहे, ते समाजातले नवे थर जागे करून नवे नेतृत्व देणारे चिंतन नव्हे. ही लोकहितवादीच्या चिंतनाची मर्यादा आहे.

ज्यावेळी समाजात सुधारणावादाचा आरंभ होतो, त्यावेळी तो दोन प्रकारांनी होत असतो. एक तर समाजातील नवे थर जागे होत असतात आणि ते खरा खोटा आक्रोश करू लागतात आणि दुसरे म्हणजे जुन्या समाजातील वरिष्ठ वर्ग आपल्या वरिष्ठपणाला मूलभूत आव्हान न देता कांही नवे चिंतन करू लागतो. या दोन्ही प्रवाहानी समाज सुधारणावादाचा आरंभ होतो. तसा तो महाराष्ट्रातही झालेला आहे. राजा राम–मोहन रॉय ज्याप्रमाणे वरिष्ठ वर्गातले वरिष्ठ वर्गीय

मनोवृत्तीचे समाजसुधारक आहेत तोच प्रकार लोकहितवादींचा आहे. लोकहितवादींचा सुधारणावाद हा मुळात महत्त्व गमावलेल्या वरीष्ठ वर्गाचा सुधारणावाद आहे. ही लोकहितवादींची एक प्रमख मर्यादा आपण ओळखली पाहिजे.

वरीष्ठ–वर्गीय सुधारणावाद रूढीचा विरोध करून धर्मांच्या मूलग्रंथावर येऊन थांबतो. त्याप्रमाणे लोकहितवादी स्मृतींचा विरोध करून वेदावर येऊन थांबले आहेत. एका समाजरचनेत वरीष्ठ आणि नेता असणारा वर्ग दुसऱ्या रचनेतही पुन्हा नेता असू शकणार नाही हे न ओळखता नेत्या वर्गाचे दोष कोणते आहेत आणि या वर्गाला खऱ्या अर्थाने नेतृत्व करावयाचे नसेल तर त्याने काय सोडावे? काय धरावे? काय स्वीकारावे? या परिघात विचार करणे ही लोकहितवादींची कक्षा आहे.

सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होण्याची उत्कट इच्छा, पण त्या इच्छेपायी राष्ट्राचा गुलामगिरीला स्वातंत्र्य व देशाच्या आर्थिक शोषणाला प्रगती समजण्याची चूक करणारा एक गट आणि सामाजिक, मानसिक, धार्मिक गुलामगिरीला पुण्याची पवित्र परंपरा मानून पण इंग्रजाच्या गुलामगिरीला मात्र दास्य मानणारा दुसरा गट हे दोन्हीही गट विचार करण्याच्या पद्धतीच्या दृष्टीने अपूरे होते. स्वातंत्र्य ही कल्पना अशी सुटी, अर्धवट असू शकत नाही. स्त्रिया व अस्पृश्य गुलाम असणेच रास्त मानणाऱ्यांना आपण मात्र स्वतंत्र असावे, असे मानण्याचा हक्क नसतो. आणि देशाची गुलामगिरी क्षम्य मानणाऱ्यांना माणसाच्या गुलामगिरी विषयी शोक करण्याचा अधिकार नसतो. लोकहितवादींनी संपूर्ण स्वातंत्र्याचे स्वप्न पाहिले. आपण धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक दृष्टचा मागासलेले आहोत म्हणून गुलाम आहोत, हे जाणणारा पहिला शहाणा माणूस म्हणून लोकहितवादींचा विचार करावा लागेल.

आपण सामाजिक न्याय आणि सामाजिक समता यावर फार बोलतो. पण दोन्ही गोष्टी प्रगतीशील एकात्म राष्ट्र अस्तित्वात यावे यासाठी असतात. समता स्वातंत्र्याकडे नेणारी व बंधुता न्याय अस्तित्वात आणणारी असावी लागते. हे सगळे भान आर्ष स्वरुपात प्रथमतः एकवटलेले असेल तर ते लोकहितवादींच्या लिखाणात, शतपत्रात एकवटलेले आहे. तो नव्या वृत्तीचा नसला तरी नव्या मतीचा आरंभ आहे. म्हणूनच आचाराचे पाठबळ नसलेला विचार, पारतंत्र्याचे पूर्ण आकलन नसणारी स्वातंत्र्याकांक्षा आणि समाज परिवर्तनातील मूलभूत प्रश्नांची जाणीव नसणारा सुधारणावाद ह्या लोकहितवादींच्या ठळक तीन मर्यादा आहेत. तरीही आम्हाला ते वंदनीय वाटतात. याचे कारण लोकहितवादी हा आरंभ बिंदू आहे. तिथे निर्दोषपणा व परिपक्वता नसते. पण हा त्या आरंभ बिंदूचा दोष नसतो.

# २/ राजर्षी शाहू

राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य ह्या निष्ठांचा उदय माझ्या मनात अतिशय लहान वयात झाला. कदाचित ह्या शद्बांचे अर्थही नीट समजण्यापूर्वी आणि कल्पना नीट आकलन होण्यापूर्वी त्या वेळच्या वातावरणानुसार मी ह्या श्रद्धांना बांधला गेलो असेन. पुढच्या काळात राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य ह्या दोन्ही कल्पनांविषयी मी पुष्कळच विचार केला. ह्या विचार करण्याच्या योगाने ह्या कल्पना माझ्या मनात तुलनेने अधिक स्पष्ट व रेखीव झाल्या असतील, नाही असे नाही. पण जिथपर्यंत प्रश्न श्रद्धांचा आहे तिथपर्यंत ह्या कल्पनांविषयी माझ्या मनातील श्रद्धा विचारोत्तर नसून विचारपूर्व आहे. ह्याचा एक परिणाम असा झाला आहे की, जे जे स्वातंत्र्यासाठी कळत न कळत झगडले त्या सर्वांच्या विषयी माझ्या मनात उत्कट आदरभाव आहे. राष्ट्रवाद ही कल्पना मी स्वातंत्र्याचा संदर्भ लक्षात घेतल्याशिवाय मनात आणूच शकत नाही. ज्या वेळी राष्ट्र परतंत्र असते त्या वेळी हे राष्ट्र स्वतंत्र झाले पाहिजे, स्वतंत्र होण्याचा त्याचा हक्क आहे, ही कल्पना राष्ट्रवादात गृहीत असते. आणि ज्या वेळी एखादे इतर कोणत्या बाहेरच्या सत्तेच्या आधिपत्यापासून मुक्त असते त्याहीवेळी हे राष्ट्र असेच स्वतंत्र राहिले पाहिजे. स्वतंत्र राहणे हा त्या राष्ट्राचा हक्क आहे ही कल्पना राष्ट्रवादात गृहीत असतेच. मानवजातीच्या इतिहासात स्वातंत्र्य ह्या कल्पनेचा जो अनेक पदरी व अनेक पातळींवर आविष्कार चालू आहे त्यातील एक कक्षा राष्ट्रवाद ह्या नावाने ओळखली जाते, असे मी मानतो. स्वातंत्र्य ह्या भव्य कल्पनेचा राष्ट्रवाद हा एक

घटक आहे म्हणूनच ह्या राष्ट्रवादाच्या कक्षेत इतर राष्ट्रांना गुलाम करण्याची कल्पना येऊ शकत नाही.

स्वातंत्र्य ही कल्पना राष्ट्रवादापेक्षा व्यापक, मोठी व अनेक पदरी आहे, पण त्या स्वातंत्र्याच्या कल्पनेपर्यंत माझ्या मनाचा प्रवास एकाएकी झाला नाही. ह्या प्रवासाचा आरंभबिंदू राष्ट्रवाद होता. इथून प्रवासाला आरंभ झाला. ह्या आरंभीच्या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्या एका कल्पनेपुढे आम्हांला इतर सर्व बाबी स्वाभाविक तुच्छ वाटत असत. त्यामुळे ज्यांनी ज्ञानाच्या, कलांच्या विकासावर भर दिला ते सारे शास्त्रज्ञ व कलावंत त्यावेळी फारसे महत्त्वाचे वाटत नसत. ज्यांनी उद्योगावर, शिक्षणविकासावर भर दिला, किंवा सामाजिक प्रश्नांसाठी आयुष्यभर झुंज दिली त्यांचेही मोठेपण ह्या मनाच्या आरंभावस्थेत कळण्याची शक्यता नव्हती. लहान मुलांना ज्याप्रमाणे हवी असलेली वस्तू आपल्याला मिळाली पाहिजे, ती मिळवणे आपला हक्क आहे, ते स्वातंत्र्य आपल्याला असले पाहिजे इतकेच जाणवते, तसे वयाने वाढलेल्या बालमनाचे लक्षण असते. राष्ट्र गुलाम आहे, ते स्वतंत्र झाले पाहिजे ह्यापलीकडची कल्पना ह्या प्रौढ शरीरात राहणाऱ्या बालमनाला जाणवतच नाही.

कधी तरी एक दिवस हे राष्ट्रीय स्वातंत्र्य कुणासाठी, हा प्रश्न उद्‌भवतो. ज्या सर्वसामान्य जनतेच्या नावे, तिचा हक्क म्हणून हे स्वातंत्र्य मागितलेले असते ती जनता गुलाम असते. पण तिची गुलामगिरी एक प्रकारची नसते. परंपरागत समाजरचनेमुळे आलेली सामाजिक गुलामगिरी, अर्थव्यवस्थेतून जन्मणारी आर्थिक गुलामगिरी, परंपरावादी मनात असणारी मानसिक गुलामगिरी, असे गुलामगिरीचे शेकडो पदर असतात; —तिच्याही विविध पातळ्या असतात. स्वातंत्र्याइतकीच आकारमानाने अजस्र, परिणाम—रूपाने भयावह, व गुंतागुंतीची अशी गुलामगिरी असते. फक्त ती अंधारलेली आणि हिडीस असल्यामुळे स्वातंत्र्याला जशी आम्ही सहस्र पाकळ्यांच्या कमलाची उपमा देतो तशी गुलामगिरीला देता येत नाही! ह्या सर्वच पातळ्यांवरील गुलामगिरीचा आपापल्या शक्तीनुसार प्रतिकार करणारे सगळेचजण मी स्वातंत्र्याचे योद्धे समजतो. ह्या सर्वच रणझुंजारांविषयी माझ्या मनात कृतज्ञता व आदर आहे.

राजर्षी शाहूमहाराज हे कोल्हापूरचे राजे होते. कोल्हापूरचे राजे ह्या नात्याने ते जरी छत्रपती शिवाजीमहाराजांचे वारसदार असले तरी जाहीर रीतीने राष्ट्रीय स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होऊ शकत नव्हते. राष्ट्रीय चळवळींशी त्यांचा असलेला संबंध नेहमीच पडद्याआड असणार. त्याच्या अनेकविध, परस्परविरोधी

आख्यायिका माझ्या कानावरून गेलेल्या आहेत. ह्या आख्यायिकांचा खरेखोटे-पणा तपासता येणे शक्य नाही. ह्याबाबतचा सर्व पुरावा अजून अंधारात बुडालेला आहे. फार तर आपण असे म्हणू शकू की, इंग्रजांच्या अधिपत्यापासून हा देश स्वतंत्र व्हावा असे शाहूमहाराजांनाही मनातून वाटत असलेच पाहिजे. पण ज्या गादीवर ते बसले होते ते स्थान लक्षात घेता ह्या दिशेने कांही भरीव कामगिरी करता येणे त्यांना शक्य नव्हते तशी त्यांच्याकडून अपेक्षाही करण्यात अर्थ नाही. हस्तेपरहस्ते, इंग्रज राजवटीला संशय येऊ न देता, कोणताही पुरावा सापडणार नाही ह्याची काळजी घेऊन, जे करता येणे शक्य होते ते त्यांनी केले असेल, हा सगळा 'असेल, असावे, असणारच' ह्या अनुमान–परंपरेचा फुलोरा फुलवण्यात फार अर्थ नाही.

महाराजांचे विस्तृत आणि तपशीलवार चरित्र अण्णा बाबाजी लठ्ठे ह्यांनी लिहिलेले आहे. हे चरित्र माझ्या पाहण्यात नाही. कारण आमच्याकडे पोलिस–ॲक्शन होईपावेतो ग्रंथ फार तुरळक उपलब्ध होते. आणि शिवाजीच्या वंशजाचे चरित्र सांगणारा ग्रंथ जाहीर रीतीने प्रसृत करणे हा धोका-ही क्वचितच घेतला जाई. जेव्हापासून आम्हाला सर्व भारत आमचा झाला त्या नंतरच्या काळात हा ग्रंथ दुर्मिळच राहिला. अधून–मधून हा ग्रंथ मिळवून वाचावा, अशी इच्छा माझ्या मनात उचंबळून येई, परंतु पुन्हा एकदा ती मावळून जात असे. भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वीच्या काळात एका संस्थानिकाचे चरित्र दुसऱ्या संस्था-निकाच्या कारकीर्दीत संस्थानात बसून जर लिहिले गेले तर त्याचे रूप फारसे लोभस असणार नाही, असा माझा तर्क आहे. शाहूमहाराज राष्ट्रीय चळवळीचे कसे कडवे विरोधक होते आणि इंग्रज राजवटीवर त्यांची निष्ठा किती उत्कट होती, हाच विषय चावून–चघळून ह्या चरित्रात मांडलेला असणार, अशी मला भीती वाटते, त्याबद्दल लठ्ठे यांना मी दोष देणार नाही. पण हा पारतंत्र्याच्या काळाचा महिमा आहे, हे तरी समजून घतलेच पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अधिक मोकळ्या वातावरणात शाहूमहाराजांचे चरित्र नव्याने लिहिले जावयास पाहिजे असे मला वाटते; ते काम अजून झालेले नाही. त्याचा परिणाम असा होतो की सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध सर्वशक्तीनिशी झगडणाऱ्या जनतेच्या स्वातंत्र्याचे एक सेनापती म्हणून जो सामान्य आदर असावयास पाहिजे तो असतो. माझ्या ठिकाणी तो उत्कटपणे आहे. पण प्रत्येक विशिष्ट कार्यकर्त्याचे काही खास वैशिष्टच असते. ह्या वैशिष्टयामुळे त्या नेत्याविषयी एक विशिष्ट आदर निर्माण होत असतो, त्यासाठी लागणारी माहितीच पुरेशा प्रमाणात आपल्याजवळ उपलब्ध नाही असे मला सारखे वाटू लागते. कोणत्याच थोर नेत्याची संपूर्ण माहिती उपलब्ध नसते. जी उपलब्ध आहे तीही संपूर्णपणे आपण पचवलेली असतेच

असे नाही. पण आपल्या मनाला आपणाजवळ पुरेशी माहिती आहे ह्याचे एक समाधान असते. शाहूमहाराजांच्याबाबत मला हे समाधान आहे. आपण मांडलेली मते अधिक पुराव्यानंतर इतरांनी खोडून काढली तर विषाद वाटण्याजोगे मला त्यात काही नाही. उलट अशा खंडनांचे मी स्वागत करीन. पण मी मते मांडण्यापूर्वी मला आपल्याजवळ पुरेसा पुरावा आहे असे वाटले पाहिजे. त्याची सोय कशी करावी हा माझ्यासमोर अडचणीचा प्रश्न आहे. शाहूमहाराजांच्याविषयी काही कमी लिहिले गेले आहे असे नाही. यंदा तर शाहूमहाराजांची जन्मशताब्दीच असल्यामुळे प्रत्येकाने त्यांच्या गुणगौरवासाठी काही तरी लिहिलेलेच आहे. अशा प्रकारे महोत्सवी लिखाण लिहिण्याची मला इच्छा आहे. सगळेजण जयजयकार करीत असताना समाजापासून दूर आपण एकटेच सुतक आल्याप्रमाणे दिसावे, असे मलाही वाटत नाही. पण समाधानकारक पुरावा नसताना लिहिण्याची खरी उर्मी येत नाही.

शाहूमहाराजांविषयी लिहिताना जवळपास प्रत्येकाने वेदोक्त प्रकरणाचा उल्लेख केलेला आहे. हे वेदोक्त प्रकरण इ. स. १९०० च्या आसपास निर्माण झाले. आपण क्षत्रिय आहोत म्हणून क्षत्रियांना साजेल ह्या पद्धतीने वैदिक मंत्रांनी आपली धार्मिक कृत्ये करण्याचा आपला हक्क आहे, असे शाहूमहाराजांचे म्हणणे होते. हे म्हणणे त्या वेळच्या पुरोहितांना मान्य नव्हते. ह्या पुरोहितांच्या मते शाहूमहाराज क्षत्रिय नसून शूद्र आहेत; म्हणून त्यांना वैदिक मंत्रांचा अधिकार नाही ! ह्या निमित्ताने कोल्हापुरातील पुरोहित वर्ग व त्यांचा पाठीराखा असणारा संस्थानांच्या आंतला आणि बाहेरचा प्रायः सगळा ब्राह्मणवर्ग एकीकडे आणि शाहूमहाराज दुसरीकडे. अशी विभागणीच झाली होती. शिवाजीचा हक्क टिळकांना मान्य होता. ह्या झगड्यातील अत्यंत चतुराईची अन् तितकीच आग्रही अंधश्रद्धेची दुर्दैवी भूमिका जर असेल तर ती लोकमान्य टिळकांची आहे. लोकमान्य टिळक, शाहूमहाराज छत्रपतींचे वारस म्हणून त्यांना क्षत्रिय मानावयास तयार होते. म्हणजे शिवाजीचा आणि शिवाजीच्या वारसाचा क्षत्रियत्वावरील हक्क लोकमान्यांना मान्य होता, पण शिवाजीच्या जातीचा म्हणजे मराठ्यांचा स्वतःला क्षत्रिय मानण्याचा हक्क मात्र त्यांना मान्य नव्हता. लोकमान्यांच्या ह्या भूमिकेला चतुर एवढ्यासाठी म्हणावयाचे की, शिवाजी हा त्यांचा नेता होता. छत्रपती शिवाजीमहाराजांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने लोकमान्यांनी आरंभिलेला होता. शिवाजी महाराजांना गागाभट्टानेच क्षत्रिय म्हणून राज्याभिषेक केलेला होता. हिंदूंचा राजा होण्याचा व म्हणून क्षत्रिय असण्याचा शिवाजीचा वारस म्हणून कोल्हापूरकर छत्रपतींनाही ते क्षत्रिय मानण्यास तयार होते. म्हणजे शिवाजीचे नायकत्व व गागाभट्टाचा निर्णय सांभाळून लोकमान्य जात होते, स्वतः सुरू

केलेल्या उत्सवालाही ते सांभाळीत होते, पण हे करत असतानाच स्मृतिग्रंथाला अनुसरून ते मराठ्यांचा 'क्षत्रिय' होण्याचा हक्क नाकारत होते! स्मृतिग्रंथाना आणि नेमकेपणाने सांगावयाचे तर ह्या ग्रंथांचे भाष्यकार ह्यांना मराठ्यांच्याविषयी असे काहीच म्हणावयाचे नाही. स्मृतिपरंपरेचे म्हणणे असे आहे की. कलियुगांत ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक राहतात! शाहूमहाराज ब्राह्मण नाहीत, सबब ते शूद्र आहेत. स्मृतिपरंपरेचा हा निर्णय राजर्षी शाहूंच्यापूरता, मराठ्यांपूरता किंवा महाराष्ट्रापुरता नसून तो आंतरराष्ट्रीय निर्णय आहे! जगात कोठेही ब्राह्मणांच्याखेरीज इतर सगळे शूद्रच आहेत, असा ह्या निर्णयाचा अर्थ आहे. एखाद्या भूमिकेचा अभिजात मूर्खपणा म्हणतात तो हा आहे! दुर्दैवी घटना असेल तर लोकमान्यांच्यासारखा महान राजकीय नेता ह्या परंपरावाद्यांच्या बाजूने उभा राहिला.

आज इतक्या दिवसानंतर पाऊणशे वर्षांपूर्वीच्या ह्या वादाकडे आपण पाहू लागलो म्हणजे तो हास्यस्पद वाटल्याशिवाय राहत नाही. ह्या वादातील सर्वात हास्यस्पद भूमिका असेल तर ती ही आहे की, कोल्हापूरकर छत्रपती हे हिंदुपदपातशहा असल्यामुळे स्वतःला शूद्र ठरणाऱ्या परंपरेचे त्यांनी निष्ठेने पालन केले पाहिजे, असा आग्रह इतर सर्वांच्याबरोबर लोकमान्यांनीही धरला! आज हा वाद हास्यास्पद वाटतो, पाऊणशे वर्षांपूर्वी हा ज्वलन्त आणि जिव्हाळ्याचा प्रश्न होता. लक्षावधींचा स्वाभिमान आणि प्रतिष्ठा त्यात गुंतलेली होती. आज मराठ्यांनाही स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेण्यात फारसा अर्थ वाटत नाही; आणि जर मराठे स्वतःला क्षत्रिय मानतील तर मोठ्या आनंदाने व उत्साहने त्यांची धर्मकृत्ये करण्यास ब्राह्मण पुढे येतील! क्षत्रियांवर ब्राह्मणांच्या सर्वांगीण रक्षणाची व ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची जबाबदारी असते. स्वतंत्र भारतातील महाराष्ट्रात प्रभावी बनलेला सधन मराठा वर्ग जर ब्राह्मणांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेणार असेल तर आजचा ब्राह्मण प्रत्येक जिल्ह्यातील सधन मराठा नेत्यास क्षत्रिय म्हणून तर मान्यता देईलच, पण इच्छा असेल त्याला 'छत्रपती' म्हणून अभिषेक करण्यासही तयार होईल. अर्थातच राज्याभिषेकाची दक्षिणा तेवढीच भरीव असावी अशी त्याची अपेक्षा असेल.

समाजजीवनाचा इतिहास आपण पाहू लागलो म्हणजे दोन प्रकारची आंदोलने आपणांस दिसतात. काही आंदोलनांचा आशय अत्यंत खोल असतो. तिथे लढा शतकानुशतके चालणारा असतो. ही आंदोलने सुरू करणाऱ्या नेत्यांना आपल्या हयातीत स्वतःचा विजय झालेला तर पाहता येतच नाही, पण पुढच्या कित्येक पिढ्यांना हा विजय दिसू शकत नाही. अशी आंदोलने पिढ्यान् पिढ्या चालणारीं असतात. त्यांची प्रेरणा शतकानुशतके उपयोगाची असते. कारण ही

आंदोलने शतकानुशतके न सुटणाऱ्या जटिल प्रश्नांना आव्हाने देत उभी असतात. सर्व शूद्रांना प्रतिष्ठित करण्याचे जे स्वप्न महात्मा फुल्यांनी पाहिले ते अजून पुरे झालेले नाहीं. अजूनही माझ्यासारख्या लक्ष सामान्यांना प्रेरणा देण्याचे सामर्थ्य महात्मा फुल्यांच्या कार्यात एकवटलेले जाणवते. समतेचे आंदोलन मानवी समाजात सर्वांगीण परिपूर्ण स्वातंत्र्य प्रस्थापित झाल्याशिवाय संपत नसते. आंदोलनांचा एक प्रकार हा आहे.

सामाजिक आंदोलनांचा दुसराही एक प्रकार असतो. आपल्या विशिष्ट स्थलकालात ती आंदोलने अत्यंत महत्त्वाची असतात. त्यानंतर सगळा प्रश्नच सुटून गेलेला असतो. त्या आंदोलनाचे महत्त्वच काळाच्या ओघात विजय झाल्यामुळे संपलेले असते. संपूर्ण विजय म्हणजे त्या आंदोलनातील प्रेरकतेचा संपूर्ण शेवट मानावा लागतो! विष्णू पंडितांच्या वेळी पुनर्विवाह हा असा प्रश्न होता. आता पुनर्विवाह करण्यास धैर्यही लागत नाही व पुनर्विवाह करणाऱ्यांनी फार मोठी समाजसुधारणा केली असेही कुणी मानत नाही. महर्षी कर्व्यांच्या वेळी स्त्रियांनी शालेय शिक्षण घ्यावे हीच एक क्रान्ती होती. आता हजारो मुली शाळेत जात आहेत. त्यामुळे हा प्रश्न निकालात निघालेला आहे. भारत स्वतंत्र झाला, प्रौढ मतदानावर आधारलेली लोकशाही येथे कार्यरत झाली. स्वतंत्र भारताने दलितांच्या शिक्षणाच्या सोयी निर्माण केल्या, त्यांना नोकऱ्यात राखीव जागा दिल्या, प्रौढ मतदानाच्या प्रक्रियेमुळे महाराष्ट्राच्या समाज जीवनावर बहुसंख्याक असणाऱ्या मराठा समाजाचे निर्विवाद प्रभुत्व स्थापन झाले. ज्यांचा ज्यांचा स्वातंत्र्य, लोकशाही आणि समतेवर विश्वास असेल ते सर्वजण असे म्हणतील की झाले ह्यात वाईट काहीच झाले नाही. जे उचित, योग्य व अवश्य होते तेच घडले; पण हा निर्विवाद जय घडल्यामुळे आता वेदोक्त प्रकरण मृत इतिहासाचा भाग झाला आहे. त्या घटनेतील प्रेरकता संपून गेली आहे. राजर्षी शाहू महाराजांकडे वेदोक्ताचे नेते म्हणून जर मराठा समाज पहात असेल तर तो त्या समाजातील सुप्त जातीयवाद आहे. तो मराठा समाजातील परंपरावादी मनाचा भाग आहे. राजर्षी महाराजांकडे आधुनिकतेचे आणि समतेचे नेते म्हणून पाहण्याची त्यांच्या चाहत्यांची तयारी आहे काय हाच एक मोठा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांत सवर्ण हिंदू विरुद्ध दलित असा जो चिरंतन संघर्ष चालू आहे त्यात सवर्ण हिंदूंचे नेतृत्व ह्या प्रश्नापुरते प्रायः मराठा वर्गाने घेतल्यासारखे दिसते. हे उघडे सत्य मान्य करून त्याचे उत्तर शोधण्याऐवजी जी माणसे आजही ब्राह्मणच दलित आणि सवर्ण-हिंदु ह्यांच्यात भांडणे लावीत आहेत असे सांगण्याचा प्रयत्न करतात, ते मनाने वेदोक्ताच्या काळात वावरत आहेत. त्यांच्यासाठी शाहूमहाराज समतेचे नेते नसून वेदोक्ताचे नेते आहेत. मी राजर्षींना स्वातंत्र्याचे नेते म्हणून एक तर

वंदनीय मानीन किंवा गप्प बसेन, पण वेदोक्ताला अवास्तव महत्त्व देण्यात मला अर्थ वाटत नाही.

ह्या वेदोक्ताच्या मुद्द्यावर काही महत्त्वाच्या बाबतीत दुर्लक्ष होत आहे असे दिसते. जोपर्यंत ह्या दुर्लक्षाचा खुलासा होत नाही तोपर्यंत शाहू महाराजां-विषयी पुरेशी माहिती आपणाला आहे असे मला वाटणार नाही. राजर्षी शाहूमहाराज इ. स. १८७४ ला जन्मले. त्यापूर्वी ११ वर्षे इ. स. १८६३ ला सयाजीराव महाराज गायकवाड जन्माला आले होते. सयाजीराव आणि शाहूमहाराज दोघेही दत्तक. सयाजीरावांना वयाच्या अठराव्या वर्षी इ. स. १८८१ ला राज्याधिकार मिळाला. ह्यानंतर १३ वर्षांनी इ. स. १८९४ ला शाहूमहाराज ह्यांना राज्याधिकार मिळाला. सयाजीराव महाराज अगदी तरुण वयात गादीवर आले, पण तेव्हापासून दलितांच्या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष होते. महाराष्ट्रात महात्मा फुले ह्यांनी जी चळवळ सुरू केलेली होती तिचे महत्त्व तरुण वयापासूनच सयाजीरावांना जाणवत होते. सयाजी-रावांनी पुण्यातील सत्यशोधक समाजाचे एक कार्यकर्ते धामणसकर बडोद्याला दिवाण म्हणून नेमलेले होते. समाजसुधारणेच्या विचारांशी तरुण वयातच सयाजी-राव महाराज गायकवाड ह्यांचा संबंध आला. इ. स. १८९६ साली महाराजांनी राजवाड्यातील सर्व कृत्ये वेदोक्त पद्धतीने करण्याची आज्ञा दिली आणि त्याबरोबरच सर्व मराठा समाजाचे धर्मसंस्कार वेदोक्त पद्धतीने करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम केले, ह्या घटना दूर बडोद्यात चालू होत्या, असे समज-ण्याचे कारण नाहीं. ह्या सर्व उद्योगाला तेव्हाही केसरीचा विरोध होता. केसरीच्या विरोधामुळे सर्व राष्ट्रभर हा प्रश्न खदखदत होता. शाहू महाराजांनी ह्या प्रकरणाला चार वर्षांनंतर हात घातला. सयाजीराव महाराजांनी वेदोक्त प्रकरण एखाद्या राजाप्रमाणे थाटात सोडवले, त्यांनी पंडितांना ह्या प्रश्नावर टिपण करण्यास सांगितले. सर्व मराठे क्षत्रिय असून त्यांना वेदोक्त कर्मांचा अधिकार आहे असाच पंडितांचा निर्णय येईल ह्याची सोय केली, आणि पंडितांचा निर्णय म्हणून सयाजीरावांनी हा निर्णय स्वीकारला. वेदोक्त प्रकरणाविषयी बोलताना अगर लिहिताना ह्या प्रकरणी अग्रहक्क सयाजीराव गायकवाडांचा आहे, हेही कोणी आग्रहाने नोंदवत नाही. कोणत्याही प्रकारचा व्यक्तिगत हेवादावा मध्ये न आणता बडोदेकर धर्मपंडितांचा हा निर्णय अजून चार आर्यसमाजी पंडित चर्चेसाठी बसवून शाहू महाराजांना पंडितांचा निर्णय म्हणून स्वतःस स्वीकारता आला असता. त्यांचा आर्यसमाजाकडे असलेला ओढा लक्षात घेता त्या पद्धतीने वागणे त्याना फार सोपे गेले असते, हे स्पष्ट दिसते. समोर सरळ रस्ता दिसत असताना महाराज त्या मार्गाने का गेले नाहीत, ह्याचा कोणताच खुलासा ह्या विषयावर लांब रुंद लिहिणारे लोक करीत नाहीत, असे जेव्हा मला दिसते व विशिष्ट मार्गाने

जाण्यासाठी महाराजाना काही कारण असले पाहिजे असेही मला वाटू लागते. त्यावेळी महाराजांच्या बाजूला १०० टक्के पाठिंबा असणाऱ्यां माझ्यासारख्या माणसाला सारखे असे वाट लागते की आपल्याजवळ पुरेशी माहिती नाही.

राजर्षी शाहूमहाराज ह्यांच्या मनावर आर्य समाजाचा फार मोठा प्रभाव होता. आर्य समाजाविषयीचे हे आकर्षण त्यांच्या ठिकाणी ऐन तारुण्यातच निर्माण झालेले होते. किंबहुना आर्य समाजाच्या ह्या आकर्षणामुळे वेदोक्त कर्माचा आग्रह सुरू झाला होता. ह्या ठिकाणी आर्य समाज म्हटल्यामुळे बिचकून जाण्याचे काही कारण नाही. महर्षी दयानंद ह्यांनी सुरू केलेली आर्य समाज ही एक विलक्षण कर्मठांची संघटना आहे. मुसलमानांचा पवित्र कुराणावर जसा गाढ आणि आग्रही विश्वास असतो तसा आर्य समाजाचा वेदांवर विश्वास आहे. त्यांच्यासाठी वेद हीं ईश्वराची निःश्वासिते असून सर्व जगाचे ज्ञान वेदांत भरलेले आहे. वेदप्रामाण्यावर आर्य समाजाचा कडवा विश्वास आहे– आणि आर्य समाज ही सहनशील, दुबळ्यांची संघटना नसून ती आक्रमक संघटना आहे. आर्य समाजाचे हे कर्मठ रूप पाहिले म्हणजे हे महासनातनी, महापरंपरावादी असले पाहिजेत असा ग्रह होतो व त्यामुळे रामराज्य सभा, वर्णाश्रम स्वराज्य संघ, असल्या प्रकारच्या सनातन्यांच्या यादीत आर्य समाजाचे नाव घेण्याची इच्छा होऊ लागते. ह्याच ठिकाणी खरा घोटाळा आहे. म्हणूनच त्यांना विलक्षण कर्मठ म्हटले आहे. आर्य समाज आपल्या एकांतिक वेदनिष्ठेमुळे स्मृती, पुराणे, हिंदू समाजातल्या सर्व रूढी, मूतिपूजा. धामिक खुळचटपणा ह्या सर्वांचा कडवा विरोधक राहिला; आर्यसमाज ही महाराष्ट्रातल्या बोलक्या सुधारकांची संघटना नव्हती, ती आग्रही आक्रमकांची संघटना आहे. म्हणून परंपरावादावर हल्ले करण्यात आर्यसमाज अग्रभागी राहिला! वेदांत स्त्री–शिक्षण आहे म्हणून आर्यसमाज स्त्री–शिक्षणाचा पुरस्कर्ता आहे. वेदांत प्रौढ–विवाह आहेत, प्रेम–विवाह आहेत. म्हणून ह्यांचाही तो पुरस्कर्ता आहे. वेदांत जाती नाहीत. अस्पृश्यता नाही, म्हणून आर्य समाज सर्व जातिभेदांचा विध्वंसक, अस्पृश्यता मोडणारा आणि आंतरजातीय विवाह करणारा आहे. कोणत्याही क्षेत्रात ते झपाट्याने लक्षसंख्या पुरी करणारे लोक आहेत. एकदा आंतरजातीय विवाह सुरू झाले की ते दहा–पंधरा वर्षांत असे एक–लक्ष विवाह घडवूनच दाखवतात. समाज सुधारकांच्या सगळ्या सुधारणावादी कार्यक्रमांची प्रचंड संख्येने अंमलबजावणी करणारा असा हा शक्ति–स्त्रोत आहे. आर्य समाजाने वैदिक परंपरेचा अभिमान आणि सगळ्या समाज सुधारणा ह्यांचा समन्वय प्रत्यक्षात आणून दाखवला आहे. शिवाय आर्य समाज राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कडवा पुरस्कर्ता होता. शाहूमहाराजांच्या ठिकाणी असणारी आर्य समाजाची ओढ जितकी समाज सुधारणेची ओढ आहे तितकीच ती ह्या महान राष्ट्राच्या स्वातंत्र्याचीही उत्कट

ओढ असण्याचा संभव आपण समजून घेतला पाहिजे. बारकाईने पाहिले तर महाराज महाराष्ट्रात आर्य समाजाचे फार मोठे प्रतिनिधी दिसतात.

राजर्षी शाहूमहाराज कोल्हापूरच्या गादीवर होते, शिवाजीमहाराजांचे वारसदार होते. राजेही होते. त्यामुळे त्यांना हिंदूधर्माचे व परंपरेचे अभिमानी असणे भाग होते. हा अभिमान आपल्या खाजगी जीवनात सर्व परंपरागत कुलधर्म आणि कुलाचार सांभाळून त्यांनी व्यक्त केला. सार्वजनिक जीवनात त्यांनी जातिभेदाच्या विरूद्ध, अस्पृश्यतेच्या विरूद्ध सर्वशक्तीनिशी जाहिररीत्या प्रयत्न करुन त्यांना संपवण्याचा घाट घातला. त्यांनी अस्पृश्यांना मंदिर-प्रवेशाचा हक्क दिला. विविध नोकऱ्यांमध्ये त्यांची भरती करुन स्पृश्यास्पृश्य विचार बाजूला सारला. त्यांनी एका दलिताला कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष केले. सर्व अस्पृश्यांना पाणवठे, शाळा आणि विश्रामगृहे खुली करून दिली. सामाजिक समता प्रत्यक्ष व्यवहारात साधण्याचा महाराजांचा हा प्रयत्न महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वांत महत्त्वाचा प्रयत्न म्हटला पाहिजे. बाजीराव पेशव्याला इंग्रजांच्या विरुद्ध बावळट उठाव करण्याची दुर्बुद्धी सुचली नसती तर सगळ्याच मांडलिक संस्थानिकांप्रमाणे एक पेशव्यांचेही संस्थान महाराष्ट्रात शिल्लक राहिले असते. सगळ्या ब्राह्मण जमिन-दारांना, वतनदारांना राजेपदी असलेल्या ह्या संस्थानिकांच्याविषयी अत्यंत आदर आणि ममत्व वाटले असते. सर्व देशस्थ कोकणस्थ, कऱ्हाडे ब्राह्मणांचा स्वयंभू नेता म्हणून हा पेशवा ब्राह्मणांनी पाहिला असता, पेशव्यांच्या गादीवर असलेल्या अशा एखाद्या संस्थानिकाने सामाजिक समतेचे काम आपल्या अंगावर घ्यावे ह्याला एक महत्त्व आले असते. शिवाजीमहाराजांची वारसदारी सांगणाऱ्या सातारा आणि कोल्हापूर ह्या दोन गाद्यांपैकी एक बुडालेलीच होती. सर्व महाराष्ट्राच्या समोर छत्रपती शिवाजीमहाराजांविषयी भक्ती–भावनेचे सगुणसाकाररुप कोल्हापूरकरांच्या रुपाने उभे होते. सामाजिक समतेच्या कार्यक्रमाला शाहूमहाराजांनी वाहून घ्यावे, ह्या घटनेचे महत्त्व सामाजिक इतिहासात लोकहितवादीं, आगरकर, रानडे, फुले ह्यांनी केलेल्या कार्यापेक्षा वेगळे आणि वेगळ्या महत्त्वाचे आहे.

परंपरागत जीवनाचे काही नियम असतात. हे नियम शब्दांनी सांगता येण्याजोगे सरळ नसतात, पण ते परंपरावादी मनात प्रभावी असतात, आजही आपण हे पाहतो की, जनतेच्या कल्याणासाठी सर्व प्रकारचा त्याग व कष्ट करणारे नेते जनतेला तितके प्रिय कधीच होत नाहीत! १००–१२५ वर्षे इंग्रजांच्या गुलामगिरीत फक्त बेजबाबदार, चैन विलास भोग ह्यांच्यात ज्यांचे जीवन गेले त्या संस्थानिकांचे वारसदार आजही सामान्य जनतेला फार प्रिय आहेत! परंपरावादी समाजात परंपरेची श्रद्धास्थाने असतात, त्यांच्यावर भक्ती ठेवण्याची

परंपरा असते. लोकहितवादी, रानडे, आगरकर. फुले ही कर्तबगार, चारित्र्यवान माणसे असतील, पण ती परंपरेतील वतनदार माणसे नव्हती. परंपरेने चालत आलेला आदर आणि श्रद्धा, परंपरेची आंधळी भक्ती महात्मा फुले यांच्या वाट्याला कधी आली नाही. शाहूमहाराजांना ही जागा उपलब्ध झालेली होती. शाहू-महाराजांच्या रुपाने कुलीन मराठ्यांचा सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंदनीय, आदरणीय वारस समतेच्या आंदोलनासाठी उभा होता. शतकांची श्रद्धा आणि मान्यता, कायदा बदलण्याची आपल्या संस्थानपुरती का होईना हिंमत आणि जिद्द, आपल्या ध्येयवादावर असणारा रांगडा प्रामाणिक विश्वास ह्या सगळ्या गोष्टी शाहूमहाराजांना एकत्रीत उपलब्ध होत्या. त्यांच्या-विरुद्ध जाहिररीत्या आघाडी उघडणे कोणत्याच कुलीन मराठ्याला शक्य नव्हते ! शृंगेरी पीठाच्या शंकराचार्यांनी जर अस्पृश्यता निवारणाची मोहीम हाती घेतली असती आणि शंकराचार्यांची आज्ञा म्हणून सर्व धर्मगुरु आणि हिंदु संस्थानिक उद्योगाला लागले असते तर परंपरावादाला जो हादरा बसला असता तसा काही प्रकार ह्या लढ्यात राजर्षीच्या पदार्पणामुळे झाला होता.

महात्मा फुले समतेच्या लढ्याला सिद्ध झाले, चार तरुण पोरे त्यांच्या-बरोबर आली. पण शाहूमहाराजांच्याबरोबर क्रमाने मराठा वतनदार वर्ग ह्या लढ्यात महाराजांच्या बाजुने उतरत गेला. परंपरेचे नेते परंपरा उद्ध्वस्त करणाऱ्या सामाजिक क्रांतीत उतरू लागतात तेव्हा ही घटना विविध प्रकारच्या भवितव्यांनी भारावलेली असते. एक तर ही सर्व जेष्ठ मंडळी मोठ्या ताकतीने तो प्रश्न सोडवून दाखवतात. ह्याच्या अगदी विरुद्ध वतनदार ज्यावेळी समतेचे पुरस्कर्ते होतात त्यावेळी ते शाब्दिक पुरस्कार करीत करीत व्यवहारतः आपल्या वतनदाऱ्या अधिक बळकट करुन घेतात. महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतीचा हा असा दुर्दैवी इतिहास आहे ! समतेच्या चळवळीचा एक पदर ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली प्रवाहित होतो. लोकहितवादी आणि रानडे हा आरंभ मानता येईल. हा प्रवाह आपले विचार अंमलात आणण्यास नेहमीच कच खाणारा असा राहिला. वैयक्तिक अपवाद सोडले तर प्रौढ-विवाह आणि विधवा-विवाह ह्यापलीकडे ह्या प्रवाहाची कार्यक्रमरुपाने फारशी झेप कधीच जाऊ शकली नाही. इंग्रज राजवटीचे गोडवे गाणारा स्वतःला सुधारणावादी समजणारा एक फॅशनेबल वर्ग ह्यातून जन्माला आला.

सुधारणेचा दुसरा प्रवाह महात्मा फुले ह्यांच्यापासून सुरू होतो. हा ब्राह्मणेतरांच्या नेतृत्वाखाली प्रवाहित झालेला पदर म्हटला पाहिजे. महात्मा फुले एकीकडे ब्राह्मणांच्या वर्चस्वाचे विरोधक होते. ब्राह्मण्य ज्या वैदिक विद्येवर

आधारलेले आहे त्याचेही विरोधक होते, धर्मक्षेत्रात सर्वांना पूज्य म्हणून वरिष्ठ, शिक्षण क्षेत्रात सर्वांच्यापुढे गेलेले म्हणून शासकीय सेवेतील सत्तास्थाने काबीज करुन बसलेले वरिष्ठ आणि नव्या इंग्रजी कायद्याचा आधार घेऊन सावकारी व जमीनदारी ह्यांतही बेदरकारपणे पुढे गेलेले अर्थक्षेत्रातले ग्रामीण भागातले उच्चपदस्थ ( शहर भागात असणारा उद्योगपती त्याहीवेळी ब्राह्मण नव्हता ) असे ब्राह्मण जातीचे त्रिविक्रमी वर्चस्व त्या वेळच्या महाराष्ट्रात होते. ह्या सर्वांच्या विरुद्ध महात्मा फुल्यांच्या रूपाने एक न संपणारा अखंड संघर्ष जागृत होतो; पण मडक्याने आपल्या डोक्यावरचे गाडगे उतरून खाली ठेवावे इतकाच ज्योतिबांचा क्रांतीचा आशय मर्यादित नव्हता. त्यांचा विरोध माथनींच्या डोक्यावर शांतपणे बसलेल्या मडक्यांनाही होता त्यांना मराठ्यांचेहो वर्चस्व नको होते. सर्व दलित आणि अस्पृश्य ह्यांच्याही डोक्यावर असणारे गुलामीचे ओझे ज्योतिबा खाली उतरू इच्छीत होते. मराठ्यांना 'तुम्ही क्षत्रिय आहात म्हणून वर्णश्रेष्ठ आहात,' हे कधी ज्योतिबांनी सांगितले नाही ! अस्पृश्यांना कड्याखांद्यावर घेऊन ज्योतिबा उभे राहिले. आपण सर्वच शूद्र आहोत असे त्यांनी प्रतिपादन केले ! कोणत्याही प्रकारच्या परंपरागत श्रेष्ठत्वाच्या अहंकाराविरुद्ध हा लढा होता, तो शहर भागात मजूर चळवळीच्या रूपाने कार्यान्वित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण फुल्यांच्या राजकारणाचे वारसदार आहोत हे सांगण्यात अभिमान वाटला, आपण एका सवर्ण हिंदुचे नेतृत्व स्विकारीत आहोत असे बाबासाहेबांना कधी वाटले नाही. कारण ज्योतिबा ही अविद्वानांच्या भाषेत उग्रपणे व्यक्त झालेली, पण सर्वांगीण स्वातंत्र्याची निर्भेळ ज्योत होती.

ज्योतिबांचे कार्य अवघड होते ह्यात वाद नाही. पण त्याबरोबरच त्या चळवळीचा आशय सर्वांगीण होता हेही पटण्यास अडचण पडू नये, कोणतीही कारणे असोत, परिस्थितीची कोणतीही अडचण असो, राजर्षी शाहूमहाराज कितीही प्रामाणिक असोत, त्यांची इच्छा असो अगर नसो, काही घटना घडणे अपरिहार्य होते. आर्य समाजाने उत्तर भारतात समाज सुधारणांचा कार्यक्रम कितीही वेगाने अंमलात आणला तरी ती शेवटी वर्णाश्रमावर विश्वास ठेवणारी चळवळ होती. ह्या चळवळीमुळे सर्व मराठे क्षत्रिय आहेत असा अभिमान जागा करता येऊ शकेल. ह्या वर्गाला शूद्र मानणाऱ्या ब्राह्मणास डोक्यावरून उतरून खाली टाकला पाहिजे हीही जाणीव निर्माण होऊ शकेल. चळवळीचा व्याप म्हणून केवळ मराठेच नव्हे तर साळी–माळी, तेली–कोळी असा अठरा पगड जातींचा बहुजन समाज क्षत्रियच आहे, असा आग्रह धरता येईल. ही चळवळ अस्पृश्यांची अस्पृश्यता संपली असे आग्रहाने सांगू शकेल, पण शेवटी 'शूद्र' हे शूद्रच राहणार. वेद, वैदिक धर्म, चातुर्वण्य ह्यांच्या अभिमानातून ब्राह्मण–क्षत्रियांचे झगडे शक्य आहेत. क्षत्रियांना बाजूला

सारून कधी ब्राह्मण बलवान होतील, कधी ब्राह्मणांना बाजूला सारून क्षत्रिय बलवान होतील, कधी विजय वशिष्ठाचा होईल, –कधी विश्वामित्राचा होईल. शूद्रांचे शूद्रत्व टळणे ह्यामुळे शक्य नसते.

शाहूमहाराजांपासून मराठा समाजाने वेदांचा अभिमान उचलला नाही, वर्णाश्रम धर्माचा अभिमानही उचलला नाही. पण कुलधर्म, कुलाचार. परंपरा ह्यांचा त्यागही त्यांना पचला नाही. हा वरिष्ठ मराठा समाज फुल्यांची भाषा बोलत आला आणि महाराजांची पूजा करत आला. महाराजांनी कितीही प्रयत्न केला तर ह्या घटनेचे काहीं परिणाम घडणे भाग होते. महाराजांमुळे सगळे वतनदार ह्या चळवळीत खेचले गेले आणि मग क्रमाने शहरातल्या उद्योगपतीविरुद्ध संघटीत होणाऱ्या मजूर–चळवळींशी ह्या आंदोलनाचा संबंध सुटत गेला. वतनदारांच्या नेतृत्वाखाली मजुरांच्या चळवळी संघटीत करता येतच नाहीत, कारण ह्या देशातील सर्वात दरिद्री आणि असंघटीत मजूर हा शेतमजूर आहे. तो ग्रामीण भागांत ह्या वतनदारांच्या तक्त्याखाली सतत दाबून ठेवण्यात आलेला असतो. क्रमाने ह्या आंदोलनांतून आर्थिक गुलामगिरीविषयीचा लढा मागे पडत गेला,–फक्त समतेचा शब्दोच्चार शिल्लक राहिला. दुसरीकडे ह्या आंदोलनातून क्रमाने अस्पृश्यांना आपल्या बरोबरीची प्रतिष्ठा द्यावयाची आहे हा विचार मावळत गेला. परंपरेचा उच्छेद करून समता निर्माण करण्याची फक्त भाषाच राहिली, आणि व्यवहारात, परंपरेत नव्या अहंतांचा शोध सुरू झाला. ब्राह्मण जातीचे वर्चस्व महाराष्ट्रातून क्रमाने ओसरत गेले, पण त्यामुळे क्षत्रियत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या मराठा समाजाचे प्रभुत्व आले. समता आलीच नाही. तो लढा तितकाच गुंता-गुंतीचा राहिला. म्हणजे ब्राह्मणेतरांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली समतेची चळवळ एका नव्या राजकीय वर्चस्वात साकार झाली.

ह्या समतेच्या आंदोलनाचा तिसरा प्रवाह ज्योतिबांच्या ध्येयवादाचे वारस-दार म्हणून बाबासाहेब आंबेडकर प्रवाहीत करतात. हा प्रवाह सर्व समाजाचे नेतृत्व तर करू शकलाच नाही, पण सर्व दलितांनाही तो एकत्र आणू शकला नाही. हा एक वेगळाच इतिहास आहे. त्यात इथे शिरणे विषयांतर होईल. ह्या साऱ्या घडामोडींचे तपशील अत्यंत दुःखाने, पण निर्विकारपणे मी समजून घेऊ इच्छितो. ते समजून घेताना पुन्हा सगळी माहितीची अडचण येथून–तेथून समोर उभी राहिलेली दिसून येते. राजर्षी शाहूंनी केलेली सामाजिक सेवा प्रसिद्ध आहे, पण ह्या सामाजिक सेवेच्याबरोबरच तेवढीच महत्त्वाची कलांची सेवा आहे. नाट्य, सिनेमा, संगीत, चित्र ह्या सर्वांचे महाराज आश्रयदाते होते. महाराष्ट्रात विसाव्या शतकात जो कलाव्यवहार बहरला त्याच्या पाठीशी महाराजांचे पुण्य फार मोठे

आहे. आज असे दिसते की, महाराष्ट्रात सर्वात विकसीत शेती ज्या भागात आहे त्यात कोल्हापूर जिल्हा महत्त्वाचा आहे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मागे शाहूमहाराज असणारच. औद्योगिकरणाच्याबाबत त्यांनी काही तरी धडपड केलेली असेलच. त्यांच्या डोळ्यांसमोर एक सर्वांगीण विकासाचे चित्र उभे असावे असे जाणवत राहते, पण त्याचा तपशील मला उपलब्ध नाही.

काही ठळक महत्त्वाच्या बाबींचा मी उल्लेख करतो. ह्या बाबींवर आजचे लेखक प्रकाश टाकताना दिसत नाहीत. शाहू महाराजांनी नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के जागा बहुजनसमाजासाठी राखीव ठेवल्या ह्या घटनेबाबत त्या काळी फार मोठा गवगवा झाला. आज ही घटना अगदीच स्वाभाविक अशी वाटते. सर्व वरिष्ठ जमाती मिळून कोल्हापूर संस्थानात त्या दहा टक्केही असणार नाहीत. त्यांच्यासाठी पन्नास टक्के जागा. आणि उरलेल्या नव्वद टक्के लोकांसाठी पन्नास टक्के जागा, हे धोरण एक आरंभ म्हणून फार तर समतोल म्हणता येईल. ह्या धोरणाला अतिरेकी म्हणता येणार नाही. पण तरीही महाराजांच्याविषयी ते ब्राह्मण जातीचे द्वेष्टे होते असा सार्वत्रिक गवगवा आहे. ह्या प्रश्नावर माझे मत बनवावयाचे तर असलेले ब्राह्मण नोकर महाराजांनी बडतर्फ किती केले व नव्या जागांपैकी पन्नास टक्के जागा वरिष्ठ वर्गाला देण्यात त्यांनी टाळाटाळ कशी केली, ह्याचाही पुरावा उपलब्ध नाही. त्यांच्या कारकीर्दीत नवनव्या लायक ब्राह्मण मंडळींना नोकऱ्या मिळतच गेल्या. कारण पन्नास टक्के जागांपैकी बहुतेक जागांवर ब्राह्मणच नेमले जावयाचे होते हे उघड आहे! ह्याहीबाबत कुणी काही बोलत नाही. कोणताही पुरावा न पाहता मते द्यावी ह्या अपेक्षेची पूर्ती करण्यास मी असमर्थ आहे.

शाहूमहाराजांनी १८९४ ला राज्यकारभार हाती घेतला. इ. स. १९२२ साली ते वारले. म्हणजे त्यांची कारकीर्द एकूण २८ वर्षांची होती. ह्या अठ्ठावीस वर्षांत महाराजांनी जे शैक्षणिक कार्य केले त्याची तरी नीट ओळख पटावयास नको काय? १८९४ पूर्वी कोल्हापूर संस्थानात कॉलेज नव्हतेच हे मला माहीत आहे. पण प्राथमिक शाळा आणि हायस्कूले किती होती? महाराजांनी आपल्या अठ्ठावीस वर्षांत एकूण किती प्राथमिक शाळा, हायस्कुले आणि कॉलेजेस काढली? बडोदे संस्थानात सक्तीचे प्राथमिक शिक्षण इ. स. १८९३ ला लागू झाले. कोल्हापूरात ही वेळ नक्की केव्हा आली? कोल्हापूरचे जुने कॉलेज राजाराम महाराजांच्या नावे आहे. म्हणजे शाहू महाराजांच्या कारकीर्दीत उच्च शिक्षणाची सोय संस्थानात झालीच नाही की काय? गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वसतिगृह ही महत्त्वाची बाब होती. महाराजांच्या कारकीर्दीपूर्वी कोल्हापुरात वसतिगृहे किती होती? महाराजांनी अठ्ठावीस वर्षांत किती वसतिगृहे काढली?

महाराजांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी कोणते कायदे केले? कोणते नवे उद्योग प्रयत्नपूर्वक संस्थानात नेऊन वसवले? जनतेचे जीवनमान उंचावण्यात त्याचा काही परिणाम झाला काय ? औंध संस्थान किर्लोस्करांमुळे नव्या औद्योगीकरणात प्रवेश करते झाले तसे शाहू महाराजांच्या बाबतीत काय घडले? बडोदे संस्थानात नगरपालिका आणि धारासभांच्या रूपाने जनतेच्या हक्कांची पायाभरणी झाली. व सयाजीराव महाराजांनी जाणीवपूर्वक क्रमाक्रमाने आपले राज्यपद घटनात्मक प्रमुखाच्या पातळीवर येईल ह्या प्रक्रियेला आरंभ करून दिला, तसे कोल्हापुरात काही घडले काय? ह्याची मला तपशिलाने माहिती हवी आहे. ती उपलब्ध होत नाही ही माझी अडचण आहे.

जुने संस्थानिक संस्थानच्या उत्पन्नाचा एक भाग कायम स्वतःच्या खाजगी खर्चासाठी तोडून घेत असत. बदनाम असलेला निजाम आपल्या उत्पन्नाचा एक-चौदांश खाजगी खर्चासाठी घेत असे. बेकानेरचे व म्हैसूरचे पुरोगामी राजे एकूण उत्पन्नाचा सुमारे एक-सप्तमांश हिस्सा खाजगी खर्चासाठी घेत असत. काही राजे असे विलक्षण असत की ते संस्थानचे सगळेच उत्पन्न जणू आपले खाजगी उत्पन्न समजत ! कोल्हापूरमध्ये ह्याबाबत काय परिस्थिती होती, कळत नाही. मी कोल्हापूरला गेलो असताना शाहू-समितीचे अध्यक्ष आमदार साळुंके ह्यांना ह्या दृष्टीने आवश्यक असणारी सर्व माहिती महाराजांच्या गौरव-ग्रंथात एकत्रित करण्यात यावी अशी विनंती केली होती. तिला कोणते रूप येते हे आता पहावयाचे आहे.

थोडक्यात म्हणजे, महाराजांविषयी माझ्या मनात भरपूर आदर आहे, त्यांच्या जीवनाचा तपशीलवार अभ्यास करण्याची माझी इच्छा आहे. पण माझ्या मनाचे समाधान होईल इतकी माहिती मला मिळत नाही, आणि जे लोक शाहू–महाराजांवर लिहितात ते फक्त महाराज जनतेचे कैवारी कसे होते, ह्या प्रश्नावर मोघम लिहिणे पुरेसे मानतात. चौरस, व वस्तुनिष्ठ आकडेवारी देऊन ह्या राजर्षीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन अभ्यासकाकडून व्हावे अशी माझी खूप इच्छा आहे. नव्हे ती आपल्या इतिहास आकलनाच्या दृष्टीने आपली गरजही आहे असे मला वाटते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3233
25463

# ३/ स्वातंत्र्यवीर सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या निधनाने भारताच्या स्वतंत्र्यलढ्यातील अग्रणीवीराचे एक पर्व समाप्त झाले आहे. सशस्त्रक्रांतीवर ज्यांचा विश्वास होता, भारतीय स्वातंत्र्याच्या एकाच ध्यासाने जे पेटून उठले होते त्या भारताच्या सर्वश्रेष्ठ क्रांतीकारकांच्या यादीतील सर्वात शेवटी नजरेआड झालेले दिव्य व्यक्तिमत्व म्हणजे सावरकरांचे होय. ज्या मार्गाने सावरकर भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढवू इच्छित होते तो मार्ग भारताच्या ह्या विशिष्ट परिस्थितीत जनतेला किती पेलला असता आणि उपयुक्त ठरला असता ह्या मुद्यावर वेगवेगळ्या मंडळींचे दुमत होण्याचा संभव आहे. पण सावरकर हे जन्मभर मातृभूमीच्या वैभवाचा एकच ध्यास कुठलीही अपेक्षा न बाळगता कवटाळून जगले. ह्या त्यांच्या जीवनाच्या दिव्यतेवर कुणाचे दुमत होण्याचे कारण नाही. जेव्हा गरज पडली त्यावेळी आततायीपणे अगर भावनेच्या भरात नव्हे तर जाणीवपूर्वक आणि योजनापूर्वक आपण आणि आपले सर्व कुटुंब बिनतक्रार राष्ट्रावरुन त्यांनी कुर्वंडी करून टाकले, आणि असा भाग्यशाली निर्वंश होण्याचे भाग्य आपल्या घराण्याच्या वाटचाला आले ह्याची कृतार्थता जाणवून घेताना ते स्वतः धन्य झाले. सावरकरांच्या जीवनातील इतर सर्व बाबी सोडल्या तरी ही भव्यताच एक कुणाही देशप्रेमी माणसाला त्यांच्यापुढे नतमस्तक होण्यास भाग पाडणारी आहे. ऐन पंचविशीतील एक तरूण पत्नी मागे ठेवून इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठी जातो आणि तिथून राजद्रोही म्हणून पुन्हा भारतात आणला जातो ह्या घटनेपेक्षा अधिक बोचक अशी अनुकंपने जी आहेत ती

महत्त्वाची आहेत. पकडल्या गेल्यानंतर इंग्लंडमध्ये सावरकर सतत असा विचार करीत होते मी पकडला गेलो म्हणून काय झाले, माझा वडील भाऊ आहे. तो माझी पत्नी सांभाळील. हा विचार करीतच सावरकर भारतात आले आणि त्यांना परमेश्वरतुल्य पवित्र असणाऱ्या ह्या पवित्र भूमीवर पाय ठेवताच जर पहिली बातमी कळली असेल तर ती ही की वडील बन्धूनाही पकडण्यात आले आहे. सर्व खटला चालू असताना सावरकर मनाशी म्हणत आम्ही दोघे पकडलो गेलो म्हणून काय झाले, धाकटा भाऊ आहे तो दोघांच्याही बायका सांभाळील. स्वातंत्र्यवीरांना पन्नास वर्षे जन्मठेप, काळेपाणी अशी शिक्षा झाली, वडील भावाला वीस वर्षे काळेपाणी अशी शिक्षा झाली आणि भारतभूमीचा शेवटचा निरोप घेऊन त्यांनी अंदमानावर पाय ठेवला तो त्यांना बातमी कळाली की धाकटा भाऊही पकडला गेला आहे, घरी शिल्लक राहिल्या त्या पतीच्या जिवंतपणी वैधव्य भोगणाऱ्या तीन भाग्यशाली अभागिनी. ह्या घटनेला उद्देशून सावरकरांनी लिहिलेले पत्र पाहण्याजोगे आहे. ह्या पत्रात ते म्हणतात, 'जगात कित्येक फुले उमलतात आणि कोमेजतात त्यांची गणती कुणी ठेवली आहे? पण जे गजेंद्रशुंडेने उपटले गेले आणि प्रभ्वार्पण झाले तेवढे फूल अमर झाले. हे वहिनी! राष्ट्राकरिता निर्वंश होऊन आमचे कुळ धन्य झाले आहे. ह्या मार्गावर आम्ही चुकून माकून अगर आंधळेपणाने आलो नाहीत. जाणून बुजून, इतिहासाने दाखविलेला मार्ग म्हणून, विचारपूर्वक हा रस्ता आम्ही धरला. जे दिव्य असते ते हातीं धरतांना हात जळणारच पण ते जाणूनबुजून सतीचे वाणच आम्ही घेतलेले आहे. हे मातृभूमि! तुझ्या वेदीवर घरदार, जायदाद बळी देऊन टाकलेले आहेत. तुझ्या वेदीवर नवपुत्रासह कांताही बळी दिली आहे. आणि आम्ही तिथे आहोत म्हणून तीन बळी दिले आहेत. जरी सातजण असतो तरी ते सर्वच्या सर्व बळी देतांना मला क्षिती वाटली नसती. 'पन्नास वर्षे जन्मठेपेची शिक्षा झालेला तरूण आपल्या पत्नीला आणि वहिनीला सांत्वन म्हणून हे पत्र लिहितो आहे. हे पाहिले म्हणजे सावरकरांचे कठोर तप आणि उत्कट व निरपेक्ष असे देशप्रेम दिसून येते.

१८१८ साली पेशवाई बुडाली आणि इंग्रजांचे राज्य देशावर आले ह्या गोष्टीची चीड अनेकजणांना आली होती. ज्यांनी खरोखरीच देशासाठी कांहीच केलेले नाही, जे गुलामीशी तडजोड करीत आपली सुरक्षितता सांभाळीत मरेपर्यंत जगले त्या क्षुद्राच्या पेक्षा ज्यांनी इंग्रजांच्या राज्याचा उत्कटतेने द्वेष केला आणि आततायी पतंगाप्रमाणे ज्यांनी स्वतःला ज्वाळेवर भाजून घेतले असेल त्यांचे जीवन केव्हाही श्रेष्ठतरच मानले पाहिजे. आमचे सर्व क्रांतीकारक ह्या दृष्टीने मला आदरणीयच वाटतात. ज्यांचे रस्ते चुकले असतील पण जे काही तरी करण्याच्या प्रयत्नात जळून खाक झाले त्यांचे ममत्व आपण कसे विसरावे?

जे कांहीच करीत नव्हते त्यांच्यापेक्षा ह्या ठिणग्या निश्चितच मोलाचे जीवन जगल्या असे म्हटले पाहिजे. पण ह्या सर्व देशभक्तांचा त्याग, त्याचे बलिदान व इंग्रजी राज्याविषयीची त्यांची चीड आपण मान्य केली तर ह्या कौतुकाला कांही सीमा निश्चितच पडतात. वासुदेव बळवंत फडक्यांच्या सारखा आद्यक्रांतीकारक जर घेतला तर त्यांच्या विषय कितीही ममत्व वाटले तरी ह्या माणसाचे आकलन बेताचे होते हे समजून घेतले पाहिजे. शिवाजीच्या काळी सह्याद्रीच्या पठारावरील चार दोन किल्ले जिंकून घेऊन स्वातंत्र्याचा एक दिवा प्रज्वलीत करणे ह्या गोष्टीला व्यवहार्यता होती पण जो मार्ग मोगलांच्याविरुद्ध व्यवहार्य होता तो मार्ग इंग्रजांच्या विरुद्ध नुसता अव्यवहार्यच नव्हे तर भाबडेपणाचा आणि पोरपणाचा होता. तारायंत्रे. लांब पल्ल्याच्या तोफा आणि सेनारचनेची भौगोलिक पद्धती अस्तित्वात आल्यावर जिल्हयात केलेली बंडे भारतभर पसरण्याआधी जिल्हयातच कोंडली जातात आणि रामोशी बेरड कवाइती फौजेच्या समोर सरळ मारले जातात. हे वासुदेव बळवंतला फारसे कधी कळलेच नाही. रँडला गोळी घालून अगर गव्हर्नरवर बॉम्ब टाकून चीड संताप व्यक्त करता येतो पण इंग्रजी राज्य समाप्त करता येत नाही ही कठोर वस्तुस्थिती होती. देशावर उत्कट प्रेम, इंग्रजांच्या राज्याविषयी अस्सल चीड आणि बलिदानाची तयारी ह्या तीन बाबी भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याला आवश्यक असल्या तरी अपुऱ्या होत्या. क्रांतीकारकांत सावरकर हे असे पहिले क्रांतीकारक की जे भावनेने भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रज्वलित होऊन स्वतःच एक जळती चूड झाले होते पण बुद्धीने पाश्चात्यविद्येचे व इंग्रजी राज्याचे वास्तववादी आकलन करून ते क्रांतीचे महान योजकही झाले होते. सशस्त्र क्रांती भारतात शक्य होती का, हा प्रश्न बाजूला ठेवला तर क्रांतीची पहिली व्यवहार्य, सुसूत्र व अखिल भारतीय पातळीची योजना सावरकरांनी प्रगल्भपणे रचली हे श्रेय इतिहासाला अमान्य करून चालणार नाही. देशावरील प्रेमामुळे सावरकर अधिक उत्कट भाबडे व आततायी झाले नाहीत ते अधिक शांत, व्यवहारी व व्यापक झाले त्यातच त्याचे खरे मोठेपण आहे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी हजारो तरुणांना पेटवून उद्युक्त करावयाचे असेल तर त्यांच्या हाती धगधगत्या निखाऱ्याप्रमाणे चटके देणारा एक क्रांतीवेद ठेवावा लागतो. सावरकरांचे १८५७ वरील पुस्तक हा तो वेद होता. हे पुस्तक म्हणजे इतिहास नव्हे. इतिहास लिहिण्यासाठी लागणारा निर्विकार थंडपणा सावरकरांच्या जवळ नव्हता. त्यांना लिहिवयाचे होते देशप्रेमी तरुणांना पेटविणारे एक पुस्तक, ते आपल्या गरजांप्रमाणे त्यांनी लिहिले. ५७च्या घटनांचा इतका प्रक्षोभक वृत्तांत त्याआधी अगर नंतर पुन्हा कधी कुणी लिहिलाच नाही, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि गरजा बदलल्यानंतर हा वृत्तांत इतिहास म्हणून खरा की खोटा ह्याची

थंडपणे खुशाल चर्चा आज करावी. पारतंत्र्याच्या काळात लढणाऱ्यांना पेटविणारे एक धगधगते अग्निकुंड सिद्ध करावे लागते. सावरकरांनी ह्या ग्रंथाने ते सिद्ध करून ठेवले होते. चोवीस वर्षांच्या पोराने अर्धसहस्र पृष्ठाचा हा महान क्रांतीवेद सिद्ध करावा आणि जर्मन देशात इंग्रजीत छापून तो भारतात प्रसृत करावा ही घटनाच मुळात रोमांचकारी व अद्‌भूत आहे.

भारतात सशस्त्रक्रांती करावयाची तर ते काम व्यक्तीचे अगर व्यक्तीसमूहाचे नसून भारतव्यापी संघटनेचे आहे, ही गोष्ट सावरकरांनी प्रथम ओळखली. त्यासाठी त्यांनी अभिनव भारताची संघटना उभारली. सर्व भारताच्या ३०० वर जिल्ह्यात एका दिवशी, एका वेळी रेल्वेपूल उध्वस्त करणे, विजेच्या तारा तोडणे, मोटारपूल उध्वस्त करणे, बातम्या मिळवणे, व सेना संचलन अशक्य करणे, देशात सर्वत्र छोटी शस्त्रागारे लुटणे हा कार्यक्रम सुसूत्रपणे अमलात आला तरच इंग्रजी राज्य कोलमडू शकेल ही गोष्ट सावरकरांनी ओळखली आणि तशी योजना त्यांनी आखली ह्यातच त्यांचे द्रष्टेपण आहे. ही योजना सफल झाली किंवा नाही, आणि इतके करूनही इंग्रजी राज्य कोलमडले असते काय हे शंकेखोर प्रश्न जरूर विचारावेत. पण हे प्रश्न विचारले म्हणजे ही भव्य योजना आखणाऱ्या तेवढ्याच भव्य आकलनाला नमन करण्यास विसरू नये इतकी जाणीव मात्र ठेवली पाहिजे.

ह्या वस्तुनिष्ठ व्यवहार्य योजनेमुळेंच सावरकर त्या पिढीतल्या देशभक्तांना प्रेरक ठरले. कॉ. एम्.एन्.रॉय, कॉ. डांगे., अजय घोष, रजनीदत्त. लाला लजपतराय रासबिहारी घोष, बाबु सुभाषचंद्र, पं. शामजी कृष्ण वर्मा ह्यानी सावरकरांच्याकडून स्फुर्ति घेतली. ही यादी वाटेल तितकी लांबवता येण्याजोगी आहे. अजून एक महत्त्वाचे नांव सेनापती बापटांचे द्यावे लागेल.

देश स्वतंत्र करावयाचा तर मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे हवी आणि ती विदेशाने दिली पाहिजेत, हे सावरकरांनी आधीच ओळखले होते. इंग्रजी साम्राज्याचा त्यावेळी मनातून शत्रू असणारा एक साम्राज्यशहा झार आणि दुसरा हुकूमशहा कैसर ह्या दोघांच्याही कडून क्रांतीची उठावणी होताच क्रांतीकारक सरकारला भारताचे सरकार म्हणून जर्मनी व रशिया मान्यता देतील ह्याची हमी सावरकरांनी मिळवली होती. क्रांतीच्या ठरलेल्या दिवशी मित्र राष्ट्रांच्या कडून शस्त्रास्त्रांनी भरलेली जहाजे भारताला येऊन पोहचतील, अशी आश्वासने इंग्लंडमधील विविध राष्ट्रांच्या वकालतींकडून त्यांनी मिळवून ठेवली होती. भारतात क्रांतीचा स्फोट होताच भारतीय क्रांतीकारकांचा ध्येय धोरणविषयक जाहिरनामा जगातील सर्व प्रमुख राष्ट्रांत तातडीने प्रकाशीत होईल. ह्याचीही सोय त्यांनी करुन ठेवली होती.

आणि एवढी प्रदीर्घ योजनासुद्धा विफल होईल हे आधीच हेरून परागंदा क्रांतीकारकांना जपान, जर्मनी, मेक्सिको, अफगाणिस्तान, तुर्कस्तान, रशिया व अमेरिका इथे आश्रय मिळेल ह्याची हमी सावरकरांनी घेतली होती. विमाने, रडार यंत्रे अजून उपलब्ध न झालेल्या त्या जगांत भारताच्या एका पंचविशीतील पोराने अखिल भारतीय पातळीवर आंतरराष्ट्रीय संबंध जोडून एवढी भव्य कल्पना आखावी ही कल्पनाच आजही अंगावर रोमांच उभे करणारी आहे. म्हणूनच सावरकरांच्यावर काहीही निश्चित सिद्ध झाले नाही तरी पुनर्जन्म न मानणाऱ्या ब्रिटीश सरकारने त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सावरकरांचे मन कुठल्या तरी अजब मुशींतून घडले होते ह्यात शंका नाही. हा माणूस अंगावर वेताचा मार बसत आहे, शरीरात ताप भरलेला आहे, सर्व शरीर ठणकत आहे, या काळात तेलाचा घाणा आपण फिरवीत विचार करीत होता की स्वतंत्र भारतात ही शिक्षा चालू ठेवावी की न ठेवावी ? त्या परिस्थितीत सावरकरांचा निर्णय हाच झाला आहे की तुरुंग भयावहच असावा म्हणून ही शिक्षा चालू ठेवावी. दिवसभर काथ्या कुटून रक्तबंबाळ झालेल्या हाताने हा माणूस जेलच्या भिंतीवर बोरीच्या काट्याने कविता लिहित बसे, आणि ह्या कविता कोठडी बदलण्याआधी मुखोद्गत करीत असे. सावरकर तुरुंगात होते आणि टागोरांना नोबेल पारितोषक मिळाले. जन्मठेप-काळेपाणी भोगणारा हा माणूस भारताच्या ह्या सन्मानाने आनंदला. ह्या घटनेवर सावरकरांची एक कविता आहे. त्या कवितेत ते म्हणतात, 'उद्यानात डोलणाऱ्या उत्फुल्ल फुला ! आपल्या रंगगंधानी जग थक्क करण्यात तुला यश आले, हा तुझा गौरव म्हणजे माझाच गौरव आहे, पण त्याच मातीतून उगवणारे एक फूल जर सर्व तृणपर्णे निर्भय व्हावी ह्यासाठी खुशीने चालत अग्नीकुंडात जाऊन पडलेले असेल आणि तिथे जळून नष्ट होताना हसत असेल तर रंग-गंधात डुलणाऱ्या हे माझ्या फुला, ह्या तृणपर्णांना विसरू नकोस ! ह्या दुसऱ्या फुलालाही अधूनमधून आठवण्याचा प्रयत्न कर.' ह्या अंदमानात सावरकरांनी कैद्यांची पहिली संघटना निर्माण केली. अंदमानच्या भूमीवर कैद्यांचे पहिले संप त्यांनी घडवून आणले आणि सावरकर भाग्यशाली असे की ऐन पंचविशीत जे घडविण्यासाठी ते लढले ते घडलेले पाहण्याचे भाग्य त्यांना मिळाले. भारताच्या दराऱ्याने भारताचे सर्व शत्रू दचकावे एवढी एकच जिद्द त्यांच्या मनात शेवटपर्यन्त होती. खेमकरण भागात पॅटन रणगाड्याचे कबरस्तान झालेले त्यांनी कानांनी ऐकले, मनःचक्षूनी हा भव्य पराक्रम पाहिला आणि कृतार्थपणे ह्या जगाचा निरोप घेतला.

सावरकर आपल्या मातृभूमीवर निस्सीम प्रेम करणारे व तिच्या गौरवात धन्यता मानणारे एक महापुरुष होते इथून—तिथून अखिल मानव जात एक आहे,

ह्या उदात्त ध्येयावर त्यांची श्रद्धा होती. त्यांनी म्हटले आहे 'जर्मनपणा,' 'फ्रेंचपणा' असे सर्व 'पण' लयाला जाणार असतील तर माझे भारतीय 'पण' त्यात विलीन करून फक्त माणूस म्हणून जगण्याची माझी तयारी आहे. जर ख्रिस्ती धर्माचे आक्रमण संपणार असेल, ख्रिश्चनत्व मुसलमानत्व ही सर्व 'त्वे' जर संपणार असतील तर माझे हिंदूत्वही त्यात समर्पित करून माणूस म्हणून जगण्याची माझी तयारी आहे. सर्वांनी आपआपले संकुचित अभिमान टिकवावेत, इतरांवर आक्रमणे करावीत आणि मी मात्र मांझा भव्य वारसा सोडून देऊन नामशेष व्हावे हे मला कधीच मान्य नाही. सावरकरांचे भांडण कोणत्या धर्माशी नव्हते, कोणत्या राष्ट्राशी नव्हते. इंग्रजांनी भारत गुलाम केला, ह्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्लंडशी त्यांचे वैर होते. पण जागतिक ज्ञानाची ही केन्द्रभूमि, लोकशाहीची ही एक प्रयोगभूमि त्यांना वंदनीयच होती. ज्या तरुणांना सावरकर पचू शकले असते ते तरुण सावरकर बंधमुक्त होण्यापूर्वीच गांधीजींच्या नेतृत्वाखाली येऊन गेले होते. आणि सावरकर ज्यांना पचणेच शक्य नव्हते त्या भिरु, अंधश्रद्ध, सनातनी, वयस्क मंडळींच्या कोंडाळ्यात सावरकरांना राहणे भाग पडले ही भारतीय राजकारणाची शोकांतिका आहे.

सावरकर कठोर बुद्धीवादी, विज्ञाननिष्ठ व जडवादी होते. एकाही अंधश्रद्धेवर त्यांचा विश्वास नव्हता. माणूस म्हातारपणी धामिक होतो असे म्हणतात. पण सावरकरांच्या बाबतीत हे घडले नाही. जेव्हा स्वयंचलित साधने नव्हती तेव्हा प्रेते खांद्यावरून वाहवी लागत आणि लाकडे रचून जाळावी लागत, आज मोटारी आहेत विजेची दहनभूमी आहे. मग जुन्या कालबाह्य परंपरा कशाला असे त्यांना वाटे. त्यांच्या शेवटच्या इच्छेप्रमाणे विजेच्या पेटीत त्यांचे दहन करण्यात आले. या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात एक क्षुद्र सूर्यमाला आणि त्या सूर्यमालेत एक अतिक्षुद्र पृथ्वी. तिच्या अडीच अब्ज वर्षांच्या प्रदीर्घ कालाचा एक क्षुल्लक थेंब म्हणजे दहा हजार वर्षांची मानवी संस्कृती. विश्वाचा देव कुणी असेल वा नसेल पण जरी तो असला तरी ह्या क्षुद्र पृथ्वीवरील तुच्छ प्राण्यांच्या कल्याणाने तो संचीत आहे असे मानणे म्हणजे सडकेवरच्या भिकार चोराने सम्राट माझा नातेवाईक आहे असे मानण्याइतके हास्यास्पद आहे असे त्यांना वाटे. ह्या वाटण्यात स्वार्थी लोचटपणा असला तरी सत्य नाही हे सावरकरांनी पुन:पुन्हा बजावले आहे. माणसाने कल्पिलेला देव काल्पनिक आणि मानवी आहे हे ते ठासून सांगत, गंगामाय कृपाळू आहे ह्याचा अर्थ ती पापे धुऊन टाकते असा न करता ती जमीन सुपीक करते, असा होतो. ह्याच गंगेला पूर आला, बोटी बुडाल्या म्हणजे लाखो गावे व माणसे नामशेष होतात. हे निसर्गाचे क्रौर्य सावरकरांना माहीत होते. गाय ही माता असलीच तर बैलाची! माणसासाठी तो एक उपयुक्त पशु आहे.

आणि तितकाच उपयोगी घोडा व इमानी कुत्रा ह्या रांगेतच गाईला बसवावे लागेल असे सावरकरांचे म्हणणे असे. ग्रहणाच्या वेळी दान करावे, ह्या पुण्याने राहू–केतुच्या विळख्यातून सूर्य चंद्र सुटतात व गोमुत्राच्या प्राशनाने माणसाची पापे जातात, हा खुळचटपणा सावरकरांना मान्य नव्हता. सावरकर समजून घ्यावयाचे तर हा कठोर बुद्धीवाद समजून घेतला पाहिजे, नसता सावरकर नुसताच वंदनीय होतो हे कुणी विसरु नये.

सावरकरांनी हिंदूस्थान हिंदूचा आहे, इतर कुणाच्या बापाचा नाही ही घोषणा केली, इतकेच आपणाला माहित आहे. पण ह्या घोषणेचा अर्थ काय? सावरकर म्हणतात ही भूमी ज्यांना पवित्र आणि पितृभूमी वाटते, ह्या राष्ट्रावर ज्यांची श्रद्धा आहे ते सर्व हिंदूच होत. हिंदू होण्यासाठी पुराण मानावे हे सावरकरांनी सांगितले नाही. हिंदू असण्यासाठी मांडी घालून नाक दाबावे का गुडघे मोडून निजावे हे सावरकरांनी सांगितले नाही. हिंदू होण्यासाठी ह्या राष्ट्रावर प्रेम करावे इतकेच सांगून ते थाबले.

सावरकरांना हिंसेचे वावडे नव्हते. पण त्यांना हिंसेचीही आवड नव्हती. सर्वत्र शांतता सुजनता असावी, माणसांनी प्रेमाने वागावे असेच त्यांना वाटे. त्यांच्या 'संन्यस्तखड्ग' नाटकातील नायक तलवार हाती घेताना जे म्हणतो ते महत्त्वाचे आहे. हा नायक भगवान बुद्धाला म्हणतो, "तथागत, हिंसा मलाही आवडत नाही. प्रेमाने प्रेम वाढावे, विचारवंतांनी विचार करावा, सांसारिकांनी संसार करावा, कवींनी काव्ये रचावीत, आयांनी मुले खेळवावीत, शेतकऱ्यांनी धान्ये पिकवावीत. सर्वांनी प्रेमाने वागावे असेच मलाही वाटते. शांतीचा भव्य संदेश देणारा महात्मा माझ्या भूमित जन्मावा ह्याचा मला अभिमान आहे. पण हा शांती संदेश समजण्याइतकी व पटण्याइतकी माणसाची जात अजून सुसंस्कृत झालेली नाही. ती होईपावेतो शांततेचा संदेश जिवंत राहावा म्हणून तथागताचे रक्षण तलवारीने करणे भाग आहे. मांगल्य जपण्यासाठी पुण्य कधी तरी प्रभावी होईल, ती वेळ येईपावेतो पापाच्या आक्रमणापासून पुण्य वाचविण्यासाठी हे खड्ग मी आता सर्व सामर्थ्याने आपल्या हाती घेतो."

सावरकर म्हणत, सर्व परंपरांचा उच्छेद करणारी सर्वंकष हुकूमशाही कम्युनिझमच्या रूपाने जग ग्रासू पाहत आहे. त्याला उत्तर वेद–वेदांगे, यज्ञ-उपासना भक्ति व जानवे ह्यातून मिळणार नाही. ह्या आव्हानाचे उत्तर लोकशाहीतच समाजाचे आधुनिकीकरण करून प्रत्येकाला पोटभर अन्न व अंगभर वस्त्रे मिळतील ह्यांची 'हमी देणारा समाजवाद' हेच आहे, ज्या समाजव्यवस्थेत अखिल

जनतेच्या सर्व भौतिक गरजा न्यायपूर्पक पुरविल्या जातील आणि संस्कृतीचा अनुबंध कायम ठेऊन सर्वांनाच विकासाची संधी मिळेल ती योजना म्हणजेच साम्यवादी हुकूमशाहीला उत्तर. विचारांनी सावरकर कसे चौरस होते ह्याचे हे एक उदाहरण आहे.

सावरकरांचा उज्ज्वल ध्येयवाद व कठोर वास्तववाद. भारतभूमीवरील त्यांचे असीम प्रेम व विज्ञानांवर श्रद्धा ठेवणारे विसाव्या शतकातील त्यांचे बुद्धिवादी मन, त्यांची आत्मार्पणाची भूमिका व त्यातील कठोर वास्तववाद असा पूर्ण सावरकर, सर्व भव्यता, ऊंचपणा व द्रष्टेपण ह्यासह समजून घेतला पाहिजे तर ती प्रेरणा पुढील अनेक दशके आपले मार्गदर्शन करील असा मला विश्वास वाटतो.

◇ ◇ ◇

# ४/ कर्मवीर भाऊराव पाटील

ज्या व्यक्तींनी आधुनिक महाराष्ट्र घडविला, त्यापैकी कै. भाऊराव पाटील हे एक महत्त्वाचे शिल्पकार आहेत, याबाबतीत माझ्या मनात कोणताही संदेह नाही. शंका नाही. मी नेहमीच त्यांचा कृतज्ञतेने उल्लेख करीत आलो आहे. कारण भाऊराव पाटील यांच्या विषयी माझ्या मनात नितान्त आदर आहे. पण तरीही लेख लिहिताना मला काही अडचणी जाणवतात. मी स्वतः राजकारणाचा आणि समाजकारणाचा अभ्यासक आहे आणि हा अभ्यास ऐतिहासिक पद्धतीने करणारा व वर्तमानातले प्रश्न समजून घेण्यासाठी ह्याच पद्धतीने अभ्यासकरणे आवश्यक आहे असे मानणारा माणूस आहे. वाटल्यास तुम्ही मला विचारवंत म्हणा अथवा न म्हणा, त्याबद्दल माझी तक्रार नाही. मला कुणाही माणसा विषयी एकांतिक श्रद्धा ठेवणे परवडणारे नाही. सध्याच्या राजकारणाच्या प्रथा पुष्कळच दांभिक आणि औपचारिक आहेत. त्या पाळण्यात मला रस वाटत नाही. ब्राह्मणेतरांना आवडते म्हणून मी भाऊराव पाटील यांच्या विषयी चांगले बोलणार नाही. मला जर वाटले तर त्यांची मी पूजा बांधीन आणि अशी पूजा बांधताना मला जे वाटते, जाणवते तेच लिहीन, ब्राह्मणेतर समाजाला जे आवडते ते लिहिणे मला जमणार नाही. भगतगणांच्या पूजा मेळाव्यात माझ्या सारख्याने उगीच शिरणे बरे नव्हे.

आधुनिक महाराष्ट्राचा विचार आधुनिक भारताच्या संदर्भात केला पाहिजे, आणि आधुनिक भारताचा विचार आधुनिक जगाच्या संदर्भात केला पाहिजे असे

मी मानतो. नव्या जगाच्या संदर्भात आपण विचार करू लागलो तर जगावर परिणाम करणारी आधुनिक भारतातील मंडळी कोणती ? आपण विचार केला तर असे आढळून येईल की, जगाच्या वाङ्मयावर रवींद्रनाथांचा फारसा प्रभाव नाही. आणि जगाच्या विज्ञानात चंद्रशेखर, रामन हे अनेकांच्या पैकी एक इतक्याच महत्त्वाचे आहेत. जगाच्या वाङ्मयाच्या दृष्टीने सार्त्र, कामू, इलियट ही प्रधानपात्रें आणि विज्ञानात आईनस्टाईन. जगावर प्रभाव टाकणाऱ्यां मध्ये आधुनिक भारतात दोन विभूती दिसतात. त्या म्हणजें म. गांधी आणि दुसरे पं. नेहरु. हे भाग्य कधी गांधीपूर्वीच्या टिळकांना लाभले नाही. आणि नेहरुनंतरच्या इंदिरा गांधींनाही मिळालेले नाही. आपल्या सर्व नेत्यांचा विचार भारताच्या चौकटीत किंवा महाराष्ट्राच्या चौकटीत केला पाहिजे. ह्या नेत्यांनी जे काही बरे वाईट काम केले असेल त्याची फळे आपण चाखतो आहोत. भाऊराव पाटलांचा विचार नेहमी महाराष्ट्राच्या चौकटीत करणे भाग आहे. ही चौकट ओलांडून जे बोलतात ते भाबडेपणाने स्वत.लाच फसवीत असतात.

आधुनिक महाराष्ट्राचा विचार म्हणजे थोडा-थोडका विचार नव्हे. इ, स. १८०० ते १९६० इतक्या दीर्घ काळाचा सुमारे १६० वर्षांचा हा इतिहास आहे. प्रदेशाच्या दृष्टीने विचार करावयाचा तर मराठवाडा हा सन १९५६ पर्यंत महाराष्ट्रापासून अलगच पडलेला होता. विदर्भाचे आठ जिल्हेही असेच तुटलेले होते. इ. स. १९६२ पर्यंत गोवा भारताचा भाग नव्हता, अजून तो महाराष्ट्राचा भाग झालेला नाही. मुंबईचा क्रम नेहमी स्वतंत्रच राहिला. या स्थूलमानाने पाच भागात विभागलेल्या महाराष्ट्रासमोर एक प्रश्न भाकरीचा आणि तितकाच महत्त्वाचा दुसरा प्रश्न स्वातंत्र्याचा होता. या ठिकाणी आपल्या बहुतेकांच्या मनात असणारे दोन गैरसमज दूर केले पाहिजेत. पहिला गैरसमज म्हणजे भाकरीचा प्रश्न आणि स्वातंत्र्याचा प्रश्न असे दोन निरनिराळे प्रश्न आहेत, असे समजण्याचा आहे. पुष्कळदा आपल्याला हे समजतच नाही की स्वातंत्र्याच्या प्रश्नामुळे भाकरीचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. आमचे राष्ट्रीय नेते म्हणत, आम्हाला "इंग्रजाचे राज्य नको, स्वातंत्र्य पाहिजे" कधी कुणी त्यांना हे विचारले आहे का की हे स्वातंत्र्य कशाला हवे ? दादाभाई नौरोजी पासून जवाहरलाल नेहरूपर्यंत सर्वांनी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. प्रत्येकाची भाषा निराळी असली तरी आशय एकच आहे. "आम्ही दरिद्री आहोत. आमच्या जनतेची उपासमार होत आहे. राष्ट्राचा विकास करून जनतेचे जीवन समृद्ध करावयाचे असेल तर इंग्रज करीत असलेली या राष्ट्राची लूट थांबवली पाहिजे. आणि आमच्या विकासाचा विचार करण्यासाठी आम्ही स्वतंत्र असलो पाहिजे. सोप्या भाषेत हा मुद्दा असा आहे की, भाकरीचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्हास स्वातंत्र्य पाहिजे. इंदिरा गांधी, त्यांचे पिताजी पंडित नेहरू आणि त्यांचे

मानसपिता गांधी नेहमी म्हणत की, "समाजवाद आमच्या स्वातंत्र्य लढ्याचा कायमचा आशय आहे." या सूत्राचा आशय आता स्पष्ट होईल. हा मुद्दा दादाभाई नौरोजीपासून सुरु होतो.

आपण कधीतरी हा प्रश्न मनातल्या मनात विचारावा की, अन्न कशाला हवे ? वस्त्र कशाला हवे या प्रश्नाचे सरळ उत्तर हे की अन्नवस्त्राशिवाय माणूस जगणार कसा ? आता दुसरा प्रश्न विचारा, 'माणूस जगून तरी करायचे काय ? मरेना का माणूस. या प्रश्नाचे उत्तर हे की, माणूस जगला पाहिजे. नुसता माणूस जगून चालणार नाही. माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठेने व हक्काने जगता आले पाहिजें. इथें ह्या प्रश्नाला अर्थ नाही. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. सगळ्या संस्कृतीचा तो गाभा आहे. तेथे का हा प्रश्न विचारायचा नसतो. 'माणसाच्या माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगण्याच्या हक्काला' स्वातंत्र्य असे म्हणतात. भाकर हा माणसाच्या स्वातंत्र्याचा भाग असतो. पाय म्हणजे माणूस नव्हे, हात म्हणजेही माणूस नव्हे, पण हे माणसाचे भाग आहेत, त्यांच्याविना माणूस पांगळा व थोटा होतो. तसे भाकर म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. पण भाकरीच्या हक्काविना स्वातंत्र्य नसते. स्वातंत्र्य आणि भाकर ह्या एकाच प्रश्नाच्या दोन बाजू आहेत हा सगळ्या मागासलेल्या जगासमोर उभा असणारा प्रश्न आहे, तोच महाराष्ट्रासमोर उभा होता.

आपल्या मनात असणारा दुसरा गैरसमज हा की. राष्ट्रीय स्वातंत्र्यालाच आपण स्वातंत्र्य म्हणतो. इ. स. १८१८ ला पेशवाई बुडाली आणि महाराष्ट्र इंग्रजांचा गुलाम झाला असे आपण म्हणतो. हे म्हणणे खोटे नाही. खरेच आहे. खरे या अर्थाने आहे की, यापूर्वी महाराष्ट्र इंग्रजांचा गुलाम नव्हता पण आपण इंग्रजांचे गुलाम नव्हतो तेव्हा स्वतंत्र होतो काय ? अस्पृश्य तेव्हाही गुलामगिरीतच होते. सगळा बहुजन समाज गुलामच होता. स्त्रियांची गुलामगिरी होतीच, शिवाय माणसांच्या खरेदी–विक्रीचे बाजारही होते. हा विषय निघाला म्हणजे ब्राह्मणेतर मंडळी मोठ्या उत्साहाने बोलू लागतात. कारण पेशवे ब्राह्मण होते. परंतु प्रसंगी पेशव्याना गुंडाळून ठेवणारे शिदे होळकर, गायकवाड होते. त्यांच्या राज्यात तरी लोक स्वतंत्र होते काय ? राजेशाही आणि जमीनदारशाही मग कोणाचीही असो जनतेच्या स्वातंत्र्याची ती खूण नसते. ब्राह्मण तरी स्वतंत्र होते काय ? तेही नानाविध रुढींचे गुलाम व दरिद्रीच होते, शिवाय अडाणी होते. सरदार, जहागिरदार. सुभेदार, व्यापारी, मंत्री सगळे मिळून दोन टक्के नसतात. ह्यात पुरोहित, मठपती, धर्मगुरु आले. उरलेल्या ब्राह्मणांचा प्रमुख पेशा भीक मागणे व स्वयंपाक करणे हाच होता, तो शतकानशतके चालूच होता.

एकजण म्हणाला वर्चस्व ब्राह्मणांचे होते, सर्व ब्राह्मण आनंदून म्हणाले, बा! बा! काय सुखाचा काळ, परिस्थिती पहावी तो पाणके, आचारी, भिक्षाजीवी, खुशमस्करे व आश्रीत हेच ब्राह्मण बहुसंख्येने जगत होते. दुसरे म्हणाले या लबाड ब्राह्मणांनी सर्व ज्ञान कोंडून ठेवले. ब्राह्मण मोठे प्रसन्न झाले, ते म्हणाले सुंदर! सुंदर ! शेवटी ब्राह्मणांच्या जानव्याला ज्ञानाच्या किल्या आहेत हेच खरे. ब्राह्मणांच्याजवळ ज्ञान होते तरी कोणते? त्यांच्याजळ काय शेती ज्ञान होते की विज्ञान होते की यंत्रज्ञान होते? त्यांच्याजवळ सगळे ज्ञान 'पीठ' किती द्यावे इतकेच होते, जे ज्ञान ब्राह्मणांजवळ होते ते अंधश्रद्धा वाढणारेच होते. कारण हे ज्ञान अंधश्रद्धेतूनच जन्मलेले होते. पण आपल्या समाजात जात नावाचा एक प्रबळ घटक आहे. एका जातीचे हजार दरिद्री आपल्या दारिद्र्याला कारण असणाऱ्या स्वजातीय दहापाच जणांचा अभिमान बाळगतात. तसा वेडा अभिमान ब्राह्मणांना पेशवाईबद्दल वाटतो. सर्व जातीत ही प्रथा लोकप्रिय आहे.

सामाजिक दास्य, आर्थिक दास्य, राजकीय दास्य हे गुलामगिरीचे तीन प्रकार अस्तित्वात होतेच. इंग्रजी राज्यामुळे राष्ट्रीय दास्य नव्याने आले. आणि सगळ्या गुलामगिरीचे मूळ मनाच्या गुलामगिरीत असते, ही मनाची गुलामगिरी तर शतकांची होती. ज्याला आपण धार्मिक गुलामगिरी म्हणतो, तिचा गाभा मनाचे दास्य हा असतो. भारतीय राजकारणाची वाढ संपूर्ण स्वातंत्र्याच्या दृष्टीने झालेली आहे. इंग्रजांचे राज्य नको, राष्ट्रीय स्वातंत्र्य हवे; जनतेच्या प्रतिनिधींचे राज्य हवे. हे राजकीय स्वातंत्र्य सर्व माणसे समान आहेत, सर्वांचे हक्क सारखेच आहेत, सर्वांची प्रतिष्ठा सारखीच आहे असे मानते. हे सामाजिक स्वातंत्र्य होय. (ह्यालाच दुसरे नाव लोकशाही आहे.) सर्वांची प्रतिष्ठेने जगण्याची सोय हवी. हे आर्थिक स्वातंत्र्य, शिवाय विचार स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य असा हा स्वातंत्र्याचा सर्वांगीण व व्यापक विचार आहे. ह्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या भूमिकेच्या प्रभावासाठी नवा महाराष्ट्र घडला आहे.

हा नवा महाराष्ट्र ज्यांनी घडविला त्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे. सर्वांना जगण्याची व समृद्धीची सोय औद्योगिकरणाशिवाय शक्य नव्हती, म्हणून मला महाराष्ट्रात औद्योगिकरणाची पायाभरणी करणाऱ्या मूर्तीविषयी म्हणजे जमशेटजी टाटा, लक्ष्मणराव किर्लोस्कर व वालचंद ह्यांच्याविषयी आदर आहे. गोखले हे कायदे मंडळातच चमकले. जनतेवर त्यांचे वजन कधीच फारसे नव्हते. ते वजा जाता रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर, कर्वे ह्यांनी नव जागरणाचे फार मोठे कार्य केलेले आहे. त्यांच्याही विषयी मला आदर आहे. अखिल भारतीय राजकारणात गोखले यांचा प्रभाव खूप मोठा होता. त्यांच्याविषयी तर आदर आहेच. एक नवा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. 3233
24823
शाखा स्थळ



मनु ज्यावेळी पालटून जातो, जुने जग बदलते त्यावेळी शेकडो हजारो कार्यकर्ते प्रयत्न करीत असतात, सर्वांची सर्वच मते आपणाला पटणार नाहीत पण त्यांच्या कष्टाचे, त्यागाचे फळ आपण चाखीत असतो, त्यांच्याविषयी नव्या पिढीला आदर असलाच पाहिजे. इतर कुणाला असो की नसो, मला मात्र सर्वांच्याविषयी आदर आहे. पण ह्या आदराबरोबर काही आपल्या नेत्यांच्या वर्मांच्या दुबळ्या जागा व मर्यादाही आपण ओळखल्या पाहिजेत.

न्या. रानडे हे अतिशय व्यापक व थोर विचार करणारे द्रष्टे पुरुष. आधुनिक भारताला जाग आणणारे असे ते फार मोठे राष्ट्रीय पुरुष. पण परंपरांच्याविषयी त्यांच्या मनातले ममत्व संपलेले नव्हते. त्यांना सगळ्या सुधारणा हव्या होत्या. पण ह्यासाठी उग्रपणे संघर्ष करण्याची जिद्द त्यांच्यात नव्हती. न्यायामूर्ती, अर्थशात्राचे पंडित पण भारताची इंग्रज राजवटीने चालविलेली आर्थिक लुटमार हा त्यांना लढण्याचा विषय वाटत नाही. सुधारणांच्यासाठी प्रसंगी किंमत द्यावी लागते. अशा ऐन ठिकाणी त्यांनी कच खाल्ली. रानड्यांचे अनुयायी त्यांच्याइतके मोठे नव्हते. सुधारणाविषयी सोयीने व्याख्याने देऊन आधुनिकात प्रतिष्ठा मिळवावी, शासनाशी गोड राहून सोय पहावी आणि झळ लागेल अशी सुधारणा वैयक्तिक जीवनात करूच नये; असा सर्व आघाडीवर सोय पाहण्याचा उद्योग रानडे ह्यांच्या अनुयायांनी केला. ह्या पार्श्वभूमिवर म. फुले ह्यांच्याकडे पाहिले म्हणजे असे दिसते की रानड्यांचे पांडित्य व व्यापकपण नसणारा पण सर्वस्व पणाला लावून झुंजणारा क्रांतीचा वणवाच जणू म. फुले ह्यांच्या रुपाने साकार होतो आहे. आपल्या सर्वांगीण क्रांतीच्या पुरस्कर्त्यांना फुले ह्यांची ओढ वाटणे स्वाभाविक आहे.

महाराष्ट्रातले ब्राह्मण सुधारक आणि आर्यसमाजाचे ब्राह्मण पंडित नेते ह्यांच्यातही फारच मोठा फरक आहे. एका बाजूने पाहिले तर आर्य समाज कट्टर वेदनिष्ठ व कर्मठ याज्ञिकांचा वारस दिसतो, दुसऱ्या बाजूने पाहिले तर आर्य समाजही क्रांतीकारी अशी संघटना होती. आर्य समाज प्रौढ विवाहाचा पुरस्कर्ता होता. लगेच त्यांनी विवाहाचे वय १६–१८ पर्यंत नेले. लक्ष प्रौढ विवाह घडवून आणले. त्यांनी लाखांनी विधवा–विवाह केले. आंतरजातीय विवाह तर लाखानी केलेच पण लाखो अस्पृश्यांच्या मौंजी करून त्यांना वेद व गायत्री मंत्र दिले. १५ ते २० वर्षात आर्यसमाजाने सुधारणेच्या नावावर प्रत्यक्ष कार्यक्रमांची उदाहरणे उभी केली. आर्य समाजाच्या प्रमाणिकपणाविषयी व झुंजारपणाविषयी कुणाला शंका नव्हती. नुसती शुद्धी चळवळ घेतली तर आर्यसमाजाने दहा वर्षात लाखो लोक शुद्ध करून घेतल्याचे दिसून येते. त्यातल्या स्त्रियांना हिन्दु पती दिले, पुरूषांना हिन्दु

बायका दिल्या. जातिभेद मोडून काढण्यास प्रतिज्ञाबद्ध असे कर्मठ लोक आर्य समाजात होते. शाहूमहाराजांना आर्य समाजाचे आकर्षण असण्याचे खरे कारण हे होते समाजातील परिवर्तनाचे चित्र हे असे गुंतागुंतीचे असते.

महाराष्ट्रातील राजकीय चळवळीचा विचार सुरू झाला की लोक रानडे चिपळूणकर-टिळक ह्या क्रमाने जातात. समाज सुधारणेचा विचार सुरू झाला की रानडे–आगरकर ह्या मार्गाने जातात. मला ही पद्धत सदोष व चुकीची वाटते, मी विचार करताना फुले, रानडे, टिळक, शाहूमहाराज. कर्वे, आंबेडकर. जेधे, भाऊराव पाटील अशा सर्व गुंतागुंतीचा विचार एकत्र करू पाहतो. हीच पद्धत स्वातंत्र्य लढ्याचा विचार करण्यासाठी योग्य आहे असे मला वाटते. ह्या क्रमात कर्मवीर भाऊराव पाटील हे मध्यवर्ती समन्वयाचे ठिकाण आहे असे मला वाटते. व त्या दृष्टीने महाराष्ट्राच्या जडणघडणीचे शिल्पकार म्हणून मी त्यांना पूज्य मानतो. ही माझी विचार करण्याची पद्धत कुणाला पटेल अगर पटणार नाही. पण मी ह्या पद्धतीने विचार करतो.

न्या. रानडे ह्यांचे मोठेपण चौरस व व्यापक विचार करण्यात आहे. म. फुले ह्यांचे मोठेपण अस्सल क्रांतीकारकत्वात व न्यायाच्या तहानेत आहे. आगरकरांचे मोठेपण बुद्धीप्रामाण्यवादात आहे. ह्या सर्वांचे मोठेपण मान्य केले तरी ह्या मंडळींचे एक दुबळेपण आहे. व्यापक अशी सामाजिक चळवळ ही माणसे उभी करू शकली नाहीत. समाज हा जडमूढच असतो. व्यापक सामाजिक चळवळ उभारून प्रचंड झुंज द्यावी तेव्हा तो क्रमाक्रमाने थोडासा बदलतो. खूप मोठे धक्के दिले म्हणजे हळूहळू वळवळ करू लागतो. आपणच हळुहळू जाण्याचा मार्ग घोषित केला म्हणजे समाज हालतच नाही. अशा व्यापक चळवळीची उभारणी राजकारणात टिळकांनी केली. समाज परिवर्तनात हे श्रेय महर्षी कर्वे, राजर्षी शाहू, भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. ह्या चौघाही पुरूषातील सर्व गुण एकत्र करणारे व्यापक समन्वयाचे स्थान कर्मवीर पाटील ह्यांचे आहे.

म. फुले यांनी स्त्रियांच्यासाठी शाळा काढली. ह्या द्रष्टेपणाचे व ध्येयवादी निर्भयपणाचे श्रेय आपण फुले यांनाच देऊ. पण हा प्रश्न केवळ एका शाळेने सुटणारा नव्हता. एकूण शाळा किती काढल्या? त्यातून एकूण नवशिक्षित स्त्रियांची निर्मिती किती झाली? आणि स्त्री शिक्षण समाजात रूळले किती? हे प्रश्न फुले यांना विचारण्यात अर्थ नाही. ते कार्य जन्मभर महर्षि कर्वे यांनी केले. आज स्त्रियांनी शिकावे की शिकू नये हा प्रश्नच उरला नाही. शाळेत जाणारी स्त्री ही आता जीवनात नित्याची बाब ठरली आहे. पण कर्वे ह्यांचे कार्यक्षेत्र

शहरे व वरिष्ठ वर्ग ह्या बाहेर फारसे पोहचू शकले नाही. ग्रामीण भागातील सर्व जाती-धर्मांच्या हजारो स्त्रियांना शिक्षण देऊन वेगवेगळया बाजूने चित्र पुरे करण्याचे कार्य कुणी केले ? ते भाऊराव पाटील ह्यांनी पार पाडले आहे. हे श्रेय त्यांनाच दिले पाहिजे. म्हणून स्त्री दास्य विमोचनाच्या कार्यात कर्वे आणि भाऊराव असे जोड कार्य सांगितले पाहिजे अस्पृश्यांची पहिली शाळा काढण्याचे श्रेय म. फुले यांचे. अस्पृश्यांच्या शिक्षणात शाहू महाराजांचाही वाटा मोठा आहे. ह्या समाजाची राजकीय जागृती करणारा तर प्रत्यक्ष भीमभगवानच. पण हजारो अस्पृश्यांना सुशिक्षित करून सुशिक्षित दलितांची नवी पिढी निर्माण करण्याचे श्रेय आपण कुणाला देणार ? ह्या कार्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे श्रेय भाऊराव पाटलांचे. उच्च शिक्षणात ते बाबासाहेबांच्या श्रेयाचे वाटेकरी आणि बहुजन समाज साक्षर करणाऱ्या चळवळीचे तर ते सर्वात मोठे कार्यकर्ते. एवढे यश राजे असूनही प्रत्यक्ष शाहू महाराजांना आले नाही. स्त्रिया, दलित, बहुजन समाज सुशिक्षित करून सोडताना भाऊरावांनी, मिळतील ते ब्राह्मणही ज्ञान गंगेत धुऊन पवित्र करून सोडले. म्हणून त्यांना समन्वयाचे सर्वात मोठे प्रतिनिधी म्हणायचे.

भाऊराव पाटलांचा काळ म. फुले आणि शाहू महाराज ह्यांच्या मानाने कितीतरी अलिकडचा. त्यांच्या शिक्षण कार्याला आरंभच मुळी इ. स, १९०९ साली झाला. हे वर्ष मोर्लेमिंटो सुधारणांचे आणि रयत शिक्षण संस्था तर १९१९ ची. म्हणजे मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणाच्या वेळची. पण मला उपलब्ध आकडे-वारीनुसार इ. स. १९४५ लाच त्यांच्या शाळांची संख्या ४०० होती. म्हणजे किमान पन्नास हजार मुले तिथे शिकत होती. याला मी व्यापक सामाजिक चळवळ म्हणतो. आजवरचा हिशोब केला तर कर्मवीरांच्या संस्थेत शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लाखांनी मोजावी लागेल. जनतेला ज्ञानी करण्याने एवढे प्रचंड कार्य महाराष्ट्रात आजवर कुणी केलेलेच नाही. सरकारचा क्रमांक पहिला, भाऊ-रावांचा क्रमांक दुसरा आणि राजेरजवाड्यांचे क्रमांक ह्यानंतर येतात.

भाऊराव पाटलांचे हे कार्य स्थूल मानाने पाहिले तर गांधी युगातले कार्य आहे. ह्या युगाचे काही संस्कार भाऊरावांच्यावर झालेच. गांधीजींनी सामाजिक सुधारणा आणि राजकीय क्रांती एकत्र आणली. गांधी युगात क्रमाक्रमाने महाराष्ट्रातला बहुजन समाज केशवराव जेधे ह्यांच्या नेतृत्वाखाली संघटीत झाला. ह्यांच्या परिणामी भाऊराव पाटील कडवे स्वातंत्र्यवादी झाले. महारा-ष्ट्रात ज्या राजकीय चळवळी झाल्या त्यात भाग घेणारे हजारो कार्यकर्ते भाऊरावांनी निर्माण केले. ह्या वातावरणातून यशवंतराव चव्हाणांचा उदय होतो. भाऊराव पाटलांच्यासारखी माणसे चव्हाण घडवितात. राजकीय नेत्यांना जमणारे

व जुळणारे हे काम नव्हे. म्हणून एकीकडे सामाजिक स्वातंत्र्य व दुसरीकडे राष्ट्रीय स्वातंत्र्य ह्या दोन्ही जाणीवांचा प्रबल समन्वय पाटलांच्या रुपाने होतो. शिवाय हे समन्वयाचे केन्द्र सत्तास्पर्धेपासून दूर असल्यामुळे पूर्णपणे विधायक व रचनात्मक होते. विघातक प्रेरणांचा त्यांना स्पर्श नव्हता.

अजून दोन बाबींचा उल्लेख केल्याशिवाय भाऊरावांचे वर्णन पूर्ण होणार नाही. ते स्वतः ब्राह्मणेतर राजकारणाच्या परंपरेतून येत असल्यामुळे ग्रामीणभाग व शेतकरी ह्यांचा विचार पाटलांच्यां मनात सदैव असणे भागच होते. ह्या शेतीच्या प्रश्नाचा सावकाराच्या संदर्भात विचार करणे अपुरे आणि निरुपयोगी आहे. ह्याची जाणीव गांधी युगात त्यांना झाली. सर्व भारतीय शेतकऱ्यांचे व म्हणून महाराष्ट्रीय शेतकऱ्याचे मुख्य प्रश्न तीन आहेत. त्यांच्या जमिनीची उत्पादन क्षमता कशी वाढविता येईल, पाण्याची सोय, खते, नवी बीजे, ट्रॅक्टर असा हा विचार चालतो. ह्याला शेतीचे आधुनिकीकरण म्हणतात. दुसरा प्रश्न शेती मालाला योग्य व रास्त भाव कसे मिळवून देता येतील हा आहे आणि तिसरा प्रश्न शेतीशिवाय ग्रामीण जनतेला वेगवेगळे जोडधंदे कसे मिळवून द्यावे हा आहे. ह्या मूलभूत प्रश्नांच्या मानाने सावकारीचा प्रश्न अगदी सामान्य आहे. हा प्रश्नच इंग्रजी राजवटीच्यामागे अॅडॅम स्मिथ व बेंथॅमचा जो विचार होता त्यातून निर्माण होतो. कर्जफेडीसाठी शेतकऱ्याचे घर, ज़मीन व शेतीची औजारे जप्त करता येणार नाहीत. असा एक कायदा सावकारशाहीची कंबर मोडून टाकतो आणि सहकारीं बँकाकडून मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठ्याची सोय केली की सावकारशाहो मृतप्राय होते. खरी अडचण ही आहे की सावकार लंगडा, लुळा केला तरीही जर शेतकरी दरीद्रीच असला तर गुंडगिरीवर कारभार चालविणारी बेकायदेशीर नवी सावकारशाही अस्तित्वात येत असते, आज आपण हे घडताना पहात आहोत.

म्हणून भाऊराव पाटलांनी एकीकडे सहकारी चळवळ वाढविणे व दुसरीकडे शेतीच्या आधुनिकोकरणाकडे लक्ष देणे असा दुहेरी उद्योग केला. यामुळे मनाच्या आधुनिकीकरणाच्या चळवळीचा समाजातील उत्पादन व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाशी सांधा जोडला जातो व विज्ञान युगाशी माणूस जोडला जातो. सावकारशाहीवर व्याख्याने देणे सावकारांविषयी समाजात राग जागा करणे इतक्याने हा प्रश्न सुटणार नाही. सावकार व जमीनदार जनतेचे रक्त शोषण करीत असतातच. ते जनतेचे शत्रूच होत. पण ह्यांच्यापेक्षा मोठा शत्रू भांडवलशाहीची अर्थरचना असतो. उत्पादन न करता फक्त देवघेवीच्या उद्योगवर कोट्यावधीची संपत्ती सावंडणारा अनुत्पादक व्यापारी हा सावकारापेक्षा भयानक असतो. पुष्कळवेळा तर असे चित्र दिसते की हा व्यापारीच जोडधंदा म्हणून

सावकारीही करीत असतो. क्रमाने १९२५ नंतर भाऊरावांना ह्या चित्राची जाणीव अधिक स्वच्छपणे होऊ लागली. क्रमाने ते पुरोगामी विचारप्रवाहाशी एकरूप होऊ लागले.

भारतातील जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था ही एक चमत्कारिक आणि लोकविलक्षण बाब आहे. ती समजून घेणेच आपल्याला अतिशय कठीण आहे. विशेषत: ज्यांना ही व्यवस्था अजिबात आवडत नाही आणि ती भारताच्या हिताला अत्यंत हानिकारक असल्यामुळे शक्य तितक्या तातडीने मोडली पाहिजे असे वाटते त्यांच्यासाठी जातीव्यवस्था समजून घेणे ही एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. जवळ जवळ अडीच हजार वर्षे ही व्यवस्था मोडण्याचा प्रयत्न चालू आहे आणि तो वाया गेलेला आहे. जातीव्यवस्थेच्या अति प्राचीन विरोधकांचे बुद्ध, जैन. चार्वाक-ह्यांचे प्रयत्न त्या त्यावेळी वाया गेले. मध्ययुगीन विरोधकांचे म्हणजे कबीर, नाथपंथीय, बसवेश्वर, चक्रधर ह्यांचे प्रयत्नही वायाच गेले आहेत आणि अर्वाचीन विरोधक म्हणजे दयानंद सरस्वती राजा राममोहन राय, म. फुले इ. चे प्रयत्न आजही यशस्वी होताना दिसत नाहीत. अजूनही जातीव्यवस्था व धर्मव्यवस्था भारतात बलवान आहे. एक जात मागे पडली आणि एक जात पुढे आली तर त्यामुळे जातीव्यवस्था मोडून जाईल असे समजणे चुकीचे आहे. महाराष्ट्राचा गेल्या दीडशे वर्षांचा इतिहास पाहिला तर क्रमाने अस्पृश्यवर्गातील जुन्या जातींच्यापैकी महार समाज बौद्ध धर्म स्वीकारून पुढे आलेला आहे. इतर दलित जाती म्हणजे मांग–चांभार–ढोर–भंगी तशाच आहेत असे दिसते. सवर्ण हिंदूत मराठा समाज पुढे येऊन राजकारणाचा नेता बनला आहे. पण अजून ब्राह्मण समाज पूर्णपणे मागे पडलेला नाही, असा एक बदल दिसतो. बाकी चित्र थोड्या फार फरकाने जसेच्या तसेच आहे. हे असे का होते हे समजून घेण्याची इच्छा नाही त्यांना जातिभेद मोडण्यात यश येण्याचा संभव नाही. वैतागून एकदा श्री म. माटे म्हणाले होते की, ही जातिभेदाची हरळी फार चिवट आहे तिला विष द्यावे तो तिचा च्यवनप्राश होतो. आणि जातिभेद चालूच राहतो, बलवान होतो असे चित्र दिसते.

हा भारतातील जातिभेद समजून घ्यायचा असेल तर प्रथम भारतभरचे चित्र समजून घेतले पाहिजे. नुसते महाराष्ट्राचे चित्र पुरेसे नाही. ह्या चित्राशी धर्माचा संबंध समजून घेतला पाहिजे आणि ह्या चित्राची आर्थिक बाजू समजून घेतली पाहिजे. जाती टिकवून धरण्यात सोय कुणाची आहे? जाती असण्यात गैरसोय कुणाची आहे? हे पाहिले पाहिजे. ह्याबाबत आपण सोयीने विचार करतो. हा सोयीचा विचार येथे निरूपयोगी आहे. प्रथम हे समजून घेतले पाहिजे की बहुतेक जाती एकेका भाषा विभागात आहेत, त्या भाषा विभागाने मर्यादित आहेत. दुसरे हे

समजून घेतले पाहिजे की वेगवेगळ्या प्रांतात असणाऱ्या एकाच नावाच्या जातीचे रोटीसंबंध असतात, बेटीसंबंध नसतात. प्रत्येक प्रांतात पुढारलेल्या जाती निरनिराळ्या आहेत. त्या त्या ठिकाणी प्रश्न निराळेच आहेत ही तिसरी बाब. चौथी बाब अशी की प्रांतीय धर्म आपल्या जाती टिकवून धरतात. इतर धर्मही हाच उद्योग निरनिराळ्या मार्गाने करतात. शेवटची बाब ही की ह्या व्यवस्थेचा संबंध सरंजामशाही समाजव्येवस्थेशी आहे. ती अर्थरचना पूर्ण बदलल्याशिवाय गत्यंतर नाही. शेवटची बाब अशी की प्रत्येक जातीच्या अभिमानाच्या देवता आहेत. त्यांची चिकित्सा होणे महत्त्वाचे आहे. आपल्या सर्व चळवळी हिंदूधर्म व त्यातील महाराष्ट्रीय ब्राह्मण इतकाच विचार करतात. हा विचार अपुरा आहे.

ह्या प्रश्नाच्या तपशीलात जाण्यास येथे जागा नाही. पण काही गोष्टी सांगितल्या पाहिजेत. निरनिराळ्या जातीजमातींच्यासाठी शिक्षण व वसति गृहाची सोय हा आरंभ असतो. महाराष्ट्रात राजर्षी शाहूंनीं मोठ्या प्रमाणात हा आरंभ केला. पण एक टप्पा ओलांडला की ही रचना निरूपयोगी ठरते. सर्व जाती, जमाती धर्म, पंथ ह्यांची एकत्र वसतिगृहे व त्यांची एकत्र सरमिसळ होईल असे शिक्षण हीच खरी उपाय योजना आहे. भाऊराव पाटील हे या उपक्रमाचे पुरस्कर्ते होते. हा प्रयोग त्यांनी मोठ्या प्रमाणावर केला. शेवटी जातिभेद मोडणार तो एकेका जातीच्या विरोधावर लक्ष केन्द्रीत करून नव्हे तर सर्वच जातींना जुने जीवन बदलण्याची सोय उपलब्ध करून देऊन, जातिभेद मोडला जातो. ही बाब तीव्रपणे प्रथम शाहू महाराजांना जाणवली. कर्मवीर भाऊरावांनी ही घटना मोठ्या प्रमाणावर घडवून दाखविली, मराठा समाजात वकील, डॉक्टर, इंजिनियर, व्यापारी, कारखानदार, शिक्षक व शेतकरी झालेच पाहिजेत; त्याच्या शेजारी अस्पृश्य समाजातही वकील, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, इंजिनियर आले पाहिजेत; आणि ब्राह्मण समाज असाच शेती पासून व्यापारापर्यंत विभागला गेला पाहिजे. सर्वच उद्योगात सर्वच जातीची माणसे दिसू लागली म्हणजे जात व धंदा, जात व प्रतिष्ठा हच्यांचा सांधा तोडला जातो. जात व आर्थिक परिस्थिती ह्याचाही सांधा तोडला जातो. हे कार्य फार महत्त्वाचे व मूलगामी आहे हच्या कार्यात महाराष्ट्रात सर्वात मोठा वाटा भाऊराव पाटलांनी उचलला आहे. आज कोल्हापूर, सातारा, सांगली हा शेतीचा प्रगत आणि महत्त्वाचा भाग बनला आहे व नवा प्रतिष्ठित सधन वर्ग जन्माला आला आहे. त्याची पाया भरणी भाऊरावांच्या कार्याने केलेली आहे. तेहीं कार्य अजून संपलेले नाही, अजून ऋग्वेदी, यजुर्वेदी, कोकणस्थ, शहाण्णव कुळीचे, बिनशहाण्णव कुळीचे मराठा, मराठेतर असे सर्व वाद चालू आहेत. पाटील विरुद्ध देशमुख हा वादही चालूच आहे. आंतरजातीय विवाह वाढविण्याचा प्रयत्न आपण पुरेसा केलेला नाही.

जातिभेद मोडण्यासाठी मस्तवाल, सत्तांध वंशपरंपरेने प्रतिष्ठा बळकावून बसलेल्या आणि आपली आसने बऱ्या वाईट मार्गाने जतन करणाऱ्या लब्धप्रतिष्ठित जातींच्या विरोधी संघर्ष करावाच लागतो, आक्रमक भूमिका घ्यावीच लागते. त्यात चूक काही नाही. इंग्रजी राजवटीत सर्व सूत्रे ब्राह्मणांच्या हाती क्रमाने इ. स. १८३० ते इ. स. १८९० पर्यंत जमा झाली. त्या विरुद्ध आवाज उठविणे योग्यच होते. वादाचा प्रश्न हा आहे की हा संघर्ष जातिभेद मोडण्याच्या कार्यक्रमाचा आरंभ म्हणून ठीक आहे. तो शेवट आहे काय ? जातिभेदाचा शेवट सर्वच जातींच्यामध्ये उदार समंजसपणा वाढविणे, त्यांना एकमेकात सर्व प्रकारे मिसळून टाकणे, त्यांच्या तील अहंता, न्यूनगंड संपविणे हा होतो. त्या कार्यक्रमासाठी सर्वांना विकासाची पूर्ण संधी मिळेल ह्याची काळजी घ्यावी लागते. त्या कामाची सर्वात दूरगामी व मूलभूत परिणाम करणारी प्रयोगशाळा भाऊराव पाटलांनी उघडली. सर्वात मोठे काम त्यांनी केले.

राजकारण करण्यात रमलेल्या मंडळींना अशा प्रकारची विधायक आणि मूलभूत उभारणी करणे शक्य नसते. राजकीय नेत्यांच्याकडून हे कार्य घडण्याचा संभव नसतो. राजकारणापासून वेगवेगळ्या असणाऱ्या नव्या पिढीचे मन समृद्ध करण्यात रस असलेल्या मूलभूत मानवी सद्‌गुणांची जोपासना करण्यावर प्रामाणिक श्रद्धा असणाऱ्या पुरुषांनाच हे शक्य असते. त्यासाठी जीवन वेचणाऱ्या माणसांच्या जवळ नुसता लढाऊपणा आणि संघटना कौशल्य असणे पुरे पडत नाही. त्याखेरीज अतिशय चोख न्यायबुद्धी लागते. तिची जात संतांच्या क्षमा-बुद्धीची असावी लागते. भाऊराव पाटील यांच्या ठिकाणी हा सगळाच समन्वय मोठ्या साक्षेपाने झालेला दिसतो.

भाऊराव पाटलांचा कार्यारंभ ब्राह्मणेतर पक्षाच्या राजकारणातून होतो. पण क्रमाने त्यांचा विकास जाती–धर्मातीत लोकशाहीवर व समाजवादावर श्रद्धा असणाऱ्या व्यक्तीत होतो. राजकारणापेक्षाही उच्चतर असे माणूस घडविण्याचे कार्य ते स्वतःसाठी मान्य करतात. पण राजकारणाविषयी उदासीन रहात नाहीत. राष्ट्राचे स्वातंत्र्य हा उदासीन राहण्याजोगा विषय नसतोच. भाऊराव पाटील हे तिसऱ्या पिढीचे कार्यकर्ते. म. फुले, राजर्षी शाहू आणि भाऊराव पाटील हे तीन टप्पेच महाराष्ट्राच्या समाज परिवर्तनात मानावे लागतील सामान्य जनतेला, सर्व दरिद्रयांना, दलितांना हक्काची जाणीव देऊन जागृत करणे, त्यांना शिक्षण देऊन बलवान करणे, त्यांचा न्यायाची जाणीव करून देणे हे कार्य करणारा माणूसच लोकशाहीची पायाभरणी करीत असतो. स्वातंत्र्याचा तो शिल्पकार असतो. महाराष्ट्रात भाऊराव पाटलांचे स्थान अशा शिल्पकाराचे आहे.

प्रश्न आता याही पुढे जाण्याचा व चौथ्या टप्प्यावर येण्याचा आहे. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात ज्या भमिका आपण घेतल्या त्या मुळापासून पुनः एकदा तपासून घेण्याचा व स्वजातीयांच्या विरूद्ध लढणारी फळी निर्माण करण्याचा प्रश्न आहे. जाती मोडायच्या म्हणजे सगळ्याच जाती मोडाव्या लागतात. त्यासाठी आहे हा हल्ला प्रत्येक जातीला आतून करावा लागणार आहे. जो ज्या जातीचा माणूस आहे त्याला आपल्याच जातीचे नाव समाजपटावरून पुसून काढण्याची चळवळ करावी लागेल. हा स्वजनांशी लढण्याचा भाग आहे. दुसऱ्या जातीवर टीका करून आपली जात टिकविण्याचा उद्योग वांझ असतो. ज्या जातीत माणसे नाहीत अशी जात नसते, व ही जात टिकविण्याचा प्रयत्न झाला, म्हणजे सगळ्याच जाती टिकून रहातात आणि स्वतःच्या जातीशी लढायचे म्हणजे आपल्या मनातूनच जात जावी लागते. हे काम कठीण तर आहेच पण ते करणे भाग आहे. भाऊरावांच्या निधनाला आता सोळा वर्षे होत आली, ह्या टप्प्यावर अजून आपण आलेलो नाही. आज तरी बाबा आढाव एकटेच वाटचाल करीत आहेत. केलेले काम जतन करण्यासाठी पुत्राची गरज नसते. पुत्राचें काम नव्या काळात पुढच्या टप्प्यावर विकासाची नवी दिशा शोधणे हे असते. कर्मवीरांचा असा वारसदार अजून दिसत नाही हे दुःख मोठे आहे.

# ५/ कर्मयोगी अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे

अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्याविषयी असणारे माझे आकर्षण फार जुने आहे. गांधीवादी आणि सर्वोदयवादी म्हणून जे जे नेते ओळखले जातात त्या प्रथमश्रेणीत मोठ्या आदराने ज्यांचे नाव घेतले जाते त्यात अण्णासाहेब एक होते. या अखिल भारतीय गांधीवाद्यांपैकी ४२ च्या लढ्यात ज्यांनी सशस्त्र उठावात भाग घेतला असे एक अण्णाच होते. जयप्रकाश नारायण हे पुढे सर्वोदयवादी झाले. जुन्या गांधीवाद्यांच्यापैकी कुणीही दीर्घकाळ अहिंसेच्या तत्त्वज्ञानात जीवन घालवल्यानंतर आपद्धर्म म्हणून शस्त्राचा स्वीकार केलेला नव्हता. शिवाय 'सेवादल' आणि 'साधना' यांच्याशी निगडित तेच एक ज्येष्ठ गांधीवादी नेते होते. आचार्य भागवत हे गांधीवादी खरे, पण सर्वोदयाच्या अखिल भारतीय मान्यतेच्या प्रथम श्रेणीत ते नव्हते. यामुळे सहस्रबुद्धे यांच्याविषयी माझ्या मनात जुने आकर्षण होते. इ. स. १९५६ साली भूदानाच्या प्रचाराच्या निमित्ताने महाराष्ट्रात विनोबांची पदयात्रा सुरू होण्यापूर्वी अण्णांनी एक दौरा केला. या प्रचार मोहिमेचा एक भाग म्हणून ते नांदेडला आले होत. मला त्यांचे प्रथम दर्शन तिथे झाले. त्यांचे पहिले व्याख्यानही मी याचवेळी ऐकले. वक्तृत्व अण्णांजवळ फारसे नव्हतेच. पण विचारांची मांडणी अतिशय रेखीव अशी होती. यानंतर अनेकदा अधून-मधून त्यांची व्याख्याने ऐकण्याचा योग आला. लेख तर मी वाचतच होतो. पण मी हे सारे दुरून करत असे. प्रत्यक्ष भेटीचा व चर्चेचा योग यानंतर दीर्घकाळाने इ, स १९६७ साली सोमनाथ येथे बाबा आमटे यांच्या प्रेरणेने जे शिबीर झाले त्या

शिबिरात आला.

अण्णासाहेब सहस्रबुद्धे हे एक कर्मयोगी होते. कर्माच्या मागे ज्ञान असावे असे ते मानत. त्यादृष्टीने त्यांचे विचारचिंतन चाले. पण आत्मवृत्तासारखे लेखन करण्यासाठी जो पिंड लागतो तो त्यांच्याजवळ नव्हता. महर्षी कर्वे यांच्या आत्मवृत्ताची जी गत तीच अण्णासाहेबांच्या आत्मवृत्ताची गत आहे. स्वतःविषयी बोलणे अगर लिहिणे न जमणारी ही माणसे होत. यात विनय, संकोच वगैरेचा भाग नाही. मुळात सांगण्याजोगे आपल्या जीवनात काही आहे हेच या माणसांना जाणवत नाही. आणि कसे सांगावे हे कळतही नाही. सौ. कुसुमताई पटवर्धन यांनी पुढाकार घेऊन जर हे काम पार पाडले नसते तर इतकेही लिखाण आपल्या हाती पडले नसते.

अण्णांसारख्या व्यक्तीने आपले मन, व्यक्तिमत्त्व, चिंतन घडले कसे हे सर्वांच्या समोर ठेवावे म्हणजे त्याचा उद्याच्या कार्यकर्त्यांना उपयोग होईल असा माझा आग्रह होता. त्यांच्या डोळ्यासमोर राजकारणाचा व स्वातंत्र्यलढ्याचा फार मोठा पट उलगडला गेला. त्याविषयी त्यांनी सांगावे, आपली मते सांगावी हा माझा आग्रह होता. माझ्यावरील प्रेम म्हणून अण्णा नांदेडला आले. सतत चार दिवस मी प्रश्न विचारीत राहिलो. ते माहिती देत बसले. या माहितीची संक्षिप्त टिपणे मी केली. याआधारे त्यांच्या आत्मवृत्तात भर घालावी असे ठरले होते. अण्णांच्या हयातीत ते माझ्या हातून घडले नाही, याची रुखरुख मला कायम राहणार आहे. ही आवृत्ती सिद्ध करण्याचे कष्टसुद्धा मोठ्या प्रमाणात सौ. कुसुमताईंचे आहेत. ऋण त्यांचे, श्रेय त्यांचे. वेळेवर काम न घेण्याचा अपराधीपणा माझा.

अण्णासाहेबांचे हे आत्मवृत्त म्हणजे त्यांच्या जीवनासंबंधी आम्ही विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलेली उत्तरे व आम्ही केलेले लेखन असे आहे. "माझी घडण"च्या दोन आवृत्त्या कुसुमताईंनी शब्दबद्ध केल्या. पण अण्णांनी पाहून घेतल्या होत्या. या आवृत्तीत अधिक मजकूर खूप आहे. तो त्यांच्या सांगण्याच्या आधारेच लिहिलेला आहे. पण अंतीम शब्दरचना अण्णांनी पाहून घेतलेली नाही. माझ्यापुरते मी इतकेच सांगू इच्छितो की, त्यांनी न सांगितलेले आमच्या पदरचे यात काही नाही. उलट मला न आवडणाऱ्या कांही नोंदी, त्यांची मते आणि त्यांचे विवेचनही येथे शब्दबद्ध झाले आहे. म्हणून या आत्मवृत्ताचे स्वरूप आत्मवृत्त आणि प्रतिक्रिया असे आहे.

आपल्या 'अहं' पणाचे विसर्जन करण्याची दीर्घ साधना केलेल्या कार्यरत

कार्यकर्त्याचे हे आत्मवृत्त आहे. ते वाचण्यासाठी आपणही थोडी तयारी करावी लागते. एखादया वाक्यात अण्णा काहीतरी सांगून जातात. ते त्यांचे म्हणणे समजून घेण्यासाठी आपण मनातल्या मनात शंभर वाक्ये जुळविण्याची तयारी ठेवली पाहिजे. ४२ च्या आंदोलनात अण्णांना अटक झाली याबाबत त्यांचे थोडक्यात म्हणणे असे की, अनेक केसेसमध्ये त्यांचे नाव होते. पण सिद्ध काही झाले नाही. भूमिगत आणि सशस्त्र आंदोलनात त्यांचा किती व्यापक सहभाग होता हे आपण कल्पनेने जाणावयाचे. ते सांगतात, 'माझा बऱ्यापैकी छळ झाला.' आपण सर्व दडपणे व प्रचंड छळ स्वतःच्या कल्पनेनेच जाणायचा. हे जर करता आले नाही तर ह्या आत्मवृत्तामागे जो भव्य कार्यकर्ता व कठोर कर्मयोगी उभा आहे तो आपणास कळणारच नाही. फाशीपर्यंतच्या सर्व धमक्या आणि शारीरिक छळाचे सर्व प्रकार या माणसावर कोणताही परिणाम करू शकले नाहीत. त्याचा तपशील जाणल्यानंतर समरस व्हावे ही वाचकाची प्रवृत्ती आणि आवश्यक तपशीलसुद्धा द्यायचा नाही ही अण्णांची प्रवृत्ती हा प्रवृत्तीभेद. ओळखला पाहिजे.

हाच प्रकार ब्रह्मचर्याबाबत आहे कामवासनेवर कोणतेही स्खलन न होता जय मिळविणे ही सोपी गोष्ट नाही. या क्षेत्रातील जे असफल योध्दे आहेत तेही माझ्या परिचयाचे आहेत. त्यांची फार धडपड इतरांना समाधान वाटेल इतके स्पष्टीकरण देण्याची असते. या क्षेत्रातील जें निर्विवाद जेते आहेत ती मंडळी खेळकरपणें उडवून देतात. मी म. म. दत्तोपंत पोतदार यांना त्यांच्या ब्रह्मचर्याविषयी विचारले होते. पोतदारांचे म्हणणे असे की, त्यांचा संकल्प पुढचे वर्षी लग्न करू इतकाच होता, पण काळ वाढत गेला. मग म्हातारपण आले, असे लोक म्हणू लागले आणि लग्न राहूनच गेले. दर्यापूरचे मामा क्षीरसागर यांना मी विचारले. ते म्हणाले, "मित्रा ! खरे सांगतो. मी फक्त अविवाहित आहे, ब्रह्मचारी ही कोटी विरळा. मी तो नव्हे" अण्णांनी मत दिले आहे की दारिद्र्य फार म्हणून लग्न केलें नाही. पुढे लग्न करीन म्हणालो तर मुलगी मिळाली नाही. ही सारी उत्तरे परमार्थाने द्यावयाची असतात. दारिद्र्यामुळे जर माणसे ब्रह्मचारी झाली असती तर कुटुंबनियोजनाचे कार्यच भारतात करावे लागले नसते. कठोर व्रते विचारपूर्वक स्वीकारावयाची, दृढतेने हे संकल्प सिद्ध करावयाचे आणि मग सिद्धीची अहंताही विसरायची, असा हा मार्ग आहे. विनोबांनी म्हटले आहे की, 'अण्णा गुप्त तत्त्वज्ञानी आहेत'. इतरांना तर हे माहीत नाहीच पण त्यांनाही हे माहीत नाही. अण्णांच्या जीवनार्थाचे सार या एका वाक्यात आहे. अण्णांचे आत्मवृत्त वाचण्यासाठी आपल्या मनाची काही तयारी आवश्यक आहे, असे मी म्हणतो ते यासाठी.

एका बाजूने पाहिले तर असंग्रह, अनासक्ती, वैराग्य आणि अहंभाव

समाप्ती या व्रताची दीक्षा घेतलेल्या यशस्वी कृतकृत्य साधकाचे हे आत्मवृत्त आहे. पण त्यात साधनेचा तपशील नाही. दुसऱ्या बाजूने पाहिले तर देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्वाची आहुती देण्यास सिद्ध झालेल्या एका कर्मनिष्ठ स्वातंत्र्ययोद्ध्याचे हे आत्मवृत्त आहे. वयाच्या सतराव्या वर्षीपासूनच देशभक्तीच्या जाणिवेने प्रभावीत. झालेले असे हे जीवन आहे. तो दिव्य स्वातंत्र्यलढा ज्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला आणि त्यात सहभाग घेतला, त्या पिढीत अण्णा येतात. या दृष्टीने समकालीन राजकारण व राजकीय नेते यांच्याविषयीच्या त्यांच्या प्रतिक्रिया अतिशय महत्त्वाच्या आहेत. या प्रतिक्रिया केवळ थोर महापुरुषांविषयी नसून सामान्य कार्यकर्त्यापर्यंत अनेकाविषयी आहेत आणि प्रतिक्रिया मोठ्या मार्मिक आहेत. त्या जाणकार अभ्यासकांनी दिलेल्या आहेत. या प्रतिक्रिया प्रथमदर्शनी जितक्या साध्या वाटतात तितक्या त्या साध्या नाहीत.

अण्णांच्या जीवनाला आकार देणाऱ्या मंडळींमध्ये आरंभाला तीन व्यक्ती दिसतात. लिमये, माटे व टिळक. श्रीपाद महादेव माटे हे विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. गरीबांचा त्यांचा कळवळाही खरा होता. केवळ व्याख्याने देण्यापेक्षा कामावर त्यांचा अधिक भर होता. कर्मप्रवणतेचा हा उपदेश अण्णांना आरंभीच मिळाला. तो त्यांनी जन्मभर जतन केला. पण माटे नेहमीच हिंदुत्ववादी राहिले. महात्मा गांधींविषयी त्यांना श्रद्धा नव्हती. अस्पृश्यांना शिकविण्याचे कार्य स्वार्थ त्यागपूर्वक त्यांनी वर्षानुवर्षे केले. पण बाबासाहेब आंबेडकरांशीही माटे यांचे सख्य कधी जमले नाही. अण्णा नेहमी माटे यांच्या विरोधातच राहिले. वैचारिक विरोध आणि व्यक्तीवर प्रेम अशी सांगड अण्णांच्या जीवनात याहीनंतर राहिली. शंकरराव वैद्य, अप्पासाहेब पटवर्धन, मोरारजी देसाई इ. मंडळी तर सोडाच. पण विनोबांच्या बाबतीतही मतभेदासह मैत्री हेच अण्णांचे सूत्र राहिले.

बाबा लिमये हा त्यांच्या जीवनावर परिणाम करणारा दुसरा माणूस. विचार कसा करावा हे लिमये यांच्या सहवासात अण्णा शिकले. लो. टिळक कर्मयोगाचे महान भाष्यकार मानले जातात. पण या कर्मयोगाला ज्ञानमूलक आणि भक्तिप्रधान अशी जी दोन विशेषणे लावली जातात ती लोकमान्यांनी लावली आहेत ह्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे जीवन आरंभाला एका सर्वसामान्य माणसाचे जीवन आहे. आरंभाच्या काळात कोणतीही असामान्य बाब तिथे नाही. अण्णांचे घर तसे दरिद्रीच. गरीबीत व प्रतिकूल वातावरणातच त्यांना वाढावे लागले. पण ही गरीबी शहरात राहणाऱ्या निकृष्ट जीवनमान असणाऱ्या कनिष्ठ मध्यम वर्गातील माणसाची गरीबी आहे. ती ग्रामीण भागातील माणुसकीचा कणा मोडून टाकणारी दलित व आदिवासींच्या जीवनातील

बीभत्स गरीबी नव्हे. शैक्षणिक जीवनसुद्धा फारसे चमकदार नाही. 'दरसाल पास होत होतो' इतकेच याबाबत सांगण्याजोगे आहे असे अण्णासाहेब म्हणतात. या सामान्य माणसातून असामान्य चिंतनशील कार्यकर्ता कसा आकारला येतो हे कळावे यासाठीच तर अशा आत्मवृत्ताची गरज असते. अण्णांचा म. गांधीशी दीर्घकाळ निकट संबंध राहिला. जवळ जवळ २५ वर्षे ते गांधीजींच्या सावलीत होते. गांधी हा त्यांच्या जीवनाचा प्रमुख आधार ठरला. गांधींनी त्यांचे जीवन व्यापून टाकले. पण अण्णांच्या जीवनात गांधींचा उदय विशीत आल्यानंतर होतो. या वयातील तरुणाला गांधींची ओढ वाटावी असे मत कोण देणार ? कुमार व तरुण अण्णांच्या मनाचे भरणपोषण गांधी दूर आकाशातून करीत होते आणि माटे आणि लिमये निकट राहून करीत होते.

अण्णांनी आपल्या आत्मवृत्तात फार मोठमोठ्या कार्यकर्त्यांविषयी मते दिलेली आहेत. त्यात सरदार पटेल आहेत. ज्या विषयात तुम्हाला कांही कळत नाही त्या विषयात तुम्ही काय म्हणून मत देता असे बजावून सांगण्यासाठी अण्णा गेले आणि गप्प बसून परतले. सरदारांची त्यांची ही भेट मोठी अर्थपूर्ण आहे. आम्ही औद्यगीकरण करायचे ठरविले आहे, इतके सत्य. शेतीविषयात आम्हाला काही कळत नाही हे खरे. पण मूळ धोरणाशी मी सुसंगत बोललो हेही खरे. हे सांगून सरदार सांगतात धोरणात्मक निर्णय नेहरूंचा आहे. भारताचे वेगाने औद्योगीकरण या मुद्यावर नेहरु व सरदार यांचे एकमतच होते. सरदारांचा प्रांजळपणा व धटिंगणपणा दोन्हींवर पुरेसा प्रकाश टाकणारा हा प्रसंग आहे. पण त्याबरोबर सरदारांनी नोंदविलेली तीन सूत्रेही विचारात घेतली पाहिजेत. प्रथम म्हणजे, परदेशातून धान्य आयात करू; पण अन्नस्वावलंबनाच्या मागे लागून औद्योगीकरणाकडे दुर्लक्ष करणार नाही. शेतीचा विकास करू पण शेतमालाचे भाव बांधून देणार नाही. कारखाने काढू व नीट चालवू. सरदार उजव्या मनोवृत्तीचे मानले जातात. ते इ. स. १९५० अखेर वारले. नेहरु पुरोगामी मानले जातात. तेच इ. स. १९६४ पावेतो सर्वेसर्वा होते. पण धोरणे हीच राहिली. काँग्रेसमधील ज्येष्ठ उजवे व ज्येष्ठ डावे यांच्या भाषेत फरक फार. कार्यक्रम एकच दिसतो. ही घटना राजकारणाचा इतिहास पाहताना काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे.

सरदार उजव्या मनोवृत्तीचे नव्हते अगर नेहरू समाजवादी नव्हते असे मला सुचवावयाचे नाही. राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे दोघांनाही एकच कार्यक्रम कसा घेणे रास्त वाटले इकडे मला लक्ष वेधायचे आहे. औद्योगीकरणाच्या या आग्रहामुळे देशात महागाई सतत वाढली, मिश्रअर्थव्यवस्थेत हे धोरण राबवताना काळा पैसा भरपूर वाढला, आणि सर्वप्रकारची विषमताही वाढली. प्रादेशिक

विषमता तर वाढलीच पण समाजगटातील आर्थिक विषमताही वाढली. हे सारे घडताना भारताचे अन्नोत्पादन वाढले, औद्योगिक पायाभरणी झाली, लष्करी बळही वाढले. जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या कार्यक्रमाचे हे अजाणता वाट्याला आलेले फलित मानायचे की गुणदोष–नफा तोटा–धोरणातील धोका सारे विचारात घेऊन जो परिणाम साधायचा तो साधताना अवांतर परिणाम होतच असतात, म्हणून ही किंमत मोजण्यास तयार व्हायचे, या धोरणाने हे सर्व झाले असे मानायचे? यावर प्रत्येक पक्षाचा माणूस वेगवेगळे बोलेल. आमचे नेते जाहीरपणे काय बोलले यापेक्षा व्यवहारात कसे वागले हे महत्त्वाचे आहे. नेत्यांचे हे वागणे जाणीवपूर्वक होते का ? हा ही अभ्यासाचा स्वातंत्रविषय आहे.

अण्णांनी सरदारांच्यापेक्षा पंडित नेहरूबाबत अधिक कठोर प्रतिक्रिया नोंदविली आहे. नेहरू अण्णांना म्हणाले सेक्युलॅरिझम ही अशी गोष्ट आहे, ज्याबाबत सर्व जगाविरुद्ध मी एकाकी एकटा भांडेन. बाकी इतर सर्व प्रश्नांबाबत बहुमताने ठरेल ते मी मान्य करीन. अण्णांनी लोकशाहीचा, नियोजनाचा, अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाचा निर्माता, थोडक्यात म्हणजे नवभारताचा भाग्यविधाता या जागेवरून पंडित नेहरूंना फार खाली आणून ठेवले आहे. अण्णा सांगतात ते पं. नेहरू बोललेले असणारच अशी माझी खात्री आहे. अण्णा खोटे बोलणारच नाहीत. पण नेहरू संपूर्ण सांगत होते असे मानण्याचे कारण नाही. त्या झटक्यात त्यानी हे मत दिले आहे. अण्णा प्रामाणिक गांधीवादी. त्यांचे सरळ गणित असे की ज्या नेत्यांच्या धोरणामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात व विषमता वाढते तो नेता समाजवादी हे मी मानणार नाही. धर्म, जाती, पैसा यांचा निवडणुकीवर प्रभाव वाढतो व माणूस अधिक हतबल होतो. त्यांची लोकशाही खरी ही मी मानणार नाही. मग राहिला सेक्युलॅरिझम. तो मी सांगतो आहे. अण्णा अतिशय सरळ परखड हिशोब मांडीत आहेत. अण्णांचा परखडपणा मान्य आहे. मूल्यमापन मान्य नाही. अण्णासाहेब इतके कठोर ज्या नेत्याविषयी बोलले तो त्यांचा लाडका व फार प्रिय नेता आहे. माणसाविषयी प्रेम, आपुलकी पण मताबाबत परखडपणा हा अण्णांनी नेहमीच चालू ठेवला. ते डोळस कर्मयोगीही होते. भक्तही डोळस राहिले.

या आत्मवृत्ताच्या निमित्ताने मी अनेक प्रश्न विचारीत गेलो. माझे प्रश्न होते त्यानुसार त्याला उत्तरे दिलेली आहेत. सामान्यपणे अनुभव असा आहे की, नेत्यांनी सुद्धा अंतर्मुख होऊन पुनर्विचार करण्याची शक्ती गमावलेली असते. अण्णांच्या बाबतीत माझा अनुभव असा की ते प्रत्येक प्रश्नाबाबत अंतर्मुख होऊन प्रांजळपणे आत्मपरीक्षण करीत. उदाहरणादाखल काही ठिकाणे मी मुद्दाम येथे नोंदवू इच्छितो. मुळशीपेटा धरणाविरुद्धचे आंदोलन हे महाराष्ट्र

प्रदेश काँग्रेसने गांधीयुगाच्या प्रारंभी नेतृत्व दिलेले पहिले आंदोलन आहे. या आंदोलनापासूनच काँग्रेस ग्रामीण भागात बलवान होऊ लागली. सेनापती बापट या आंदोलनातच सेनापती म्हणून गाजले. माझा प्रश्न असा होता की, तुम्ही त्या काळी धरणाविरुद्ध आंदोलन केले. आज स्वतंत्र भारतात तुम्हीच मोठ मोठी धरणे बांधता आहा. आजही धरणाला विरोध करणारे आंदोलन तुम्ही करणार आहात काय ? की मुळशीपेटा आंदोलनच चूक होते असे तुम्हाला वाटते ? शासनाने धरणे बांधावी हा आग्रह रानडे, टिळक यांच्यापासून चालू होता. हा आग्रहच चूक होता असे तुम्हाला वाटते का ? एक गांधीवादी म्हणून सर्व मोठ्या धरणांना विरोध करणे आपले कर्तव्य आहे असे तुम्हाला वाटत नाही का ? सत्तरी ओलांडलेल्या वृद्ध नेत्याला असे प्रश्न विचारणे म्हणजे डिवचणेच असते. माझाही हेतू डिवचण्याचाच होता. पण अण्णा चिडले नाहीत किंवा रागावले नाहीत.

त्यांनी शांतपणे एकेका प्रश्नाचा खुलासा केला. अखिल भारतीय नेतृत्व नेहमीच धरणांच्या बाजूने राहिले. धरणे बांधा हाच त्यांचा आग्रह राहिला. आजचे भारतीय शासन तेच करते. वाया जाणारे सर्व पाणी साठवा. ते वापरून धान्य वाढवा. लहरी पावसाच्या लहरीवर शेतकरी सोडू नका. अन्नधान्य वाढवून सामान्य माणसाला पोटभर जेवणापुरते मिळेल याची सोय करा. जनतेचे दारिद्र्य हा काँग्रेस राजकारणाचा नेहमी केन्द्रबिंदू राहिला. मग ते मवाळ, जहाल नेते असोत की डावे, उजवे नेते असोत. सर्वांना धरणे हवी होती. नवीन मुद्दा शेतीला पाणी द्या शिवाय वीज निर्माण करा हा आला. यामुळे काल–आज–उद्या धरणांना विरोध शक्य नाही.

एक गांधीवादी म्हणून सुद्धा मी धरणांना विरोध करणार नाही. पण मोठी धरणे सगळे पाणी अडवू शकणार नाहीत. मध्यम व छोटी धरणे तर हवीतच पण पाटबंधारेही हवेत. पाटबंधारे व छोटी धरणे यावर आम्ही भर देऊ. पण मोठ्या धरणांना मी विरोध करणार नाही. इतर गांधीवाद्यांनी त्याचे ठरवावे. मला मोठी धरणे विरुद्ध छोटी धरणे हा वाद कृत्रीम वाटतो. दुष्काळाच्या वर्षी मोठी धरणेच उपयोगी पडतात. छोटी धरणे व पाटबंधारे सुकून जातात. पण मोठी धरणे किती बांधली जातील याला मर्यादा आहे. प्रमुख पावसाचे पाणी अडविणे जागोजाग छोट्या बंधाऱ्यांनीच करावे लागेल.

पुढे ते म्हणाले मुळशीपेटा धरण सत्याग्रहाला राष्ट्रीय कार्यकारिणीची संमती नव्हती. महाराष्ट्र प्रांतिक सभा सुद्धा अधिकृतपणे पाठीशी नव्हती. कारण आम्ही धरणाविरोधी आंदोलन करतो आहो असे त्यांना वाटे. आम्ही हा समज

दूर करू शकलो नाही. ग्रामीण जनतेची घोषणा सुद्धा 'जान या जमीन' अशीच भावनात्मक व धरणविरोधी होती. या जनतेला आम्ही धरणविरोधी नाहीत हे आम्ही पटवून देऊ शकलो नाहीत. धरणवादी नेते व धरणविरोधी जनता अशी ही युती होती. आमच्या आंदोलनात वैचारिक स्पष्टता नव्हती. आपण धरण-विरोधी नाही हे आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांना मात्र मान्य होते. निदान मी धरणविरोधी नव्हतो.

आम्ही कोणत्या प्रश्नासाठी लढत होतो हेही सारे जण विसरलेले आहेत. प्रश्न पहिला. धरणाखाली जमीनी जातील त्याचा मोबदला पूर्ण किंमतीत द्या. नाममात्र मोबदला नको. आणि धरणग्रस्तांचे पुनर्वसन करा. तो खर्च द्या शक्यतो पर्यायी जमीन द्या. स्वतंत्र भारतात हे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे. दुसरा प्रश्न असा की, धरणाचे पाणी शेतीसाठी सवलतीच्या दराने द्या. या धरणाच्या पाण्यावर अग्रहक्क मुंबईच्या गरजांचा नसावा. हे तत्त्व आता अर्धवटपणे मान्य झालेले आहे. या धरणावर निर्माण होणारी वीज ग्रामीण भागालाही सवलतीच्या दराने द्या. हे तत्त्व आता सर्वमान्य आहे. धरणाच्या निमित्ताने झालेला आधुनिक राजकारणातील हा पहिला महत्त्वाचा लढा. ज्या तत्त्वांसाठी आम्ही झगडलो ती आता सर्वमान्य झाली आहेत. कधी काळी हे मुद्दे अतिशय विवाद्य होते. याची आठवणही बुजली आहे. आणि अशा आठवणी विसरल्या याचेच मला समाधान आहे. तुम्हीही लढलात पण शेवटी धरण तर झालेच. तुमचा पराभव झाला हे म्हणणे अर्धसत्य आहे. आम्ही धरणविरोधी नव्हतो तेव्हा पराभव झाला असे मी मानत नाही. झाला विजयच पण तो दुःखी विजय होता. जमीनीचा जो मोबदला मिळाला तो शेतीत भांडवल म्हणून गुंतवला आला नाही. शेतीला जोडधंदा म्हणूनही वापरता आला नाही. खेळता पैसा हाती आला तो वाढलेल्या दारुच्या दुकानांनी, नाटक-सिनेमांच्या थिएटरांनी फस्त केला आणि धरणग्रस्ताची वकीली हे काँग्रेसवादी वकीलांना नव्या उत्पन्नाचे साधन बनले. आमच्या संघटना लढू शकतात पण विधायक कार्याला अपुऱ्या ठरतात. अण्णांची विचार करण्याची ही पद्धती व्यक्तीच्या उखाळ्या पाखाळ्या टाळून जनतेच्या सामान्य प्रश्नावर लक्ष केन्द्रित करणारी, तरीही चिकित्सक पद्धती आहे. माझ्या सारख्याला अण्णांचे आकर्षण वाटे ते या स्वच्छ चिंतनामुळे.

असाच एक प्रश्न पंढपूर विठ्ठलमंदिराबाबत होता. भारत स्वतंत्र झाला होता. संविधान बनत होते. वर्ष, दोन वर्षात सारी मंदिरेच दलितांना मोकळी होणार होती. मग साने गुरुजींनी या मंदिरासाठी प्राणपणाला लावणे हा उतावळेपणा नव्हता काय? नव्या संविधानात सर्व भारतभरची मंदिरे दलितांना मोकळी होतील

हा अंदाज न आल्यामुळे हे उपोषण झाले का ? की या उपोषणामुळे संविधानात ते कलम समाविष्ट करण्याची प्रेरणा मिळाली ? की कायदा जरी झाला तरी अंमलबजावणीसाठी झगडणे भागच आहे तेव्हा कायद्याची वाट न पाहता झगडावे असे ठरले ? आणि गांधीजींनी ह्या उपोषणाला मान्यता का दिली नाही ? साने गुरुजी भावनाप्रधान होते. सेनापती बापट यांना तर आंदोलन म्हटले की स्फुरणच येई. पण तुम्ही आणि आचार्य जावडेकर हे तर विचारी, आणि तुमचा पाठिंबा असताना गांधीजींनी उपोषणाला मान्यता देऊ नये हे नवल नाही का ? साने गुरुजी हा राष्ट्र सेवा दलाचाही आणि अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचाही 'विक पॉईंट' आहे. हे लक्षात आले तर प्रश्न डिवचणारे आहेत हे सहज कळू शकेल

अण्णांनी शांतपणे सांगितले भारतीय संविधान तयार होते आहे. त्यात सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे गुन्हा ठरविणारे कलम आहे. सारी मंदिरे कायद्यानेच मोकळी होणार आहेत हे आम्हाला माहित होते. आमच्या उपोषणामुळे ती कलमे आलेली नाहीत. हे ज्ञान असल्यामुळेच गांधीजी आणि इतर नेते व महाराष्ट्रात काका गाडगीळ, शंकरराव देव, बाळासाहेब खरे यांचा साने गुरुजींच्या उपोषणाला विरोध होता. प्रत्येकजण जाहीर बोलताना सोयीनुसार बोलला पण खाजगीत सर्वांनी आपला विरोध स्पष्टपणे मांडलेला होता. सगळे मंदीरप्रवेशवादी होते. पण या 'अवेळी' उपोषणास त्यांचा विरोध होता. गांधीजींनी प्रथम उपोषणास मान्यता दिली नाही याचे कारण हे.

मी, जावडेकर, आचार्य भागवत उपोषणाचे समर्थक होतो. इतरांनी काय विचार केला माहित नाही. आमचा विचार असा– पंढरपूर विठ्ठलमंदिर सार्वजनिक देवालय आहे की ती बडव्यांची खाजगी इस्टेट आहे हा वाद आहे. तो वाद न्यायालयात २५ वर्षेही चालेल. हे मंदीर दलितांना, कायदा मोकळे करू शकणार नाही. त्यासाठी जनआंदोलन व उपोषणच हवे. जर हे मंदिर उपोषणाने मोकळे करण्यात यश आले तर कायदा झाल्यानंतर प्रमुख मंदिराच्या बाबत खाजगी की सार्वजनिक हा वाद न्यायालयात जाणार नाही. नसता प्रत्येक प्रमुख मंदिराची द्वारे न्यायनिर्णय होई पावेतो, संविधानात घोषणा असूनही दलितांना बंदच राहतील. आजही मला वाटते आमची विचार करण्याची पद्धत बरोबर होती. केवळ कायद्याने प्रश्न सुटत नाहीत व ते तसे सुटणे इष्टही नाही कायद्याच्या मागेपुढे जनजागृती, जनआंदोलन, जनतेचे दडपण हवेच. नाही तर कायदा प्रस्थापितांचे हित सांभाळतो. म्हणून उपोषण हवे. आम्ही साने गुरूजींना उपोषण करा म्हटले नव्हते. तो निर्णय त्यांचा. सहा महिने प्रचार व लोकजागृती नंतर उपोषण. या व्यूहरचनेत मी ही सहभागी होतो. गांधीजींना जेव्हा सर्व तपशील मी सांगितला

तेव्हा प्रश्न संपलेला होता. पण गांधीजींशी चर्चा करणे आम्हाला इष्ट वाटले नाही. एक तर त्यांच्यावर फाळणी व दंगलीचा ताण होता. दुसरे म्हणणे त्या क्षणी त्यांनी प्रांतिक शासनला अडथळा आणू नका हा सल्ला दिला असता. तो आम्हाला नको होता. आधी त्यांना भेटून आल्यानंतर त्यांचा सल्ला टाळणे आम्हाला कठीण गेले असते.

या अत्मवृत्तात जागोजागी प्रतिक्रिया आलेल्या आहेत. त्याचे कारण माझे प्रश्न हे आहे. आपल्या सहकाऱ्यांविषयी अण्णांना मते देण्याचा उत्साह नव्हता. पण जिज्ञासू माणसाने प्रश्न विचारले व त्याच्यावर वात्सल्य असले म्हणजे उत्तरे द्यावीच लागतात. त्यामुळे या प्रतिक्रिया व्यक्त झालेल्या आहेत. या प्रतिक्रिया व्यक्त होण्यासाठी प्रश्न कसे विचारलेले असतील याचा काही अंदाज वरील दोन प्रकरणांमुळे यावा असे वाटते.

अण्णांना आपले काही चुकले असे वाटलेच नाही का? त्यांना त्यांच्या चुकांचीही मधूनच जाणीव होई. दीर्घकाळपर्यंत त्यांचे असे मत होते की गांधीजी सुभाषचंद्राशी फार वाईट रीतीने वागले. त्यांनी सुभाषबाबूंवर अन्याय केला. हे वर्तन त्यांच्या हातून घडायला नको होते. वीस वर्षे हे मत त्यांनी कायम ठेवले आणि वीस वर्षानंतर पुन्हा त्यांनी पहिल्यापासून त्या प्रकरणाचा विचार केला. या फेरविचारामुळे ते या निर्णयावर आले की गांधीजी वागले त बरोबर होते. आपण म्हाताऱ्यावर उगीचच दोषारोप ठेवला. याची रुखरुख त्यांना वाटे. परिस्थितीच्या मूल्यमापनात आपण केलेल्या अनेक चुका ते सांगत. अंदाज कसे चुकले, माणसांचे मूल्यमापन कसे चुकले, परिस्थितीचे आकलन कसे चुकले हे ते मोकळेपणाने सांगत. पण त्यांचा पिंड विचारपूर्वक निर्णय घेण्याचा होता. आपल्या मर्यादा जाणण्याचा होता, त्यामुळे आपण चुकलो असे वाटण्याची वेळ त्यांच्यावर फार कमी येई.

या आत्मवृत्तात सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या अशा काही चुकांची नोंद आहे. दोन नोंदीकडे मी लक्ष वेधतो. बाकीचा शोध वाचकांनी स्वतः घेतला पाहिजे. अण्णा हे ब्रह्मचारी. ते तोंडाने काहीही बोलोत. ब्रह्मचर्याचा निर्णय त्यांनी कुठेतरी १७ व्या, १८ व्या वर्षी घेतला आहे. आणि तो जन्मभर पाळलेला आहे. लहानपणी रामदास, शंकराचार्य डोक्यात शिरल्यामुळे असो, अगर सशस्त्र क्रांतीकारका-विषयीच्या आकर्षणामुळे असो कारणे कोणतीही असोत पण ब्रह्मचर्याचे व्रत त्यांनी स्वीकारले. मुळांत कल्पना अशी आहे की स्त्रीकडे पहावयाचे नाही. स्त्रियांशी बोलावयाचे नाही. त्यांच्याशी एकांतातही बोलणे तर सोडाच पण चारचौघात

दोन हात अंतर ठऊनच वागायचे. हा 'धोका' मनात नेहमी जागा ठेवायचा. या पद्धतीनेच त्यांच्या जीवनातील पहिली ३५ वर्षे गेलेली आहेत. यानंतरचा काळात ही आचरणपद्धतीच चूक आहे असे त्यांना पटले. स्वातंत्र्यसंग्रामात स्त्रियांचा वाटा वाढावा यासाठी गांधी प्रयत्नरत होते. स्त्रीस्वातंत्र्य ही कल्पना मान्य करून सारे विचार करत होते. खरे स्त्रीस्वातंत्र्य जर अस्तित्वात यावयाचे असेल तर तुमच्या सहवासात स्त्री निर्भय व अनौपचारिक झाली पाहिजे. तिला तुम्ही आप्त व विश्वासार्ह वाटले पाहिजे. स्त्रियांना तुम्ही मित्र मानू शकला पाहिजेत. मोह हा स्त्रीदेहात नसतो. तो तुमच्या मनातच असतो. यानंतर अण्णानी जाणीवपूर्वक कुटूंबाचे मित्र होण्याचा प्रयत्न केला. स्त्रीस्वातंत्र्यावर श्रद्धा असणाऱ्या ज्या मंडळींनी जीवनात निष्ठेने हा प्रयोग केला त्यांना गैरसमजाच्या वादळातून जावे लागले, अण्णांना या वादळातून कधी जावे लागले नांही आरंभीचीही चूक त्यांनी मान्य केलेली आहे. आपला प्रयत्न योगी व नेता होण्याचा असतो. अण्णाचा प्रयत्न मित्र होण्याचा होता. त्यांना तसा संसार नव्हता पण ते किती जणांचे बंधु होते, पिता होते याला सीमा नव्हती.

अशीच अजुन एक नोंद संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याबद्दल आहे. भाषावाद प्रांतरचनेत त्यांना रस नव्हता. द्वैभाषिक राज्य हे पूर्णपणे समर्थनीय आहे. ते टिकवावे असे त्यावेळी त्यांचे मत होते. महाराष्ट्रीय मंडळींची सारी भूमिका त्यांना सदोष वाटे. अण्णासारख्या माणसाचे हे एक फार चांगले आहे. द्वैभाषिक मोडले आणि महाराष्ट्र अस्तित्वात आला यांचे त्यांना फार कौतुक वाटले नाही. पण ही घटना इ. स. १९५५ ते १९६० या काळखंडातील आहे. इ. स. १९७० नंतर भाषावर प्रांतरचनेबाबत आपली भूमिका संपूर्णपणे चुकली असे त्यांना वाटू लागले व तेही त्यांनी मोकळेपणाने कबूल केले. आता महाराष्ट्र अस्तित्वात आलाच आहे तर मग जे निर्माण झाले आहे टिकले आहे तेच बरोबर मानूया अशी ही भूमिका आहे का ? अशातला हा प्रकार नाही. जे इ. स. १९५५ पूर्वी हजार जणांनी सांगितले होते त्याचे महत्त्व त्यांना नंतर जाणवू लागले. लोकशाही बलवान व्हावयाची असेल तर लोकांच्या भाषेतून शासन चालले पाहिजे व ही गोष्ट शक्यतो एक-भाषिक राज्ये निर्माण झाल्याविना शक्य नाही. या निर्णयावर गांधी इ. स. १९२५ लाच आले होते. अण्णाचे बहुतेक जिवलग स्नेही महाराष्ट्रवादी होते. पण विनोबा, अप्पा पटवर्धन, अण्णा सहस्त्रबुद्धे, रावसाहेब पटवर्धन यांना संयुक्त महाराष्ट्रात फारसा रस नव्हता. इ. स. १९७० नंतर लोकभाषेतून राज्याचे महत्त्व त्यांना जाणवू लागले. भाषावार राष्ट्ररचना निर्माण होते हा युरोपच्या इतिहासाचा धडा त्यांनी विचारार्ह मानला. पण भारतात हा धोका फार मोठा आहे असे त्यांनी शेवटपर्यंत मान्य केले नाही. पण १९७० नंतर अण्णांना सतत असे जाणवू लागले

की प्रादेशिक असमतोल सारखा वाढतो आहे. प्रादेशिक असमोल कमी व्हायचा असेल तर लोक जागृत व्हायला हवेत. आणि त्यांनी शासनावर दडपण आणायला हवे. अण्णा शेवटी या निर्णयावर आले की भाषावार प्रांतरचना प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी अधिक उपयोगी आहे. जसजसे त्यांना हे जाणवू लागले तसतसे ते भाषावार प्रांतरचनेला अनुकूल होऊ लागगे.

त्यांच्या पद्धतीने सांगायचे तर महाराष्ट्राच्या चळवळीतून मी दूर राहिलो ही माझी चूक झाली. नाही तर महाराष्ट्र राज्य निर्माण होतानाच मी प्रादेशिक विकासाच्या स्वायत्त रचना मान्य करून घेतल्या असल्या. बारकाईने पाहणाऱ्याला हे जाणवेल की त्यांची प्रेरणा ज्ञानेश्वर नाही आणि शिवाजीही नाही. ती प्रेरणा गांधी आहे. ग्रामीण पुनर्रचनेच्या दृष्टीने प्रादेशिक विकासमंडळे व भाषावार प्रांतरचना अधिक सोयीची आहे या जाणिवेने ते महाराष्ट्रवादी झाले आहेत. अधिक छोटे प्रांत ही त्यांना आवडणारी कल्पना आहे. कारण ती विकेन्द्रीकरणाकडे जाते.

कम्युनिस्ट विचारसरणीशी त्यांचा मतभेद आहे. एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे की राष्ट्रीय चळवळीला कम्युनिस्टांनी सदैव विरोधच केला. अण्णांच्या पिढीतील मंडळींना ह्या सदैव खटकणारा मुद्दा आहे. कन्युनिस्ट राष्ट्रविरोधी आहेत म्हणून त्यांना माझा विरोध आहे असा हा मुद्दा आहे. पण माझा होरा असा की, इ. स. १९७० नंतर त्यांच्या मनात याबाबतीत फारसा राग शिल्लक राहिला नसावा. एकदा मला ते म्हणाले. हे कम्युनिस्ट सहज सुटणारे प्रश्नही सुटू देत नाहीत. त्यांना प्रश्न सुटले तर क्रांतीची धार बोथट होईल याची नेहमी चिंता वाटते. पुढे तेच हसले आणि म्हणाले मुलभूत प्रश्न असे सहजासहजी सुटत नाहीत हेही खरेच आहे आणि सुटू शकणारे प्रश्न फार वरवरचे व किरकोळ असतात हेही खरे आहे. मी आपला उगीच थोडेतरी दुःख कमी करावे म्हणून तडफडतो आहे. पण हा माझा भाबडेपणा आहे. म्हणजे हा रागही खरा नाही. त्यांना सर्व मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण मान्य आहे. विषमता कमी करणे यासाठी थोडीफार सक्तीही मान्य आहे. लोकशाही आणि राष्ट्रवाद ही निमित्ते शोधून काढून राष्ट्रीयीकरण व जमीन वाटप यांना विरोध करणाऱ्यापैकी ते नाहीत. यंत्रालाही त्यांचा अतिरेकी विरोध नव्हता. मुलभूत अर्थरचना बदलल्याशिवाय माणूस सुखी होणार नाही असे तेच मानतात. मग शिल्लक राहिले दोन आक्षेप, पहिला असा की कम्युनिस्ट फार बंदिस्तपणे विचार करतात. जीवनातील प्रश्नांचे स्वरुप फार साधे व बिनगुंतागुंतीचे एकपदरी मानतात. तसे ते नाही. हा आक्षेप जेव्हा मुलभूत अर्थरचना बदलणे भाग आहे असे सांगून नंतर घेतला जातो तेव्हा आक्षेप फार गंभीर राहत नाही. अण्णांचा खरा आक्षेप हा आहे की, कम्युनिश्ट मालक बदलतात आणि भांडवलशाहीची यंत्रणा

मात्र मान्य करतात. यंत्रणा तीच राहिली तर असंघटीत आणि दुर्बल जे आहेत त्यांचे मागासलेपण कायमच राहते. वेगळच्या भाषेत सांगायचे तर कम्यूनिझम शहरांना महत्त्व देतो. आणि खेडी तशीच दुबळी ठेवतो. ग्रामीण माणूस बलवान व मध्यवर्ती करीत नाही. अण्णांचा खरा मुलभूत आक्षेप हा आहे. त्यांच्या सारख्या गांधीवाद्याने अहिंसेचा प्रश्न आग्रहाने उपस्थित करू नये हे नवल नाही का ?

या नवलाचे कारणही दुसरीकडे अण्णांनीच सांगितले आहे, अण्णा हे खादीच्या क्षेत्रातले ज्येष्ठ कार्यकर्ते. अण्णांनीच मला हे समजावून सांगितले की, त्यांचा आणि गांधीजींचाही खादीवर फार बेताचा विश्वास होता. आरंभापासूनच गांधीजींचे हे म्हणणे होते की ज्यांनी श्रद्धा म्हणून अहिंसेचा स्वीकार केला आहे. त्यांनीच खादी कार्यात यावे. आरंभापासून अण्णांचे हे मत होते की, सशस्त्र क्रांती आम्हाला शक्य दिसत नाही. सत्याग्रहाचा मार्ग हाच आम्हाला शहाणपणाचा व उपयोगी वाटतो. पण वेळ आली तर मी शस्त्राचाही वापर करीन. गांधींनी अण्णांना अपवाद करून खादीचा क्षेत्रात घेतले. अण्णांनी वेळ आल्यावर १९४२ साली शस्त्राचा वापर केला. ते स्वतःला अहिंसेचा उपासक मानीत. जीव घेण्यापेक्षा बलिदान करण्यात अधिक शौर्य लागते हेही ते मानत पण या अपूर्ण मानवी जीवनात अपवाद म्हणून शस्त्राचा वापर ते स्वीकारीत. कम्युनिस्ट हिंसेच्या मार्गाने जातात हे त्यांना फार आक्षेपार्ह वाटत नाही ते ह्यामुळे.

अण्णासाहेब खादीकार्यात जन्मभर होते. त्यांना खादीचे महत्त्व कळत नव्हते असे कोण म्हणू शकेल? पण समाजपरिवर्तनाचा आधार खादीकार्य होऊ शकणार नाही. तुम्हाला शेती हा आधार करावा लागेल, असे प्रथमपासून त्यांचे मत होते. गांधीजींचेही हेच मत होते. कापड गिरण्या राहणार, तेव्हा खादी ही गिरणीला पर्यायी रचना नव्हे. हे सूत्र गांधींनी उघडपणे इ. स. १९४५ साली सांगितले. पारतंत्र्याच्या काळात स्वातंत्र्य लढा सांभाळीत शेतीच्या प्रश्नाला हात घालणे सोयीचेही नव्हते, शक्यही नव्हते. मग गांधीजींनी खादी कार्याला हात घातला. पण त्याहीवेळी शेतीला जोड उद्योगधंदे देण्याचा विचार त्यांनी सतत मनात ठेवला. वेळ आली की, सारा सर्वोदयाचा भर शेतीवर द्यायचा ही दिशा गांधीजींच्या मनात होतीच. अण्णांचेही तेच मत होते. गांधींच्या अनुयायांना खादी विषयी भक्ती होती. शेतीविषयी तात्त्विक आस्थेच्या पुढे जाण्यास ते तयार नव्हते.

अण्णांच्या पद्धतीने सांगायचे तर आम्हा गांधीवाद्यांचे प्रमुख तीन गट होते. एक गट अध्यात्मवाद्यांचा होता. यंत्रविरोध, चित्तशुद्धी, ब्रह्मचर्य. अहिंसा यातच त्यांना फार रस होता. दरिद्री माणसाचे दारिद्र्य व शोषण

संपविणारी नवी व्यवहार्य रचना म्हणून ते सर्वोदयाकडे पहात नव्हते. या गटाला सर्वोदय हा पारमार्थिक साधनेचा एक उचित मार्ग वाटे. या गटातील मंडळी ऋषीच आहेत. ते तपस्वी व चिंतनशील आहेत. पण त्यांच्यासमोर व्यवहार्यता हा कधी प्रश्नच येत नाही. मी विनोबावर एक विस्तृत लेख लिहिला आहे. त्याची प्रेरणा अण्णांचे हे विवेचन हीच होती.

अण्णांनी नाव घेतले नाही पण असे म्हटले आहे की, कम्यूनिझमला विरोध ही एका गटाची प्रमुख प्रेरणा होती. जमीनदारशाही आणि भांडवलशाही यांना नाममात्र विरोध पण राष्ट्रीयकरण नको. जडवाद नको असे तो गट सांगे. खरा विरोध कम्यूनिझमला करावयाचा असा हा एकच गट होता. खादीचा प्रमुख समर्थक वर्ग या गटातून येतो. ही माझी प्रतिक्रिया अण्णाना आवडली नाही. त्यांनी नापसंती अभिनयाने दाखविली पण माझे मत सुधारूनही दिले नाही.

अण्णांच्या समोर व्यवहार्यता ही कसोटी फार मोठी होती. विधायक कार्य जर स्वावलंबी नसेल तर ते समाजपरिवर्तनाचा आधार ठरू शकणार नाही. परावलंबी कामे आपल्याला जेथून मदत येते तो आधार मोडणार कसा? मदत देणारी ही यंत्रणा व शोषणाचा गाभा असते. बाबा आमटे यांचे आकर्षण अण्णांना यामुळेच होते. विषमता समाप्त करणारी, माणसाला महत्त्व देणारी, त्याचे स्वातंत्र्य जपणारी पण गरजा भागवणारी, शोषण संपवणारी अशी एक समाजरचना हवी आणि ती व्यवहार्य हवी असे त्यांना वाटे. अण्णांच्यासाठी या समाजरचनेकडे नेणारे नेते गांधीजी होते. ते हिंसा–अहिंसेच्या वादात फार पडत नसत. यंत्रविरोधावर फार भर देत नसत. वीजेचा वापर, छोट्या यंत्राचा स्वीकार तर त्यांना आवश्यक वाटेच पण समाजात गरजेपुरती अवजड औद्योगिक यंत्रणा राष्ट्रीयकरण करून अस्तित्वात ठेवणे भाग आहे, असेही त्यांना वाटे. माणसाचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा न गमवता त्याला दारिद्र्याच्या शापातून मुक्त करणारा प्रेषीत म्हणून गांधी त्यांना हवा होता.

मी हे काय सांगत आहे? तांत्रिक पातळीवर जे आचार्य जावडेकर सांगत तेच व्यावहारिक पातळीवर अण्णासाहेब सांगत आहेत, असे मी सांगत आहे का? होय. तेच मी सांगत आहे. सेवादलात वावरणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला अण्णा जर असे दिसले तर दोनच शक्यता मानल्या पाहिजेत. एक म्हणजे अण्णा खरोखर असे असणार किंवा मी ज्यांच्याकडे सेवादलाच्या आद्य विश्वस्तापैकी एक म्हणून पाहतो आहे तोच माझा चुकीचा मूळ उगम असेल. वाचकांनी कोणताही निर्णय घेतला तरी माझी तक्रार नाही.

◇ ◇ ◇

# ६/ मार्क्स आणि गांधी

कार्ल मार्क्स आणि म. गांधी यांची तुलना करणे हे एका दृष्टीने पाहिले तर अप्रस्तुतच म्हटले पाहिजे. ते अप्रस्तुत या दृष्टीने म्हणायचे की दोघांच्या जीवनपद्धतीतच फरक आहे. मार्क्स हा प्रामुख्याने विचारवंत आहे. अधूनमधून सामाजिक चळवळीत तो निष्ठेने व जिद्दीने काम घेतो ही गोष्ट खरी असली तरी ग्रंथालयात बसून एखाद्या प्रश्नाचा अभ्यास करणे आणि प्रचंड पुरावा डोळ्यासमोर ठेवून शास्त्रीय पद्धतीने एखाद्या प्रश्नाचा उलगडा करणे ही मार्क्सची वैशिष्टयें आहेत. म्हणून मार्क्सचा 'कॅपिटल' सारखा ग्रंथ पुरावे आणि आकडेवारी यांनी भरलेला असतो. आपल्या आधी जे चिंतन झाले त्याचा आढावा घेत, समोर आलेला पुरावा तपासून दाखवीत मार्क्स आपली मते मांडतो. त्याचे लिखाण व विवेचन बुद्धीला आव्हान देणारे आणि प्रचंड प्रेरणा देणारे असे आहे. जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारा मार्क्स हा प्रकांडपंडित होता. त्याच्या मृत्यूला आता जवळपास एक शतक होत आले, पण त्याच्या विचाराची प्रेरकता अजून संपली नाही. रशिया, चीन आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रे मिळून जगाचा १/३ भाग त्याच्या मार्गदर्शनाखाली आपल्या जीवनाची फेरमांडणी करण्यात गुंतलेला आहे. आणि उरलेल्या आशिया–आफ्रिकेत, दक्षिण अमेरिकेत, मध्य आशियात त्याच्याकडे आपले आशास्थान म्हणून पाहणारे कोटयवधी लोक आहेत. जवळ जवळ मार्क्स आता एका धर्मपुरुषाच्या पदवीला जाऊन पोचलेला आहे. त्याच्या विचारातील उणीवा आपण दाखवू लागलो तर हे संशोधन सत्याचे प्रामाणिक संशोधन आहे असे जगातील बहुसंख्य माणसांना

वाटण्याचा संभव फार कमी आहे.

गांधींची कहाणी यापेक्षा अगदी निराळी आहे. गांधी प्रकांडपंडित नव्हते. ग्रंथालयात बसून लिखाण करणारे नव्हते. एकूण गांधींनी पुस्तके किती वाचली, जी वाचली त्यांचे तरी शास्त्रीय पद्धतीने अध्ययन त्यांनी किती केले हे सांगता येणे फार कठीण आहे. साधकबाधक पुरावे मांडून शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची गांधींची पद्धत नाही. आपल्या बुद्धिवादाचा गर्व असणाऱ्या कोणत्याही पारंपरिक विद्वानाचे समाधान करणे गांधींना जमले नसते. इतर लोक तर सोडाच, पण जे गांधीजींचे जन्मभराचे अनुयायी होते त्या मंडळींनासुद्धा गांधीजींचे तत्त्वज्ञान व्यवहार्य आणि आकर्षक असे वाटले नाही. गांधीजी कर्मयोगी होते. त्यांचे तत्त्वज्ञान सर्व मानवजातीसाठी असले तरी व्यवहारतः एका राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याचे आंदोलन ते नेतृत्व घेऊन चालवीत होते. त्यामुळे त्यांच्या विचाराला राष्ट्राची बंधने पडलीच. ज्यांनी गांधींना आपला राष्ट्रपिता मानले त्यांनीही गांधीजींचे विचार अंमलात आणण्याचे दायित्व कधी स्वीकारलेले नव्हते. त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात आधुनिक भारताशी गांधीजींचा संबंध कोणता, असा जर सरळसरळ प्रश्न विचारला तर प्रश्नाचे सरळ उत्तर देणे कठीण आहे. प्रथम दर्शनी तरी असे दिसते की आधुनिक भारताने गांधीजींच्या जीवनदृष्टीचा अत्यंत आदरपूर्वक निरोप घेतला आहे. म. गांधी हे प्रातःस्मरणीय, पूज्य अशा वंदनीय पुरुषाचे नाव आहे. आधुनिक भारतात ते आचरणीय असे नाव नाही! शिवाय गांधीजी पूर्णपणे आस्तिक आणि धर्मश्रद्ध होते. मार्क्स हा नास्तिकांचा आचार्य आहे.

हे कठोर सत्य मान्य करण्याचीही आजच्या शासनाच्या मनाची तयारी नाही. आणि तरीही गांधी हा माणसाच्या, जातीचा एक फार मोठा प्रेरक दीप-स्तंभ आहे असे मी मानतो. गांधीजींच्या जीवनातील प्रेरकता संपलेली नाही. उलट त्यांची प्रेरणा आता अधिक आवश्यक वाटू लागलेली आहे. मार्टिन ल्यूथर किंगसारखा अमेरिकेतील नीग्रोंचा नेता असो की उ. व्हिएतनाममधील आपल्या बांधवांशी एकरूप होण्यासाठी धडपडणारे व त्या प्रेरणेपायी आत्मदहन करणारे दक्षिणेतील भिक्कू असोत; गांधींचा संदेश अजून जगाला हवा आहे, याची ही प्रतीके होत. फक्त माणसाची जात गांधींचा संदेश समजून घेण्याइतकी सक्षम झालेली आहे काय एवढाच एक वादाचा प्रश्न आहे.

विसाव्या शतकाला प्रेरणा देणारे मार्क्स आणि गांधी हे दोन महापुरुष असल्यामुळे त्यांची प्रकृती कितीही भिन्न असली तरी त्यांची परस्परांशी तुलना

होणे अपरिहार्य आहे. ते प्रकृतिभेदाने कितीही भिन्न असले तरी ध्येयवादाच्या दृष्टीने अत्यंत जवळचे असे महापुरुष आहेत आणि एकाचा विचार आपण बारकाईने करू लागलो की दुसऱ्याचे महत्त्व चटकन लक्षात यावे असे त्यांच्या कार्याचे स्वरूप आहे. म. गांधींच्याविषयी समजापेक्षा गैरसमज हेच जास्त आहेत, आणि अशा गैरसमजाला इतर कुणाच्यापेक्षा स्वतः गांधी हेच जास्त जबाबदार मानले पाहिजेत. गांधींच्या डोळ्यासमोर असणारा श्रोता पढिक पंडित नव्हता. आपली भूमिका पंडितांना समजावून पटवून देण्यापेक्षा सगळे पुस्तकी पांडित्य बासनात गुंडाळून परिस्थितीला अप्रस्तुत करून दाखविण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे गांधीजी ज्या भाषेत बोलत तिचा विपर्यास करणे हे अगदीच सोपे होते. गांधीजींनी स्वतःला जन्मभर अभिमानाने हिंदू म्हणवून घेतले. त्यामुळे ते शेवटी हिंदूच होते असे म्हणणे सर्वांना शक्य आहे. फक्त कै. नारायण भास्कर खरे हेच गृहस्थ त्यांना ख्रिश्चन समजत असत. कै. खरे यांनी जो शेवटचा लेख लिहिला त्या लेखात गांधीजींना हिंदू समजण्याबद्दल त्यांना नुसता दोष देण्यात आलेला नाही तर पुराव्याने गांधी ख्रिश्चन होते हे पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सामान्यपणे हिंदू गांधींना हिंदू पण हिंदुसमाजाचे द्रोही मानतात. अस्पृश्यांच्या मनात ते सवर्ण हिंदूचे नेते म्हणून त्यांच्याविषयी राग असतो. मुसलमान त्यांना हिंदूचे कल्याण पाहणारे पक्षपाती नेतेच समजतात. म्हणजे गांधींना मुसलमान हिंदूचे नेते मानतात. हिंदूच्यामधील अस्पृश्य सवर्णांचे नेते मानतात, सवर्ण हिंदू त्यांना आपले आत्मघातकी नेते समजतात. गांधीजी हे थोर मानवतावादी असले तरी समकालीन इंग्रजांच्या मते ते संकुचित राष्ट्रवादी होते. या देशातल्या राष्ट्रवाद्यांना असे वाटत नाही. अनेकांनी गांधींना तरुणांचा विश्वासघात करणारे, प्रस्थापित समाजरचना जतन करणारे, भांडवलशाहीचे छुपे हस्तक असे तर म्हटलेले आहेच; पण त्यांना जुनाट, प्रतिगामी आणि मध्ययुगीन मनोवृत्तीचे असेही म्हटले आहे. गांधीजींच्या लिखाणाचे स्वरूप असे आहे की गांधीजींच्या विरोधकांनी त्यांची निंदा करण्यासाठी कोणताही आरोप केला तरी तो त्यांच्याच वाङ्मयातून भरपूर पुरावे देऊन सिद्ध करता येतो. याच्याविरुद्ध गांधीजींच्या विषयी जर अनुकूल बोलायचे ठरवले तर त्याही दृष्टीने विविध प्रकारची मते त्यांच्याच लिखाणांतून आपण काढून दाखवू शकतो. वाक्यांचा पुरावा देऊन अनुकूल–प्रतिकूल चर्चा करणाऱ्या सर्व पंडितांचे पांडित्य अव्हेरून या देशातील कोट्यावधी जनतेने-विशेषतः कोट्यावधी दरिद्री जनतेने त्यांना आपला राष्ट्रपिता मानले. अशा प्रकारे भारतीय जनता गांधीजींच्याविषयी उत्कटतेने सश्रद्ध का असावी, हे मात्र पंडितांना सांगता येण्याजोगे नाही.

ज्या ठिकाणी तर्कवाद लंगडा पडतो तेथून शिवीगाळीचा आरंभ होतो.

दरिद्री भारतीय जनतेने गांधीना आपला राष्ट्रपिता का मानले, याचे उत्तर देता आले नाही म्हणजे मग विद्वान मंडळी सांगतात, या देशातील जनता धर्मश्रद्ध व अडाणी असल्यामुळे असे झाले. शब्दांची अस्तरे बाजूला काढली तर या वाक्याचा अर्थ जनता गाढव आहे, म्हणून ती गांधीमागे गेली असा होतो. आता चाळीस कोटी जनतेलाच पहिल्या झटक्यात गाढव ठरवायचे असेल तर मग हा प्रश्न तत्वचर्चेचा नसून शिवीगाळीचा तेवढा उरतो. लोक गांधीमागे का गेले ? या देशातील बुद्धिवाद करणाऱ्या पंडिताच्या मागे का गेले नाहीत ? याचे उत्तर लोक् गाढव आहेत असे दिले म्हणजे पुढचा प्रश्न निर्माण होतो. जर हे राष्ट्र गाढवांनी भरलेले असेल तर विद्वानांच्या विद्वतेला उद्या तरी यश येणार आहे का ? त्याचे उत्तर 'नाही' असे द्यावे लागते. आणि मग सगळी चर्चा समाप्त होऊन जाते. कोटयावधी लोक आपले धर्मगुरू, मठपती, राजेमहाराजे सोडून देण्याइतके शहाणे आहेत. ते शंकराचार्य, मध्वाचार्य इत्यादी बडया आचार्यांना राजकारणात कवडीइतकी किंमत न देण्या-इतके शहाणे आहेत. पण गांधीजी मागे जाण्याइतके गाढव आहेत. या विसंवादाचे उत्तर काय द्यावे ?

शिवाय गांधीजींचे अनुयायी मोठ्या प्रमाणात आधुनिक शिक्षण घेतलेले, शहाणेसुर्ते लोक होते. त्यांनीही बहुसंख्येने या अडाण्यांच्या बरोबर राहणेच पत्करले ! हा तरी एक विसंवादच म्हणायचा. नाहीतर ही सगळी विचार करण्याची पद्धत चुकली असे समजायचे. या शिवाय मला तरी दुसरा मार्ग दिसत नाही.

म्हणून विसंवादाने भरलेल्या गूढ अंधुक धार्मिक भाषेत बोलणारा गांधी आपण सोडूनच देऊ. गांधींच्या भाषेतील तर्कातील अशास्त्रीयपणा सोडला तर उरलेले जे अपरिहार्य सत्य आहे ते समजण्यासाठी मार्क्सइतका चांगला रस्ता नाही, असे मला वाटते. माझाही स्वतःचा वावर पढिक पंडितांच्या बागेतच असल्या-मुळे मला मार्क्स जसा जवळचा वाटतो तसा भारतीय असूनही गांधी जवळचा वाटत नाही. म्हणून ज्यावेळी गांधीजींचा विचार करण्याची वेळ येते त्यावेळी मी मार्क्सच्या महाद्वाराने गांधीच्या अंतरंगात शिरण्याचा प्रयत्न करीत आलो आहे. म्हणूनच वर असे म्हटले आहे की एकाचा अभ्यास करतांना दुसऱ्याचे महत्त्व कळत जावे असा या दोघांचा अनुबंध आहे.

मार्क्स आपल्याला हे सांगतो की समाजरचनेत एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत असतो. सरंजामशाहीत जमीनमालक हाच सरदार. जहागीरदार आणि राजा असतो. हा जमीनदार सर्वांचे शोषण करीत असतो. भांडवलशाहीत जमीन-दाराची जागा भांडवलदार घेतो. आणि भांडवलदार सर्व मजुरांचे शोषण करतो.

म्हणजे समाज सरंजामशाहीतून भांडवलशाहीत येताना शोषण करणारा वर्ग बदलतो. शोषणाची पद्धती बदलते सामान्य जनतेचे दुःख आणि दारिद्र्य जसेच्या तसे शिल्लक राहते. उलट भांडवलशाही व्यवस्थेत जनतेच्या यातना कमी न होता वाढतात. त्यांचे दारिन्द्य व उपासमार वाढते. त्यांच्या जीवनाचा अस्थिरपणा वाढतो. मानसाच्या मनातील एकाकीपणा आणि माणसाचे भय वाढते. असुरक्षिततेची जाणीव वाढते. नव्या उत्पादन साधनांच्या योगाने नवे उत्पादनसंबंध निर्माण होतात. नवी उत्पादन साधने, उत्पादन व्यवस्थेशी नवे संबंध यामुळे नवी समाज–रचना अस्तित्वात येते. अशारितीने समाज सरंजामशाहीतून भांडवलशाहीत क्रमाने रूपांतरीत होतो. पण हे चक्र याच ठिकाणी थांबणारे नाही. सतत काहीजणांच्या हातात संपत्ती साठत जाते. समाजाचे दारिर्‍द्य वाढत जाते. एकीकडे लोक अधिकात अधिक दरिद्री होत जातात. पण दुसरीकडे केन्द्रीत यंत्रप्रधान उत्पादन पद्धतीमुळे लोक एकत्र जमतही जातात, संघटितही होत जातात. हे संघटीत झालेले मजूरच क्रांतीचे अग्रदूत होतात. जुनी समाजव्यवस्था उलथून पाडतात आणि त्या जागी नवीन वर्गविहीन समाजरचना येते. समाज या पद्धतीने बदलत जावा याची कारणे समाजव्यवस्थेतच असतात. म्हणून समाज कोणत्या दिशेने विकसित होणार तो दिशा निश्चित केलेली असते.

मार्क्सच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाचा हा एक स्थूल आराखडा म्हटला पाहिजे. अतिशय तपशीलवार चर्चा करून पुरावे देऊन मार्क्सने आपली भूमिका मांडली आहे आणि मग जगातल्या सर्व कामगारांना नवीन समाजरचना घडवण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. मार्क्सचे हे तत्त्वज्ञान त्यातील शास्त्रीय मांडणीमुळे बुद्धीला प्रभावित करणारे आहे यात वादच नाही. पण या अत्यंत प्रभावी आणि शास्त्रीय मांडणीत अतिशय नकळतपणे एक फार मोठी अशास्त्रीयता दडून राहिलेली आहे हे सहजासहजी लक्षात येत नाही. काटेकोर शास्त्रीय मांडणीला शास्त्राला सापडणार नाहीत अशी सूक्ष्म छिद्रे असतात. या छिद्रांच्या-मधून आशय केव्हा ओघळून जाईल याचा पत्ता नसतो. स्वतः मार्क्स एक महान ध्येयवादी आणि मानवतावादी विचारवंत होता. दोष मार्क्सचा नाही. दोष तार्किक मांडणीत छिद्रे नसतातच असा भ्रम करून घेणाऱ्या आपल्या मनाचा आहे. ही छिद्रे आपण मान्य करणे यात शहाणपण आहे.

आपण एका एका प्रश्नापासून आरंभ करू, ज्यावेळेला आपण असे पाहतो की, छन्नीवर हातोडा मारून दगड फोडला जातो त्यावेळी आपण छन्नी दगडावर अन्याय करीत आहे असे समजावे की जो दगड काल ओबडधोबड आकारहीन होता त्या दगडाला एक व्यवस्थित आकार प्राप्त होत असल्यामुळे

दगडाची प्रगती होत आहे असे समजून दगडाची प्रगती घडवून आणणाऱ्या छन्नीला पाषाणउद्धारक नेता समजावे ? दगड आणि छन्नी या संदर्भात हे सगळेच प्रश्न गैर लागू आहेत हे कोणताही विचार न करता चटकन समजण्याजोगे आहे. पावसाळ्याच्या आरंभी आकाशात विजांचा कडकडाट होतो. कधी या विजा झाडांच्यावर कोसळतात आणि झाडे जळून खाक होतात. कधी नद्यांना पूर येतो आणि पुरात झाडे उन्मळून जातात. हा पुराने अगर विजेच्या लोळाने केलेला अन्याय आहे असे आपण समजत नाही. अन्यायाची कल्पना जड, अचेतन वस्तूंच्या-बाबत नसते. त्याचप्रमाणे जड, अचेतन वस्तुंच्या बाबतीत सुखदुःखाची कल्पना नसते. प्रगति-परागतीची कल्पना नसते. या जड वस्तुंच्यापासून आपण ज्यावेळी सजीवाच्या सृष्टीपर्यंत येतो. त्यावेळी आपल्याला असे दिसते की एका झाडा खाली दुसरे झाड वाढत नाही. काही गवत असे असते की ते इतर सर्व वनस्पती झाकोळून मारुनच टाकते. एक प्राणी दुसरे प्राणी मारून खातो, सिंहच, हरणे मारतो असे नाही तर कावळे, चिमण्यासुद्धा आळ्या मारून खातात. या वनस्पतींच्या, पशुप्राण्यांच्या जीवनात सुखदुःख असते. जगणे–मरणे असते. भय असते, आक्रमण असते. पण याही जीवनाला न्याय, अन्यायाचे. नीति-अनीतीचे प्रश्न लागू होत नाहीत. न्याय-अन्याय, नीति-अनीति हे सगळेच प्रश्न माणसांच्या बाबतीत लागू होतात. हे सगळे प्रश्न फक्त माणसांच्या बाबतीत लागू होतात हे लक्षात घेतल्याशिवाय कोणत्याही शास्त्रीय विचारांना तरणोपाय नसतो.

जड जगातून सचेतन जगताची निर्मिती झाली याला आपण प्रगती म्हणतो. सचेतन प्राण्यात रुपांतरीत झाले, प्राणी माकडापर्यंत आला आणि माकडाचा माणूस झाला असा आपण सगळा प्रगतीचा आलेख सांगतो. या प्रगतीच्या आलेखात जे कालानुक्रमाने नंतर येते ते प्रगत असते हा ठोबळ नियम उपयोगी पडत नाही. कालानुक्रमाने नेहमीच कोणत्याही माणसासाठी जन्म आधी असतो, मृत्यू काही वर्षांनी नंतर येतो. मरणाऱ्या प्रत्येक जीवाला त्याची प्रगती झाली असे सांगत नसतात. नाहीतर दुष्काळ आणि साथीचे आजार ही मानवजातीच्या प्रगतीची फार मोठी साधने ठरली असती. प्रगती आणि विकास याही कल्पना पुन्हा एकदा मानवसापेक्ष आहेत. प्रगती, विकास, न्याय, अन्याय या सगळ्याच कल्पना मानवसापेक्ष असणे भाग आहे. कारण त्या माणसांनी निर्माण केलेल्या कल्पना आहेत. जनावरांबाबत आपण न्याय-अन्यायाच्या कल्पना वापरीत नाही. ओळखदेख नसताना आणि संमती न घेता कुत्र्यांची लागण होते. त्याला आपण बलात्कार म्हणत नाही. उलट कुठल्यातरी वळूचे वीर्य हिंदुस्थानातील गायींना न विचारता आपण त्यांच्या गर्भाशयात लोटतो आणि याचा उल्लेख वैज्ञानिक प्रगती म्हणून

करतो. माणसे स्वतःच्या सोयीलाच प्रगती-परागती ही नावे देत असतात, असा याचा अर्थ आहे.

या सगळ्या बाबी आपण माणसांच्या संदर्भातच का विचारात घेतो याचे उत्तर असे आहे की, माणूस जितका नैसर्गिक आहे तितकाच तो अनैसर्गिक आहे. सर्व प्राण्यांप्रमाणे त्यालाही भूक लागते म्हणून ती नैसर्गिक आहे. पण पोट भरण्यावर प्राण्यांचे समाधान असते; माणसांचे नसते. माणसांच्यासमोर प्रत्यक्ष अस्तित्वापेक्षाही महत्त्वाच्या अशा काही कल्पना असतात. या अर्थाने माणूस अनैसर्गिक आहे. सामाजिक रचनेच्या बाबी सोडा. अगदी साध्यासुध्या घटनां-मध्ये माणसांचा हा अनैसर्गिकपणा दिसून येतो. आपल्याला हे माहीतच आहे की. जनावरे आत्महत्या करीत नाहीत. माणसे आत्महत्या करतात. कुणाच्या तरी आठवणीने झुरून मरण्याचा योग जनावरांना येत नाही, माणसांना येतो. यामुळे माणूस हा असा चमत्कारिक प्राणी बनलेला आहे की तो स्वतःचे स्वार्थाचे वर्तुळ छेदून बाहेर पडू शकतो आणि समाजाच्या हितात आपला स्वार्थ विलीन करू शकतो. हे माणसांनाच शक्य आहे. आणि आपल्या स्वार्थाखातर सगळा समाज कायमचा गुलाम करून साधन म्हणून वापरण्याचा हट्ट माणूस धरू शकतो हेही माणसांनाच शक्य आहे. माणसांना हे शक्य आहे की, ते एखादा ध्येयवाद उभा करू शकतील. त्याच्यासाठी प्राण पणाला लावू शकतील. एखाद्या ध्येयाने वेडे होऊन जगाच्या रचनेत उलथापालथ करू शकतील. माणसांना हे शक्य आहे म्हणूनच उत्पादन साधनांची प्रगती शक्य आहे. संस्कृतीची उभारणी शक्य आहे, क्रांती शक्य आहे.

माणूस आपल्या स्वार्थाच्या बाहेर जाऊ शकतो म्हणूनच मार्क्सवादाला भवितव्य आहे. स्वतः मार्क्स आणि लेनिनच असल्या प्रकारच्या उदात्त ध्येयवादाचे प्रतिनिधी आहेत. मार्क्सवादाच्या तर्कशुद्ध चाळणीत जे छिद्र राहून गेले आहेत ते हे की माणूस हे करू शकतो या प्रश्नाचा विचारच त्या तत्त्वज्ञानाच्या चौकटीत करता येत नाही. माणसे उत्पादनाची नवी साधने निर्माण करतात. याचे कारण मार्क्सवाद फक्त 'गरज' इतकेच देतो, हे स्पष्टीकरण अत्यंत अपुरे आहे. कारण ज्यांना उत्पादनाची गरज असते ते ही साधने निर्माण करीत नाहीत, जे उत्पादनाची ही नवी साधने आपल्या स्वार्थासाठी वापरतात ते ही नवी साधने निर्माण करतात. त्यापाठीमागे छंद, प्रयोग, निर्मिती आणि जिज्ञासा असते. ही नवी उत्पादनाची साधने वापरणाऱ्यांच्या समोर स्वार्थ असतात. उरलेली जनता या नव्या उत्पादन साधनांच्या होरपळीत नुसतीच होरपळत असते. मानवी जीवनात अन्याय असतो, अन्याय करणारे असतात, इतकेच खरे नाही. या अन्यायाविरूद्ध

प्राणपणाने झुंजणारे असतात. कोणत्याही समाजातील क्रांतीच्या नेत्याच्या जीवनाचा आधार नीती हा असतो. कोणते तरी नैतिक मूल्य स्वीकारल्याशिवाय अंगीकारल्या शिवाय क्रांती शक्य नसते.

आणि जिज्ञासा ही जितकी उपयोगी गोष्ट आहे तितकीच ती भयावह गोष्ट आहे. ती अन्नधान्यांचे उत्पादन चौपट करून धान्य वाढवता कसे येईल याचा विचार करते, त्याप्रमाणे अधिक मोठ्या स्फोटक शक्तीचा शोध घेताना एक स्फोटात विश्वगोल. कसा समाप्त करता येईल यांच्याही योजना आखते. विज्ञानाने कधीच आपल्या समोर नीती हा आदर्श ठेवला नाही, विज्ञानाला अमुक केले तर तमुक होऊ शकेल हे कळत असते आणि तमुक घडण्यासाठी काय करावे याच्या शोधाचा ध्यास असतो या शोधाशोधीत जग संपवता येईल अशा अणुस्फोटांच्यापर्यंत आपण आलेलो आहोत. फुटलेले डोळे, मोडलेले हात आपण दुरूस्त करतो. उद्याची प्रगती प्रयोगशाळेत माता, पित्याचे साह्य न घेता अपत्य-निर्मिती कशी करता येईल या दिशेने घोडदौड करीत आहे. एका हाताने विज्ञान यंत्राप्रमाणे माणूस हाताळता कसा येईल, त्याचे इच्छेनुसार जनन, मरण कसे निश्चित करता येईल या दिशेने धावत आहे. तर दुसऱ्या बाजूने विज्ञान कोटयवधींचे प्राण समाप्त करणे काही माणसांच्या मुठीत आणून ठेवीत आहे. अशा वेळी माणसांची संख्या निष्प्रभ होते, त्याच्या इच्छेला तर वावच राहत नाही. आणि हे सगळे संशोधन आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी वापरणारा माणूस अजून शिल्लक आहे.

गांधींची गरज या ठिकाणी लागते. माणसांना प्रबल कामवासना असतात हे फ्राईड सांगतो. ते खोटे नसून खरेच आहे. माणसांना भूक आणि भीती असते हे मार्क्स सांगतो तेही खोटे नसून खरे आहे. पण माणूस आपल्या सर्व वासनां-च्यावर मात करून नैतिक जीवन उभे करू शकतो हे गांधी सांगतो. गांधीजींचे हे म्हणणे खरे आहे की खोटे आहे, कोण जाणे ! पण ते खरे असेल तर टिकवून धरले पाहिजे आणि खोटे असेल तर माणसाने आपले सत्य प्रयत्नपूर्वक बदलून घेऊन हे म्हणणे खरे करून दाखवले पाहिजे. समाजाच्या स्वार्थात आपला स्वार्थ विलीन करणारा नैतिक करुणाप्रधान माणूस जन्माला येणे शक्य असेल तरच या सुसंस्कृत माणसांच्यासाठी सर्वांना अभय देणाऱ्या वर्गविहीन सुखी समाजरचनेचे मार्क्सचे स्वप्न व्यवहारात साकार होणे शक्य आहे. एरव्ही जनतेच्या कल्याणाच्या नावाने जनतेला गुलाम करणारे परमेश्वराचे प्रतिनिधी राजे माणसांना गुलाम करीत काही काळ नांदले आणि मावळले. जनतेच्या हक्काचा स्वातंत्र्य, समतेचा घोष करणारी भांडवलशाही जगात नांदली. हा इतिहास आहे. या पुढे वर्गविहीन

समाज जनतेचे सुख आणि समता या नावाने सर्व वैज्ञानिक आयुधांनी सज्ज झालेल्या हुकुमशाहच्या स्वतःला कल्याणकारी समाजवाद म्हणून घेतील आणि न संपणाऱ्या गुलामगिरीला भयापोटी किंचाळून सुखाचा सूर्योदय म्हणून सत्कारावे लागेल हा भविष्यकाळ आहे.

मार्क्स समाजरचनेचे गतिनियम सांगतो. क्रांतीचे शास्त्र उभे करतो. बुद्धीच्या जोरावर हे करता येणे शक्य आहे. पण ज्यांच्या कल्याणासाठी ही समाजरचना आहे त्यांच्या कल्याणात आपल्या स्वार्थाचे विसर्जन कसे करावे हे गांधी सांगतो; हे शक्य आहे याचे आश्वासन देतो. तर्काच्या चिमटीत गवसणारे हे सत्य नव्हे. ते तर्काच्या पलीकडचे सत्य आहे. तर्काचा प्रांत ओलांडून. सत्य सांगणारा प्रेषित तर्कातीत भाषेतच बोलत असतो. त्यातले सत्य समजून घेण्याइतका सुसंस्कृतपणा माणसाच्या जातीजवळ आहे काय, हा खरा प्रश्न आहे. मार्क्स आणि गांधी दोघांचेही एकच स्वप्न होते. त्या भव्य स्वप्नाला साकार करण्यासाठी अपेक्षीत असणारे उदात्त नैतिक जीवन दोघांचेही सारखे होते. म्हणूनच आपल्याला असे दिसते की गांधींचा ध्येयवाद यशस्वी होण्यासाठी मार्क्सचे भाकीत खरे ठरणे आवश्यक आहे आणि मार्क्सचे स्वप्न व्यवहारात येण्यासाठी गांधी जे सत्य सांगताहेत ते शक्य असणे आणि गांधीला हवा असणारा माणूस अस्तित्वात येणे आवश्यक आहे. माणूस कसा जगेल हे बुद्धी सांगते. ते मार्क्सने सांगितले आहे. माणसाने कशासाठी जगावे हे सांगण्याचे काम बुद्धीच्या आटोक्यातले नव्हे. ते गांधीने केले आहे.

◇ ◇ ◇

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3233 24863

# ७/ लॉर्ड माऊंटबॅटन

सत्तावीस ऑगस्ट ( १९७९ ) रोजी आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ एका बोटीवर झालेल्या बॉंब स्फोटात लॉर्ड अर्ल ऑफ माऊंट बॅटन यांचा अपघाती मृत्यू वयाच्या (७९ व्या) वर्षी झाला. या मृत्यूमुळे इतिहासाचा एक दुवा काळाच्या पडद्याआड गेलेला आहे. तसे पाहिले तर गेली कित्येक वर्षे माऊंट बॅटन निवृत्त जीवनच जगत होते. एक कर्तृत्वपूर्ण आणि समाधानी असे भरपूर मान-सन्मानाचे जीवन उपभोगल्यानंतर माऊंट बॅटन निवृत्त झालेले होते. वयाच्या मानाने पाहता माऊंट बॅटन आता मृत्यूच्या दारातच उभे होते. अपघाताच्यामुळे त्यांच्या वार्धक्याचा काळ संपुष्टात आला. इतकेच म्हणून आपण थांबले पाहिजे. या पुढील काळात त्यांच्याकडून कोणत्या कर्तृत्वाची अपेक्षा नव्हती. मुळातच राजकीय धकाधकीचा त्यांचा पिंड नव्हता. योगायोगाने आयुष्याची दोन वर्षे त्यांना धकाधकीच्या राजकारणात अनपेक्षितपणे उतरावे लागले. पण एकदा जबाबदारी मान्य केल्यानंतर ती त्यांनी अतिशय उमदेपणाने व चोखपणाने पार पाडली. भारतीय राष्ट्र या उमद्या माणसाचे नेहमीच कृतज्ञतेने स्मरण करीत राहील.

माऊंट बॅटन यांच्या अपघाती निधनाची वार्ता येताच भारत सरकारने सात दिवसाचा दुखवटा जाहीर केला. ब्रिटीशांच्यावतीने भारतात शेवटचे व्हॉयसराय आणि गव्हर्नर जनरल म्हणून ते आलेले होते. स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर

जनरल म्हणून त्यांनी काम पाहिले होते. या पदावर राहून गेलेल्या कोणत्याही व्यक्तीच्याबाबत उपचार पाळणे शिष्टाचाराला धरून आहे. पण माऊंटबॅटनच्या बाबत दुखवटा हा केवळ उपचार नव्हता. स्वातंत्र्य मिळत असताना जे नेते तिथे होते त्यांच्या मनात म्हणजे विशेषत: सरदार पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांच्या मनात माऊंट बॅटन यांचेविषयी गाढ महत्व होते. आजही माऊंटबॅटनचा मृत्यू झाल्याचे वर्तमान येताच भारतीय विद्याभवनसारखी संस्था इंग्लंडमध्ये उभारल्या जाणाऱ्या आपल्या भवनाच्या इमारतीस माऊंटबॅटनच्या स्मरणार्थ त्यांचे नांव देण्याचा निर्णय जाहीर करते. या घटनेचा अर्थ आपण काळजीपूर्वक समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे राजकारणाची गुंतागुंत जनतेच्या समोर फारशी येत नाही आणि जरी ती आली तरी तिचे फारसे स्मरण राहत नाही. या दोन्ही बाबी लक्षात घेऊन माझ्यासारख्या एखाद्या व्यक्तीला जर माऊंट बॅटन विषयी आपुलकी आणि कृतज्ञता वाटत असेल तर त्याने जाहीरपणे ती कृतज्ञता व्यक्त करणे कर्तव्य आहे असे मला वाटते.

माऊंटबॅटन यांच्या निधनानंतर भारताचा 'एक सच्चा मित्र गेला. पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा एक महान दुवा निखळला' अशा शब्दात त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. यापैकी पूर्व आणि पश्चिमेचा दुवा होण्याइतके मोठे व्यक्तिमत्व माऊंटबॅटन ह्यांचे नव्हते. पूर्वेला केवळ एक भारत नावाचा देशच अस्तित्वात नाही तर इतरही अनेक देश अस्तित्वात आहेत. या सर्व देशांना माऊंटबॅटन विषयी विशेष आत्मीयता वाटावी याचे काही कारण नाही. भारत, पाकिस्तान आणि ब्रह्मदेश ह्या राष्ट्रांशी राजकारणाच्या संदर्भात माऊंट बॅटन यांचा संबंध आला. पैकी पाकिस्तानने माऊंटबॅटनला नेहमीच आपला वैरी मानले. ब्रह्मदेशाने त्यांच्या बाबत फारशी आस्था दाखविली नाही. भारत सरकार मात्र नेहमीच माऊंटबॅटन यांना आपले मित्र मानीत आले आहे. या स्नेहाचे कारण माऊंट बॅटन कुटूंबाशी पंडित नेहरू यांचे घनिष्ठ संबंध, इतकेच नाही तर प्रत्येकाच्या मनात काही स्मृती आहेत. पश्चिमेच्या बाजूने सुद्धा फक्त इंग्लंड हाच एक देश नाही. उरलेल्या देशांना माऊंटबॅटनविषयी फारशी आस्था वाटणार नाही. हे मुद्दाम सांगण्याचे कारण असे की पूर्व आणि पश्चिम यांना जोडणारा दुवा हे त्यांचे वर्णन औपचारिक आहे हे लक्षांत यावे. भारताच्या सच्चा मित्र हेच त्यांचे खरे वर्णन आहे. भारतीय नागरिक नसताना इंग्लंडविषयीची अत्मियता आणि इंग्लंडचे हित यांच्याशी कोणतीही तडजोड न करता भारताचा जास्तीत-जास्त मित्र असणे व वर्षानुवर्षे ही मैत्री टिकवणे यात माऊंटबॅटन यांची आपल्या दृष्टीने थोरवी आहे.

भावनाप्रधान मंडळींच्या मते माऊंटबॅटन म्हणजे भारताची फाळणी, पाकिस्तानचा उदय आणि माऊंटबॅटन म्हणजे काश्मिरचा प्रश्न यूनोत नेण्याचा उद्योग. म्हणून भावनाप्रधान मंडळींना माऊंटबॅटनचे नाव काढले की राग येतो. राजकारणाच्या विलक्षण वक्रगतीविषयी फारसा समजूतदारपणा नसला म्हणजे असे राग लोभ आपण व्यक्त करू लागतो. व्यक्तीला सर्वस्वी महत्त्व देणे अगर व्यक्तीचे महत्त्वच अजिबात नाकारणे हे दोन्ही अतिरेक टाळण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. भारताला स्वातंत्र्य मिळाले ते माऊंटबॅटन यांच्यामुळे असे समजणे हा खुळेपणाचा प्रकार होईल. आमच्या स्वातंत्र्याला जर काही कारण असेल, तर ते कारण वर्षानुवर्षे चाललेला आमचा स्वातंत्र्य लढा आणि दुसऱ्या महायुद्धानंतरची बदललेली परिस्थिती हे होय. माऊंटबॅटन भारताला स्वातंत्र्य देऊही शकत नसतो किंवा कायम पारतंत्र्यातही ठेवू शकत नसतो. मोठ्या घटना केवळ व्यक्तीच्या इच्छेमुळे होत नसतात.

भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी माऊंटबॅटन गव्हर्नर जनरल होण्यापूर्वीच किंबहुना दुसरे महायुद्ध संपण्याच्याही कितीतरी वर्ष आधीच सुरू झालेल्या होत्या. पाकिस्तानची मागणी मुस्लिमलीगने इ. स. १९४० साली केली त्यावेळी माऊंटबॅटन भारतात गव्हर्नर जनरल म्हणून येणार आहेत याची कुणालाही गंधवार्ता असण्याचे कारण नव्हते. भारतीय राजकारणात मुस्लीमलीगचा उदय आणि विकास यांच्याशी माऊंटबॅटन ह्याचा जवळचा अगर दूरचा कोणताही संबंध नव्हता. भारतीय राजकारणातील प्रवाह माऊंटबॅटन यांनी जन्माला घातलेले नव्हते. भारतीय राजकारणाचा नेता म्हणून माऊंटबॅटनचा विचार करण्याची गरज नाही. भारताच्याच काय पण ब्रिटनच्या राजकारणात सुद्धा माऊंटबॅटन यांनी फारसे लक्ष कधी घातले नाही त्यांना राजकीय विचार नसतीलच असे नाही. त्यांचे राजकीय विचार मजूर पक्षापेक्षा हुजूर पक्षाशीच मिळते-जुळते असणार हेही उघड आहे. भारतात अगर ब्रिटनमध्ये कोणत्याही अर्थाने राजकारणी नेता नसताना आणि तरीही राजकारणाविषयी नेत्यांच्यापेक्षा अधिक चांगली व व्यापक समज असणारा हा माणूस होता. समाजजीवनात हे नेहमी घडते की प्रमुख निर्णय राजकारणाचे नेते घेतात. आणि हे प्रमुख निर्णय अमलात आणीत असताना ज्या तपशीलाच्या छोट्या छोट्या बाबी असतात त्यावर अंतीम सत्ता प्रत्यक्ष खुर्चीत असणाऱ्या माणसांच्या हाती असते. या बारक्या सारक्या बाबी संख्या जर अधिक असली तर त्यांचे दूरगामी परिणाम होतात. माऊंटबॅटन भारताचे मित्र राहिले ते अशा छोट्या छोट्या दूरगामी परिणाम घडविणाऱ्या बाबींच्या संदर्भातच. त्यांना श्रेय द्यायचे असेल तर ते मोठ्या बाबींच्या बद्दल देता उपयोगी नाही. आणि छोट्या बाबींच्या बद्दल त्यांचे श्रेय नाकारणे प्रामाणिकपणाचे होणार नाही.

लॉर्ड अर्ल ऑफ माऊंटबॅटन यांचा जन्म इ. स. १९०० साली झाला. इंग्लंड हे असे चमत्कारिक राष्ट्र आहे की तिथे लोकशाही आणि राजेशाही पिढ्यानपिढ्या शेजारी शेजारी नांदत आहेत. इंग्लंडमध्ये नुसता राजा नाही. राजाच्या शेजारी सरदार घराणी आहेत. राजघराण्यातील मुली ज्या उमराव घराण्यात दिल्या जातात अगर ज्या उमराव घराण्यातून राजघराण्यात मुली केल्या जातात अशी काही घराणीही तिथे आहेत. राजघराण्याशी निकट नात्याने जोडलेल्या उच्चकुलीन घराण्यात लॉर्ड अर्ल ऑफ माऊंटबॅटन यांचा जन्म झाला. वयाच्या सोळाव्यावर्षी, पहिले महायुद्ध ऐन भरात असताना माऊंटबॅटन यांनी नाविकदलात प्रवेश केला. नाविकदल या पाठीमागे ब्रिटनची एक परंपरा आहे. ग्रेट-ब्रिटन एक बलवान राष्ट्र म्हणून नाविकदलाच्या जोरावरच स्पेनचा परभव करुन उदयाला येते. नाविकदलाच्या जोरावर ब्रिटनने आपले जागतिक सामर्थ्य व महत्त्व निर्माण केले. ब्रिटनमध्ये नाविकदल हा एक स्वतंत्र अभिमानाचा विषय आहे. आपल्या कुलीनत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या, परंपरेविषयी गाढ प्रेम असणाऱ्या माऊंटबॅटनसारख्या महत्त्वाकांक्षी तरुणाला नाविकदलात जावेसे वाटले तर ते अगदी स्वाभाविक म्हटले पाहिजे. तरूण वयापासून माऊंटबॅटन ह्यांची महत्त्वाकांक्षा ब्रिटनचे नौदल प्रमुख होण्याची होती. ब्रिटनच्या प्रथेपरंपरेनुसार नौदलाचा प्रमुखच ब्रिटनचा सरसेनापती असे. या महत्वाकांक्षेमुळेच माऊंटबॅटन यांनी ब्रिटनच्या राजकारणापासून स्वतःला कटाक्षाने बाजूला टेवले. हुजूर आणि मजूरपक्ष दोघांनाही ते सारखेच जवळचे अगर दूरचे होते. भारताच्या गव्हर्नर जनरल पदावरुन निवृत्त झाल्यानंतर माऊंटबॅटन परत नाविकदलात जाऊन रुजू झाले आणि त्यानंतर ते यथाक्रम ब्रिटनचे नौदल प्रमुख आणि सरसेनापती झाले. हा मान त्यांना ज्या काळात ब्रिटन जगातले फार मोठे राष्ट्र राहिलेले नव्हते त्या काळात मिळाला.

इ. स. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्यावेळी माऊंटबॅट इंग्लंडच्या नौदलात अत्यंत उच्चपदावर नौदल अधिकारी होते. इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल ह्यांनी दुसऱ्या महायुद्धात नौदलसामर्थ्य हाच ब्रिटनच्या विजयाचा मुख्य कणा राहील. या बेताने युद्ध तंत्राची रचना केली. या रचनेत पूर्वेकडील आघाडी सांभाळण्याचे काम माऊंटबॅटनकडे आले. या संदर्भातच त्यांचा भारताशी पहिला संपर्क आला. दुसऱ्या महायुद्धात पूर्वेकडील आघाडीला दोन दृष्टींनी महत्त्व होते, एक तर जपानच्या विरुद्ध निर्णायक विजय मिळविण्याचे काम या आघाडीला करायचे होते. आणि दुसरे ब्रिटनच्या दृष्टीने प्रतिष्ठेचे काम म्हणजे कसलेल्या अमेरिकन सेनापतीच्या मॅकार्थर यांच्या स्पर्धेत इंग्लंडचा गौरव शिल्लक ठेवण्याची कामगिरी पार पाडायची होती. पूर्वेकडील आघाडीत माऊंट बॅटन यांनी आपले सर्व गुण प्रकर्षाने सर्वांच्या नजरेस आणले. या द्वितीय

महायुद्धातील कामगिरींमुळेच माऊंट बॅटन यांना कीर्ती आणि प्रतिष्ठा मिळाली. माऊंट बॅटननी यापूर्वी राजकारणात कधी भाग घेतलेला नव्हता पण पूर्वेकडील आघाडीचे नौदल प्रमुख म्हणून पडद्याआडच्या राजकारणाशी माऊंट बॅटनचा संपर्क आलाच. हे युद्ध चालू असतानाच त्यांनी काही निर्णय घेतले. आज इतक्या वर्षांनी त्या निर्णयांच्याकडे आपण पाहू लागलो तर मनाचा उमदेपणा, राजकारणाबाबत बरीचशी अपरिपक्वता आणि प्रश्नाच्या तात्कालिक स्वरुपाकडे पाहण्या ऐवजी दूरगामी परिणामाच्याकडे पाहण्याची त्यांची पद्धत या सर्व बाबी आपणाला एकदमच दिसू लागतात. माऊंटबॅटन यांचे दुसरे महायुद्ध संपण्यापूर्वीच बनलेले अतिशय ठाम मत असे की, या युद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटनला आपल्या साम्राज्याचे विसर्जन करणे भाग आहे. हुजूर आणि मजूर पक्षाची इंग्लंडची नेते मंडळी आणि माऊंटबॅटन यांच्यात या ठिकाणी मुख्य फरक दिसून येतो. राजकीय नेत्यांचे मत असे की, साम्राज्य टिकवण्याचा आणि जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न आपण करावा. जर नाईलाजच झाला तर मग साम्राज्याचे विसर्जन करता येईल. पण आधी ते टिकवण्याचा प्रयत्न करुन पहायला पाहिजे. इंग्लंडच्या हुजूर आणि मजूर पक्षाचे यावर जवळपास एक मतच असे. मजूरपक्ष साम्राज्य विसर्जनाची वेळ आली आहे या निर्णयावर फार उशिरा आला. हुजूर पक्षाला तर शेवटपर्यन्त आपण साम्राज्य विसर्जन करू नये असेच वाटे.

माऊंटबॅटन यांचे अजून एक मत असे की. जर सौजन्यपूर्ण साम्राज्य विसर्जनाला आपण तयार झालो नाही तर त्याचा फायदा कम्युनिष्ट घेतील. इंग्लंडच्या साम्राज्याच्या विसर्जनातून संबंध आशिया कम्युनिस्ट होण्याच्या प्रक्रियेला आरंभ व्हावा ही गोष्ट त्यांना मुळीच आवडणारी नव्हती. साम्राज्य विसर्जनामुळे कम्युनिझमचा प्रसार थोपवता येईल हे माऊंटबॅटन यांचे मत फारसे परिपक्व मानता येणार नाही, पण ते त्यांचे मत होते. माऊंटबॅटन यांचे असेही मत होते की राष्ट्रीय स्वातंत्र्याबाबत अनिवार प्रेम असल्यामुळे ज्यांनी इंग्रजाविरुद्ध महायुद्धात जपानशी सहकार्य केले त्यांची ती चूकच होती पण या चुकीकडे उदारपणे पाहिले पाहिजे. देशप्रेमापोटी घडलेली ही चूक क्षम्य मानणे आणि उदार विचार करणे जर आपल्याला जमले नाही तर दक्षिण आशिया कम्युनिस्ट होणे आपण वाचवू शकणार नाही. या भूमिकेमुळेच ब्रह्मदेशात आँगसान वर्थकिनून् यांच्याकडे उदारपणे पाहिले पाहिजे अशी भूमिका माऊंटबॅटन यांनी घेतली.

सर्व साम्राज्याचे विसर्जन होणार त्याला पर्याय नाही म्हटल्यानंतर ब्रिटनचे भारतातील साम्राज्यासुद्धा विसर्जित होणार हे तर आपण गृहित धरलेच पाहिजे. पण त्या बरोबर भारतीय नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध स्थापन करण्यात

आपण पुढाकार घेतला पाहिजे असेही त्यांना वाटे. यामुळेच इ. स, १९४५ साली ब्रह्मदेशात जवाहरलाल नेहरू गेले असताना त्यांनी सन्मानपूर्वक नेहरूंना आपल्या भेटीस बोलावले. एखाद्या राष्ट्राच्या नेत्याशी ज्याप्रमाणे वागावे त्यापद्धतीने नेहरूंशी माऊंटबॅटन वागले. या भेटीत माऊंटबॅटनने पंडित नेहरूंना हा सल्ला दिला की नव्याने उदयाला येणाऱ्या राष्ट्राच्या नेत्याची जबाबदारी लक्षात घेऊन त्यांनी वागायला हवे. सैन्य जर राजकारणात लक्ष घालू लागले तर मग नवोदित राष्ट्रात लोकशाही फार काळ टिकणार नाही. या दृष्टीने पाहता सुभाषचंद्र बोस याच्या राष्ट्रीय फौजेविषयी तुमचे धोरण तुम्ही आखले पाहिजे. ज्या सैन्याला जपानपुढे शरणांगती द्यावी लागली त्या सैन्याचा फार मोठा भाग अनेक हालअपेष्टा सोशीत युद्ध कैदी म्हणून राहिला. या कैदी सैन्याचा एक भाग सुभाषचंद्राच्या फौजेत सामील झाला, आता युद्ध संपलेले आहे. हे निष्ठावान युद्धबंदी आता सैन्यात परत सामावून घेतले जातील. त्यांच्या शेजारी जर निष्ठेची शपथ मोडलेले लोक मानसन्मानाने वावरू लागले तर त्यामुळे सैन्याचे मनोधैर्यही खच्ची होईल आणि सैन्यात राजकीय महत्वाकांक्षाही निर्माण होईल, याचा तुम्ही सर्व बाजूनी विचार करा.

माऊंटबॅटन यांचा सल्ला पंडित नेहरूंच्यासाठी एक अतीव कडू गोळी होती. भारतीय जनतेने बाबू सुषाषचंद्र बोस यांना मोठ्या अभिमानाने स्वातंत्र्यवीर म्हणून मान्यता दिलेली होती. सुभाषबाबूशी नेहरूंचे कोणतेही मतभेद असले तरी सुभाषचंद्रांच्या उज्वल देशभक्तीविषयी नेहरूंना शंका नव्हती. सुभाषचंद्रांचा मृत्यू झालेला आहे ही नेहरूंची खात्री असल्यामुळे आता स्पर्धेचा प्रश्न शिल्लक नव्हता. उलट सुभाषचंद्रांच्या विषयीचा जनतेत उचबळून आलेला आदरभाव काँग्रेस पक्षाच्या हितासाठी वापरण्याची संधी होती. ह्या सोयीकडे कानाडोळा करून माऊंटबॅटनचा सल्ला पत्करणे सुखाचे नव्हते. पंडित नेहरूंनी सुभाषचंद्राच्या फौजेत सामील झालेल्या मंडळीचा पुन्हा सैन्याशी संबंध येऊ दिला नाही. आणि या फौजेतील लोक कैदेतून सोडविणे या पलिकडे ते स्वतःपुढे गुंतलेही नाहीत.

आपण भारतीय लोक नेहरूंचे वागणे योग्य की अयोग्य यावर चर्चा करू शकतो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे लढले त्यांना स्वतंत्र भारतात प्रतिष्ठा देण्यास टाळाटाळ करणे हे चांगले झाले की वाईट झाले यावरही आपण चर्चा करू शकतो. एकच एक मत बनविण्याइतका हा प्रश्न सोपा नाही. पण माऊंटबॅटनचा जेव्हा आपण विचार करतो त्यावेळी त्यांच्या विचारांची दिशा आपण समजून घेतली पाहिजे. भारत स्वतंत्र होणार, ब्रिटीश साम्राज्य मावळणार हा मुद्दा त्यांच्यासमोर स्पष्ट आहे. जे नवे राष्ट्र उदयाला येईल त्याचे नेते कोण राहणार ? त्यांच्याशी आपली मैत्री असली पाहिजे हाही मुद्दा त्यांच्या समोर स्पष्ट आहे. नवस्वतंत्र

राष्ट्रात लोकशाही नांदावी, रुजावी यासाठी पथ्ये कोणती पाळली पाहिजेत याही बाबत ते स्पष्ट आहेत. आजहीं आपण असे मानतो की सैन्य राजकारणापासून अलिप्त असले पाहिजे. आपण असेही म्हणतो की बांगला देशात स्वातंत्र्योत्तर काळात जे हत्याकांड घडले त्याचे आणि पाकिस्तानात लोकशाही रुजत नाही याचे एक कारण राजकारणात सैन्याचा आणि सैन्यात राजकारणाचा प्रवेश आहे. ही जर सगळी मते आपण मानणार असू तर माऊंटबॅटन यांचा सल्ला कितीही नावडता असो, तो कल्याणाच्या इच्छेतून आला होता हे मान्य करणे भाग आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी खरे तर इ. स. १९४१ सालीच सुरू झालेल्या होत्या. त्यावेळी तुटलेला धागा महायुद्ध संपल्यानंतर इ. स. १९४५ साली पुन्हा जोडून घेण्यात आला. आणि वाटाघाटीची चक्रे पुन्हा सुरू झाली. इ.स. १९४५ साली देशभर निवडणुका झाल्या. हिंदु बहुसंख्येच्या प्रांतात सर्वत्र काँग्रेस निवडून आली. बंगाल, पंजाब आणि सिंधच्या मुस्लीम बहुसंख्येच्या प्रांतात बलवानपक्ष लीग होता. वायव्यसरहद्द प्रांत मुस्लीम बहुसंख्येंचा असूनही तिथे मंत्रीमंडळ काँग्रेसचे होते. त्यामुळे देशभरच्या राजकारणात काँग्रेस आणि लीग हेच दोन बलवान देशव्यापी पक्ष आहेत या गृहित कृत्यावर पुढच्या सगळ्या वाटाघाटी व चर्चा आरंभ होतात. मुस्लीम लीगला पाकिस्तान हवे होते. या प्रश्नावर लीग कोणतीही तडजोड करण्यास तयार नव्हती. काँग्रेस फाळणी मान्य करण्यास तयार नव्हती. अशा वातावरणात सर्वत्र प्रचंड ताण असताना लॉर्ड वॉव्हेल हे गव्हर्नर जनरल होते. प्रमुख निर्णय शेवटी काँग्रेस, मुस्लीम–लीग आणि इंग्लंडचे मंत्रिमंडळ यांनाच घ्यावे लागले असते. पण किरकोळ तपशीलाच्या प्रश्नांवर वॉव्हेल यांचे मतच प्रमाण मानणे भाग होते. लार्ड वॉव्हेल यांना फाळणीची कल्पना अजिबात मान्य नव्हती. वाटेल ती किंमत देऊन भारत हे अखंड राष्ट्र म्हणून टिकवावे ही त्यांची भूमिका होती.

या मनोभूमिकेतून लार्ड वॉव्हेल यांनी हंगामी मंत्रिमंडळ बनविले. आरंभी या हंगामी मंत्रिमंडळात मुस्लीम–लीग नव्हती. वॉव्हेल यांनी घटना समितीचे कामकाजही सुरू करण्यास मान्यता दिली. या घटना–समितीवरही लीगचा बहिष्कार होता. संबंध देशभर एक दंगलीचे वातावरण यानंतर निर्माण झाले. दंगलीना कलकत्यापासून आरंभ होतो आणि तिथून त्या सर्वत्र पसरू लागतात. या वातावरणामुळे वैतागून जाऊन लार्ड वॉव्हेल यांनी सत्ता विसर्जनाचा एक कार्यक्रम आखलेला होता.

वॉव्हेल यांच्या योजनेप्रमाणे एकेका प्रांताला सत्ता वाटून दिली जाणार होती. प्रांताच्या हवाली सत्ता करून ब्रिटन सैन्य व प्रशासन एकेका प्रांतातून संपूर्ण

बाजूला होणार होते. या योजनेत कलकत्ता. मद्रास आणि मुंबई येथून सगळ्यात शेवटी इंग्रज गेले असते. त्यातही शेवटचा क्रमांक मुंबईचा लागला असता. समजा जर ही वॉव्हेल योजना अमलात आली असती तर काय झाले असते? पाकिस्तान कदाचित झाले असते, कदाचित झाले नसते पण भारताला पूर्व पंजाब आणि पूर्व बंगाल गमवावा लागला असता. पूर्ण बंगाल गमावल्यानंतर आसाम भारतात राहणे शक्य नव्हते. दक्षिणेतील प्रांतानी भारतात राहण्याची भूमिका जरी घेतली असती तरी यानंतर संस्थानाचे भारतात विलीनीकरण ही घटना फारच कठीण झाली असती. चर्चा, तडजोड व करार यांचे दीर्घ आवर्तन पूर्ण झाल्याशिवाय भारतच अस्तित्वात आला नसता. हा भारत अस्तित्वात येण्यास जो कालावधी लागला असता तो नीट समजून घेतला की एक गोष्ट सहज लक्षात येण्याजोगी आहे की वॉव्हेलचा कार्यक्रम अमलात आला असता तर काश्मिर, जुनागड. हैद्राबाद, त्रावणकोर हे भाग भारतात आले नसते. माऊंटबॅटन विषयीची कृतज्ञता का वाटते हे समजण्यासाठी ही पार्श्वभूमि माहित असावी लागते.

वॉव्हेलबाबत अजून एक नोंद आपण जाणीवपूर्वक केली पाहिजे निरनिराळ्या संस्थानाचे भाग इंग्रजांनी संस्थानांपासून तोडलेले होते. हे भाग त्या त्या संस्थानांच्या मालकीचे आहेत, म्हणून साम्राज्य विसर्जनापूर्वी हे भाग संस्थानांना परत केले पाहिजेत असे वॉव्हेल यांचे मत होते. या दृष्टीनेच त्यांनी गिलीगीट, स्वात आणि चित्रळ हा भाग काश्मिरनरेशांच्या स्वाधीन इ. स. १९४६ साली केला. ह्या शिवाय वॉव्हेल यांची इच्छा वऱ्हाडचे चार जिल्हे निजामच्या स्वाधीन करण्याचीही होती, या मागणीचे सुतोवाचही झाले होते.

भारत आणि पाकिस्तान ही दोन्ही राष्ट्रे अस्तित्वात येणे अशक्यच व्हावीत; इंग्रजांचे साम्राज्य विसर्जित होताच पंधरा सोळा स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात यावीत या दिशेने वॉव्हेल पाऊले टाकून साम्राज्य विसर्जन करणे भाग पडत आहे असे भासवीत होते. असे करून वॉव्हेल नवोदित राष्ट्रावर सूड उगवीत आहेत ही गोष्ट सर्वांनाच जाणवली. वॉव्हेलच्या या उद्योगात इंग्रज सरकारचे संस्थान खातेही सहभागी होते.

जातीय दंगली, अस्थिरता आणि कडवटपणाच्या वातावरणात शेवटचा प्रयत्न म्हणून लॉर्ड अर्ल ऑफ माऊंटबॅटन यांनी भारताचे गव्हर्नर जनलर व्हावे अशी सूचना पुढे आली. माऊंटबॅटन यांनी आपल्या दोन अटी ब्रिटनच्या पंतप्रधानासमोर ठेवल्या. पहिली अट माऊंटबॅटनच्या दृष्टीने महत्त्वाची होती. ती मान्य करणे त्या वेळचे पंतप्रधान अॅटली यांना कठीण गेले नाही. माऊंटबॅटन यांचे म्हणणे असे की ब्रिटनचा नौदल प्रमुख व्हावे ही माझी नेहमीच महत्वाकांक्षा राहिली

तिच्या आड हे गव्हर्नर-जनरलपद येऊ नये, गव्हर्नर जनरल पदाचा काळ हा नौदलातून निवृत्ती न समजता रजा समजण्यात यावा. नौदलातील ज्येष्ठताक्रम अबाधित असावा आणि भारतातील काम संपल्यानंतर त्यांना परत नौदलात येता यावे. ॲटली यांनी फारशी खळखळ न करता ह्या अटी मान्य केल्या. माऊंटबॅटन यांची आणखी एक अट अधिक अवघड होती. त्यांचे म्हणणे असे की, मी शेवटचा गव्हर्नर जनरल म्हणून जातो आहे हा मुद्दा स्पष्ट असावा आणि मला उचित निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे. वेगळ्या भाषेत माऊंटबॅटन ब्रिटनच्या मंत्रिमंडळाचे हक्क आपल्याला असावेत असे सांगत आहेत. बरीच खळखळ झाल्यानंतर त्यांची ही दुसरी अटही मान्य करण्यात आली.

तिथेही माऊंटबॅटन यांची भूमिका अगदी स्पष्ट आहे. त्यांचे म्हणणे असे की साम्राज्य विसर्जित केले पाहिजे असे माझे पक्के मत जर असेल तर मग मी जाणार म्हणजे साम्राज्य विसर्जनासाठीच जाणार. आणि हे साम्राज्य विसर्जन इंग्लंडच्या प्रतिष्ठेला शोभेसे, नवोदित राष्ट्रांच्या आणि इंग्लंडच्या मैत्रीला नवा प्रारंभ करणारे असे घडवून आणणे हे माझे काम आहे. माऊंटबॅटनच्या मनात नव्याने स्वतंत्र होऊ इच्छिणाऱ्या प्रदेशाविषयीची सूडबुद्धी नव्हती. उलट हा प्रदेश उद्या आपल्या राष्ट्राचा चांगला मित्र ठरावा ही त्यांची भूमिका होती. त्यांनी मंत्रिमंडळाला असा सल्ला दिला की साम्राज्यविसर्जनाबाबत कोणतीही संदिग्धता राहणार नाही अशी स्पष्ट घोषणा मंत्रिमंडळाने केली पाहिजे. इ. स. १९४७ च्या फेब्रुवारीत ॲटली यांनी अशी स्पष्ट घोषणा केली. त्यांनी सांगितले सत्ता भारतीयांच्या हाती सोपवून साम्राज्य विसर्जित करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. हे साम्राज्य विसर्जन जास्तीत जास्त उशिरा म्हणजे जून १९४८ पर्यंत होईल. माऊंटबॅटन यांनी नौदलातील रजाही जून १९४८ अखेरपर्यंतच मान्य करण्यात आली होती. माऊंटबॅटन हे साम्राज्य विसर्जनाची स्पष्ट घोषणा आग्रहाने आधी करून घेऊन हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी येणारे शेवटचे इंग्रज अधिकारी होते. त्यांना अनावश्यक लांबण नको होती. युद्धात ज्या प्रमाणे अतिशय वेगाने हालचाली करून युद्ध लौकरात लौकर संपवायचे असते तोच दृष्टिकोण माऊंटबॅटन यांनी भारतीय प्रश्नांच्या बाबत घेतला. आणि मार्च १९४७ च्या तिसऱ्या आठवड्यात भारताच्या गव्हर्नर जनरल पदाची सूत्रे त्यांनी आपल्या हाती घेतली. गांधी, जिना आणि सरदार यांनी सत्तरी ओलांडलेली होती. त्या मानाने जवाहरलाल नेहरू हे अधिक तरुण. हा तरूण नेता सुद्धा माऊंटबॅटनपेक्षा एका दशकाने वडील होता. इतके माऊंटबॅटन तरुण होते. पण विविध प्रश्नांच्यावर त्यांची मते पक्की ठरलेली होती.

ज्या प्रदेशावर इंग्रजाचे राज्य आहे तो प्रदेश तसाच्या तसा अखंड

राहावा ही सर्वात चांगली गोष्ट असे लॉर्ड वॉव्हेल प्रमाणे माऊंटबॅटनचेही मत होते. पण जर हा प्रदेश अखंड राहणार नसेल तर त्याची कमीत कमी शकले उडावीत हा माऊंटबॅटन यांचा प्रयत्न होता. वॉव्हेल प्रमाणे त्यांच्या मनात सूडबुद्धी नव्हती. ब्रिटिश पंतप्रधानाने फेब्रुवारी अठ्ठेचाळीसमध्ये जी घोषणा केली आहे तिच्यात पाकिस्तानची गर्भित सूचना होतीच. माऊंटबॅटन भारतात येऊन त्यांनी गव्हर्नर जनरल पदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी काँग्रेस पक्षाने पंजाबच्या फाळणीची सूचना केली होती. या सूचनेतही फाळणी गृहित होती. माऊंटबॅटन यांनी मनाशी हा होरा बांधला की जर भारताच्या फाळणीची सूचना आपण मांडली तर कांग्रेसपक्ष कुरकुर करीत तिला मान्यता देईल मात्र काँग्रेस स्वतः फाळणीची सूचना करणार नाही. जर सर्व देशाची फाळणी होणार असेल तर पंजाब आणि बंगालचीही फाळणी व्हायला पाहिजे. अर्धा बंगाल आणि त्यामुळे आसाम अर्धा पंजाब जर भारताला मिळत असेल तर भारतीय नेते कुणी शांतपणे, कुणी समजुतदारपणे तर कुणी आक्रस्ताळेपणा करीत, पण सर्वजण क्रमाने फाळणीला राजी होतील.

अडचणीचा प्रश्न होता तो हा की पंजाब व बंगालच्या फाळणीला जिनांची मान्यता कशी मिळवायची. कारण सहजासहजी बॅ. जिना या घटनेला मान्यता देतील अशी शक्यता नव्हती. याचवेळी वायव्य सरहद्द प्रांताचा पख्तूनिस्तान मुद्दा पुढे येत होता आणि बंगालमध्ये स्वतंत्र अखंड बंगालचे राष्ट्र म्हणून रूपांतर करणे या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या सुराहवर्दी आणि शरद बोस यांचे बंगालचे स्वतंत्र राष्ट्र करावे या मुद्यावर एक मत झाले होते. या कल्पनेला म. गांधींचा आशीर्वाद मिळवण्याची त्यांची धडपड चालू होती. समोर आलेल्या माहितीत ज्या रिकाम्या जागा आहेत त्यांचा विचार करून व्यक्तिशः मी या निर्णयावर आलेलो आहे की, वायव्य सरहद्द प्रांत याचा पख्तूनिस्तान न होता तो पाकिस्तानचा भाग होण्याला रस्ता मोकळा करून दिला पाहिजे. आणि अर्धा पंजाब व अर्धा बंगाल हे प्रदेश भारतात आणता आले पाहिजेत. या कल्पनेला प्रथम सरदार आणि नंतर नेहरू याची संमती माऊंटबॅटन यांनी मिळविली. आणि पंजाब बंगालची फाळणी न झाल्यास सगळ्याच बंगालचे एक राष्ट्र आणि वायव्य सरहद्द प्रांताचा पख्तूनिस्तान हा अधिक अडचणीचा पर्याय पत्कारावा लागेल ही गोष्ट जिनांच्या समोर त्यांनी ठेवली. समोर असलेल्या पर्यायांपैकी पंजाब बंगालच्या फाळणीला मान्यता देणे हा तुलनेने परवडणारा पर्याय आहे. दुसरा पर्याय न परवडणारा आहे, हे जिनांच्या लक्षात येताच जिनांनी फाळणीला मान्यता दिली. आणि मग यातून आजच्या भारताच्या फाळणीची योजना साकार झाली. माऊंटबॅटनकडे भारताची फाळणी करणारे म्हणून पाहण्याच्या ऐवजी सर्व प्रांताना स्वातंत्र्य आणि भारताच्या ठिकऱ्या किंवा पूर्व पंजाब बंगाल व आसाम गमावणे किंवा अखंड भारताची किंमत म्हणून

सगळाच भारतदेश कायमचा मुस्लीम वर्चस्वाखाली जाऊ देणे या एकापेक्षा एक भयावह पर्यायांच्या पैकी त्यातल्या त्यात कमी विनाशाच्या पर्यायाला सर्वांचीच संमती मिळवून व्यवहारात आणणारे शिल्पकार या नात्याने पाहणे योग्य ठरेल.

हे घडत असताना वायव्य सरहद्द प्रांतासमोर भारत की पाकिस्तान हे दोन पर्याय ठेवण्यात आले. म्हणून वायव्य सरहद्द प्रांताने पाकिस्तानचा पर्याय निवडला. जर त्या प्रांतासमोर पख्तूनिस्तान हा तिसरा पर्याय ठेवला असता तर तेव्हाच तो वायव्य सरहद्द प्रांताने पत्करला असता. 'भारतीयांनी आम्हाला वाऱ्यावर सोडून दिले, लांडग्याच्या हवाली केले; आमचा विश्वासघात झाला,' इत्यादी बाबी सरहद्द गांधी बोलतात, त्याची संगती आता लावता येते. आणि पाकिस्तान व पाकिस्तानचे नेते माऊंटबॅटनवर नेहमीच जळफळत आल्याचेही एक कारण आपल्याला कळू शकते.

माऊंटबॅटनसमोर दुसरा प्रश्न संस्थानिकांचा होता. ही सर्व संस्थाने असे समजत होती की इंग्रज साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर संस्थानिक स्वतंत्र होतील त्यांना कुठे सामील व्हायचे असेल तर ते आपल्या अटी लादू शकतील. तत्वतः ही भूमिका माऊंटबॅटनननी मान्य केली. संस्थानिकांना भारतात सामील होणे; पाकीस्तानात सामील होणे अगर स्वतंत्र राहणे या तीनपैकी कोणताही एक पर्याय स्वीकारण्याची संधी असली पाहिजे हे माऊंटबॅटन यांना मान्य होते. पण तत्वतः त्यांनी हे जरी मान्य केले तरी हैद्राबादला वऱ्हाड देण्यास त्यांनी स्वच्छ नकार दिला. वॉव्हेले असते तर त्यांनी अकोला, बुलढाणा, यवतमाळ, अमरावती निजामच्या हाती देऊनच भारताचा निरोप घेतला असता. माऊंटबॅटनननी तत्वतः संस्थानचे स्वातंत्र्य मान्य केले. पण या स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी ब्रिटनने घेण्याच्या कल्पनेस ठाम नकार दिला. हे करीत असताना एका मुद्यावर माऊंटबॅटनननी अशी भूमिका घेतली की ज्यामुळें व्यवहारतः भारतीय संस्थानिकांना स्वतंत्र राहणें अशक्य होईल. माझ्या मते माऊंटबॅटन यांनी भारताच्या मैत्रीचे हे सर्वात मोठे कृत्य केले.

भारत स्वतंत्र झाल्यावर जवळपास साडेनऊ महिने म्हणजे जून अठ्ठेचाळीस अखेर पर्यंत माऊंटबॅटन गव्हर्नर जनरल राहिले. प्रशासनातील ब्रिटीश लोकही राहिले. ब्रिटीश सेनानीही राहीले. या घटनेचे बरे वाईट परिणाम थोडे आहेत. जुनागडच्या नवाबाने जुनागड पाकिस्तानात सामील केलेले होते. भारत सरकारची भूमिका ही होती की जुनागडचे पाकिस्तानात सामील होणे आम्हाला मान्य नाही. माऊंटबॅटन यांचा सल्ला असा होता की, हा प्रश्न युनोत न्यावा.

इच्छा असती तर या मुद्यावर माऊंटबॅटन अडून राहू शकले असते. ब्रिटीश सेनाधिकारी, ब्रिटीश प्रशासक आणि आपण यांचा राजीनामा आधी पत्करा त्याशिवाय जुनागडात फौजा पाठविता येणार नाहीत अशी भूमिका जर माऊंटबॅटन यांनी घेतली असती तर अडचणी निर्माण झाल्या असत्या. या अडचणी नुसत्या राजिनामे स्विकारण्याच्या नसतात. तिथे राजकीय पेचप्रसंग निर्माण होत असतो. पण माऊंटबॅटननी हे केले नाही, काश्मिर वाचवण्यासाठी, काश्मिर नरेशांच्या विनंती वरून काश्मिरात फौजा पाठवायला भारतीय नेते तयार होते. माऊंटबॅटनचा मुद्दा काश्मिर प्रश्न युनोत न्यावा हा होता. ( काश्मिर प्रश्न युनोत गेला पण तो माऊंटबॅटनच्या आग्रहामुळे गेला नाही तर इतर कारणांमुळे गेला. पण त्या प्रश्नाच्या तपशीलात इथे मी जाणार नाही. ) पण याही मुद्यावर माऊंटबॅटन अडून राहिले नाहीत. ते दुसऱ्याच मुद्यावर अडले. त्यांचे म्हणणे असे की जर काश्मिरात भारतीय फौजा जायच्या असतील तर त्या काश्मिर नरेशांच्या विनंतीवरून जाणार नाहीत. काश्मिरच्या महाराजांनी काश्मिरचे पाकिस्तानाशी संबध तोडावेत, भारतात सामील व्हावे, म्हणजे काश्मिर भारताचा भाग होता. आणि जो भाग भारताचा आहे त्याच्या रक्षणार्थ भारतीय फौजा जातील. माऊंटबॅटन यांच्या आग्रहामुळे काश्मिरात भारतीय फौजा जाण्यापूर्वी, भारतात काश्मिर सामील करावयाच्या करारावर काश्मिरच्या महाराजांची सही केली होती. आणि ही घटना चांगलीच झाली असे म्हटले पाहिजे नाहीतर भारतीय फौजा लढून सुद्धा काश्मिरचे महाराज असे म्हणू शकले असते की या मित्र राष्ट्रांच्या फौजा आमच्या विनंतीवरून आमच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ झटत आहेत. आणि मग वेगळीच गुंतागुंत निर्माण झाली असती.

या आणि अशा अनेक घटना माऊंटबॅटन यांच्या बाबतीत सांगता येतील. पण त्या सर्व बाबी फार लहान आहेत असे मला वाटते. चटकन फारशी लक्षात न येणारी माऊंटबॅटन यांची देणगी वेगळीच आहे. इंग्रजांचे राज्य मावळत होते या घटनेचे कायदेशीर स्वरूप कोणते ? सर विन्स्टन्ट चर्चिल यांचे मत असे होते की ज्याला आपण भारतातील इंग्रजांचे राज्य म्हणतो ती इंग्रजांनी घडवून आणलेली घटना आहे. वेळोवेळी इंग्रजांनी वेगवेगळे प्रदेश वेगवेगळ्या मंडळीशी झगडून ताब्यात घेतले आणि ईस्ट-इंडिया-कंपनीने आपल्या प्रशासनाखाली ते आणले. ज्याला तुम्ही भारत म्हणता ती भारताच्या इतिहासातील स्वाभाविक गोष्ट नव्हे, ती इंग्रजांच्या कर्तृत्वाची निदर्शक अशी बाब आहे. हे इंग्रजांचे साम्राज्य आता संपत आहे. इंग्रजांचे राज्य संपताच सर्व संस्थाने स्वतंत्र होतील. कारण साम्राज्यसत्ता संपत आहे. आणि पाकिस्तान व भारत ही दोन नवी राष्ट्रे उदयाला येतील. संस्थाने स्वतंत्र होत असून, आपल्या भवितव्याचा निर्णय संस्थानांनीच घेतला पाहिजे. चर्चिल यांची ही भूमिका जिनांना मान्य होती. इंग्रजांपैकी बहुतेकांना

हीच भूमिका मान्य होती. भारतीयांच्या पैकी अनेकांना आजही असे वाटते की, पंधरा ऑगस्ट एकोणिसशे सत्तेचाळीसला दोन नवी राष्ट्रे उदयाला आली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांना ही भूमिका मान्य नव्हती. त्यांचे म्हणणे असे की इंग्रजांच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशातून काही भाग बाजूला निघून वेगळा होत आहे त्याचे पाकिस्तान नावाचे नवे राष्ट्र अस्तित्वात येत आहे. बाकी उरलेला प्रदेश जसाच्या तसा भारत आहे. तो मागच्या इंग्रज राजवटीचा वारस आहे. आजवर हा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात होता आता यावरील इंग्रजांचा ताबा संपून जाऊन हा प्रदेश स्वतंत्र होत आहे. म्हणजे स्वतंत्र नसणारे राष्ट्र स्वतंत्र होत आहे. पण नवे राष्ट्र अस्तित्वात येत नाही. नेहरूंना म्हणायचे ते हे की, जुन्या भारताचे सर्व हक्क व करार नव्या भारताकडे वारसाने चालत येत आहेत. म्हणून भारत हे राष्ट्रसंघात नव्याने सामील होणारे राष्ट्र नाही. ते राष्ट्रसंघाचे संस्थापक राष्ट्र आहे. पंडित नेहरू यांच्या भूमिकेचा अर्थ असा की, भारतातील संस्थानिकांच्या रक्षणाची, त्यांच्या प्रदेशात आणिबाणीच्यावेळी फौजा पाठविण्याची; संस्थानिकांना मान्यता देण्याची आणि त्यांचे विदेश सबंध आपल्या स्वाधीन ठेवण्याची जी ब्रिटीशांची जुनी परंपरा आहे तिचा वारसा नव्या भारताकडे येतो. संस्थानिक भारतात सामीलही न झाले तरी हीच परिस्थिती कायम राहते. हैद्राबादच्या प्रदेशात आपल्या फौजा घुसविण्याचा हक्क या आधारेच पुढे भारताने सांगितलेला आहे व बजावलेला आहे. नेहरूंच्या भूमिकेचा दुसरा अर्थ असा की, भारताच्या शेजारी असणाऱ्या फ्रान्स आणि पोर्तुगालच्या वसाहती यांच्या संरक्षणाचा अधिकार नव्या भारत सरकारला आहे. नाटो राष्ट्रे तर सोडाच पण पोर्तुगालसुद्धा ठराविक मर्यादेबाहेर स्वतःचे सैन्य गोव्यात आणू शकणार नाहीत. भूतान आणि सिक्कीम वरील भारताचे प्रभूत्व तिबेट व नेपाळ येथील विशेष अधिकार वारसा हक्काने नव्या भारत सरकारकडे येतील. या नेहरूंच्या भूमिकेचे नानाविध प्रकारचे लाभ भारताला झालेले आहेत. त्यांची मोजदाद करून दाखविणे शक्य नाही. पण आपण असा विचार करू शकतो की फ्रान्सच्या वसाहती भारतात विलीन होताना अगर पोर्तुगालच्या वसाहती भारतात येताना त्यात वाटा मागण्याचा हक्क पाकिस्तानने का गमावला ? आणि असे अनेक प्रश्न स्वतःला आपण विचारू शकतो.

नव्या भारताकडे जुन्या ब्रिटीश इंडियाचा वारसा येतो आहे ही भूमिका चर्चिलला अजिबात मान्य नव्हती. वॉव्हेललाही मान्य नव्हती. पण चर्चिल पंतप्रधान नव्हता. ही भूमिका स्वातंत्र्याच्या वेळचे ब्रिटीश पंतप्रधान क्लेमेन्ट ॲटली यांनाही रूचणारी नव्हती. ब्रिटीश हा शब्द वगळून होणाऱ्या कॉमनवेल्थ मध्ये राहण्यास

माऊंटबॅटननी नेहरूंचे मन वळविले. हे घडायचे असेल तर जुन्या ब्रिटीश प्रदेशाचा वारसा नव्या भारताकडे आला या भूमिकेला मान्यता मिळणे आवश्यक आहे, यासाठी माऊंटबॅटननी अॅटलीची सम्मती मिळविली. या ठिकाणापासूनच स्वतंत्र भारत आणि इंग्लंड यांच्या मैत्रीचा पाया भरला जातो, भारत आणि चीन यांच्या झगड्यात मॅकमोहन रेषा प्रमाण मानणे इंग्लंडला नेहमी भाग पडले. याचेही एक कारण आता उघड आहे.

काही गोष्टी आपण समजून घेतल्या पाहिजेत. भारताची फाळणी करणे अगर टाळणे दोन्ही माऊंटबॅटनला शक्य नव्हते. ती त्यांच्या आटोक्याबाहेरची गोष्ट होती. पण फाळणी होताना नवे एकसंव बलवान राष्ट्र निर्माण होईल याची व्यवस्था करणे माऊंटबॅटनला शक्य होते. ब्रिटनच्या नागरिंकाला, ब्रिटनच्या तात्कालिक व दूरच्या हितसंबंधाचे जतन करणे भाग असते. भारत मित्र असणे, आणि भारत कॉमनवेल्थमध्ये असणे या गोष्टी ब्रिटनच्या हिताच्या आहेत. भारतात विस्कळित-पणा व अराजक नसणे, भारत कम्युनिष्टांच्या आहारी न जाणे हे ब्रिटनच्या हिताचे आहे. ही व्यापक चौकट लक्षात घेऊन या चौकटीत बसून भारताचे जितके हित करता येईल तितके माऊंटबॅटन करीत आले. हैद्राबाद सारख्या प्रश्नावर ब्रिटनच्या मंत्रिमंडळाने हैद्राबाद स्वतंत्र राहू शकत नाही अशी भूमिका घेतली. जुनागड प्रश्नावर भारत–पाक संबंध लक्षात घेऊनसुद्धा ब्रिटनला भारताची कृती पसंत नाही. पण जुनागडवर आम्ही भारताचा ताबा मानतो अशी भूमिका घेतली. जुन्या हैद्राबादने वीस कोट रुपये पाकिस्तानला दिले. याची अंमलबजावणी करणे ब्रिटनने टाळले. या व अशा शेकडो गोष्टी असतात जिथे सूडबुद्धी आणि शत्रूत्व किंवा मित्रत्व दाखवता येते. माऊंटबॅटन यांनी ब्रिटनला स्थूलपणे भारताचे मित्र राहण्यास प्रवृत केले. याचे लाभ उभय देशांना झाले. विशेषतः नवे भारत जुन्या भारताचा वारसा स्विकारणारे राष्ट्र आहे हा मुद्दा मान्य करुन घेऊन माऊंटबॅटन यांनी नवे भारत कायमचे ऋणाइत करुन ठेवले आहे.

माऊंटबॅटनच्या रुपाने एका ऐतिहासिक काळातील भारताचा सच्चा मित्र गेला ही गोष्ट आता उपचार न मानता एक महत्त्वाचे सत्य मानले पाहिजे. माऊंटबॅटन ब्रिटीश सैन्याच्या प्रमुख पदावरून निवृत्त होईपर्यंत म्हणजे जवळ जवळ स्वातंत्र्योत्तर आठ वर्षे पर्यंत ब्रिटनच्या राजकारणातील ती एक महत्त्वाची व्यक्ती होती. आपल्या कर्तृत्वाचा काळ त्यांनी भारताचे मित्र म्हणून व्यतीत केला, या विषयीची कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे. आपल्या इतिहासातून आपल्याला मिळालेली दुःखे आपण पत्करली पाहिजेत. या दुःखांचा दोषारोप तिऱ्हाइतावर न करता, तिऱ्हाइताने जर मित्र भावनेतून कुठे आपले हित केले

असेल तर ती मैत्रीही आपण समजून घेतली पाहिजे. आजही भारत कॉमनवेल्थ-मध्ये आहे ही गोष्ट एकाअर्थी माऊंटबॅटनविषयी नव्या भारताला जी कृतज्ञता वाटते तिचे स्मारकच आहे, असे मानावे लागेल.

# ८/ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे दुसरे राष्ट्रपती रहावे हा एक आश्चर्यकारक योग होता. ज्यांची विवेक बुद्धी त्यांच्या राजकारणावर कधी कधी मात करते असे राजकीय इतिहासातील राधाकृष्णन हे एक उदाहरण होय. पहिले राष्ट्रपती राजेंद्र बाबू आणि तिसरे झाकीर हुसेन. त्यांची बाब डॉ. राधाकृष्णन यांच्यापेक्षा निराळी होती. या नंतर क्रमाने सर्वश्री गिरी, फकरूद्दीन अली अहमद व नीलम संजीव रेड्डी हे राष्ट्रपती झाले. हे शेवटचे तीन राष्ट्रपती हा नेहमीच चालू असणाऱ्या राजकारणाचा भाग आहे. राजकीय जीवनाच्या परिघात राजकारण चालू असावे याला फार दोष देता येणार नाही. जिथे राजकारण नसावे तिथेही ते चालू असते मग अशा वेळी जिथे राजकारण असतेच तिथे तर ते असणारच याबद्दल तक्रार तरी कशी करावी.

पहिल्या तीन राष्ट्रपतींची कहाणी थोडी निराळी आहे. जेव्हा भारत स्वतंत्र झाला व राष्ट्रपतीची निवड होण्याची वेळ आली त्यावेळी काँग्रेस श्रेष्ठी (हाय कमांड) पुढील प्रमाणे होत्या : सरदार पटेल, नेहरू, आझाद, राजगोपालाचारी आणि राजेंद्र बाबू. पैकी सरदार, पंडितजी व आझाद मंत्रीमंडळात असणार हे उघडच होते. राजगोपालाचारी गव्हर्नर जनरल होते. तेव्हा ह्यांनीच पहिले राष्ट्रपती व्हावे की संविधान सभेचे अध्यक्ष राजेंद्र बाबू ह्यांनी पहिले राष्ट्रपती व्हावे इतकाच प्रश्न होता. सरदार पटेलांचे मत राजेंद्र बाबूंच्या बाजूने होते. नेहरूंच्या इच्छे

विरूद्ध राजेंद्र बाबू राष्ट्रपती झाले. पहिले राष्ट्रपती हे सात्त्विक, सज्जन, चारित्र्य-संपन्न म्हणून प्रसिद्ध होते. प्रत्यक्षात ते अतिशय कसलेले मुत्सद्दी होते. राजकारणी व संघटनेवर बळकट पकड असणारे नेते होते. स्वतंत्र युद्धातून तावून सुलाखून निघालेले देशभक्त होते. तिसरे राष्ट्रपती झाकीर हुसेन हे थोर शिक्षण शास्त्रज्ञ, चारित्र्यवान, आणि आदरणीय असे गृहस्थ होते. राजकीय वजन त्यांना नव्हतेच. त्याना संघटनेमध्येही स्थान नव्हते. जुने काँग्रेसमन व देशभक्त होते. स्वातंत्र्यपूर्व काळात अशी काही माणसे काँग्रेसने आपापल्यात गोळा केली होती जी राजकीय पक्षाची सभासद होती. चळवळ असेल तर सत्त्याग्रह करून ती सरळ जेलमध्ये जात. ही माणसे देशभक्त होती. नेत्याची निष्ठावंत अनुयायी होती. कोणत्याही त्यागाला ते तयार असत. "स्वातंत्र्यासाठी सांगाल ती किंमत देऊ" हे त्यांचे सूत्र. पण येरव्ही त्याना राजकारणात रस नव्हता. ही सत्तेत व राजकारणात रस नसणारी काँग्रेसचीच माणसे होती. झाकीर हुसेन हे त्यापैकी एक होते.

झाकीर हुसेनांच्याविषयी सर्वांनाच आदर होता. त्यांचे एक उदाहरण सांगण्याजोगे आहे. विरोधी पक्षाच्या वतीने बाबू जयप्रकाश उभे रहावे असा प्रयत्न त्या वेळी जोरात चालू होता. जयप्रकाश म्हणाले विरोधी पक्ष काय काँग्रेस-सह सर्व पक्षांनी बिनविरोध जरी मला राष्ट्रपतीपद दिले तरी मी ते घेणार नाही झाकीर हुसेन आमचेच उमेदवार आहेत. त्यांच्या विरुद्ध न्या. सुब्रह्मण्यम उभे होते. ते म्हणाले झाकीर हुसेन तर अपक्षीय अगर सर्व पक्षीय उमेदवार म्हणून उभे राहणार असतील तर त्यांना आमचा पाठींबा राहील. आज काल अशा बाबी घडणे फार कठीण झाले आहे.

डॉ. राधाकृष्णन यांची परिस्थिती याहून निराळी होती. ते कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधीत नव्हते. सत्त्याग्रह, तुरूंग या बाबी त्यांच्या जीवनात नव्हत्या म. गांधीशी त्यांचे संबंध होते. पण तेही देशावर प्रेम करणाऱ्या नागरीकाचे, राष्टनेत्याशी आदराचे संबंध असावेत असे होते. कोणाशीही त्यांचे घनिष्ट व व्यक्तीगत संबंध नव्हते. राधाकृष्णन हे तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध होते. जगभर त्यांची तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्धी होती. काँग्रेसमधील शेकडो हजारो लोक त्यांच्या ग्रंथाचे चहाते होते. स्वतः जवाहरलाल नेहरूच त्यांच्या लेखनाचे चहाते होते. पण त्यांचा काँग्रेस राजकारणाशी काही संबंध नव्हता. राजकीय नेते मधून मधून त्यांना भेटत पण त्यांच्याशीही ते राजकारणावर कधी बोलत नसत.

त्यांच्या जीवनात प्रमुख प्रश्न तीन होते. आणि कुणाशीही ते याच तीन प्रश्नांच्या अनरोधाने बोलत. पहिला प्रश्न असा की नीतीमान पण चिकित्सक,

विज्ञानोन्मुख पण अध्यात्मप्रवण असा नवा माणूस कसा निर्माण करता येईल ? या दृष्टीने शिक्षणाचा काही उपयोग होऊ शकेल का ? दुसरा प्रश्न असा होता की प्राचीन भारतीय तत्त्वचिंतन सर्व जगाला आधुनिक भाषाशैलीत, आधुनिक पद्धतींने कसे समजावून सांगता येईल? उदा. न्याय दर्शनाला लॉजीकल अॅनॉटानिझम म्हणावे की लॉजीकल क्लॅरॅलिझम म्हणावे? भारतीय तत्त्वचिंतनाचे वैभव जगाला नेमकेपणाने कसे सांगावे ? कसे पटवून दद्यावे ? तिसरा प्रश्न असा होता की मानवजातीचे भवितव्य घडवण्यासाठी सांस्कृतिक संचिताचा उपयोग किती ? तत्त्वज्ञांसमोर तात्त्विक प्रश्न होते. वर्तमान व्यावहारिक प्रश्नात त्यांना फार रस नव्हता.

स्वातंत्र्याच्या उदयकाळी काँग्रेसचे श्रेष्ठ नेते राधाकृष्णन ह्यांच्याकडे गेले. त्यांना त्यांनी संविधान सभेचे सदस्य होण्यास पाचारण केले. आम्हाला तत्त्वज्ञ मार्गदर्शकाची गरज होती. त्यांना राजकारणात रस नव्हता. संविधान सभेत येण्यापूर्वी काही वर्षे ते प्राचार्य होते. नंतर बनारस विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. प्रशासन त्यांनी सांभाळलेले होते, कौशल्याने सांभाळले होते. पण त्यांना त्यात रस नव्हता. क्षमता नसणे ही जीवनाची उणीव असते. पण क्षमता असूनही रस नसणे हा ऋषीचा स्वभाव असतो. राधाकृष्णनच्या रूपाने तत्त्वज्ञ राजा आपल्यापुढे उभा आहे हे नेहरूनी जाणले. सरदार पटेल व नेहरूंचे फार थोड्यावेळी एकमत होई. त्यापैकी एक ठिकाण हे होते. या माणसाचा देशासाठी उपयोग करून घेता आला पाहिजे असे त्या दोघांनाही वाटे. म्हणून त्यांना रशियाचे वकील म्हणून पाठवण्यात आले. पुढे १० वर्षे ते उपराष्ट्रपती होते. इ. स. १९६२ मध्ये ते भारताचे राष्ट्रपती झाले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे असे राष्ट्रपती होते. ज्या माणसाचे राजकीय सामर्थ्य शून्य होते, संघटना मुत्सद्देगिरी डावपेच यात जो रस घेत नव्हता, पण त्याचे नैतिक वजनच एवढे मोठे होते की त्या सामर्थ्यासमोर नतमस्तक होण्यात सत्तेलाही आपला गौरव झाला आहे असे वाटे. दुःख निराशेच्या क्षणी ज्याचा सहवास हेच एक मोठे सांत्वन होते असा हा आमचा राष्ट्रपती होता. राधाकृष्णन हे ऋजु स्वभावाचे म्हणूनच प्रसिद्धच होते. फटफळपणा तुसडेपणा हा त्यांचा गुण नव्हता. पण त्यांचा सरळ साधा प्रश्नच कित्येकवेळा समोरच्या माणसाला सपाट करीत असे. एका मंत्र्याशी ते सॉक्रेटीसवर बोलत होते. सॉक्रेटीसचे असे एक मत आहे की आपल्याला कोणकोणत्या विषयात काहीही कळत नाही हे नक्की माहींत असणे हे शहाणपणाचे लक्षण आहे. राधाकृष्णन उपराष्ट्रपती होते. त्यांनी मंत्र्याला विचारले, आपल्याला ज्या विषयात काही कळत नाही त्यांची यादी तुम्ही केली आहे का ? मंत्री म्हणाले. यादी आहे पण अपूर्ण आहे. राधाकृष्णन म्हणाले, काही हरकत नाही. आपण दोघं बसून ती यादी पूर्ण करुन टाकू.

संकेत त्यांच्याकडून पाळले जातीलच याची खात्री नसे, सर्व संकेताच्या पलीकडे असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांनी संकेत मोडले तरी त्यांच्या मोठेपणाकडे पाहून त्याकडे दुर्लक्ष करणे भाग होते. जन्मभर ते असेच तत्त्वज्ञासारखे वागले. त्यात राजकीय संकेत डावलले गेले तरी त्यांनी दुर्लक्ष केले. संकेत मोडले जात तेव्हा बहुधा सत्यच त्यांच्या तोंडून बाहेर पडे. हा गृहस्थ निर्भयपणे सत्य बोलण्याचा संभव आहे याचीच अनेकांना जरब बसे. तोंडातून याबाबतच्या काही गोष्टी फार प्रसिद्धी आहेत.

डॉ. राधाकृष्णन एकदा सोव्हिएत रशियात भारताचे वकील होते, स्टॅलीनने एकदा त्यांना भेटीसाठी बोलावले. स्टॅलीन सामान्यपणे लोकांना भेट देत नसे. पण हा जगत् विख्यात तत्त्वज्ञ. त्यामुळे स्टॅलीनने त्यांना बोलावले. इकडच्या तिकडच्या औपचारिक बाबी बोलून झाल्यावर स्टॅलीन म्हणाले, 'डॉक्टर आपण रशयित आहातच तर रशयिन जनतेने जी महान संस्कृती उभारली आहे तीही पाहून द्या. नव्या भारताच्या उभारणीला आमच्या अनुभवाचा उपयोग होईल.' राधाकृष्णन म्हणाले, "महाराज आकाशातून आपण पाखरासारखे उडू शकता व समुद्रात माशाप्रमाणे खोल वावरू शकता हे तर मला माहीतच आहे. पण पृथ्वीवर माणसांप्रमाणे वागायला शिकलात का?" तत्त्वज्ञाने हुकूमशहाच्या तोंडावर त्याच्या हुकूमशाहीचा निषेध नोंदवण्याचाच हा प्रकार होता. पण स्टॅलीनने हा फटका शांतपणे सहन केला. वकीलाने काय बोलावे या संकेताचा हा भंगच होता. पण तत्त्वज्ञाने काय बोलावे याच्याशी हा मुद्दा सुसंगत होता. इतर कुणी असे बोलले असते तर चोवीस तासात रशियातून त्याची हकालपट्टीच झाली असती.

त्यांची व स्टॅलीनची अजून एक भेट प्रसिद्ध आहे. स्टॅलीन आजारी होता म्हणून तो अंथरूणावर निजलेला होता. राधाकृष्णन शेजारच्या कोचावर बसले होते. थोडीफार चर्चा झाल्यावर ते म्हणाले आज तुमची प्रकृती बरी नाही. मी नंतर भेटेन, आणि ते स्टॅलीनच्या जवळ गेले. त्यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवत म्हणाले, "भल्या माणसा थोडा विसावा घे. शरीराचे आजार हे असणारच, ते धैर्याने भोगावे मनाच्या आरोग्याची काळजी घ्यावी," स्टॅलीन म्हणाला, 'त्यांचा हात किती वात्सल्य आणि मायेने भरलेला आहे!' आता हाही संकेतभंग होय! पण आजारी माणसाला तत्त्वज्ञ काय सांगणार? राधाकृष्णननांच्या वत्सलतेला राष्ट्रसीमेची बंधने थोडीच होती. ते राष्ट्रपती असताना झेकोस्लाव्हाकियाला गेले. तेथील संसदे–समोर त्यांचे व्याख्यान होते. व्याख्यानात ते म्हणाले, जगभर शांतता नांदावी आणि मानवजातीचा उत्कर्ष व्हावा यावर तुमच्या आणि माझ्या राष्ट्राचे व जनतेचे एकमत आहे. पण प्रत्येक राष्ट्राचे काही निराळेपण असते. आम्ही असे मानतो की,

संसदेचे काम शासनाची तपासणी करून शासनावर वचक ठेवण्याचे आहे. तुमच्या-प्रमाणे संसदेचे काम शासनाच्या सर्व कृतीवर शिक्कामोर्तब करणे एवढेच आहे असे आम्ही मानत नाही.' हा पुन्हा एक हुकूमशाहीला फटकाच होता. पाहुण्या राष्ट्रपतीने यजमानाचा असा अपमान करायचा नसतो. पण तो राधाकृष्णननी निर्भयपणे केला. प्रसिद्ध पत्रकार लुईफिशर या व्याख्यानाला हजर होते. त्यांनी म्हटले आहे: त्यांचा आवाज स्पष्टपणाने व गंभीरपणाने निनादत होता. मात्र विजेच्या प्रचंड कडकडाटाने सर्वांनी सुन्न व्हावे तसा त्यांचा आवाज होता. क्षणभर मला वाटले, आपण टाळ्या वाजवून स्वागत करावे. पण पुन्हा वाटले ते बरे दिसणार नाही.' झेकोस्लाव्हाकियाने वृत्तांत देताना ही वाक्ये गाळली. पण ते राष्ट्र गप्प बसले. निषेध वगैरे काही केला नाही. कदाचित राधाकृष्णननी निषेधाच्या पत्राला असे उत्तर पाठवले असते: "बाळांनो तुमचे पत्र मिळाले. तुमचे कल्याण असो. अरे खरे बोलण्यावर असे रागावू नये, अंतमुर्ख होऊन चिंतन करावे. असो, सर्वांना आशिर्वाद." हीच त्यांची पद्धत होती.

इ. स. १९६५ साली भारत पाक युद्धाच्या संदर्भात ते अमेरिकेला गेले. पाकिस्तान आक्रमक असून सुद्धा अमेरिकेची सर्व सहानुभूती पाकिस्तानलाच होती. या वातावरणात हा दौरा झाला. राधाकृष्णन विमानतळावर पोहचले. त्या वेळी पाऊस पडत होता. अमेरिकेचे अध्यक्ष विमानतळावर छत्री घेऊन आले होते. त्यांनी भारताच्या राष्ट्रपतीचे स्वागत केले. डोक्यावर छत्री धरली. अमेरिकेचे अध्यक्ष म्हणाले, "महोदय निसर्गावर आमचा ताबा नाही, आपले स्वागत असो!" राधाकृष्णन म्हणाले, "अध्यक्ष महाराज, निसर्गावर आपला ताबा नाही हे खरेच आहे. पण आपल्या भावना व बोलणे यावर तर आपण ताबा ठेऊ शकतो. तेवढे केलेत तरी पुरे!"

राधाकृष्णन यांच्या अशा अनेक आठवणी सांगता येतील. त्या आपल्या देशातील आहेत तशा परदेशातीलही आहेत. ह्या सर्वच कथांमधून त्यांचे तत्त्वचिंतक व्यक्तीमत्व आणि सरळ व प्रांजळ मनच प्रकट होते खरे म्हणजे भारतीय संस्कृतीत जे जे काही मधूर व मंगल आहे. त्या सर्वांचा वारस लाभलेले ते व्यक्तीमत्व होते.

राधाकृष्णन यांचा विचार आपण तत्त्वज्ञ म्हणून करावा की शिक्षक म्हणून? कारण त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देशभर शिक्षक दिन साजरा होतो. प्रथम दर्शनी हा प्रश्न वाटतो तेवढा उचित नाही. कारण जो शिक्षक असेल तो तत्त्वज्ञ असेलच याची खात्री नाही. पण जो तत्त्वज्ञ असतो तो मात्र शिक्षक असतोच.

राधाकृष्णन असे समजत की तत्त्वज्ञ हा दोघांचा शिक्षक असतो. प्रथमतः तो स्वतःचा शिक्षक असतो व नंतर तो दुसऱ्याचा शिक्षक असतो. त्यांच्या शिक्षण-विषयक चिंतनातील अशा एका महत्वाच्या सूत्राचा उदय या ठिकाणी होतो. त्यांच्याविषयीच्या अनेक कथा ह्या आपल्या आनंदाचा व मौजेचा विषय आहेत. पण त्यांच्या विचाराचे स्वरूप मात्र असे नाही. गंभीरपणे आपण त्यांचे विचार समजून घेण्याची गरज आहे.

आधुनिक भारत ज्या मंडळीनी घडविला त्यांच्यात दोन परंपरा स्पष्ट दिसतात. पहिली प्राचीन भारताकडे अतीव प्रेमाने, ममतेने, गौरवाने पहाणाऱ्यांची परंपरा. तिला असे वाटते की भारतीय संस्कृती ही जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे. कालमानानुसार किरकोळ तपशील आपण सुधारून घेतले तर भविष्य-काळासाठी व राष्ट्राचे भवितव्य ठरविण्यासाठी ही संस्कृती पुरेशी उज्वल आणि मार्गदर्शक आहे. तोंडाने भारतीय संस्कृतीचे हे गोडवे गात असतानांच किरकोळ तपशीलाच्या नावाने त्यांना आधिुनिक भौतिक संस्कृतीच्या सर्व बाबी क्रमाने आत्मासात करण्याची इच्छा असते.

दुसरी परंपरा नव्या जगाचा आस्थेने विचार करणारी व आधुनिक विज्ञान, शास्त्रे, मूल्ये यांचा गौरवाने विचार करणारी आहे. भारताच्या भूतकाळात गौरव करण्यासारखे असे फारसे काही या मंडळींना दिसत नाही. तरीही परिस्थितीच्या दडपणाखाली येथील परंपराचा विचार त्यांना करावाच लागतो. आधुनिक जगात प्रतिष्ठेने जगायचे असेल तर हजारो वर्षापूर्वीचा भारतीय वारसा, नव्या जगाचे तंत्रज्ञान या दोघांचा समन्वय कसा करायचा असा त्यांच्यासमोर प्रश्न असतो.

या प्रश्नाकडे एका तत्त्वज्ञाच्या भूमिकेतून डॉ. राधाकृष्णन यांनी पाहिले आहे. ते म्हणतात जगातील इतर राष्ट्रांना जसा त्यांचा स्वतःचा वारसा आहे, भारतालाही तसा स्वतःचा वारसा आहे. वारसा हा सर्वांना असणारच. या वारशाचे स्वरूप काय आहे ? बऱ्यावाईट चालीरिती, धार्मिक कर्मकांड; सामाजिक, आर्थिक परिस्थिती हा सगळा आपला वारसाच आहे. हे सगळेच आपण सांभाळणार काय ? आणि तुम्ही ज्याला नवे जग म्हणता त्यात नवे दोषही आहेत. नव्या जगाने निर्माण केलेल्या नव्या व्यथा आणि नव्या उणिवा हे ते दोन दोष आहेत. हे सगळेच नवे केवळ नवे आहे एवढ्याचसाठी आपण स्विकारणार काय ? राधाकृष्णन यांच्या मते नव्या जुन्याचा वादच बरोबर नाही. भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरेप्रमाणे त्यांनी सनातन प्रश्नांचा विचार केला आहे.

ते म्हणतात जिज्ञासा आणि चिकित्सा हे मानवी मनाचे कायम घटक आहेत. सर्वांच्याच ठिकाणी ही जिज्ञासू व चिकित्सक होण्याची क्षमता असते. पण या क्षमतेचा सार्वत्रिक वापर व उपयोग होण्यासाठी वाव नसतो. बहुतेकांची त्या क्षमतेचा वापर करण्याची इच्छा नसते. दुसरी बाब माणसात असणाऱ्या अध्यात्मिक प्रवृत्तीची आहे. या अध्यात्मिक प्रवृत्तीतून नीतीच्या सर्व कल्पना व श्रद्धा जन्माला येतात. या नैतिक कल्पनांच्यामुळे माणूस आपल्या जीवनाला अर्थ देतो. याही कल्पना जगभर आपल्याला दिसतात. एक नवा माणूस कसा घडवायचा की ज्याच्या आचरणात व मनात अध्यत्मिकता सहज धर्म म्हणून व्यक्त होत जाईल ? त्याचप्रमाणे चिकित्सा व जिज्ञासाही सहज धर्म म्हणून त्याच्या ठायी वावरेल ? चिकित्सा आणि नीती यांची पूर्ण संगती ज्याच्या जीवनात आहे असा नवा माणूस कसा निर्माण करता येईल हा खरा प्रश्न आहे.

हा माणूस निर्माण करण्यासाठी शिक्षण असावे लागते. असा माणूस निर्माण करणे व टिकणे उपयोगी ठरावे, ते शक्य व्हावे अशी समाजाची रचना व्हावी म्हणून सुधारणा असते. आपण स्वातंत्र्योत्तर काळात या दिशेने काय मिळवू शकलो असा प्रश्न डॉ. राधाकृष्णन स्वत.लाच विचारीत.

डॉ. राधाकृष्णन यांचा स्वातंत्र्य आणि लोकशाहीवर नितांत विश्वास होता. जे बलवान आहेत त्यांनीच सत्ता गाजवावी हे तर जनावरातही घडते. मग तसेच जर माणसांमध्ये सुद्धा घडले तर मग माणसात व जनावरांमध्ये फरक काय ? स्वतंत्रपणे विचार करण्याचा माझा हक्क गेला तर मग मी माणूस आहे याला काय अर्थ उरला. माणसाच्या माणूसपणाशी सुसंगत अशी रचना फक्त लोकशाहीच करू शकते असा त्यांचा विश्वास होता. पण या विश्वासाला धरून त्यांचा एक इशाराही होता. आपण माणूस तयार न करताच लोकशाही राबवण्याचा प्रयत्न करतो आहोत. तोही अशा रितीने की जे अर्धे मुर्धे माणूस आहेत त्यांनी माणसांप्रमाणे वागावे अशी अपेक्षा करीत आहोत. यामुळे स्वातंत्र्याचा अविष्कार बेजबाबदार व स्वार्थी वागणूकीत, अनिर्बंध वागणूकीत दिसू लागतो. यालाच सर्वांगिण भ्रष्टाचार असे म्हणतात. मग आपण लोकशाही रूजवणार कशी, हा त्यानी आपल्या समोर उपस्थित केलेला खरा प्रश्न आहे.

राष्ट्रपतीचे पद हे पांच वर्षाचे होते. नियमाप्रमाणे ते आले आणि गेलेही. पण डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे व्यक्तीमत्व हे तत्त्वचिंतक म्हणून मात्र आहे तसेच स्थिर राहिले. त्यांचे विचार, चिंतन व त्यातून मिळणारे मार्गदर्शन आहे तसेच स्थिर आहे. काही काही शिक्षक हे केवळ वर्गातल्याच विद्यार्थ्यांचे शिक्षक असतात.

समाजात त्यांचीच संख्या अधिक असते. यापुढे जाऊन काही काही शिक्षक मात्र आपल्या बरोबरच्या आणि अनेक भावी पिढ्यांचे ही शिक्षक असतात. हे शिक्षकपण किंवा गुरूपद त्यांच्या खोल व तत्त्वनिष्ठ, तत्त्वचिंतक व्यक्ती-मत्वामुळे निर्माण होत असते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे असे दुसऱ्या गटातील थोर आचार्य होते. त्यांच्या ऋषीतुल्य तत्त्वचिंतक तपस्वी व्यक्तीमत्वामुळे शिक्षक हे पद भूषणावह ठरले आहे. एखाद्या सामान्यच समजल्या गेलेल्या पदालाही त्यांच्या अंगभूत ज्ञाननिष्ठेमुळे, ज्ञानोपासनेमुळे व ज्ञानदानामुळे प्रतिष्ठा मिळाली आहे.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क्र. 3233
२५६६३ / १०/०४
२५/११/०८
संदर्भ शाखा

# ९/ एकाधिकारशाही

ह्या देशात लोकशाही चालू असावी आणि चालू रहावी ह्यावर ज्यांचा ज्यांचा विश्वास आहे त्या सर्वांचा हुकूमशाहीशी विरोध असणार. हुकूमशाहीचा प्रकार कोणताही असो, लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या कुठल्याही माणसाला कोणत्याही स्वरूपातील हुकूमशाहीविरुद्ध आपला आवाज उठवणे आवश्यकच असते. फॅसिझम हा हुकूमशाहीचाच एक प्रकार आहे. किंबहुना हुकूमशाहीला तात्त्विक अधिष्ठान देऊन ती अधिक भयावह करण्याचा असा हा प्रकार आहे म्हणूनच हुकूमशाहीचा निषेध होणे आवश्यक असते. आपल्या देशात फॅसिझमविरुद्ध वातावरण निर्माण करण्याचा संघटीत प्रयत्न सातत्याने होणार असेल तर ती एक स्वागतार्ह घटना म्हटली पाहिजे. आणि जेवढ्या जास्त प्रमाणात फॅसिझमविरुद्ध लोकमत संघटीत-करता येईल तेवढ्या मोठ्या प्रमाणावर ते संघटीत करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

जे रोज लोकशाहीच्या नावाने जप करतात ते लोकशाहीवादी असतीलच ह्याची खात्री नाही. दांभिकांना नेहमीच नानाविध प्रकारच्या खोटेपणाची गरज लागत असते. ही माणसे वेगवेगळ्या मान्यवर कल्पना आपल्या स्वार्थासाठी वापरण्यात वाकबगार असतात; इसापनीतीत ज्या नानाविध पशु-पक्ष्यांच्या गोष्टी आहेत त्यांत वेगवेगळ्या दांभिकांच्याही गोष्टी आहेत. अशा गोष्टीतच एक गोष्ट मैत्रीचा पुकारा करणाऱ्या लांडग्याची आहे ! असे निरनिराळे लांडगे शेळीचे कातडे पांघरून वावरत असतात. त्यांचे शब्द बाजूला सारून आपण कृतीचा शोध घेतला

तर फॅसिस्ट प्रवृत्ती अधिक नेमकेपणाने ओळखता येण्याचा संभव जास्त आहे. कारण फॅसिझम हा केवळ बाह्यात्कार नव्हे. ती प्रवृत्ती आहे. त्यामुळे मनोवृत्तीचा शोध, वर्तणुकीचा शोध अशा वेळी महत्त्वाचा ठरतो.

जनतेचे प्रश्न सोडवण्यात लोकशाहीला अपयश आले, ह्या अपयशाचे कारण भ्रष्टाचार व राजकीय नेत्यांची सत्तास्पर्धा हे होते. ज्यावेळी आपण देशात फॅसिस्ट प्रवृत्ती वाढत आहेत असे म्हणतो त्या वेळी वेगळ्या शब्दांत आपण अशी कबुली देत असतो की चालू असलेली लोकशाही जनतेचे प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरलेली आहे. ह्याचे कारण जे सत्तेत आहेत त्यांनी भ्रष्टाचाराला संरक्षण देऊन वाढवले आहे व सत्तेतल्या मंडळींना सत्ता टिकवणे ह्यापेक्षा वेगळा उद्योग राहिलेला नाही हे आहे. पुष्कळदा देशात फॅसिस्ट प्रवृत्ती क्रमाने वाढत आहेत असे गंभीरपणे लोक बोलतात, त्यांना आपण कशाची कबुली देतो आहोत ह्याचे भान राहिलेले नसते. जेव्हा चालू लोकशाही जनतेचे प्रश्न सोडवण्यात अयशस्वी होते तेव्हा जनतेने क्रांती करावी हा पहिला पर्याय उपलब्ध असतो. हितसंबंधियांनी लोकशाही हा अनावश्यक खेळ आहे असे समजून तो गुंडाळून टाकावा हा दुसरा पर्याय उपलब्ध असतो. भाषा सोडून वर्तन पाहिले म्हणजे नेमके फॅसिस्ट कोण आहेत हे समजणे सोपे जात असते.

फॅसिझमचे दोन प्रमुख शत्रू सर्वप्रसिद्ध आहेत. फॅसिझम हा संसदीय लोकशाहीचा शत्रू असतो. फॅसिस्टांचे वैशिष्ट्य सत्ता ताब्यात घेणे आणि ती हरमार्गाने ताब्यात टिकवणे ह्यात असते. विजयाची खात्री असली म्हणजे फॅसिस्ट निवडणुका घेतातच. प्रौढ मतदानावर आधारलेल्या निवडणुका घेणे ह्यात फॅसिझमच्या विरूद्ध काही नाही. मात्र ह्या निवडणुकीत आपल्याखेरीज कुणी निवडून येणार नाही ह्याची फॅसिस्ट काळजी घेतात! मुसोलिनीने इ. स. १९२२ मध्ये सत्ता ताब्यात घेतली. सत्ता हाती घेतल्यानंतर मुसोलिनीने हे जाहीर केले होते की, संसदेच्या इच्छेविरूद्ध आपण राज्य करणार नाही. म्हणून त्याने इ. स. १९२४ ला निवडणुकाही घेतल्या. हाती सत्ता आल्यानंतर व आपले सर्व विरोधक पाशवी शक्तीच्या जोरावर निष्प्रभ करून टाकल्यानंतर निवडणुका घेणे फॅसिस्टांनासुद्धा परवडते.

एकदा फॅसिस्टांच्या हाती सत्ता आली म्हणजे ती सत्ता हातातून जाऊ नये ह्यासाठी विरोधकांचे खून पाडणे, भयाचे वातावरण निर्माण करणे, पक्षांवर बंदी घालणे, माणसांना तुरुंगात लोटणे—हे सर्व उद्योग फॅसिस्ट करतात. ह्यानंतर संसदेत नेत्यांनी बोलावे आणि इतरांनी टाळ्या वाजवून स्वागत करावे, हा एकच

खळ सुरू होतो ! काही निष्प्रभ विरोधक आपल्यावर टीका करण्यासाठी संसदेत जिवंत ठेवणे फॅसिस्टांच्या सोयीचे असते. म्हणून फॅसिस्ट निवडणुका घेतात, राष्ट्राची गरज म्हणून स्वतःच्या सोयीची घटना–दुरुस्ती करतात. जनतेकडून मान्यता मिळवण्यासाठी संसदेत ठराव पास करून घेतात. असा सगळा खेळ फॅसिस्ट करतच असतात. ज्यांनी लोकशाहीचा बाह्यात्कार सांभाळला ते फॅसिस्ट नव्हते असे मानणे हा एक भ्रम ठरेल.

फॅसिस्ट निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर येतात. ते जमले नाही तर उठाव करून सत्ता ताब्यात घेतात ; उठाव फसले तर पुन्हा निवडणुका घेतात. फॅसिझम ओळखणे अवघड जाते ते ह्यामुळे ज्या वेळी आपण फॅसिझम संसदीय लोकशाहीचा शत्रू असतो असे म्हणतो त्या वेळी त्याचा नक्की अर्थ समजून घेतला पाहिजे. संसदीय लोकशाहीचे सोंग फॅसिस्ट समजत नसतात असा ह्याचा अर्थ नाही. फॅसिस्ट लोकशाहीचे शत्रू असतात ह्याचा अर्थ असा की, फॅसिस्ट हाती आलेली सत्ता कधीही सोडत नाहीत. सत्ता टिकवण्यासाठी सगळे मार्ग ते वापरतात. सोपे मार्ग परवडतात तोवर अवघड मार्ग वापरत नाहीत. गरज पडेल त्या वेळेला कोणताही मार्ग वापरतात. विरोधी पक्ष खच्ची करणे हा त्यांचा पहिला कार्यक्रम असतो ; आणि निष्प्रभ विरोधी पक्षांकडे पाहून ह्यांना जनतेची साथ नाही असे म्हणणे हा त्यांचा दुसरा कार्यक्रम असतो. फॅसिस्टसुद्धा स्वतःला जनतेचे प्रतिनिधीच मानतात.

जोपर्यंत सत्तेचे प्रलोभन दाखवून विरोधी पक्षांतील कार्यकर्ते फोडून लाचार करता येतात तोपर्यंत गोळ्या घालून मारण्याची गरज नसते. जोपर्यंत कोणत्याही पक्षाशी सोयिस्कर सोयरिकी करता येतात तोपर्यंत चिंताच नसते. जोपर्यंत जाती, धर्म व पैसा यशस्वी रीतीने हाताळता येतो, व विरोधी पक्षांत फूट पाडता येते तोपर्यंत अडचण नसते. ज्या वेळी हे मार्ग अपुरे ठरतात त्या वेळी बंदी घालून पक्ष मोडता येतात, माणसे तुरुंगात पाठवता येतात, बोलणारी सर्व तोंडे बंद करता येतात,–सगळ्याच गोष्टी करता येतात. मुर्ख फॅसिस्ट हे करताना आपली मूठ उघडी करतात ; आमच्या लोकशाहीवर विश्वास नाही असे ते सरळ सांगतात. चतुर फॅसिस्टांना आपली मूठ उघडण्याचे बंधन नसते. अतिशय मोकळे-पणाने आपण हे सगळे लोकशाहीच्या रक्षणासाठी करत आहो असे सांगणे शक्य असते कारण विरोधकांची तोंडे बंद केल्यानंतर सत्तेकडून आलेले कोणतेही विधान खोटे ठरवणेच शक्य नसते. असत्य हे सत्य म्हणून बिनधोकपणे वावरू शकेल इतकी सोय जर करता आली तर शिष्टसंमत कल्पना म्हणून परवडणारी लोकशाही सोयीनुसार वापरणे ह्याला फॅसिस्टांची हरकत नसते.

ज्या देशात संसदीय लोकशाहीचे नाव घेऊन हितसंबंध जतन करणारे लोक, राज्यकर्ते होतील तिथे जनतेचे प्रश्न सोडवण्यात संसदीय लोकशाहीला अपयश येणारच. लोकांवर निष्ठा नसणारे लोक एका भ्रमाच्या आधारे लोकनेते म्हणून सत्ताधारी होऊन बसले तर मग संसदीय लोकशाही अपयशी होणे भाग असते. आणि संसदीय लोकशाही अपयशी होऊ लागली म्हणजे त्याच हितसंबंधियांना आपले हितसंबंध टिकवण्यासाठी लोकशाही गुंडाळणे भाग असते. त्या त्या देशांत, त्या त्या परिस्थितीत सत्ता टिकवण्यासाठी किती टक्के लोक लोकशाही गुंडाळणे भाग आहे ह्याचा निर्णय फॅसिस्ट घेत असतात. खऱ्या लोकशाहीवर श्रद्धा नसणारे लोक लोकशाही मार्गाने सत्तेत आले म्हणजे फॅसिझमचा उदय होतो. कारण ही पुण्यवान मंडळी विरोधी पक्ष वाढूच देत नाहीत, पर्यायी पक्ष तयारच होऊ देत नाहीत, म्हणून संसदीय लोकशाही रुजूच देत नाहीत. आम्ही सत्तेत राहणे भागच आहे, नाही तर देशात अराजक येईल, हे सांगणे खपून जाईल अशी परिस्थिती ही माणसे निर्माण करतात. वरील विवेचनाचा दुसरा अर्थ असा आहे की, ज्यांचे हितसंबंध सांभाळावयाचे असल्यामुळे संसदीय लोकशाही अयशस्वी होते त्यांचेच हितसंबंध सांभाळता यावे म्हणून फॅसिझमचा उदय होत असतो. हे सूत्र लक्षात ठेवले म्हणजे फॅसिस्ट मंडळींना ओळखणे सोपे जाते. वॅटकिन्सनी सामाजिक शास्त्रांच्या ज्ञानकोशात फॅसिझमचे एक सूत्रच हे सांगितले आहे : सत्ता हाती घेण्याची व सर्व मार्गांनी सत्ता टिकवण्याची जीद्द म्हजे फॅसिझम ! लोकशाहीचे शत्रू हे फॅसिस्टांचे एक ठळक वैशिष्टय आहे.

फॅसिस्टांची स्वतःला समाजवादी म्हणवण्यास हरकत नसते. नाव परवडत असेल तर त्यांना तसे कोणतेही चालते. त्यांची खरी हरकत आर्थिक हितसंबंध धोक्यात आणणाऱ्या परिस्थितीला असते म्हणून फॅसिस्ट हे समाजवादाचे शत्रू असतात. तुम्ही मार्क्सचे नाव घेऊन या, द्वंद्वात्मक स्वयंगती सांगा, मात्र आर्थिक हितसंबंध धोक्यात आणू नका ! फॅसिस्टांचे अशा कम्युनिस्टांशी प्रेम जुळते ! ! पण तुम्ही कोणतेही लेबल न लावता, कोणत्याही नावाचा अगर दर्शनाचा सैद्धान्तिक आग्रह न धरता कार्यक्रमाकडे वळा, उद्योगपतीचे आणि जमीनदारांचे हितसंबंध धोक्यात येतील असा प्रयत्न करा. फॅसिस्ट तुमचे शत्रू असतात. फॅसिझम हा जनतेला न्याय आणि प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या खऱ्या समाजवादाचा शत्रू असतो. पोथ्यांची पूजा आणि मंत्राचा जप ह्याला अर्थ नसतो. पोथीचे नाव वेद, पुराण असले तरी निरर्थक असते; आणि दास कॅपिटल असले तरी पोथीचे नाव निरर्थक असते. मंत्र डायलेक्टिक्स आणि क्लास स्ट्रगल हा जरी असला तरी तो कोटी नाम-जपही निरर्थक असतो. मूळ मुद्दा साखर कारखानदाराची थैली स्वीकारून त्यांना पुरोगामी असे शिफारसपत्र द्यायचे की नाही हा असतो म्हणून

खरा प्रश्न कार्यक्रमाचा असतो. जनतेला न्याय व प्रतिष्ठा देऊन समर्थ करण्याचा असतो. फॅसिस्ट ह्या मूळ मुद्याचे शत्रू असतात.

ज्यांच्या राजवटीत सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सतत वाढत जाते, चैनीचे उत्पादन कमी आणि गरजेचे उत्पादन जास्त असा प्रकार होतो व ज्यांच्या हाती संपत्ती गोळा झाली आहे अशी मंडळी क्रमाने गरीब होत जाताना दिसतात, बेकारी कमी होते आणि जनतेचे खरे उत्पन्न वाढत जाते, त्या राजवटींना नाव कोणतेहीं असले तरी त्या समाजवादी राजवटी आहेत असे आपण ओळखायला पाहिजे आणि ज्यांच्या राजवटीत प्रथम शंभर टक्के महागाई वाढते व नंतर पन्नास टक्के पगार वाढतो अशा प्रकारे पगारवाढ करुनसुद्धा खऱ्या उत्पन्नात पंचवीस टक्के घटच होत असते, हा उद्योग करणाऱ्या राजवटी आपण समजून घेतले पाहिजे की, ह्या राजवटी केवळ सोंग म्हणून समाजवादाचा जप करत आहेत.

फॅसिझम हा लोकशाही आणि समाजवादाचा शत्रू असतो. हे निर्विवाद सत्य आहे; पण फॅसिस्ट मंडळी आपण फॅसिस्ट आहोत, हे जाहीररीतीने कबूल करतीलच ह्याची खात्री नाही. त्यांनी जाहीर रीतीने आपण फॅसिस्ट आहोत हे कबूल करावे ही अपेक्षा म्हणजे चोरांनी परवानेधारक बनण्यासाठी अर्ज करावा ह्यासारखीच भ्रामक अपेक्षा नाही काय ? फॅसिझमचे एक ठळक वैशिष्टय़ असत्य हे आहे. म्हणून फॅसिस्ट मंडळी लोकशाही समाजवादाचा नामजप करण्याचा धोका आहे, म्हणून आपण घोषणांच्या आधारे फसणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. असत्याचा प्रचार करणारे लोक अमुकच थापा मारतील अशी खात्री नाही. सत्ता टिकवण्यासाठी पक्षाचे दोन तुकडे ज्यांनी केले त्यांचा निःस्वार्थपणा समजावून सांगणाऱ्या कुजबुजी वेगाने चालू असतात; आणि ज्यांचा अर्धा जन्म स्वातंत्र्य मिळवण्यात गेला, आणि उरलेला जन्म सत्तेपासून दूर राहण्यात गेला त्यांच्याही-विषयी अशी कुजबुज सुरू होते की ह्यांना विदेशी पैसा मिळत असला पाहिजे ! कुजबुज आणि अफवा ह्यावर फॅसिझमची फार मोठी भिस्त असते, ज्यांना लाजच उरलेली नसते अशा मंडळींनी परंपरेने परक्या राष्ट्रांकडे पाहून आपली धोरण आखावी व मधूनमधून आमच्या विरोधकांना परराष्ट्राची मदत मिळते असा आक्रोश करावा ही बाब उद्वेगाची आहे. पण राजकारणाच्या वक्र गतीला नीती नियम परवडत नाहीत. सत्ता मग इंग्रजांची असो अगर भारतीयांची. सत्ताधाऱ्यांना गांधीजयप्रकाश परवडतच नसतो. ज्यांना सत्तेचा वारसा मिळतो त्यांना त्यागाचा वारसा परवडणारच नाही !

फॅसिझमचे काही ठरलेले आडाखे असतात. लोकशाही असफल होऊ

लागली म्हणजे बेकारी वाढते, भ्रष्टाचार वाढतो, महागाई वाढते, आणि लोक त्रस्त होऊन जातात. जिकडे तिकडे एक हलकल्लोळ आणि चीड उसळलेली असते. निदान प्रथमदर्शनी तरी अराजक माजल्याचे दिसते. अशा पार्श्वभूमिवर फॅसिझमचा अवतार होत असतो. फॅसिझमचे काही आग्रहाचे मुद्दे असतात. पहिला आग्रहाचा मुद्दा हा की, आम्ही शांतता आणि व्यवस्था निर्माण करू. दुसरा मुद्दा असा की चोर. काळा बाजारवाले ह्यांच्याविरुद्ध आघाडी उघडून आम्ही भ्रष्टाचार कमी करू आणि तीन ह्यापुढे लौकरच आम्ही उत्पादन वाढवून दारिद्र्य कमी करणार आहोत, बेकारी संपवणार आहोत. शांतता. स्वस्ताई, भ्रष्टाचारविरोधी मोहीम. ह्या आजच्या नगदी तीन, आणि दारिद्र्यनाश व बेकारीनाश अशा उद्याच्या उधार दोन, ह्या पाच फॅसिस्टांच्या हुकमी घोषणा असतात.

फॅसिझम कधी शांतता निर्माण करत नाहीं, बोलणाऱ्यांची तोंडे शिवून लिहिणाऱ्यांचे हात बांधून आणि छातीवर बंदूक रोखून जेव्हा सर्वांना गप्प केले जाते त्याला शांती म्हणत नसून भीती म्हणतात! फॅसिस्टांना सत्याची कदर करण्याचे कारण काय? फॅसिझम कधी महागाई कमी करू शकत नाही. तो वस्तूचे भाव कमी करील. वस्तूचे भाव वाढवताना व पगारही वाढताना दारिद्र्य कसे वाढते हे सर्व-प्रसिद्ध आहे. वस्तूचे भाव कमी कमी करून दारिद्र्य वाढवण्याच्या काही स्वतंत्र योजना आहेत! महागाई कमी करण्याचा मार्ग उत्पादनात जनतेचा वाटा वाढवणे, संपत्तींत जनतेचा वाटा वाढवणे हा असतो. फॅसिझमला भांडवलशाहीचे रक्षण करायचे असते. म्हणून महागाई कमी करता येत नाही. बेकारी मात्र फॅसिझम मोठ्या प्रमाणात कमी करू शकतो सर्वांनाच आपल्या सोयीनुसार गुलाम म्हणून वापरायचे ठरल्यानंतर बेकारी ह्या शब्दाला अर्थ नसतो. गुलामांना बेकार म्हणण्यात अर्थ नाही. लायकीनुसार उचित काम आणि कामानुसार उचित पगार, ह्या सूत्राच्या संदर्भात बेकारी ह्या शब्दाला अर्थ असतो. सर्वांनाच गुलाम करून वेठीला धरले म्हणजे जनतेचे शोषण वाढते. ह्यालाच फॅसिस्ट बेकारी कमी झाली असे म्हणतात. आणि जी दोन उद्याची आश्वासने आहेत त्यांबाबत तर सत्तेला प्रश्न विचारण्याची सोयच नाही कारण फॅसिझमला टाळ्या वाजवणारे हातच हवे असतात. शंका घेणारी मूठभर डोकी केव्हाही समाजात अल्पसंख्यच असतात. ह्या अल्पसंख्येने बहुसंख्येच्या प्रतिनिधी असणाऱ्या शासनाला त्रास द्यावा हे फॅसिस्टांना पटत नाही. म्हणून फॅसिस्ट हाताच्या पाच बोटांप्रमाणे पाच घोषणा नाचवत असतात. ह्या पाच घोषणा एकत्र जमल्या, जनतेच्या अवस्थेत काही बदल होत नसला म्हणजे तिथे ठळक खूण अशी समजावी की, पाच बोटे एकत्र येऊन त्यांनी आपली सलामी दिलेली आहे. अशा रीतीच्या वळलेल्या मुठी फॅसिझमची खात्रीलायक खूण असतात.

जनतेला एक नेता लागतो. प्रत्येक देशात ह्या नेत्याला वेगळे नाव असते. पण वेगळे असले तरी नेता असतोच. ह्या नेत्यावर सारखे विश्वासाचे ठराव पास होत असतात. जनतेचा प्रतिनिधी पक्ष असतो. पक्षाचा प्रतिनिधी नेता असतो, आणि नेता हाच राष्ट्र असतो! लोकांनी अविश्वास व्यक्त केला तर नेता सत्ता सोडत नाही, खरे म्हणजे तो अविश्वास व्यक्त करण्यासाठी एकत्र जमण्यापूर्वीच. विरोधकांची वासलात लावतो. जनतेला जनतेवर अविश्वास व्यक्त करण्याचा हक्क नसतोच! म्हणून नेत्यावर विश्वास व्यक्त करणे ह्या शिवाय दुसरे काही करणे शक्य नसते. तरीही वेळोवेळी सर्वांनी नेत्यावर विश्वास व्यक्त करावा अशी फॅसिझममध्ये प्रथा आहे. आमचा एकमेव नेता, आमचा अलौकिक नेता – फक्त तोच एक राष्ट्र तारू शकतो, तो म्हणजे राष्ट्र, अशी सगळी वाक्ये ठरलेली असतात. किंबहुना 'गेल्या हजार वर्षांतील आमचा सर्वश्रेष्ठ नेता' हे बिरुद कायम राहते आणि दर दहा वर्षाला बिरुदधारी मात्र बदलतो. तरी सुद्धा हे सगळे करायचे असते. जनतेच्या नावे हे सगळे चाललेले असल्यामुळे नाममात्र सुधारणांचे कार्यक्रय चालू असतात; हे कार्यक्रम यशस्वी झाल्याच्या घोषणाही चालू राहतात. जर्मनीसारख्या सहा–सात कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात तीन–साडेतीन कोटी मतदान होते. हिटलरला मिळालेली सव्वा कोटी मते ही बहुसंख्या नव्हे, तरी हे सव्वाकोट काही भांडवलदार नव्हते. ह्या श्रद्धावान अनुयायांच्या ताकदीवर हिटलर उभा असतो. म्हणून फॅसिझमला दास्याचे व दारिद्र्याचे जतन करून मालक व धनवान ह्याच्या संरक्षणार्थ प्राणपणाने लढणारी दासांची एक निष्ठावंत सेना हवी असते. कैद्यांनी बेड्यांच्या संरक्षणार्थ प्राणपणाने लढावे अशी प्रेरणा त्यांच्या मनात निर्माण करण्यात फॅसिझमचे खरे यश असते.

ह्यासाठी फॅसिझमला तत्त्वज्ञान लागते. ते तत्त्वज्ञान जितके धूसर व अंधुक असेल आणि जितके आकर्षक असेल तितके चांगले. परंपरावादी मनाला सर्वात आकर्षक परंपरा असतात. म्हणूनच फॅसिझम परंपरा, धर्म, राष्ट्र, पंथ ह्यांच्या वैभवाची गीते गात असतो. फॅसिझमला धर्मगुरु आणि साधुसंत आपल्या पाठिंब्यासाठी हवे असतात. म्हणून हुकूमशहांना ते धार्मिक नसूनही धर्माचा वापर सोयीचा असतो. फॅसिस्ट कधी संत नसतात, पण आपल्या काळातील साधु–संतांचे आशिर्वाद मिळवण्यात फॅसिस्टांना यश येत असते. जसे राज्यकर्ते धार्मिक नसतात तसे धर्मगुरूही नसतात. त्यांनाही आपापल्या इस्टेटची संरक्षण करण्याचे हमी देणारे हवेच असतात. चतुर साधुसंतांनासुद्धा आपला आशिर्वाद घेणारी सत्ता हवीच असते. म्हणून फॅसिझम एकजात, परंपरा. राष्ट्र, वैभव ह्या सगळ्यांच्या घोषणा करीत असतो. असल्या प्रकारचे आधार फॅसिझमला लागतातच. कारण कोणते तरी भ्रम पक्केपणी मनात रुजवल्या शिवाय आत्महत्त्या करणारे पिसाट

श्रद्धाळू मन जन्माला घालता येत नाही. शद्धीवर असणारी माणसे गुलामगिरी संपवून स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करणारच.

फॅसिस्टांना धर्म, परंपरा, संस्कृती, राष्ट्र ह्यांच्याविषयी प्रेम नसते. गुंगी आणण्यासाठी ही मादक द्रव्ये चांगली आहेत, इतकाच त्यांचा मुद्दा असतो. पण जर एखाद्या राष्ट्रात नशा चढण्यासाठी ही द्रव्ये उपयोगी नसली तर फॅसिस्टांच्यासाठी धर्म महत्त्वाचा नसून नशा महत्वाची आहे ! आणि जर धर्मामुळे नशा येत नसेल तर मग फॅसिस्ट त्या त्या समाजात नशा आणणारी द्रव्ये कोणती ह्याचा शोध घेतील. मुद्दा जनतेला भ्रमात ठेवून नशा व गुंगी आणणे हा असतो. जे नशेला उपयोगी ते फॅसिस्टांना उपयोगी. ह्यामुळे धर्म व परंपरांचे नाव न घेताही फॅसिस्टांना नवी चलनी नाणी वापरता येतातच. घोड्याला चार पाय असतात हे खरे आहे. धर्म, राष्ट्र, परंपरा ह्यांचा वापर फॅसिस्ट करतात हेही खरे आहे. पण चार पाय असणारा घोडाच असतो हे खरे नाही. म्हणून धर्माचे नाव न घेणारे फॅसिस्ट नसतातच ह्या भ्रमात कुणी राहू नये.

फॅसिझम हे एक आक्रमक तत्त्वज्ञान आहे. इतरांच्यावर गुलामगिरी लादणे हे फॅसिझमचे ठळक वैशिष्ट्य आहे. इटलीने ॲबिसिनीयावर गुलामगिरी लादली, जर्मनीने ऑस्ट्रिया-पोलंडवर गुलामगिरी लादली, जपानने कोरिया-मांचुरिया येथे गुलामगिरी लादली पण काही फॅसिस्ट इतके महत्त्वाकांक्षी नसतात. आपल्याच देशाच्या आत आपल्याच प्रजेवर गुलामगिरी लादणे एवढीच त्यांची महत्त्वकांक्षा असते. स्वतःच्या चतुःसीमेबाहेर ते शांततावादी राहायला तयार असतात. कारण आपली जनता नुसती गुलाम करणे फॅसिझमला पुरत नाही. कोणत्यातरी ध्येयवादाने लोक भारले जावे लागतात. असा भारून टाकणारा ध्येयवाद नसला तर फॅसिस्ट मंडळी उरलेल्यांच्या वाट्याला जात नाहीत, ती आपल्याच सीमेत गप्प बसतात. इतरांच्यावर गुलामगिरी लादणे हे फॅसिझमचे कायम वैशिष्ट्य आहे, पण हे इतर म्हणजे परराष्ट्रीयच असले पाहिजेत अशी काही शर्त नाही. स्वदेशबांधव जरी गुलाम करता आले तरी काही फॅसिस्टांना तितके यश पुरे वाटते.

◇ ◇ ◇

# १०/ जातीयवाद

लोकहितवादी आणि म. फुले यांचे कार्य आरंभ होऊन आता सुमारे सव्वाशे वर्षे होत आलेली आहेत. या सव्वाशे वर्षात लहानमोठ्या अनेक समाजसुधारकांनी मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने समाज परिवर्तनाचे कार्य आपापल्या शक्तीनुसार केले. या सव्वाशे वर्षाच्या प्रदीर्घ झगड्यानंतर समाज किती बदलला आहे असे आपण पाहू लागलो म्हणजे निराशा वाटू लागते. समाजात बदल व्हावा ही उत्कट इच्छा आणि वेगाने बदल होत नाही ही वस्तुस्थिती या दोनकडे पाहिले म्हणजे मग हा समाज बदलेल तरी कसा? असा प्रश्न मनात निर्माण होऊ लागतो. आता या प्रश्नाचे उत्तर द्यावे तरी कसे, हा माझ्यासारख्याच्यासमोर अडचणीचा प्रश्न आहे. आपण दिलेले उत्तर समाज निरपवादपणे मान्य करणार नाही ही खरी अडचण नाही. एखाद्या नव्या धर्माचा प्रेषितच आपली मते निरपवादपणे सर्वांनी मान्य करावीत अशी अपेक्षा ठेवू शकतो. आपण असे प्रेषित असल्याचा माझा दावा नाही. अडचण असेल तर ती या ठिकाणी आहे की, माझे विचार तपासून पाहिले जाण्याच्या ऐवजी अशा रीतीने विचार मांडण्याच्या मागे असणाऱ्या हेतूंचा शोध लोक घेऊ लागतात. एखादा विचारवंत हा राजकीय नेत्यांच्याप्रमाणे सोयीने विचार मांडीत नसतो तो स्वतःला जाणवणारे सत्य-स्पष्टपणे प्रकट करीत असतो. इतकेही जर किमान मान्य नसेल तर मग कोणत्याही विचारवंताची आपले विचार मांडतांना अडचणच होणार आहे

या प्रश्नाकडे आपण दोन भिन्न बाजूनी पाहू शकतो. सव्वाशे वर्षांच्या प्रयत्नानंतरसुद्धा जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता पुरेशा प्रमाणात ढासळलेल्या, दुबळ्या झालेल्या दिसत नाहीत. जे त्यांचे सामर्थ्य अजूनही शिल्लक आहे, ते पुरेसे महत्त्वाचे आणि चिंता करण्याजोगे आहे, या घटनेकडे आपण दोन बाजूंनी पाहू शकतो. एक बाजू सुधारकांची आहे. विशेष करून कर्त्या सुधारकांची बाजू, म्हणजे फुल्यांची बाजू आहे. ज्या काळात म. फुले यांनी आपल्या कार्याला आरंभ केला त्या काळात आजच्या मानाने अस्पृश्यता व जातीयवाद अधिक बळकट होता. आज अस्पृश्यता व्यवहारात फार जरी उणावली नसली तरी किंचित का होईना उणावलेली आहेच. पण ज्या वेळेला अजून या जुनाट बुरजाचा पहिला टवकाही महाराष्ट्रात निघालेला नव्हता, त्या काळात कर्त्या सुधारकांच्या फळीने अस्पृश्यता हा सामाजिक गुन्हा मानला. तो नष्ट करता येणे शक्य आहे असे मानले. त्यादृष्टीने प्रयत्नांना आरंभ झाला. सुधारकांच्या फळीला अस्पृश्यता नष्ट करता येणे शक्य आहे, ती नष्ट करणे आवश्यक आहे, असे प्रथम गृहित धरावे लागते. आणि नंतर ती लवकर नष्ट होत नसेल तर काय करावे, याचा विचार करून अधिक प्रखर हल्ल्याची तयारी करावी लागते.

पण या प्रश्नाला अजून एक दुसरी बाजू आहे. ही बाजू सनातन्यांची आहे, सनातन्यांनी असे मानले की, जातीव्यवस्था स्वाभाविक असल्यामुळे व अस्पृश्यता तिचा भाग असल्यामुळे ती तोडता येणे शक्य नाही. सव्वाशे वर्षांचा सर्व खटाटोप झाल्यानंतरही जर अस्पृश्यता आणि जातीव्यवस्था बळकटपणे टिकून असेल तर ती मोडता येणे शक्य नाही हाच याचा अर्थ नाही काय ? असे या गटाला वाटत असते, जातीव्यवस्था मोडता येणे शक्यच नसल्यामुळे तिच्याविरुद्ध झालेला सव्वाशे वर्षांचा प्रयत्न वाया गेलेला आहे. म्हणून ती मोडण्याचा नाद याहीपुढे यशस्वी होण्याचा संभव नाही असे समजून हा खटाटोप आता सोडून दिला पाहिजे, असे या गटाला मनातून वाटते. जाहीरपणे वा स्पष्टपणे लोक बोलतील अगर बोलणार नाहीत. हा ज्याच्या त्याच्या सोयीचा हा भाग आहे. जेव्हा आपण असे म्हणतो की, भगवान बुद्धापासून गेली अडीच हजार वर्षे जातीव्यवस्था मोडण्याचे प्रयत्न सातत्याने चालू आहेत, त्यावेळी या गटातील माणसे मिस्किलपणे मनातल्या मनात असे म्हणतात की अडीच हजार वर्षांच्या प्रयत्नानंतरसुद्धा जाती मोडत नाहीत, हा खरे म्हणजे जाती स्वाभाविक आहेत व न मोडणाऱ्या आहेत ह्याचा हा पुरावाच होय. सनातनी गटाची ही भूमिका जाती मोडणाऱ्यांची नाही. सबब अस्पृश्यता टाळता येणार नाही या गृहितकृत्यापासून आरंभ होतो.

जर हे जातीव्यवस्थेचे समर्थन वरिष्ठ वर्णियांच्याच मनात असते

तर मग त्याच्याबाबत फारशी चिंता करण्याचे कारण नव्हते. दुःखाची गोष्ट असेल तर ती ही आहे कीं, ही भूमिका दलित जातींच्याच काही नेत्यांच्या मनात क्रमाने बद्धमूल होतांना दिसत आहे. दलित समाजाचे कांही नेते आता असे म्हणू लागले आहेत की जातीव्यवस्था मोडणे शक्य नाही, हे आता आपण समजून घेतले पाहिजे. ज्या ख्रिस्ती धर्मात मुळात जातीव्यवस्था नाहीच आणि ज्या ख्रिस्ती समाजात आधुनिकीकरण, औद्योगिकरण प्रचंड प्रमाणात झालेले आहे तिथेही-अमेरिकेत-जर अजूनही निग्रो समाज गोऱ्या लोकांच्यामध्ये आत्मसात होऊ शकत नसेल तर मग भारतासारख्या औद्योगिक दृष्टचा मागासलेल्या दरिद्री समाजात, धर्मात जातीव्यवस्था असल्यास अस्पृश्यतेचा प्रश्न आजउद्या सुटेल ही आशा करणेच चूक आहे. या समाजात अस्पृश्य कधीच सामावले जाऊ शकणार नाहीत, त्यांला स्वतः साठी वेगळे राष्ट्र वेगळी भूमि प्राप्त करून घेणे भाग आहे. दलित समाजापैकी काही मान्यवर सुशिक्षितांनी ही भूमिका मांडलेली आहे. तिचे पडसाद दलितांच्यासाठी वेगळी विद्यापीठे, त्यांच्यासाठी वेगळे गांवें या पद्धतीने उमटत असतात. दलितांनी ही भूमिका घेतलेली असली तरी ही भूमिका हिंदूची भूमिका आहे इतकेच म्हणावयाचे आहे.

या प्रश्नाकडे पाहण्याच्या या दोन बाजू मूलभूत महत्त्वाच्या आहेत, हा प्रश्न सुटू शकेल आणि सुटला पाहिजे असा आग्रह धरणारे लोक जातींच्या जाणिवा दुबळ्या कशा करता यातील याचे प्रयत्न करीत असतात. ते जातीनिष्ठ संघटनेचा विरोध करतात, जातीनिष्ठ विचारांचा विरोध करतात; अनेक जातींची माणसे एकत्र आणण्याचा प्रयत्न करतात. गेल्या सव्वाशे वर्षात झालेले बदल ते स्वागतार्ह मानतात. आणि यापुढचे टाळण्यासाठी काय करावे याचा विचार करतात. हा विचार वेगवेगळ्या प्रकारचा असू शकतो.

दुसऱ्या बाजूने पाहणारे अट्टाहासाने जातींच्या उणिवा बळकट करतात, जातवार संघटना बळकट करण्याचा प्रयत्न करतात. इतर समाजाने दाखवलेला उदारपणा आणि समंजसपणा आता दंभ म्हणून अव्हेरिला जातो, दोन गट एकत्र येऊ नयेत याची काळजी घेतली जाते. कारण मुळात हेतू मिसळून जाऊन भेद नष्ट करावेत हा नसतोच. मिसळून जाणे, एकत्र येणे अशक्य आहे हे गृहित धरून केव्हा तरी उद्या फुटून वेगळे निघायचे आहे याची पूर्वतयारी तेवढी चालू राहते. आजच्या सामाजिक विचारमंथनात या दोन्हीं पद्धतीच्या लाटा सारख्या एकमेकांवर आदळत आहेत. विशेष करून जातीभेद मिटणारच नाहीत, अस्पृश्यता संपणारच नाही या गृहितकृत्यावर आधारलेल्या चळवळी हा प्रश्न सोडवण्यासाठी लागणारे सारे वातावरण नष्ट करून टाकीत आहेत असे दिसते.

माझे आक्षेप या किंवा त्या माणसावर नसून विचार करण्याच्या पद्धतीवर आहेत. आपण एकीकडे जे कधी घडलेच नाही ते घडले आहे असे गृहित धरतो. जे घडणे अपरिहार्य आहे ते घडलेले दिसले म्हणजे दुःख व्यक्त करतो. आणि दुसरीकडे वेगवेगळ्या सामाजिक हालचालींचे अनुबंध सतत नाकारीत राहतो. याही नंतर हा समाज बदलेल कसा या प्रश्नाचा विचार आपण करीतच राहतो. माझी स्वतःची भूमिका याबाबतीत स्पष्ट आहे, मी सामाजिक परिवर्तन घडणे शक्य आहे, इष्ट आहे असे मानतो व त्या दृष्टीने विचार करतो. त्यामुळे ज्या मंडळींना परिवर्तन शक्यच वाटत नाही त्या मंडळींच्या चिंतनाशी मला सहमत होता येणे शक्य नाही, या देशात फुटून निघण्याच्या कोणत्याच चळवळीला सुखासुखी यश येईल असे वाटत नाही. अल्पसंख्यांकांच्या अशा चळवळीत यश येण्याची कोणतीही शक्यता मला दिसत नाही. फक्त अशा धडपडीतून कटुता तेवढी वाढते.

जे कधी घडलेच नाही ते घडले आहे असे आपण मानतो, या विधानाचा अर्थ असा आहे की समाज परिवर्तनाची चळवळ आपल्या देशात बलवान कधीच नव्हती. ती बलवान होती असे आपण उगीच गृहित धरतो. इथे जनतेची चळवळ नव्हतीच. जातीव्यवस्था अनाहूतपणे दृढ करणारी राजकीय यंत्रणा अस्तित्वात आली, असे असूनही स्वतंत्र भारतात काही महत्त्वाच्या बाबी घडलेल्या आहेत. त्या तशा घडल्या हेच खरे म्हणजे आश्चर्य आहे. राजा राममोहन राय. म. फुले, यांच्यापासून पुढच्या सर्व समाज सुधारकांना विशेषतः गांधी नेहरूंना जर यश आले असेल तर ते हे आहे की त्यांनी अस्पृश्यता नष्ट करणारे संविधान भारतीयांकडून संमत करुन घेतले, कायद्याने त्यांनी समान हक्क दिले. विकासात त्यांचा अग्रहक्क मान्य करण्यात आला. त्यांना प्रतिष्ठा मिळावी यासाठी संरक्षण दिले आणि अशा प्रकारे जनतेला विशेषतः बहुसंख्यांक अशिक्षित जनतेला मनातून न पटणारे संविधान केवळ स्वीकारले नाही तर या देशात राबवून दाखविले. या संविधानाच्या चौकटीत जे राजकारण निर्माण झाले त्याचे प्रमुख स्वरूप असे आहे की, एकही महत्त्वाचा राजकीय पक्ष जाहीरपणे या रचनेवर आक्षेप घेत नाही. निदान तोंडी या संविधानाला पाठिंबा देतो. या घटनेचे महत्त्व मी मानतो. सामाजिक परिवर्तनात शिल्लक राहिलेला डोंगर विचारात घेतला तरीही त्यामुळे जे घडले आहे त्यांचे महत्त्व मी नाकारीत नाही.

या संविधानाचे सर्व समाजावर प्रमुख तीन परिणाम झालेले दिसतात. एक म्हणजे सनातन्यांना पाठिंबा देणारा एकही भारतव्यापी पक्ष आता शिल्लक दिसत नाही. त्यामुळे सनातन्यांना व परंपरावाद्यांना राजकारणाचा जाहीर पाठिंबा कधी मिळू शकत नाही. दुसरे म्हणजे सर्व परंपरावाद संविधानाच्या विरोधी

जातो कायद्याच्या व शासकीय धोरणाच्या विरुद्ध जातो. म्हणून परंपरावाद्यांना नेहमी बचावाचा पवित्रा घ्यावा लागतो. त्यांना कधीच आक्रमक भूमिका घेता येत नाही. तिसरे म्हणजे दलित वर्गातून सुशिक्षित वकील, डॉक्टर्स, इंजिनियर. शासकीय अधिकारी, मंत्री, लेखक असा वर्ग क्रमाने पुढे येत आहे. तो आपल्या समाजाचा आत्मविश्वास तर वाढवतोच पण इतर समाजाचा दृष्टीकोण बदलणे-ही भाग पाडतो. ग्रेस आणि सुर्वेसारखे कवी सर्व जातीच्या निष्ठा छेदून समाजाचे लाडके होतात. या घटनांचे महत्त्व मी कमी लेखीत नाही. जे या पंचवीस वर्षात घडले आहे ते अगदीच नगण्य नाही. जो फक्त अन्यायच सहन करीत होता त्या वर्गाच्या ठिकाणी राजकीय सौदा करावयाची शक्ती निर्माण होते ही घटना दूरवर परिणाम करणारी असते, असे मी मानतो. म्हणून माझ्यासमोर प्रश्नाचे जे स्वरूप आहे ते गेल्या पंचवीस वर्षात कांहीच घडले नाही असे नाही तर कांहीही तयारी नसतांना पूर्व तयारीच्या मानाने खूपच घडले आहे असे आहे. आणि मग नंतरचा प्रश्न, जे घडले आहे त्याचे महत्त्व न नाकारता अजून जे घडायचे राहिले आहे ते अफाट आहे याचे भान ठेवून तिकडे कसे जायचे हा ठरतो. मी विचार करीत असेन तर तो या प्रश्नाचा आहे.

या ठिकाणी अनुबंधांचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. हा अनुबंध म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, समाजरचना, अर्थरचना आणि राजकारण यांचा परस्परांशी संबंध असतो. हे तिन्ही एकमेकांच्या हातात हात घालून चालतात. ते थोडेही एकमेकांच्या मागेपुढे जाऊ शकत नाहीत असेही मला म्हणायचे नाही. या तीन बाजूंच्या पैकी अर्थकारण हीच एकमेव आणि मूलभूत बाब आहे असाही आग्रह या क्षणी धरायचा नाही. पण सगळे आग्रह सोडून दिले तरी या तीन घटकांचा एकमेकांवर परिणाम होतो ही गोष्ट मला मान्यच करणे भाग आहे. भारतातील हिंदू–मुसलमानांच्या मधील तणाव शिल्लक राहील. आणि हिंदुच्या-मधील जातिनिष्ठा विस्कळीतपणा पार संपून जाऊन हिंदू समाज एकजीव होईल ही आशा करण्यांत अर्थ नाही. कांही राजकारण्यांचा असा विश्वास आहे की, इतर कोणतेही काम न करता फक्त मुस्लिम विरोधाच्या जोरावर हिंदू समाज एकत्र करता येईल. याउलट काही जणांना असे वाटते की, हिंदूच्यामधील जातीभेद मोडण्याचे काम हे अगदी स्वतंत्र काम आहे, त्यांचा हिंदू–मुस्लिम तणावशी कांही संबंध नाही. सत्य असे आहे की. हिंदू–मुसलमान सवर्ण–असवर्ण आणि सर्वणाच्यामधील विविध जातीभेद हे सगळे व एका परंपरावादी मनोवृत्तीचे भाग आहेत. ही परंपरावादी मनोवृत्ती बदलण्याचे काम विचारांच्या पातळीवर कांही प्रमाणांवर करता येईल, पण संपूर्णपणे करता येणार नाही त्यासाठी

समाजाची अर्थरचनाच बदलावी लागेल. सर्व समाजाचे आधुनिक औद्योगिक समाजात प्रयत्नपूर्वक रूपांतर करावे लागेल.

समाजपरिवर्तनाच्या या कार्यात राजकारणाचे महत्त्व आद्य असते. कारण शेवटी अर्थरचना बदलण्याचे काम राजकारणाला करावे लागणार आहे आणि या ठिकाणी आपण एका दुष्टचक्रात सापडतो. विशिष्ट मर्यादेत समाज बदलल्याशिवाय राजकारण बदलणार नाही. राजकारणात सुधारणा झाल्याशिवाय अर्थकारण बदलणार नाही, त्याशिवाय समाज बदलणार नाही. असे हे चक्र आहे. हे दुष्टचक्र सोयींचे आहे. आपण कुणीच राजकीय नेते मंत्री आदी नसल्यामुळे सगळा दोष राजकारणाच्या डोक्यावर टाकणे सोपे व सोयीचे होऊन जाते. पण सगळ्या सामाजिक प्रश्नांच्याबाबत अशी चक्रे असतातच. ही चक्रे अंशतः खोटी असतात. राजकारण बदलल्याशिवाय कांहीच शक्य नाही ही प्रामुख्याने नाकर्तेपणाची भूमिका आहे. राजसत्ता आपल्या हाती नसतांनाच अनेक भूमिकांचे आरंभ करावे लागतात आग्रह धरावे लागतात. आजच्या परिस्थितीतील अशा सार्वत्रिक आग्रहाच्या जागा कोणत्या आहेत, याचा आपण विचार केला पाहिजे. त्यांच्यावर जाणीवपूर्वक आग्रह धरला पाहिजे. हा आग्रह अंमलबजावणीचा आहे. निरनिराळ्या आग्रहांच्या अंमलबजावणीतूनच शेवटी पुढे जाऊ शकू असे मला वाटते.

ही अंमलबजावणी करतांना इतर कांही नसले तरी असेल त्या कायद्याचे पालन आणि संविधानातील ध्येयांच्या आग्रही पुरस्कार आपण करू शकतो काय? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. उदाहरणार्थ, अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा आहे, हे माहीत असूनही धार्मिक व्यासपीठावर अस्पृश्यतेचा पुरस्कार होतो व त्याकडे दुर्लक्ष करून नियतकालिके या व्यक्तीचे समर्थनही करतात. अस्पृश्यतेच्या पुरस्काराला जणू तो विचार स्वातंत्र्याचा भाग आहे असे समजण्याची जबाबदारी अनेकजण अंगावर घेतात. पुरीचे शंकराचार्य याबाबत प्रसिद्ध आहेत, त्यांच्या महाराष्ट्रातील यात्रेत घडलेले प्रसंगही प्रसिद्ध आहेत. कोणते तरी निमित्त काढून चातुवर्ण्याचे शास्त्रीय समर्थन करणारे लोक आहेत. त्यांच्या युक्तिवादाचे एक विचार म्हणून समर्थन करणारी मंडळी आहेत. लोकमत हळूहळू बदलेल हा या मंडळीचा कायमचा मुद्दा असतो. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा आहे. हा कायदा करूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. कायदे आहेत, पण अंमलबजावणी नाही असे हे एकच क्षेत्र नाही. गृहनिर्माण मंडळ घरे बांधण्यांसाठी कर्ज देते, या सहकारी मंडळात विविध जातिधर्माचे लोक असावेत. दहा टक्के जागा अस्पृश्यांना मिळाव्यात असा कायदा आहे पण त्याची अंमलबजावणी नाही शैक्षणिक सवलतींच्यामुळे अस्पश्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढते आहे.

ही चांगली घटना आहे. पण त्याबरोबरच सुशिक्षीत बेकारांचेही प्रमाण वाढते. नोकऱ्यांच्यामध्ये त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत. त्याचा फारसा लाभ या समाजाला झालेला दिसत नाही. अजून सरकारी चाळींच्यामधूनसुद्धा निरपवादपणे मिश्रवस्त्यांचे धोरण कार्यान्वित झालेले नाही. असलेला एकही कायदा चोखपणे अंमलात येऊ द्यायचा नाही हीच जेथे प्रवृत्ती आहे, तिथे नवे कायदे सुचविणे निरुपयोगी असते. असलेल्याच कायद्यांच्या सार्वत्रिक आणि निरपववाद अंमलबजावणीवर आपण आग्रह धरू शकतो काय? हां महत्त्वाचा प्रश्न आहे.

भारतीय संविधानाने समान नागरी कायदा हे आपले ध्येय पुरस्कारिलेले आहे. या समान नागरी कायद्याच्याबरोबर एकराष्ट्रीय कार्यक्रम म्हणून कुटुंबनि-योजनाचाही समावेश आहे. मुस्लिम समाजाचे मन दुखवायचे नाही म्हणून स्पष्ट शब्दात समान नागरी कायद्याला कुणी पाठिंबा देत नाही. समाजवाद्यांनी समान नागरी कायद्याचा पुरस्कार करणारा ठराव मान्य केलेला आहे. पण तो त्यांचा आग्रहाचा मुद्दा होऊ शकला नाही. काँग्रेसेतर मुस्लिम समाजाची मागणी येईपर्यंत आपण हे कार्य करणार नाही असे आश्वासन दिलेले आहे. कम्युनिस्टांच्यासाठी हे सगळे प्रश्न क्रांतीनंतरचे आहेत. त्यामुळे ते या मुद्यांवर बोलण्यास तयार नाहीत असलेल्या कायद्याची अंमलबजावणी नाही, संविधानातील ध्येयाचा आग्रही पुरस्कार नाही, अशा वातावरणात नवे कार्यक्रम सुचविण्यात अर्थ नसतो. म्हणून माझा कार्यक्रम अगदी साधा असा आहे. त्याचे स्वरूप असलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीचा आग्रह व संविधानातील ध्येयाचा पुरस्कार इतकेच मर्यादित आहे. या दृष्टीने मला हजार क्रांतीकारी घोषणा करणाऱ्यापेक्षा बाबा आढाव आणि हमीद दलवाई यांचे कार्य महत्त्वाचे वाटते.

एक पिढी राजकीय स्वातंत्र्यानंतर सर्व प्रश्न सोडवू इतकेच बोलत राहिली, दुसरी पिढी हे प्रश्न सोडवण्याचे काम राजसत्तेचे आहे. असे म्हणून बाजुला सरकू इच्छिते. या दोन्ही पिढ्यांमध्ये समाजपरिवर्तनाच्या कार्याची परंपरा आणि प्रतिष्ठा शिल्लक राहिली नाही. या सामाजिक कार्यावर भर देणारे निवडणूकीच्या राजकारणात न गुंतलेले असे किती तरूण ही नवी पिढी देऊ शकते यावर हा प्रश्न कसा सुटेल याचे उत्तर अवलंबून आहे. हे सांगताना दलित वर्गातील तरूण नेत्यांनी आपले मित्र ओळखावे. एकटे पडण्याचा प्रयत्न करू नये हे मी सांगीत राहीन. पण हा जो संतापाचा उद्रेक दलितांच्या मनात आहे, तो प्रश्न सोडवू शकणार नाही हे जितके खरे तितकेच तो प्रश्न सोडविण्यांतील सर्वात मोठा अडथळा नाही हेही खरे आहे. प्रश्न सोडविण्यांतील सर्वात मोठा

आडथळा आमचे मन आहे. अजून या देशातील बहुसंख्यांक विचारवंताना हा प्रश्न नित्य आग्रहाने सांगण्याचा आहे व परंपरावाद्यांचे युक्तिवाद सतत खोडण्याचाही आहे हे सुद्धा पटायचे राहिले आहे असे मला वाटते.

◇ ◇ ◇

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3233
संदर्भ शाखा

# ११/ धर्म आणि मन

भारतीय मुसलमानांचे मन बनविण्यात धर्माचा वाटा कोणता आहे ह्या प्रश्नाची चर्चा करणे धोक्याचे आहे. एक तर बाब अगदी स्पष्ट अशी आहे की मी त्या धर्माचा अनुयायी नाही. कितीही प्रयत्न केला तरी इतिहासाचा पुरावा मला विसरणे शक्य नाही. कितीही सहानुभूतीने विचार करायचा असे मी ठरविले तरी मुस्लिम धर्मांच्या उपासकांना हा विचार सहानुभूतीशून्य व त्यांच्यावर अन्याय करणारा असे वाटणे स्वाभाविक आहे. दुसरी त्याहून महत्त्वाची गोष्ट अशी आहे की मुसलमान धर्म म्हणजे काय हे सांगणे सोपे काम नाही, इस्लामच्या धर्मपंडितांनासुद्धा हे स्पष्टीकरण करता येणे कठीण आहे. हे मुसलमानांच्या बाबतीतच खरे आहे असे नसून कोणत्याही धर्माच्या अनुयायाला आपल्या धर्माची व्याख्या करता येणे कठीणच असते, कारण धर्म ही माणसाच्या जीवनाइतकीच गुंतागुंतीची घटना असते. मूळ धर्मग्रंथ व त्यांतील आज्ञा ह्या स्वरूपाचा धर्म कधी अस्तित्वातच नसतो. काळाच्या प्रवाहात प्रत्येक समाजाने आपल्या धर्मग्रंथांचा एक अर्थ स्वीकारलेला असतो. हा अर्थ मूळ धर्मग्रंथातून निष्पन्न होवो अगर न होवो अनुयायांच्या दृष्टीने त्यांच्या धर्मग्रंथाचा तोच अर्थ असतो.

इस्लामचा धर्मग्रंथ पवित्र कुराण, त्यांच्या धर्मपरंपरा म्हणजे हदीस, इस्लामी धर्मपंडितांनी केलेले विधि–विधानांचे स्पष्टीकरण हे मिळून धर्माचा एक भाग होतो. अत्यंत उदात्त नीतिमुल्ये आणि अत्यंत कर्मठ विचार ह्यांची सरमिसळ

असणारा, शांतता व न्याय एकीकडे आणि आक्रमण व अन्याय दुसरीकडे ह्या परंपरा मूळच्या धर्माशी सुसंगत असतात. पण काहीं प्रमाणात त्या निराळ्या असतात.

ह्या परंपराप्राप्त इस्लाम धर्म मुस्लिम समाजातील व्यक्तींना आदरणीय, वंदनीय वाटतो, म्हणजे मुसलमान ह्या धर्माचे अनुकरण करतोच असे नाही. परंपरा-प्राप्त धर्माचा काही भाग त्याला वंदनीय असला तरी अनुकरणीय वाटत नाही. इस्लाममध्ये दारू नेहमीच निषिद्ध मानलेली आहे. धर्मग्रंथाने, धर्मपरंपरांनी नेहमीच दारूचा निषेध एकमुखाने केला आहे. आणि मुसलमान राजे सरदार. व्यापारी व इतर लोक नेहमीच दारू पीत आले आहेत. मुसलमान कलावंतांच्यामध्ये तर हे प्रमाण जवळजवळ सार्वत्रिक आहे. आजही मुसलमानात खूप लोक दारू पितात. सिगारेट, नस, तंबाखू ह्यांचा वापर करणारा शीख जसा अतिशय दुर्मिळ आहे तसे मुस्लिम समाजात दारूचे व्यसन नाही हे दाखवणे दुर्मिळ आहे. हेच संगीत, नृत्य, सिनेमा, जुगार ह्यांच्याविषयी म्हणता येईल. कोणतेच धर्म आपल्या प्रजेची नीतिमत्ता टिकवण्यात व सुधारण्यात फारसे यशस्वी झालेले दिसत नाहीत. इस्लाम धर्मसुद्धा आपल्या प्रजेला फारसे नैतिक परिमाण देऊ शकला नाही. प्रश्न आहे तो असा की धर्माने वर्ज्य सांगितलेल्या गोष्टी सर्रास करणारा, धर्माने आवश्यक सांगितलेल्या गोष्टी करण्यास सतत टाळाटाळ करणारा समाज पाहिल्यानंतर ह्या समाजाचे मन घडविण्यात धर्माचा सहभाग कसा ठरवावा ? आणि आपण तो ठरविला तरी निर्विवाद कोण मानील ?

ह्या ठिकाणी रूढींच्याविषयी थोडेसे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. सामान्यतः आधुनिक सुधारकांची पद्धत रूढींच्या अंगावर दोष लादण्याची आहे. कोणतीही गैरबाब असली ती समाजाला हानिकारक असली की तिची जवाबदारी रूढीवर टाकण्यात येते. जणू रूढींचा त्याग करून जेव्हा आपण एखादी सुधारणा आत्मसात करतो त्यावेळी धर्माच्या मूळ उज्ज्वल रूपाकडे जात असतो. धर्माच्या बाबतीत अत्यंत हळवा आणि श्रद्धाळू असा समाज समोर उभा असतो. ह्या समाजाला एखादी सुधारणा पटवून देण्यासाठी जर आपण रूढींचा तेवढा विरोध करीत आहो अशी कुणी भूमिका घेतली तर ती क्षम्य मानली पाहिजे. पण समाजात सुधारणा रुजविण्याचा एक पवित्रा म्हणूनच ह्या पद्धतीकडे पाहिले पाहिजे. ऐतिहासिक दृष्टीने पाहिले तर रूढींचा उदय धर्माच्या आदेशातूनच होत असतो. कोणताही धर्म हवेत जन्माला येत नसतो, धर्म म्हणजे पारलौकिक कल्याणाची हमी आणि नीतीतत्त्वांचा पुरस्कार इतकेच नसते तर धर्माला एक समाजरचनाही अभिप्रेत असते. उपलब्ध असणारी समाजरचना काही फेरफार करुन धर्म मान्य करतात. धर्मांच्या समोर असणाऱ्या सगळ्याच समाजरचना विषमतेचा पुरस्कार

करणाऱ्या, व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधी गुलामगिरीला मान्यता देणाऱ्या अशा जुनाट व मध्ययुगीन आहेत. मूळ धर्मच अशा प्रकारे अनेक अन्यायांचा संरक्षक, अनेक अत्याचारांचा जन्मदाता असतो. रूढींच्यामुळे ह्या जुनाट समाजरचनेचा मूळ धागा न सुटता काही रंग तेवढे बदलतात, नव्या जगाला केवळ रूढींच्याविरुद्ध भांडून चालावयाचे नाही. मूळ धर्म-पुरस्कृत समाजरचनेतच आमूलाग्र बदल करावा लागणार आहे.

भारतीय मुसलमान अतिशय धर्मश्रद्ध आहेत असे काही जणांचे मत आहे. हे मत ह्या अर्थाने खरे आहे की सगळा भारतीय समाजच धर्मश्रद्ध आहे. आणि जगभरचे स्वतःला सुधारक म्हणविणारे समाजही कमी धर्मश्रद्ध नाहीत. समाज नेहमीच धर्मश्रद्ध राहात आला. हजारो वर्षांपासून श्रद्धेच्या वातावरणात मानवी समाजाचे जीवन घडत आले. कला, साहित्य. नीती, संस्कृती अशा जीवनाच्या सर्व अंगांना धर्मश्रद्धेने व्यापलेले असते. युरोपात बुद्धिप्रामाण्यवादाचे युग सुरु होऊन अजून पुरती तीनशे वर्षे झालेली नाहीत. भारतात तर बुद्धिप्राण्यवाद अजून पुरता शंभर वर्षांचाही झाला नाही. सारे भारतीय समाजसुधारक प्रायः धर्मश्रद्ध आहेत व होते. हा नियम राजा राममोहन रॉय ह्यांच्यापासून महर्षी दयानंदांच्यापर्यंत चालतो. महात्मा फुले ह्यांच्यासारखा बंडखोर व क्रांतीकारक नवा धर्म निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. डॉ. आंबेडकरांना पुनः समाजपरिवर्तनासाठी धर्माचा आश्रय घ्यावा लागतो. अशा वातावरणात आग्रही बुद्धिप्राण्यवादाचे नेते फार थोडे असणार हे उघड आहे. सेक्युलॅरिझम हे मूलतः धर्माला विरोधी असणारे दर्शन आहे, हे आजही बहुतेकांना पटत नाही. जाणत्या सुशिक्षित समाजाची वाटचाल शंकराचार्यांकडून भगवान रजनीशांच्याकडे व मठाधिपतींच्याकडून सत्यसाईबाबांच्याकडे अशी होते. आधुनिक शिक्षणाचे समाजात प्रमाण कमी. ह्या आधुनिक सुशिक्षितांत आधुनिक मन असणारे त्याहून कमी, हे सत्य समजून घेतले तर आजही भारतीय समाज मनाने तसाच जुनाट, धर्मश्रद्ध व परंपरावादी राहिला आहे हे दिसून येईल. हे परंपरावादी मन नेहमीच जुन्या धर्माच्या समर्थनाची नवी कारणे शोधीत असते. दोन-तीन वर्षांपूर्वीच एका पंडिताने असे सिद्ध करण्याचा गंभीरपणे प्रयत्न केलेला आहे की आदर्श राज्य, निर्दोष लोकशाही व परिपूर्ण स्वातंत्र्य ह्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी मनुस्मृतीचे मार्गदर्शन स्वीकारले पाहिजे, विद्वत्तेचा ह्यापेक्षा हास्यास्पद प्रयोग कोणता असू शकेल ?

केवळ युक्तिवादाने समाज बदलूही शकत नसतात. धार्मिक अंधश्रद्धांच्या विरुद्ध सततचा उग्र संघर्ष ही एक आघाडी असते. मुसलमान समाजाच्या बाबतीत हे कर्तव्य नेटाने पार पाडण्याची जबाबदारी ह्या देशांतील स्वतःला सेक्युलर

समजणाऱ्या राजकारणाने कधीही स्वीकारलेली नाही. सेक्यूलर राजकारणाची प्रचंड स्पर्धा मुस्लिम अंधश्रद्धांना कुरवाळण्यासाठी, गोंजारण्यासाठी चालू असते. धार्मिक अंधश्रद्धां आणि मानसिक गुलामगिरीविरुद्धची ही आघाडी कायम बंद असते. पण ह्याखेरीज महत्त्वाची आणि मूलभूत आघाडी अर्थरचना बदलण्याची आहे. अर्थरचना बदलल्याविना समाजरचना बदलत नसते. ह्या आघाडीवरसुद्धा आधुनिकांचा फारसा मोठा जय झालेला नाही. दोन्ही आघाडींवर जोर धरावा तेव्हा मंदगतीने मन बदलत असते. मानवाच्या दास्यपरंपरेत मानसिक दास्य हे सर्वात शेवटी लय पावणारे तथ्य असते. अजून ह्या मानसिक दास्याला फार मोठ्या भेगा पडलेल्या नाहीत, फक्त काही तडे तेवढे जाताना दिसतात.

हिंदू समाज जितका आणि जेवढा धर्मश्रद्ध आहे तितकाच कदाचित. थोडा कमी, मुस्लिम समाज धर्मश्रद्ध आहे. हिंदूंची धर्मश्रद्धा, त्यांचे धर्मवेड चटकन जाणवत नाही. मुस्लिम समाजाचे धर्मवेड जाणवते. ह्याला माझ्या मते प्रमुख कारणे चार आहेत : ह्या चार कारणांच्यापैकी मुस्लिम धर्माचे स्वरूप व त्या धर्माचा इतिहास हे सर्वांत महत्त्वाचे कारण आहे. आता उरलेल्या तीन कारणांचा प्रथम विचार करू.

आधुनिक सुशिक्षित हिंदूंना मुस्लिम धर्मवेडेपणाची तीव्र जाणीव जातीय दंगली आणि पाकिस्तानची चळवळ ह्यांमुळे होत असते. मुस्लिम अत्याचारांचा मागचा सर्व इतिहास विसरून ( हा इतिहास खोटा आहे असे म्हणण्याची माझी शक्ती नाही ) हिंदू बहुमताच्या ह्या देशांत मुसलमानांना संपूर्णपणे समान नागरिकत्व देण्यासाठी सारे हिंदू नेते एका पायावर तयार असत. स्वा. सावरकर आणि कै. श्यामाप्रसाद मुखर्जी ह्यांचा तर ह्या भूमिकेला पाठिंबा होताच पण ह्या भूमिका डॉ. हेडगेवार व कै. गोळवलकरगुरुजी ह्यांनाही मान्य होत्या. मुसलमानांचे ह्यावर समाधान नव्हते. गोखले, टिळक. गांधी, नेहरू, सुभाषचंद्र बोस ह्यापुढे एक पाऊल टाकणारे होते, हे पुढचे पाऊल हिंदुत्ववाद्याना मान्य नव्हते. पण हिंदू प्रजा ज्या नेत्यांच्या मागे होती त्यांना म्हणजे टिळकांना ते मान्य होते, ( ह्या यादीत पुढे क्रमाने गांधीजी इत्यादी नेते येतात. ) विभक्त मतदारसंघ घ्या किंवा लोकसंख्येपेक्षा अधिक जागा घ्या ; धर्म व परंपरांच्या संरक्षणाबद्दल हवी तेवढी हमी घ्या, मागासलेपणाच्या-साठी विकासात अग्रहक्क घ्या, असे ह्यांचे म्हणणे होते. पण हा औदार्याचा हात फेटाळून प्रसंगी दंगल करून मुसलमानांनी स्वतःचे राष्ट्र मिळविले. आता हिंदूंना असे वाटते की एकदा पाकिस्तान मिळाल्यानंतर भारतीय मुसलमानांनी एक तर पाकिस्तान-ला चालते व्हावे अगर भारतात प्रेमाने रहावे. ह्या राष्ट्रावर प्रेम करण्यास शिकावे. हिंदंचे हे मनोगत अत्यंत रास्त तर आहेच पण उदारही आहे. कारण त्यात

सुडाची भूमिका नाही. मी हिंदूत्ववादी नसलो तरी माझे हेच मत आहे. नेहरूंच्यापासून सर्वांचे म्हणणे हेच आहे. मुसलमान समाजाचे म्हणणेही हेच आहे पण हिंदू हे जातीयवादी असल्यामुळे त्यांना आमचे प्रेम दिसत नाही, एवढीच त्यांची तक्रार आहे.

ह्या सगळ्या विवेचनात आपण लोकशाहीचे गतिशास्त्र विसरतो, ते समजून घेतले पाहिजे स्वतंत्र भारतात राहणाऱ्या सर्व प्रौढांना आपण नागरिकत्वाचे पूर्ण हक्क दिलेले आहेत त्यातच मतदानाचाही हक्क आला. जे आयुष्यभर पारतंत्र्याचे स्तुतिपाठक राहिले तेही, जे विषम समाजाचे समर्थक आहेत तेही आणि ज्यांनी इंग्रजांची मर्जी संपादन करण्यासाठी नीतीचीही चाड बाळगली नाही तेही आता सर्वांच्यासह नागरिक झालेले आहेत. आपली मते न बदलता नागरिक झाले आहेत. ज्या संस्थानिकांनी व राजा–महाराजांनी कधी प्रजेची कणभर काळजी घेतली नाही ते श्रद्धेच्या पोटी त्याच प्रजेचे प्रतिनिधी म्हणून निवडून येत आहेत सर्वांच्याप्रमाणे मुस्लिम समाजही नागरिक झालेला आहे, आपले मन न बदलता नागरिक झालेला आहे. लोकशाहीचे गतिशास्त्र हे की तिथे बलवान गटांना महत्त्व येते. परंपरानिष्ठ समाजात हे गट जाती आणि धर्मांच्या नावे संघटित होतात. लोकशाहीत कायद्याचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न असतो. म्हणून माणसे विचार मांडताना निर्भय होतात. धर्माच्या नावे संघटित होऊन भारतीय लोकशाहीला विसंवादी स्वर जर मुस्लिम समाज निर्माण करीत असेल तर तो परंपरावादी मनाला मिळालेल्या स्वातंत्र्य व सुरक्षिततेचा आवाज म्हटला पाहिजे. लोकशाहीची अडचण हीच असते. तिथे विरोधी मतांना वाव असतो ; जातीवाद्यांना वाव असतो. हुकूमशाहीच्या पुरस्कर्त्यांनासुद्धा विचारस्वातंत्र्याचे संरक्षण असते

मुस्लिम समाजाला पाकिस्तानविषयी उत्कट आपुलकी वाटते. शांततेच्या काळात आपला असे प्रेम करण्याचा हक्क ते जाहीररीतीने सांगतात. तंग वातावरणात परराष्ट्राविषयी आम्हाला काही बोलावयाचे नाही असे निमित्त ते सांगतात. पण स्पष्टपणे पाकिस्तानचा ते कधीच धिक्कार करीत नाहीत. खेळाच्या मैदानावर इस्त्रायली खेडाळूंची अमानुष हत्या झाली तरी भारतीय मुसलमान गप्प असतो. मनांतून ह्या कृत्याचे तो समर्थन करीत असतो, मुसलमानांचे म्हणणे असे आहे की विभक्त मतदार संघ मुसलमानांनी मागितला तेव्हा पाकिस्तानची मागणी समोर आलेली नव्हती. भारतीय नेत्यांनी विभक्त मतदार संघ मान्य केला तेव्हाही पाकिस्तानचा प्रश्न नव्हता. मुसलमान ही अल्पसंख्या नसून ती एक स्वतंत्र राष्ट्र आहे म्हणून स्वतंत्र मतदार संघ मिळावा अशी आमची मागणी होती. ती काँग्रेसने मान्य केलेली होती. स्वतंत्र भारतात विभक्त मतदार संघाची मागणी रद्द करणे म्हणजे जे भारतावरील प्रेमाने भारतात राहिले त्यांचा विश्वासघात

करणे आहे. मुसलमानांच्या राखीव नोकऱ्या गेल्या, त्यांची संस्थाने बुडाली, उर्दू भाषेचा ऱ्हास झाला. मुसलमान अधिक दरिद्री व पोरका झाला, आणि आता अलिगढ विद्यापीठात हस्तक्षेप झाला. आमच्या कायद्यात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न होत आहे. सतत दंगली होतात. मुसलमानांच्यावर अन्याय होतो. ह्या सरकारवर, ह्या देशावर आम्ही प्रेम करावे अशी मागणी करण्याचा नैतिक अधिकारच कुणाला नाही. थोडक्यात म्हणजे हे जुनेच, स्वातंत्र्यपूर्व काळातील मन आहे. ते लोकशाहीमुळे निर्भयपणे व्यक्त होत असते इतकेच.

मुसलमान समाजाला बदललेल्या परिस्थितीचे भान नसते. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्याला सर्व प्रकारे सहाय्य करणारी इंग्रज राजवट होती व बहुमताचे प्रांत होते. त्या जोरावर पाकिस्तान निर्माण झाले असे त्यांना वाटत नाही. पाकिस्तान हा मुसलमानांच्या शक्तीचा विजय आहे असे त्यांना वाटते. अजूनही मुसलमान पुरेसे संघटित झाले तर नवे विजय मिळवू शकतील ह्यावर त्यांचा विश्वास आहे. हा मुद्दा सांगण्याची त्यांची विशिष्ट शैली आहे. ते म्हणतात, हिन्दूच्या धर्मांधतेमुळे व मुस्लिमद्वेषामुळे देशाची फाळणी झाली. हिंदू जातीयवादी फाळणीला जबाबदार आहेत. अजूनही त्यांनी आपली वांगणूक सुधारावी. नसता देशाचे अजून तुकडे पडणे अपरिहार्य आहे.

मुस्लिम जातीयवाद तीव्रपणे जाणवण्याचे दुसरे कारण त्या समाजाचे नेतृत्वह आहे. मुसलमान समाजात धर्म आणि राजकारण अशी विभागणी नाही. हिंदू समाजाचा संत राजकारणात प्रायः भाग घेत नाही. गेली हजार वर्षे हिंदूचे साधुसंत आपल्याच धर्मातील कर्मठ परंपरांच्याविरुध्द आवाज उठवीत आले आहेत. कर्मकांड, बाह्य परंपरा, चालीरिती, यज्ञयाग या सगळ्या अतिशय गौण आणि तुच्छ बाबी आहेत. खरे महत्त्व मनातील श्रध्देला आहे. असे हजार वर्षं हिंदूचे साधुसंत सांगत आले. ह्या हजार वर्षांच्या परंपरेचा एक परिणाम असा आहे की हिंदू धर्मात हिंदूंच्या धर्मपंडितांनाच फारशी प्रतिष्ठा नाही. आणि हे साधूसंत वैराग्याचा उपदेश करीत आले. राजकारण, लढाया, सत्ता ह्यांचा विरोध सांगत आले. राजकारणाविषयी आमच्या संतांची उदासीनता एवढी मोठी की ज्या धर्मावर त्यांचे प्राणाहून जास्त प्रेम होते तो धर्म धोक्यात आला तरी राजकारणाचा विचार करणारे फारसे संत निर्माण झाले नाहीत. विद्यारण्य, एकनाथ. रामदास ह्यांच्यासारख्या अपवादांनी नियम सिध्द होत नसतो. ह्याचा परिणाम असा झाला आहे की हिंदूचे शंकराचार्य, मठाधिपती, धर्माचार्य त्यांचे राजकीय नेते होऊ शकत नाहीत आणि हिंदुत्ववादी राजकीय नेतेसुध्दा स्पष्टपणे धार्मिक भूमिका घेऊ शकत नाहीत. स्वा. सावरकर तर सोडाच पण गोळवलकर गरुजीसुध्दा मला मनुस्मृतीवर

आधारलेले राज्य हवे असे म्हणण्यास धजले नाहीत. शिवाय हिंदूंचा इतिहास मोठ्या प्रमाणात पराजयाचा आहे. हृदयाला हा पराजय झोंबलेला असल्यामुळे आमचा विचारच धर्माचा प्रतिवाद करीत, धर्माचा अधिक्षेप करीत जन्माला येतो. हिंदू राजकारणातील लहाममोठे हजारो नेते दररोज आपल्या धर्माचा अधिक्षेप करीत असतात. हे शंभर वर्षे चालू असून हिंदू मन इतके धार्मिक आहे.

मुस्लिम समाजात हे सारे चित्रच मूलतः निराळे आहे. इस्लामचे प्रेषित महंमद पैगंबर हे धर्माचार्य आणि राज्यनिर्माते होते. त्यांच्या नंतरचे चार पवित्र खलिफा धर्माचार्यही आहेत, राजेही आहेत. तर विसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत कोणत्यातरी राजाला मुसलमान खलिफा मानत आले. सतत बाराशे वर्षे राज-कारण हा धर्माचा अविभाज्य भाग आणि धर्म राजकारणाचा भाग ह्यांच्या परंपरेत राहात आला, मुसलमान राजे स्वतःला खलिफांचे प्रतिनिधी म्हणजे सुलतान म्हणवत. धर्म आणि राजकारण एकत्र येण्याचे काही परिणाम होतात. राजाच्या साऱ्या लढाया धर्मयुद्धे होतात. राजाचे विजय धर्माचे विजय होतात. आरंभापासून इस्लामचा इतिहास धर्म प्रसाराचा व विजयाचा इतिहास राहिला. धर्म राजकारणात विजय देतो, व राजकारण धर्माच्या विजयासाठी असते असे मानणे ही मुसलमानांची परंपरा राहिली. धर्म आणि राजकारण एकत्र असल्यामुळे सर्व मुस्लिम संतांच्या समोर दोन ध्येये राहिली. पहिले, धर्मप्रसार करून राज-कारणाला मदत करण्याचे व दुसरे राजाला सतत धर्म प्रसाराला उद्युक्त करण्याचे. धर्म आणि राजकारण एकच असल्याचा परिणाम असा होते की धर्मविरोधकांचे पारिपत्य हा राजाचा हक्क होतो. मन्सूरचा वध ह्यातून येतो. धर्म प्रसार राज्याचे कर्तव्य असले की धर्म लादण्यासाठी शस्त्राचा वापर होतोच. असहिष्णुता हा धर्माचा भाग होतो. आणि सारी परंपरा धर्माचार्यांच्या नेतृत्वाच्या उदयाची कहाणी असते. धर्माच्या आज्ञा सांगून संत राजांची कान उघाडणी करणार. ही पोथी-निष्ठा अशा समाजात बलवान असते.

परंपरेने मुसलमान स्वतःला सर्वश्रेष्ठ धर्माचे अनुयायी व विजेते मानतात. आजही ते भारतावर इस्लामिक धर्मराज्य निर्माण करणे, आपला हक्क व ध्येय मानतात. जमात-ए-इस्लामीने स्पष्टपणे आपले हे ध्येय घोषित केले आहे. सगळ्या राजकारणात असा धर्माचा आधार असल्यामुळे मुस्लिम समाजात धर्मटीकेची परंपरा नाही. ते स्वतःच्या धर्मावर टीका करीत नाहीत. इतरांनी केलेली टीका सहन करीत नाहीत. मुसलमान समाजातील नेते दोन गटात विभागलेले असतात. एक गट उलेमांचा असतो. तो स्वतः धर्मश्रद्ध असतो व धर्माचा भाग म्हणून राजकारण करतो. स्वातंत्र्यपूर्व काळात लीगमध्ये मौ. नदवी, मौ. दर्याबादी, मौ. भाषाणी असे

नेते होते. ह्या उलेमांचा एक गट पाकिस्तान विरोधी होता. पाकिस्तान निर्माण होणे म्हणजे सर्व भारत मुस्लिम वर्चस्वाखाली आणण्याचे स्वप्न सोडून देणे. ह्याला त्यांची तयारी नव्हती. उलेमांचा हा गट राष्ट्रीय मुसलमान म्हणून ओळखला जाई. स्वातंत्र्योत्तर काळात ह्या उलेमांना राष्ट्रीय म्हणून प्रतिष्ठा मिळाली. मौ. मदनी ह्यांपैकी होत. मुसलमान नेत्यांचा दुसरा गट धार्मिक नसतो. परंपरागत धर्मावर ह्या गटाची श्रद्धाही नसते. हा गट सोयिस्करपणे धर्माचा वापर करीत असतो. राजकारणासाठी धर्माचा वापर त्यांना गैर वाटत नाही. म. जीना, मौ. आजाद हे ह्या प्रवृत्तीचे नेते आहेत. आजच्या महाराष्ट्रात डॉ. रफिक झकेरिया व भारतात फक्रुद्दीन अली अहमद ह्या गटात येतील. सर सय्यद अहमद ह्या गटाचे पहिले प्रमुख नेते होते.

हिंदूंच्या परंपरेत कर्मकांडावरील टीकेची हजार वर्षांची परंपरा आहे. ती आधुनिक काळात धर्मटीकेचे रूप घेते. मुसलमानांच्यामध्ये बाराशे वर्षे फक्त धर्माच्या जयघोषाची व समर्थनाची परंपरा आहे. ती आधुनिक काळात धार्मिक राजकारणाचे रूप घेते. आपल्या धर्माची कठोर चिकित्सा करण्याचा पहिला प्रयत्नच हमीद दलवाई ह्यांच्यापासून सुरू होतो. ह्या प्रयत्नाला अजून एकही तप उलटलेले नाही. स्वतःला पुरोगामी म्हणणाऱ्या एकाही विचारवंताने हे कार्य करण्याचे धाडस दाखविलेले नाही. मुस्लिम समाजात हमीद दलवाई, आणि हिंदू समाजात लोकहितवादी व फुले हे अपवाद आहेत. समाजवादी, कम्युनिस्ट, काँग्रेस ह्या पक्षात अनेक मुस्लिम नेते होते व आहेत. त्यांच्यातील रफी महमद किडवाई, युसुफ मेहरअल्ली, हॅरिस, झेड. ए. अहमद, कॉ. मकदूम ह्यांना कोणी धर्मश्रद्धा म्हणणार नाही. ही पुरोगामी विचारांचीच माणसे होती. पण ह्यांच्यातील एकहीजण स्वतःच्या धर्माचा चिकित्सक अभ्यास करू धजला नाही. उलट इस्लाम म्हणजे समता, इस्लाम म्हणजे लोकशाही, इस्लाम म्हणजे समाजवाद, इस्लाम म्हणजे राष्ट्रवाद अशा भ्रामक समजुती आग्रहाने सांगण्यात ह्या नेत्यांनी जन्म घालविला. धर्मश्रध्दा व धर्मग्रंथ प्रमाण मानून त्यांचा आशय बदलण्याचा अयशस्वी पण महत्त्वाचा प्रयोग करणारे मौ. आझाद तेवढे ह्याला अपवाद दिसतात. मुस्लिम नेतृत्वच सर्वस्वी धार्मिक दिसते. आणि हे धार्मिक नेतृत्व बेजबाबदारपणे जातीय आणि आक्रमक भाषेत बोलते

मुस्लिम राजकारणाचे सर्वात दुःखद दर्शन ज्यावेळी हे राजकारण राष्ट्रद्रोही रूप घेते त्यावेळी होते. भारताच्या इतिहासात ह्या राष्ट्रद्रोही स्वरूपाला कांही प्रसंगी महत्त्वाचे अपवाद असतात. ही त्यातल्या त्यात आनंदाची बाब आहे. मुस्लिम राजकारणाचे राष्ट्रद्रोही दर्शन आणि मुस्लिम समाज यांतील फरक आपण नीटपणे ओळखला पाहिजे. मस्लिम माणूस धर्मश्रद्ध असतो, धर्मवेडा असतो पण

राष्ट्रद्रोही नसतो, राष्ट्रद्रोहाच्या सीमेवर वावरत असतात राजकीय नेते. आणि जनतेला नक्की असा ह्या भूमिकेचा अर्थ कळत नसतो. मुस्लिम मनाच्या साऱ्या विचारपद्धती धर्मप्रधान असल्यामुळे त्यांचा राष्ट्रवादही धार्मिक राष्ट्रवाद आहे. राष्ट्र वाचक उर्दू शब्द 'कौम' हा प्रादेशिक राष्ट्रवादाचा नसून धार्मिक राष्ट्रवादाचा आहे. भारत देश ह्याचे भाषांतर उर्दूत 'मुल्क–ए–भारत' असे होईल. पण भारतीय राष्ट्र ही कल्पना उर्दूत कशी मांडणार ? 'कौम–इ–भारत' ही शब्दरचना मुसलमान हास्यास्पद मानतील. मुसलमान 'कौम' आहे, हिंदू 'कौम' आहे. भारत मात्र फक्त मुल्क असू शकतो. वतन हा शब्द प्रायः जन्म–गावाचा वाचक असतो. त्यांचा राष्ट्रवाद धार्मिक असल्यामुळे सर्व जगातील मुसलमान हे परस्परांचे बंधू आहेत असे ते मानतात. म्हणून पॅलेस्टानमधील मजीद अल्–अक्सासाठी भारतव्यापी संप होतो. पाकिस्तान तर मुसलमान देश असल्यामुळे आपलाच देश आहे. काश्मीर मुस्लिम बहुसंख्येचे असल्यामुळे न्यायतःच पाकिस्तानला जायला हवे असे त्यांना वाटते. अतिशय कठोर शब्दांत काश्मीरप्रकरणी पाकिस्तानचा धिःकार करणारे आझाद, रफिक झकेरिया, छागला हे अपवाद सोडले तर प्रायः मुस्लिम नेते पाकिस्तानवर गप्प बसतात.

या राष्ट्रद्रोही भूमिकेचे मुस्लिम समाज़ात अनेक आविष्कार असतात. सर्वांच्या मागे एक सूत्र असते. ते म्हणजे पाकिस्तान आपले राष्ट्र आहे. त्याला अनुकूल प्रतिपादन करीत राहिले पाहिजे. नेते असे प्रतिपादन जाणीवपूर्वक करतात. समाजाला नेत्यांचे तर्कशास्त्र अतिशय बरोबर वाटते, जोपर्यंत शेख अब्दुल्ला भारतवादी होते तोपर्यंत ते मुसलमानांचे लाडके नव्हते शेख साहेब भारतविरोधी झाले की लाडके होतात. भारताच्या प्रगतीसाठी, विकासासाठी शांतता अत्यंत आवश्यक आहे असे सारे कॉंग्रेसजन सांगतात. पाकिस्तानला जर काश्मीर जाऊ दिले व काश्मीरचा प्रश्न प्रतिष्ठेचा बनविला नाही तर ह्या उपखंडात चिरस्थायी शांततेची पायाभरणी होऊन भारताच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. शिवाय एक प्रदेश तेथील जनतेच्या इच्छेविरुद्ध भारतात अडकून ठेवणे लोकशाहीला शोभणारे नाही, काश्मीर सोडून दिल्यास आपली लोकशाही निर्दोष होईल व जगात आपली पत वाढेल असे प्रतिपादन सातत्याने करणारे नेते आहेत इ. स. १९६५ सालीं व नंतर पाकिस्तानचा पराभव झालेला नाही. युद्ध बरोबरीने सुटले, आयुबखानांना शांततेची तळमळ आहे पण भारत प्रतिसाद देत नाही असा प्रचार झाला.

सर्वांत मूर्खपणाची कमाल बांगलादेश प्रकरणी झालेली दिसते. ज्यावेळी पाकिस्तानी लष्कराने बंगालमधील मुसलमानांच्या कत्तली केल्या, लाखो लोक मारले गेले त्यावेळी हे नेते तीन मुद्दे प्रामुख्याने मांडीत होते. प्रथम म्हणजे येणारे

निर्वासित विदेशी नागरिक आहेत. आपला देश गरीब व दरिद्री असताना ह्या परदेशी लोकांच्या सोयी करण्यासाठी पैसा खर्च करणे चूक आहे, ह्या निर्वासितांनी येणे बंद केले पाहिजे. दुसरे म्हणजे शेख व त्यांचे अनुयायी राष्ट्रद्रोही आहेत. कोणत्याही देशात राष्ट्रद्रोहयांना गोळयाच घातल्या जातात. तेच पाकिस्तान-मध्येही घडत आहे आणि तो पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यावर भारतीयांनी बोलणे म्हणजे परराष्ट्राच्या अंतर्गत कारभारात आक्षेप आहे. तिसरे म्हणजे फुटीर-पणाला उत्तेजन देणे गैर आहे. त्याच्या परिणामी भारतातून केरळ, मद्रास, बंगाल, आसाम ह्यांना फुटण्याचे स्वातंत्र्य मिळते. त्यात भारताची हानी आहे. पाकिस्तान लष्करीदृष्टया अतिशय बलवान असल्यामुळे भारताने त्याच्या वाटेस जाऊ नये, भारताचा पराभव होईल. हे मुस्लिम नेते आपणच खरे राष्ट्रवादी असल्याचा दावाही करीत होते डॉ. रफिक झकेरिया व फक्रुद्दीन अली अहमद मात्र ह्या प्रकरणी अतिशय निग्रहाने पाकिस्तानविरोधी राहिले.

चीन पाकिस्तानचा मित्र म्हणून हे चीनला अनुकूल. रशिया भारताचा मित्र म्हणून हे रशियाला प्रतिकूल असेही एक चित्र आहे. गफारखानांची तुलना नागा नेता फिजोशी करणारे आहेत, इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले हे तर कधीच क्षम्य ठरणारे नाही, म्हणून जाहीर सभांच्यामधून हे नेते पंतप्रधानांचा विधवा, अपशकुनी, विश्वासघातकी असा उल्लेख करतात. भारतीय मुसलमानांचे राजकीय नेतृत्व पाकिस्तान प्रेमातून विचार करणारे आहे. सामान्य मुसलमान फक्त धार्मिक आहे. इस्लामाचे केन्द्र मक्का-मदिना भारताबाहेर. अरब जग भारताबाहेर. इस्लामी देश पाकिस्तान भारताबाहेर, असे हे चित्र आहे. म्हणून मुसलमान धर्मानुरोधाने विचार करू लागला की त्या विचाराला राष्ट्रद्रोहाचा वास येऊ लागतो. राजकीय नेते स्पष्ट देशहानिकारक भूमिकेपर्यंत समाज नेतात. हिंदू समाजाला भारताबाहेर धर्मभूमी नाही. भारताबाहेर प्रेम करण्यास जागाच नाही. त्यामुळे धार्मिक हिंदूलासुद्धा राष्ट्रद्रोही होणे फार कठीण जाते. हिंदू धार्मिक माणसाला आपले कोणते विचार राष्ट्रद्रोही आहेत हे लवकर कळतच नाही. वंदेमातरम्, जनगणमन ही आमची राष्ट्रगीते नव्हेत. राष्ट्रगीत वेदातून घ्यायला हवे. भारतीय संविधान आमचे नव्हे. आजचा भारतीय राष्ट्रध्वज आमच्यावर लादलेला आहे. हिंदूंचा राष्ट्रध्वज भगवा राहील. ह्यासारखे विचार काही हिंदू नेते बोलतात तेव्हा ते राष्ट्रद्रोहाच्या सीमेवरच असतात. परदेशनिष्ठेच्या अभावामुळे चटकन तिथे राष्ट्रद्रोह जाणवत नाही इतकेच. मुसलमानांच्या बाबतीत चटकन राष्ट्रद्रोह जाणवतो.

सर्वच धर्मातील लोकांना आपल्या धर्माचा व इतिहासाचा अभिमान असतो, आत्यंतिक प्रेम असते. सर्व जगातील धर्मांत आपला धर्म श्रेष्ठ आणि निर्दोष असून

आपला धर्म अत्यंत उदात्त आणि चांगला आहे ह्यावर त्या धर्मातील प्रजेची श्रद्धा असते. जे सर्वांनाच वाटते तेच जर मुसलमानांना आपल्या धर्माविषयी वाटत असेल तर त्याबद्दल मुसलमानांना कुठवर दोषी गृहीत धरता येईल ? ह्या प्रश्नाचा विचार गेली कित्येक वर्षे मी करीत आलो आहे. ह्या ठिकाणी मुख्य अडचण असेल तर सर्व जगातील धर्म व जुडाइस्ट परंपरेचे धर्म यातील फरकही आहे. हिंदू माणूस आपल्या धर्माचा जसा विचार करतो त्याचप्रमाणे इतर सर्व धर्मांचा विचार करतो. आपल्या धर्मावर प्रेम आहे म्हणून आपला धर्म चांगला आहे ह्या भूमिकेचे उदार रूप हे की जगातील सारेच धर्म मुळात चांगले आहेत समजणे. औदार्य म्हणून हे ठीक असले तरी ऐतिहासिक मूलभूत सत्याच्याकडे ह्या उदारपणामुळे दुर्लक्ष होते.

ज्युडाइस्ट परंपरेचे तीन प्रमुख धर्म : कालानुक्रमे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम हे तीन आहेत. ह्या परंपरेत तिन्ही धर्मांना समान असणारी बाब अशी की ते आपला धर्म जगातील अनेक धर्मांच्यापैकी एक मानत नाही तर फक्त आपला धर्म हाच एकमेव धर्म आहे असे मानतात. जगात परमेश्वर एकच आहे. त्या एका परमेश्वरानेच सांगितलेला धर्म एकच आहे व हा एकमेव धर्म आपला आहे असे त्यांना वाटते. चारचौघात बोलतांना शिष्टाचार म्हणून ज्यू–ख्रिश्चन–मुसलमान हा मुद्दा मांडणार नाहीत. प्रत्येकाने आपापल्या धर्माप्रमाणे वागावे असे ते म्हणतील. पण थोडी तपशिलाने व पद्धतशीर चर्चा केली म्हणजे असे दिसते की ज्युडाइस्ट परंपरेतील विचारवंत स्वतःचा धर्म एकमेव धर्म मानतात. आपल्या परंपरेतील उरलेल्या दोन धर्मांना ते शुद्ध धर्माची भ्रष्ट रूपे मानतात त्या बाहेर अज्ञानाचे जग ( आलमे–जहालत ) मानतात. म्हणजे हिंदू, मुसलमान, ख्रिश्चनांचे स्वतःपेक्षा निराळे धर्म मानतो. मुसलमान स्वतःचा धर्म ; ख्रिश्चानिटी इस्लामचे भ्रष्ट रूप व हिंदू धर्माला फक्त अज्ञान मानतो. परिणामी इतर धर्मांच्याविषयी तुच्छता, तिरस्कार हा स्वभाव होऊन जातो. मुस्लिम विचारवंतांच्या लिहिण्या, वागण्या, बोलण्यात हिंदू धर्माचा तिरस्कार दिसेल. सावरकर, गोळवलकर ह्यांच्यासारख्या कडव्या हिंदुत्ववाद्यांच्या लिखाणात मुसलमानांच्याविषयी तिरस्कार आहे. इस्लाम-विषयी तिरस्कार दिसणार नाही.

जगात अनेक धर्म आहेत. त्यांच्यापैकी माझा एक. मात्र माझा धर्म सर्वश्रेष्ठ असे हिंदू मानतो. जगात एकच धर्म आहे तो म्हणजे माझा. ज्यू, ख्रिश्चन, ही माझ्या धर्माची भ्रष्ट रूपे आहेत, हिंदू, पारशी, बौद्ध, जैन, आदी धर्मच नव्हते असे मुसलमान मानतो. आपलाच धर्म असल्यामुळे जे त्याचे अनुयायी नाहीत त्यांनीही त्याचा आदर बाळगलाच पाहिजे असा मुसलमानांचा आग्रह आहे. इतरांचे धर्म नसल्यामुळे त्यांच्याविषयी आदर बाळगण्याची गरज नाही असेही त्याला

वाटते. हिंदू आणि मुसलमान दोघेही कर्मठ आणि धर्मश्रद्ध असले तरी त्यांच्यातील फरक ह्यामुळे होतो. हा फरक इस्लाममधील जिहाद व जिझिया या दोन भूमिकांच्यामुळे वाढतो. ह्या जिहादच्या पोटी मुसलमानांच्या तबलिग. इजतदाद, बईद अशा अनेक भूमिकांचा उदय होतो. सत्य तर असे आहे की जिझिया जिहादचाच एक भाग असतो. पवित्र कुराण ह्या धर्मग्रंथात अशा अनेक आज्ञा झालेल्या आहेत की ज्यांनी एकूण मुस्लिम समाजाचे मन व विचार करण्याच्या पद्धतीच बदलून टाकलेल्या आहेत.

मुसलमान समाजाला धर्मस्वातंत्र्याशिवाय दुसरे काही नको आहे. सर्व धर्मश्रद्ध समाजाची मुख्य मागणी आपणाला धर्मस्वातंत्र्य असावे इतकीच असते. तीच मुस्लिम समाजाचीही मागणी आहे, आणि भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य दिलेलेही आहे. मुसलमानांची मुख्य तक्रारच ही आहे की भारतीय संविधानाने मुसलमानांना धर्मस्वातंत्र्य दिलेले नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्मावर श्रद्धा ठेवण्याचा अधिकार आहे हे भारतीय संविधान मान्य करते. पण 'धर्मावर श्रद्धा' ही कल्पना भारतीय शासनाने हिंदू पद्धतीने मान्य केली आहे. मुसलमानांना त्यांच्या धर्माच्या प्रथा परंपरांच्याप्रमाणे 'धर्मावर श्रद्धा' ठेवण्याचा अधिकार हवा आहे. तो मिळत नाही म्हणून भारत सरकारला ते हिंदू सरकार मानतात. मुसलमानांची मुख्य तक्रार राज्यकर्ते बहुसंख्य हिंदू आहेत ही नसून राज्यकर्ते हिंदू पद्धतीने प्रत्येक प्रश्नाचा विचार करतात ही आहे. हिंदूंना ह्या आरोपाचा अर्थच समजत नाही. मग आमचे सेक्युलर राज्यकर्ते हिंदू पद्धतीने जोरजोराने हा आरोप नाकारतात. एकदा हा मुद्दा तपशिलाने समजावून घेतला तर मुसलमान समाजाचे मन बनविण्यात धर्मांचा सहभाग कोणता हे स्पष्ट होईल.

इस्लामची मूलभूत तत्त्वे पाच आहेत. रोजा (रमजानचा उपवास), नमाज (ईश्वराची प्रार्थना) हज (धर्मक्षेत्र मक्का-मदिनेची तीर्थयात्रा), जकात (धार्मिक दानधर्म), ही पाचपैकी चार तत्त्वे सरळ साधी असून ह्या चार तत्त्वांचे स्वरूप जगातल्या इतर सर्व धर्मांच्यासारखेच आहे. हिंदूंच्या परिभाषेत सांगायचे तर प्रभुचिंतन करावे, त्याची प्रार्थना करावी, तीर्थयात्रा करावी, दानधर्म करावा, त्याचे नावे उपवास करावेत, अशा प्रकारे ईश्वराला शरण जावे असा ह्या चार तत्त्वांचा आशय आहे, पाचवे तत्त्व अत्यंत निरुपद्रवी व साधे दिसणारे व अतिशय गुंतागुंत असणारे किंबहुना साऱ्या इस्लामधर्माचा गाभा असणारे आहेत. ह्या तत्त्वाला कलाम-इ-तोहीद म्हणतात. मी सांगताना ते शेवटी सांगितले तरी ते इस्लामचे आद्य तत्त्व आहे. त्यातूनच उरलेली चार तत्वे निघतात. हे कलाम-इ-तोहीद म्हणजे काय ? तर ऐक्याचे प्रतिपादन करणारे वचन. मूळ वचनाचा अर्थ असा आहे "सर्व

स्तुतीला पात्र असा तो एकच ईश्वर आहे व महंमद त्याचा संदेशवाहक म्हणजे रसूल आहे.' प्रथमदर्शनी तरी ह्यात आक्षेपार्ह असे काही नाही. ह्या सूत्राला मध्यवर्ती महत्त्व का ते समजून घेणे महत्त्वाचे आहे.

ईश्वर एकच आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे. सर्व स्तुतीला पात्र आहे. हा ह्या ऐक्य प्रतिपादनाचा एक भाग झाला. महंमद त्याचा रसूल म्हणजे संदेश सांगणारा आहे, हा दुसरा भाग आहे. महंमद पैगंबरांनी ह्या आज्ञा मानव जातीला दिल्या. त्या ईश्वरीय आज्ञा आहेत. त्या ईश्वरीय आज्ञांचा संग्रह कुराण आहे. पवित्र कुराणातील एक ईश्वरीय आज्ञा ही की ईश्वर एक असल्यामुळे धर्मही एकच आहे व तो कुराणामध्ये सांगितलेला हा धर्म परिपूर्ण व निर्दोष आहे. म्हणून त्यात बदल होऊ शकत नाही. महंमद पैगंबर शेवटचे प्रेषित असल्यामुळे ह्यानंतर ईश्वराचा नवा संदेश येऊ शकत नाही. म्हणून इस्लामच्या प्रथा परंपरेत धर्माचा काही भाग उपयोगशून्य झाला, रद्द झाला असे म्हणणारे, धर्मातील वचनात वदल करणारे अगर अर्थात बदल करणारे ते सारे धर्मद्रोही, देवद्रोही आहेत व मृत्युदंडास पात्र आहेत. इस्लाम ह्या साऱ्यांना जातिबहिष्कृत करतो. इस्लामच्या ह्या प्रथा परंपरा शतकानुशतके अंमलात राहिल्या. ह्या प्रथांची अंमलबजावणी आता भारतात करता येत नाही, उलट प्रत्येकजण धर्मात सुधारणा झाली पाहिजे असे म्हणतो व ते सहन करावे लागते. ही घटनाच भारतात मुसलमानांना धर्मस्वातंत्र्य नाही ह्याची द्योतक आहे असे ते मानतात.

महंमद पैगंबर शेवटचे प्रेषित आहेत. ह्या वाक्याचा अर्थ मुरडून निराळा करणारे अहमदिया मुसलमान मुसलमान नव्हेत. त्यांना इस्लाममधून बहिष्कृत मानावे. त्यांचा वध करणे गुन्हा मानू नये असे मुसलमानांना वाटते. (अनेक मुस्लिम देशांत कित्येक दशके अहमदियांचा वध करणे गुन्हा मानला जात नसे.) कुराणमध्ये सर्व जगभर ईश्वराची सत्ता व ईश्वराचा धर्म निर्माण करण्याचाही आदेश आहे. जगभर ईश्वरीय धर्माचा प्रचार करणार कसा ? इस्लामचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर हे नुसते धर्म प्रतिपादक व प्रचारक नाहीत. ते हातात शस्त्र घेऊन लढणारे सेनापती व राष्ट्रनिर्माते राजपुरुषही आहेत. महंमद पैगंबरांनी शस्त्र हाती का घेतले ? ते आक्रमक होते की संरक्षक होते ? ही चर्चा कितीही केली तरी एक मुद्दा स्पष्ट आहे. त्यांनी हाती शस्त्र घेतले व राज्य निर्माण केले. इथून राज्यकर्ता हा धर्मप्रसारक व धर्मगुरू हा राज्यकर्ता ठरला. ह्यानंतर ईश्वरीय धर्माचा जगभर प्रसार व जगभर ईश्वराची अधिसत्ता ह्या दोन्हींचा अर्थ एकच होतो. इस्लामची प्रजेवर इस्लामी धर्मशास्त्रानुसार चालणारी राजवट व ही राजवट निर्माण करण्यासाठी युद्धे.

राज्याच्या आत जे बिगर मुसलमान असतील त्यांना सतत अपमानित करावे, त्यांच्यावर कर लादावे, त्यांच्या धर्मावर टीका करावी, त्यांना दुय्यम नागरिक करावे हा इस्लामच्या प्रसाराचा एक मार्ग आहे. ह्याला जिझिया म्हणतात. अशा प्रकारे इतर धर्मियांना अपमानित करण्याची ईश्वरी आज्ञा आहे. तशा वागणुकीची इस्लाममध्ये दीर्घ प्रथा परंपरा आहे. जिझिया पैसे मिळविण्यासाठी नसून इतरांना अपमानित करण्यासाठी असतो ही खलिफांची आज्ञा व धर्मशास्त्रांची परंपरा आहे. (मुस्लिम विचारवंतानी हे सत्य दरवेळी नाकारले आहे.) ह्या मार्गाने सर्वांना मुसलमान करण्यास उशीर होतो हे पाहून सगळ्या अरबस्थानात जिझिया बाजूला ठेवून इस्लाम अगर मृत्यू ही भूमिका खलिफा उस्मान ह्याने स्वीकारली. भारतात ही भूमिकाच स्वीकारावी हा मुस्लिम धर्मपंडितांचा आग्रह होता. मुस्लिम राजे जिझियाच्या मार्गाने जाणे पुरेसे समजत. (हा संघर्षही भारतीय मुस्लिम विचारवंत नाकारतात.)

राज्याच्या आत धर्मप्रचारासाठी हनाफी परंपरेप्रमाणे जिझिया अगर इतर परंपरेप्रमाणे इस्लाम वा मृत्यू व राज्याच्या बाहेर शेजारच्या राज्यांना मुसलमान धर्म स्वीकारण्याचे आमंत्रण व ते नाकारल्यास जिहाद म्हणजे धर्मयुद्ध असा हा धर्मप्रसाराचा दुहेरी मार्ग आहे. पण जे मुसलमान आहेत ते अर्थांतर, आचारांतर करतील तर त्यांच्याही विरुद्ध लढले पाहिजे हाही जिहाद आहे. ह्यामुळे धर्म-द्रोह्यांना मृत्यूदंड देण्याचा हक्क निर्माण होतो. ईश्वरांच्या आज्ञेत एक आज्ञा अशी आहे की बिगर मुसलमानांशी केलेले करार पाळण्याची मुसलमानांना गरज नाही. त्यामुळे धर्मतःच मुसलमानांना इतरांशी खोटे बोलण्यास व करार करून तो तोडण्यास मुभा आहे. इस्लामेतरांना लुटण्याची, त्यांना गुलाम करण्याची परवानगी आहे. इतके तर धर्मग्रंथात ईश्वराची आज्ञा म्हणूनच आले आहे, ह्याला अनुसरून मुसलमान धर्मस्वातंत्र्याची कल्पना स्पष्ट करतात. धर्मस्वातंत्र्य म्हणजे मुसलमान करण्याचा हक्क (तबलीग), इतरांचे धर्म खोटे व भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्या खंडनाचा हक्क; सत्यधर्माचे कुणी खंडन करू लागला तर त्याविरुद्ध लढण्याचा हक्क, इस्लाम हा विजेता व पसरणारा धर्म असल्यामुळे त्यात प्रदेशनिष्ठा बसत नाही हे सांगण्याचा हक्क, बिगर मुस्लिम राजवटीशी प्रामाणिक राहण्यास धर्म-शास्त्राचा विरोधच आहे, त्यामुळे अशा निष्ठेतून मोकळीक; इस्लामी प्रजा व राष्ट्रे ह्यांच्याविषयी प्रेम बाळगण्याचा, त्यांचे कल्याण करण्याचा हक्क, धर्म स्वातंत्र्यात हे सारे येते. असे धर्मस्वातंत्र्य मुसलमानांना भारतात नाही म्हणून भारतात धर्म-स्वातंत्र्य नाही असे मुसलमान मानतात.

ह्या ठिकाणी दोन भोळसट प्रश्नांना उत्तर देणे प्राप्त आहे. ज्या देशात

मुसलमान बहुसंख्य नाहीत तिथे इस्लामी राज्य आणण्याचे धोरण समर्थनीय आहे का? ह्या प्रश्नाची तीन उत्तरे आहेत. प्रथम म्हणजे हा बहुसंख्य–अल्पसंख्येचा प्रश्न नसून गुणवत्तेचा प्रश्न आहे. इस्लाम हा सर्वश्रेष्ठ व एकमेव धर्म असल्यामुळे इस्लामी धर्मराज्याची गुणवत्ता सर्वश्रेष्ठ आहे. तिथे संख्येचा प्रश्न गैरलागू आहे. (जमात–ए–इस्लामीने हे उत्तर दिले आहे.) दुसरे म्हणजे इस्लामी राजवट आल्यानंतर फार दिवस मुसलमान अल्पसंख्य राहातच नाहीत. (हे इस्लामच्या इतिहासाचे उत्तर आहे.) तिसरे म्हणजे आम्हाला धर्म प्रचाराचे स्वातंत्र्य पूर्णपणे द्या म्हणजे आधी आम्ही बहुसंख्य होऊ मग न्यायतः इस्लामिक राज्य येईल. (हे उत्तर भारतीय अंजुमन–ए–तबलीगचे आहे.) दुसरा भोळसट प्रश्न असा की हे सारे अन्याय्य नाही का? मुस्लिम धर्मशास्त्राचे ह्याला उत्तर हे आहे की न्याय्य काय आणि अन्याय्य काय ह्यावर निर्दोष ईश्वराचा शब्द प्रमाण मानला पाहिजे. तो पवित्र कुराणात सापडतो. म्हणून येथे अन्याय जाणवणे हेच चूक आहे.

इस्लामच्या धर्मशास्त्राचे हे स्वरूप अतिशय तपशीलाने प्रथम जदुनाथ सरकारांनी मांडले. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. घुर्ये ह्यांनी मांडले. इतिहासाची साधने, पाश्चात्य संशोधक, स्वतः मुसलमान लेखक ह्यांनीही ह्याच कल्पनेला दुजोरा दिलेला आहे. राहुल सांकृत्यायन ह्यांच्यासमोर हेच रूप आहे. ही मंडळी हिंदुत्ववादी नसून हिंदू धर्माची कठोर चिकित्सा करणारी आहेत. जुन्या खिश्चन धर्माचे रूपही हेच आहे, ज्यूंना इतिहास असता तर धर्माचे रूप हेच राहिले असते. खिश्चन आणि इस्लामच्या विजयी इतिहासाने ह्या रूपावर श्रद्धा बळकट केली आहे. आज ह्या धर्मश्रद्धेतून बव्हंशी खिस्ती जग बाहेर पडलेले आहे. मुसलमान अजून त्याच वातावरणात आहेत, इतकाच फरक. हा फरक काळाचा व धर्मश्रद्धा सोडण्याचा आहे, धर्मरूपाचा नाही. कोणत्याही धर्माच्या सश्रद्ध माणसाला आधुनिक जीवनात समरस होणे कठीण आहे. धर्मश्रद्ध मुसलमानाला तर ते अगदीच अशक्य आहे. इस्लाममधील सुधारणेच्या सर्व चळवळी पवित्र ग्रंथावरील श्रद्धा अधिकच बळकट करणाऱ्या असल्यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट झालेला आहे.

स्वतःला पुरोगामी म्हणविणारे विचारवंत आपल्या धर्माविषयींचे सत्य मोकळेपणाने मान्य करण्यास सतत टाळाटाळ करीत आलेले आहेत. ह्या पुरोगामी विचारवंतांचा एक गट इस्लाममध्ये लोकशाही, समता, शांतता, न्याय, समाजवाद, सहिष्णुता इत्यादी सारे सद्गुण मूलतः आहेतच असे सांगण्याचा प्रयत्न करतो. दुसरा गट सर्व दोषांची जबाबदारी धर्म सोडून इतर कुणावर व म्हणजे माणसां-

च्यावर, मध्ययुगावर टाकून मोकळा होतो. प्रत्येकाची धर्म चिकित्सा टाळण्याची पद्धत स्वतंत्र असते. बहुतेकजण तर सरळ असे सांगतील की तुम्हाला इस्लामचे ज्ञान नाही. इंग्रजांनी व जातीयवाद्यांनी तुमची दिशाभूल केली आहे. मुसलमान आपल्या धर्माची प्रामाणिक चिकित्सा का टाळतो? कारण धर्म चिकित्सेची त्यांच्यात परंपराच नाही. (हमीद दलवाई व त्यांचे सहकारी ह्याला अपवाद समजायचे) हिंदू धर्मात चिकित्सेची एवढी मोठी परंपरा असून सुद्धा अजून माणसे धर्माच्या समर्थनासाठी लंगडे युक्तिवाद शोधतातच. मुसलमान समाजाला तर अजून आपल्या धर्माच्या उणिवांची जाणीवच झालेली दिसत नाही.

मी मुस्लिम धर्माच्या सामान्य भूमिकेविषयी वर माहिती दिलीच आहे. ह्या सामान्य भूमिकेतून इतरांच्यापेक्षा वेगळे राहण्याची प्रवृत्ती, धार्मिक व सांस्कृतिक अहंता, आक्रमक भूमिका, देशाबाहेर निष्ठा, सुधारणा विरोध, इतरांच्या समंजस उदारपणाचा अधिक्षेप, कांगावखोरपणा ह्या साऱ्या भूमिकांचा उदय होतो. वर हे म्हटलेच आहे की मुसलमानसुद्धा धर्माचा सोयीस्कर भाग स्वीकारतो व इतर भाग सोडून देतो. आपल्या सगळ्याच धार्मिक भूमिकांच्याविषयी मुसलमान आग्रही नसतात. इस्लाममध्ये व्याज अमान्य आहे. पण मुसलमान व्याज स्वीकारतात. स्वतः सावकारी करतात. अरब, पठाण, रोहिले अतिशय हिडीस सावकारशाहीसाठीच प्रसिद्ध होते. मुसलमान बिगर मुसलमान राजवटीचे नौकर राहात, हिंदू व्यक्तींचे नौकर राहातात. धर्माला मोडून हिंदू व्यक्तींचे फार चांगले निष्ठावान व प्रामाणिक मित्र होतात. प्रसंगी हिंदूंच्यासाठी त्यांनी जीवही दिले आहेत. जमेल तिथवर, परवडेल तितके धार्मिक राजकारण ते रेटतात. पण अडून राहात नाहीत. तडजोडी करतात.

अडचण ही आहे की भारतीय लोकशाहीत संस्थांचे संघटित असे राजकारण क्रमाने ऱ्हास पावत गेले आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या हुकमी संघटना आणि खात्रीलायक मते कुणाजवळच नाहीत. सारेचजण तडजोडी करीत गटशः मते हस्तगत करण्याच्या प्रयत्नात असतात. कार्यक्रमावर निष्ठा ठेवणारी संघटना नसली म्हणजे परंपराप्राप्त संघटना टिकविण्याचा व वापरण्याचा प्रयत्न होतो. हा प्रयत्न एका बाजूने सफल होत असताना दिसतो. जातीयवादावर आधारित गटांचे राजकारण हिंदूंच्यामधे व धर्माधिष्ठित राजकारण ख्रिश्चन, मुसलमान ह्यांच्यामध्ये वाढताना जे दिसते तो ह्याचा परिणाम आहे, दुसऱ्या बाजूने हा मार्ग विफल होताना दिसतो. कारण देशव्यापी जातीच भारतात नाहीत. जातींच्या बाहेर पडल्याविना भारताचा विचार करणे कठीण होते. धर्माधिष्ठित राजकारणाला तडजोडी पत्कराव्याच लागतात. मुसलमान कधी कॉंग्रेसमध्ये, कधी कम्यु-

निस्टांच्यासह, कधी विरोधी पक्षात असा फिरताना दिसतो. मुस्लिम जातीयवादाचे खरे सामर्थ्य मुस्लिम समाजात नाही. बहुसंख्याकांच्या तत्त्वशून्य, असंघटित राजकारणातून ते सामर्थ उगवते. हे जर आपण नीट समजून घेतले तर धर्मांधते-समोर शरणागती अगर धर्मांधतेला दुसऱ्या धर्मांधतेने उत्तर ह्याखेरीज निराळे प्रामाणिक मार्ग आहेत हे पटू शकेल.

◇ ◇ ◇

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 3233 / 24863
REFBK-0025463

## लेखांची पूर्वप्रसिद्धी :

---

लोकहितवादी/ ललित, फेब्रु. १९७२; पुढारी, फेब्रु. १९७२ ह्या दोन लेखांचा एकत्रीत स्वरूपातील लेख.

राजर्षी शाहू/ साधना, १५ ऑगस्ट १९७४.

स्वातंत्र्यवीर सावरकर/ 'प्रतिभा विलास', पुनर्मुद्रण : प्रतोद २८-२-८४.

मार्क्स आणि गांधी/ समीर, आक्टोबर १९७४.

कर्मवीर भाऊराव पाटील/ रयत, शिक्षण पत्रिका, सप्टे. १९७५.

कर्मयोगी अण्णासाहेब सहस्रबुद्धे/ साधना, एप्रिल १९८०.

लॉर्ड माऊंटबॅटन/ धर्मभास्कर, दिवाळी अंक १९७९.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन/ नंदीग्राम, सप्टे. १९७७.

एकाधिकारशाही/ साधना, निवडणूक विशेषांक जाने. १९८०.

जातीयवाद/ पुनर्मुद्रण : अजिंठा, रविवार पुरवणी २७-१-१९८२.

धर्म आणि मन/ मराठवाडा, दिवाळी अंक १९७३.





राजकारणातील एकाधिकारशाही, सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातील जातीयवाद आणि हिन्दु मुसलमानांच्या एकते आड येणारा धर्म ह्या तीन अंगांनी भारतातील ज्या महत्त्वाच्या सुधारकांनी कार्य केले त्यांच्या कर्तृत्वाचा 'अन्वय' लावणारे लेख ह्या संग्रहात संकलित केले आहेत. पहिल्या संग्रहाप्रमाणेच ह्या दुसऱ्याही संग्रहाचे वाचक स्वागत करतील अशी आशा आहे.

- संपादक

: आगामी प्रकाशन :

? ?

**( वाङ्मयीन लेखांचा संग्रह )**

पृष्ठ संख्या अंदाजे २०० मूल्य ५० रुपये

: संपादक :

प्रा. लक्ष्मीकांत देशपांडे प्रा. मधुकर राहेगावकर